CMYK

४२ वा वर्धापन दिन

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १० ऑगस्ट २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २५३ | पाने १२+१२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



## विचारपुष्प



युवा अवस्थेत प्रवेश करताना आपल्या शरीर-मन-बुद्धीच्या विकासाबरोबर अनायास वाढणाऱ्या वासना व गरजा अगदी आवश्यक त्या मर्यादेतच राहतील याची काळजी घेण्याचे ज्ञान, हेच खरे 'ज्ञान' आहे.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# खेळेल तोच बहरेल

**| पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन**
**| राष्ट्रकुल पदक विजेत्यांची घेतली भेट**

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

जो खेळेल, तोच बहरेल. भारताच्या खेळाडूंना मी नेहमीच प्रोत्साहन देतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. राष्ट्रकुल स्पर्धेत पदक पटकावणाऱ्या खेळाडूंची त्यांनी आज भेट घेतली आणि ग्लासगो येथील या क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

नरेंद्र मोदी यांनी पदकविजेत्यांशी संवाद साधला आणि आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याच्या त्यांचे कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि वचनबद्धतेचे कौतुक केले. देशातील क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तरुणांना मोठ्या प्रमाणात खेळासाठी प्रेरित करणारी क्रीडा संस्कृती निर्माण करण्याच्या महत्त्वावर भर दिला.

जो खेळेल तोच बहरेल हा खेळांचे महत्त्व आणि भारतातील तरुणांमधील अधिक सहभाग याविषयी मोदींच्या वारंवार येणाऱ्या संदेशापैकी एक आहे. नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी भारताच्या बदलत्या क्रीडा संस्कृतीबद्दल आणि तरुण खेळाडूंसाठी अधिक संधी निर्माण करण्याच्या गरजेबद्दल बोलताना हा वाक्यांश वापरला. जे खेळतील, त्यांचीच भरभराट होईल. सदैव भारताचा जयजयकार करा. भारत माता की जय! अशी पोस्ट मोदींनी इन्स्टाग्रामवर केली आहे.

आम्हाला, सर्व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांना आमच्या माननीय पंतप्रधानांनी आमंत्रित केले होते. आज आम्हाला खूप अभिमान आहे आणि त्यांना भेटणे हा एक अद्भुत अनुभव होता. ते अतिशय नम्र आहेत आणि त्यांना भेटून आम्हाला अतिशय आनंद झाला, अशी प्रतिक्रिया खेळाडूंनी व्यक्त केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत सेल्फी काढताना राष्ट्रकुल स्पर्धेतील पदक विजेते

### ज्युडोतही ऐतिहासिक कामगिरी

ज्युडोमध्येही भारताने ऐतिहासिक कामगिरी केली. अस्मिता डे आणि हर्षसिंह यांनी सुवर्णपदके जिंकून भारताला प्रथमच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या एकाच आवृत्तीत दोन ज्युडो सुवर्णपदके मिळवून दिली. भारताने या खेळात चार पदकांची कमाई केली आहे.

**मुष्टियुद्धाने दिली सर्वाधिक पदके**

सात सुवर्णांसह १० पदके जिंकून, भारतासाठी सर्वांत मोठे पदक योगदानकर्ता म्हणून मुष्टियुद्ध क्षेत्र उदयास आले. राष्ट्रकुल स्पर्धेमधील ही भारताची मुष्टियुद्धातील सर्वोत्तम कामगिरी होती, भारतीय महिलांनी सात सुवर्णपदकांपैकी पाच सुवर्णपदकांवर दावा केल्यामुळे ते विशेषतः प्रभावी होते. (वृत्तसंस्था)

# रशियन रेल्वे थेट पोहोचणार भारतात!

**| जागतिक व्यापाराचा नकाशा बदलण्याची शक्यता | सागरी मार्गावरील अवलंबित्व संपणार**

**मॉस्को, ९ ऑगस्ट**

रशियाने हिंद महासागरापर्यंत पोहोचण्यासाठी इराण आणि मध्य आशियातून जाणारा नवीन रेल्वे मार्ग उभारण्याची चाचपणी सुरू केली आहे. या प्रस्तावित भू-मार्गामुळे सागरी धोके टाळून आणि होर्मुझ सामुद्रधुनीशिवाय रशिया आणि भारतामधील थेट व्यापार अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.

रशियाचे उपपंतप्रधान मरात खुसनुलिन यांनी सरकारी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, रशिया आणि भारत हिंद महासागरापर्यंत रेल्वे मार्ग उभारण्याच्या शक्यतेवर गांभीर्याने विचार करत आहे. असा पर्यायी रेल्वे मार्ग तयार झाल्यामुळे सध्याच्या सागरी मार्गांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. बोस्फोरस आणि होर्मुझ जलमार्गासारख्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या सागरी मार्गांवर निर्माण होणारी जोखमी टाळण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू शकतो. हिंद महासागरापर्यंत रेल्वेचा हा प्रस्ताव केवळ नवीन व्यापारी मार्ग तयार करण्याची योजना नसून, तो रशियाच्या मोठ्या रणनीतीचा भाग आहे, ज्याद्वारे रशिया-भारत आणि आशियाई देशांसोबतचा आपला भू-मार्गावरील (जमिनीवरील) व्यापार संपर्क अधिक मजबूत होऊ शकतो. (वृत्तसंस्था)




### तुर्कमेनिस्तानमार्गे येणार

रशियाचे अफगाणिस्तान आणि इराणशी जवळचे संबंध आहेत. रशियन रेल्वे तुर्कमेनिस्तानमध्ये आल्यानंतर अफगाणिस्तान, इराणमधून हा मार्ग पाकिस्तानमार्गे भारताला जोडू शकतो. यामुळे रशियन इंधन भारतापर्यंत पोहचू शकते. यामध्ये पाकिस्तानने अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्यास इराणमार्गे रशियन इंधन आणि अन्य साहित्य थेट अरबी समुद्रापर्यंत येऊ शकते.

## ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर चिखल, चपलांचा मारा

**कोलकाता, ९ ऑगस्ट**

उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हलीशहर येथे रविवारी पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना लोकांच्या तीव्र विरोधाचा सामना करावा लागला. तृणमूल काँग्रेसच्या एका मृत कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी जात असताना आंदोलकांनी त्यांच्या गाडीला घेराव घातला, चोर, 'डकैत रानी' अशा घोषणा देत त्यांच्या वाहनावर चिखल, चपला आणि दगड भिरकावल्याचा आरोप आहे.

पोलिस कोठडीत कथितरीत्या मृत्यू झालेल्या तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी गेलेल्या ममता बॅनर्जी यांना पोलिसांच्या सुरक्षा घेऱ्यातून मार्गक्रमण करावे लागले. (वृत्तसंस्था)

# विधानसभेला विद्यार्थी आज घेराव घालणार

**तिसऱ्या बैठकीत ५० टक्के मागण्या मान्य, सीबीआय चौकशीवर अडले घोडे**

**रांची, ९ ऑगस्ट**

रांचीमध्ये विद्यार्थी आणि सरकार यांच्यातील बैठकांची तिसरी फेरी रविवारी सुमारे पाच तास चालली. या बैठकीत आंदोलकांच्या ५० टक्क्यांहून अधिक मागण्या मान्य झाल्यात. सरकारने १४ वी जेपीएससी आणि २०२३ व २०२५ च्या जेपीएससीच्या अनुत्तीर्ण परीक्षा रद्द करण्यास सहमती दर्शवली. याशिवाय, जेपीएससी सुधारणांवरही एकमत झाले. परंतु, सीजीएल परीक्षेवर सहमती होऊ शकली नाही. तसेच टीडीपीएलद्वारे घेण्यात येणारी परीक्षा रद्द करण्यावरही कोणताही निर्णय झाला नाही, अशी माहिती विद्यार्थी शिष्टमंडळाने दिली.

सरकारसोबतच्या चर्चेनंतर विद्यार्थी नेते कुणाल म्हणाले, आम्ही सोमवारी विधानसभेला घेराव घालणार आहोत. हे आंदोलन शांततापूर्ण असेल. आमची मागणी सीबीआय चौकशीची आहे. आम्ही यावर कोणतीही तडजोड करणार नाही. दरम्यान, सरकारने सांगितले की, ईडी गैरप्रकारांची चौकशी करेल. एक जलदगती न्यायालय स्थापन केले जाईल. तज्ज्ञांच्या मतानुसार सुधारणा लागू केल्या जातील. सीजीएल परीक्षा केंद्र सरकारने घेतली होती. आम्ही ती स्वतःहून रद्द करू शकत नाही, असेही सरकारने स्पष्ट केले. रांचीमधील विद्यार्थी आंदोलनादरम्यान जेपीएससीचे सदस्य अजिता भट्टाचार्य, जमील अहमद आणि अनिमा हंसदा या तिघांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.



पत्रपरिषदेत घडामोडीची माहिती देताना विद्यार्थी नेते

**९० दिवसांच्या आत आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करणार**

झारखंडचे मंत्री सुदिव्या कुमार सोनू यांनी सांगितले की, १४ व्या जेपीएससी आणि २०२३-२५ च्या बॅकलॉग भरतीमधील अनियमितता दुहेरी दृष्टिकोनातून सोडवण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. सीआयडी गुन्हेगारी बाबींची चौकशी करेल. याशिवाय, आर्थिक परिणाम आणि बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांच्या पुराव्यांच्या आधारे चौकशी करण्यासाठी ईडीला विनंती केली जाईल. त्यानंतर एक जलदगती न्यायालय स्थापन केले जाईल आणि ९० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल केले जाईल. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### रथ हत्या प्रकरणात आरोपत्र सादर

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांचे निकटवर्तीय आणि वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्या हत्येच्या प्रकरणात सीबीआयने कोलकाता येथील विशेष न्यायालयात ११ आरोपींविरोधात आरोपपत्र सादर केले. रथ यांच्या हत्याप्रकरणात त्यांच्या कार्यालयातच काम करणारे भाजपाचे दोन कार्यकर्ते सागर सोनकर आणि साहिब सोनकर यांनीच हा कट रचल्याचे आरोपपत्रात म्हटले आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी, म्हणजेच ६ मे रोजी मध्यमग्राम येथे चंद्रनाथ रथ यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

### 'एनटीए' बळकट करण्यासाठी चर्चा

**नवी दिल्ली** : केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी रविवारी राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) संबंधित बाबींवर चर्चा करण्यासाठी शिक्षण सचिवांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. संस्थात्मक यंत्रणा मजबूत करण्यासाठी, परीक्षा प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी आणि एनटीएला विद्यार्थ्यांसाठी अधिक उत्तरदायी बनवण्यासाठीच्या उपाययोजनांवर या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. एनटीए संबंधित बाबींवर शिक्षण मंत्रालयाचे सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह एक बैठक बोलवली. संस्थात्मक यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी चर्चा केली, असे जोशी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# एअर इंडियाच्या दोन वैमानिकांची ड्रग चाचणी

## विमान हेलकावे प्रकरणात सेवेतून बडतर्फ

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

फुकेत ते दिल्ली या एअर इंडियाच्या विमानात झालेल्या हेलकाव्याच्या घटनेनंतर दोन्ही वैमानिकांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. या घटनेतील दोन्ही वैमानिकांची स्थापित नियमांनुसार ड्रग चाचणी करण्यात आली, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने रविवारी दिली.

मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, विमानांच्या मुख्य वैमानिकाचा अहवाल असा होता की त्याची पुष्टि करण्यासाठी पुन्हा चाचणी करणे आवश्यक होते. नमुने नियुक्त प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. अंतिम अहवाल प्रलंबित आहे. ही चाचणी अशा कोणत्याही घटनेनंतरच्या सामान्य प्रक्रियेचा एक भाग आहे. अहवाल प्राप्त होईपर्यंत त्याचा परिणाम काय होईल हे निश्चित केले जाऊ शकत नाही परंतु दोन्ही वैमानिकांना सेवेतून काढून टाकले आहे. ते आता विमान उडवू शकणार नाहीत.

**विमानात १३४ प्रवासी होते, १२ जखमी**

४ ऑगस्टला फुकेतहून येणाऱ्या विमानात १३४ प्रवासी होते. फुकेत-दिल्ली विमान एआय-२३७९ दिल्लीत उतरणार होते. त्यावेळी निरभ्र आकाश असताना विमानात अचानक धक्का (क्लिअर एयर टर्ब्युलन्स) जाणवला.

### मराठा आरक्षणाची १० टक्के पदे तूर्तास रिक्त ठेवा : हायकोर्ट

**मुंबई, ९ ऑगस्ट -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) २०२३ च्या जाहिरातीअंतर्गत झालेल्या भरती प्रक्रिया मराठा आरक्षणाच्या १० टक्के कोट्याचा पूर्वलक्षी प्रभावाने समावेश करता येईल का, याबाबतचा अंतिम निर्णय होईपर्यंत १० टक्के पदे रिक्त ठेवण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला दिले आहेत. मात्र, निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पदांवर रुजू होण्यास न्यायालयाने परवानगी दिली.

सोलापूर तरुण भारत

सस्नेह निमंत्रण

Precision PRINTS

४२ वा वर्धापन दिन...

सप्रेम नमस्कार,
गेली ४२ वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे.
वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे.
मराठवाडा, सोलापूर तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथेही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा

**॥ वर्धापन दिन ॥**

आपले स्नेहांकित

**सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड**

श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) | श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) | श्री. प्रशांत माने (मुख्य संपादक)

संचालक मंडळ, तरुण भारत व प्रिसिजन प्रिंटस् परिवार

✻ स्थळ ✻

मंगळवार दि.११ ऑगस्ट २०२६, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल,
तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.






CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

**इम्फाळ:** मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यातून, बंदी घातलेल्या विविध संघटनांशी संबंध असलेल्या चार बंडखोरांना सुरक्षा दलांनी अटक केली आहे, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. बंदी घातलेल्या 'कांग्ली यावोल कन्ना लुप' या संघटनेचा सदस्य असलेला व नवीन सदस्यांच्या भरतीमध्ये गुंतलेला ख्वैराकपम रोजित सिंग याला बिष्णुपूर जिल्ह्यातील थामनापोकपी मखा येथून अटक करण्यात आली. त्याच जिल्ह्यातील नाओरेम मायाई लेईकाई भागात, नाओरेम प्रियोकुमार सिंग याला कथित खंडणीखोरीच्या कारवायांसाठी अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

### 'मराठी'ची सर्व संकेतस्थळे आता नव्या पत्त्यावर

**मुंबई:** मराठी भाषा विभाग आणि त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयांच्या सातही संकेतस्थळांचे महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत 'maharashtra.gov.in' या मानक डोमेनवर यशस्वीपणे हस्तांतरण करण्यात आले आहे. तांत्रिक प्रक्रियेनंतर ही सर्व संकेतस्थळे आता नव्या पत्त्यांवर नियमितपणे कार्यान्वित झाली असून नागरिकांच्या सेवेत रुजू झाली आहेत. 'महाआयटी'च्या माध्यमातून हे हस्तांतरण करण्यात आले. या हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान आवश्यक ते तांत्रिक आणि प्रणालीगत बदल करण्यात आल्यामुळे संबंधित संकेतस्थळे काही काळासाठी तात्पुरती अनुपलब्ध होती. मात्र, आता ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली असून, सर्व संकेतस्थळे नव्या डोमेनवर सुरळीतपणे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये मराठी भाषा विभागासह, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य आणि संस्कृती मंडळ आदी महत्त्वाच्या विभागांचा समावेश आहे.

### दिल्लीत जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

नवी दिल्ली: बाह्य उत्तर दिल्लीतील जुगाराच्या एका कथित अड्ड्यावर छापा टाकून दिल्ली पोलिसांनी २२ जणांना अटक केली आणि सुमारे ६.२ लाख रुपयांची रोकड जप्त केली. भालस्वा डेअरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुकुंदपूर भागातील 'सोम बाजार' येथील एका इमारतीत रविवारी पहाटे हा छापा टाकण्यात आला, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.या ठिकाणी जुगार अड्डा चालवला जात असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर, पोलिस पथकाने छापा टाकण्यापूर्वी संबंधित इमारतीला वेढा घातला आणि तिचे प्रवेश व बाहेर पडण्याचे मार्ग बंद केले. ■

# ९२ गावांत लोकशाहीचा सूर्योदय

## स्वातंत्र्यानंतर प्रथमच फडकणार तिरंगा, छत्तीसगडमध्ये माओवाद्यांचा बीमोड

**रायपूर, ९ ऑगस्ट**

छत्तीसगडमध्ये स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतर नक्षलवाद्यांचा बीमोड करण्यात यश आले असून, कधीकाळी माओवाद्यांचा गड असलेल्या राज्यातील ९२ गावांमध्ये यावर्षी १५ ऑगस्टला पहिल्यांदाच तिरंगा फडकणार असल्याची



माहिती उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी दिली. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला या भागांत नक्षलवादी काळे आणि लाल झेंडे फडकवून बहिष्कार टाकायचे, मात्र आता येथे, भारताचा राष्ट्रध्वज डौलाने फडकणार असल्याचे त्यांनी सांगितले.



गेली अनेक दशके नक्षलवादाच्या दहशतीखाली जगणाऱ्या छत्तीसगडमधील बस्तर भागातील तब्बल ९२ गावांमध्ये स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच १५ ऑगस्ट रोजी तिरंगा ध्वज फडकावला जाणार आहे. ३१ मार्च रोजी या भागात सशस्त्र नक्षलवाद्यांचा बीमोड केल्यानंतर येणारा हा पहिलाच राष्ट्रीय उत्सव आहे. या ९२ गावांमध्ये बीजापूर जिल्ह्यातील ३३, सुकमा जिल्ह्यातील ५० आणि नारायणपूर जिल्ह्यातील ९ गावांचा समावेश असल्याची माहिती शर्मा यांनी पत्रपरिषदेत दिली. नक्षली हिंसाचारामुळे हा भाग विकासापासून कोसो दूर राहिला. आता या भागात विकासाची कामे झपाट्याने सुरू असून, नागरिकांना मुख्य प्रवाहाशी जोडले जात आहे. बस्तरच्या प्रत्येक गावात आता तिरंगा यात्रा काढली जाईल. सिलगेर, टेकालगुडम, रानीबोदली आणि दरभा सारखी दुर्गम भागांतील गावेही तिरंगा यात्रेने जोडली जातील. भारतीय जनता युवा मोर्चा आणि स्थानिक तरुण या मोटरसायकल रॅलीत सहभागी होऊन देशभक्तीचा संदेश देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**दुर्गम भागातून जाणार तिरंगा यात्रा**

वर्षभरापूर्वी नक्षलवाद्यांच्या भीतीमुळे या भागात जाणे असुरक्षित होते, मात्र यावर्षी पहिल्यांदाच बस्तरच्या दुर्गम भागात तिरंगा यात्रा काढली जाणार असून, येथील नागरिकांना देशभक्तीचा संदेश दिला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे, नक्षलविरोधी अभियानात बलिदान दिलेल्या शूर जवानांच्या स्मरणार्थ, बस्तरमधील ५०० हून अधिक शाळा, प्रमुख चौक आणि सार्वजनिक इमारतींना त्यांची नावे दिली जातील, असेही शर्मा यांनी सांगितले. पूर्वी भीतीपोटी जगणारे नागरिक आता मोकळा श्वास घेत आहेत. स्वातंत्र्यानंतर, या १५ ऑगस्टला संपूर्ण बस्तर भागात लोकशाही आणि देशभक्तीचा नवा सूर्योदय बघायला मिळेल. ◂ (वृत्तसंस्था)

# 'जमात'च्या २६ ठिकाणांवर छापे

## गुन्हेगारीविषयक दस्तावेज, साहित्यासह इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त

**श्रीनगर, ९ ऑगस्ट**

बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्यांतर्गत बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामी गटाविरुद्ध दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाचा भाग म्हणून पोलिसांनी रविवारी जम्मू आणि काश्मीरमधील सोपोर जिल्ह्यात या गटाशी संबंधित २६ ठिकाणी छापे टाकले. या शोधमोहिमेदरम्यान विविध ठिकाणांहून गुन्हेगारी सिद्ध करणारे दस्तऐवज, साहित्य आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केले.



बंदी घातलेल्या संघटना आणि फुटीरतावादी गटांविरुद्धच्या आपल्या सातत्यपूर्ण कारवाईचा एक भाग म्हणून सोपोर पोलिसांनी जमात-ए-इस्लामी (जेआय)विरुद्ध यूएपीए अंतर्गत दाखल गुन्ह्याच्या तपासासंदर्भात २६ ठिकाणी समन्वित शोधमोहीम राबवली. या कारवाईत विविध भागांतील जैश-ए-इस्लामीचे नेते, सदस्य आणि कार्यकर्त्यांशी संबंधित निवासी आणि इतर ठिकाणांवर ही शोधमोहीम राबवण्यात आली. प्रतिबंधित संघटनेशी संबंधित पुढील दुवे आणि कारवाया निश्चित करण्यासाठी सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून जप्त केलेल्या साहित्याची तपासणी केली जात आहे.प्रतिबंधित संघटना आणि फुटीरतावादी कारवायांशी संबंधित जाळे आणि परिसंस्था उद्ध्वस्त करण्यासाठी व राष्ट्राची सुरक्षा, सार्वभौमत्व आणि अखंडतेला बाधा आणणाऱ्या कारवायांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या जम्मू-काश्मीर पोलिसांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक भाग आहे, असेही त्या अधिकाऱ्याने सांगितले.

**दहशतवादाशी संबंधित ७० लाखांची मालमत्ता जप्त**

जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील पोलिसांनी रविवारी दहशतवादाशी संबंधित प्रकरणात ६९.८२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली. २००८ च्या दहशतवादी कारवायांशी संबंधित एका प्रकरणात न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

तसेच सोपोर येथील एनआयए न्यायालयाकडून दुसऱ्या एका आरोपीविरोधात अटक वॉरंट मिळवण्यात आले आहे. जप्त केलेल्या मालमत्तेत चंदूसा भागातील आरोपी परवेझ अहमद फामदाच्या मालकीच्या १२ कनाल (१.५ एकर) जमिनीचा समावेश आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# महेश चंद्र त्रिपाठी होणार मुख्य न्यायाधीश

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

सर्वोच्च न्यायालयाच्या निवड मंडळाने चार न्यायमूर्तींची विविध उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली. अलाहबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पदासाठी शिफारस करण्यात आली.

निवड मंडळाचे अध्यक्ष सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वात ६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सध्या दिल्ली उच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्या. व्ही. कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांची कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात आली. पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाचे न्या. अश्वनी कुमार यांची त्या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे. दुसऱ्या एका निर्णयात निवड मंडळाने उच्च न्यायालयांमधील दोन न्यायमूर्तींच्या बदलीची शिफारस केली आहे. सध्या ओडिशा उच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्या. मानस रंजन पाठक यांची गुजरातला बदली करण्यात आली. ◂ (वृत्तसंस्था)

# आसाममधील पूरस्थिती अजूनही गंभीर

## दीड लाख लोक बेघर

### मृतांचा आकडा ९९ वर

**दिसपूर, ९ ऑगस्ट**

आसाममधील पूरस्थिती अजूनही गंभीर बनलेली आहे. राज्यात यावर्षी पुरामुळे जीव गमावणाऱ्यांची संख्या ९९ वर पोहोचली असून १ लाख ४७ हजारांहून अधिक नागरिकांवर घर सोडण्याची वेळ आली आहे.

अनेक भागांत घरे आणि रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे मोठ्या संख्येने लोकांना घर सोडून मदत छावण्यांमध्ये निवारा घ्यावा लागला आहे.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या माहितीनुसार, गोलाघाट जिल्ह्यात आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, त्यामुळे यावर्षी पुरामुळे जीव गमावलेल्यांची एकूण संख्या ९९ वर पोहोचली. सध्या राज्यातील १२ जिल्हे अजूनही पुराच्या प्रभावाखाली आहेत. यामध्ये सोनितपूर, नागाव, गोलाघाट, शिवसागर, होजाई, दरांग, जोरहाट, धेमाजी, चराईदेव, कार्बी आंगलोंग, लखीमपूर आणि विश्वनाथ या जिल्ह्यांचा समावेश आहे. पुराचा सर्वात मोठा फटका गोलाघाट जिल्ह्याला बसला आहे, जिथे ६१,७३५ नागरिक बाधित झाले आहेत. त्यानंतर शिवसागरमध्ये ४३,४९२ आणि जोरहाटमध्ये २४,२८३ लोक पुरामुळे प्रभावित झाले आहेत. ◂ (वृत्तसंस्था)



आसमच्या गोलाघाट जिल्ह्यातील एका गावाला पुराने घातलेला वेढा

# भाविकांवर काळाचा घाला; अपघातात सहा जण ठार

**धार, ९ ऑगस्ट**

मध्य प्रदेशातील धार येथे रविवारी सकाळी एक भीषण अपघात झाला. बडनावर-बरवानी-उज्जैन रस्त्यावर चुकीच्या बाजूने येणाऱ्या एका कंटेनरने भाविकांच्या इको कारला धडक दिली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू तर एक जखमी झाला. मृतांमध्ये तीन महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. सर्व मृत तरुण गुजरातच्या दाहोद जिल्ह्यातील रहिवासी होते.



पोलिसांनुसार, अपघातग्रस्त इको कारमधील लोक महाकालचे दर्शन घेतल्यानंतर घरी परतत होते. महामार्गावर चुकीच्या दिशेने येणाऱ्या एका कंटेनरने त्यांच्या कारला धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, कारचा चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. कारमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्यात आले. सहाय्यक पोलिस अधिक्षक विजय दावर यांनी सांगितले की, कंटेनर चालक चुकीच्या बाजूने गाडी चालवत होता. तो दारुच्या नशेत होता, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांनी कंटेनर चालकाला अटक केली असून तपास सुरु आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# गाडगेबाबा मिशनचे आधारवड बापूसाहेब देशमुख कालवश

## गाडगेबाबांचा सहवास लाभलेले व्यक्तिमत्त्व

**अमरावती, ९ ऑगस्ट**

कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा आयुष्यभर जपणारे, नागरवाडी इंद्रभुवनचे शिल्पकार आणि गाडगेबाबा मिशन मुंबईचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब देशमुख यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने रविवारी पहाटे २.३० वाजता निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते.



अमरावती जिल्ह्यामध्ये चांदूरबाजार तालुक्यातील नागरवाडी या गाडगेबाबांच्या अंतिम श्रद्धास्थानी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. बापूसाहेब देशमुख यांना संत गाडगेबाबांचा प्रत्यक्ष सहवास लाभला होता. गाडगेबाबांनी संपूर्ण महाराष्ट्रात उभारलेल्या शाळा, आश्रमशाळा आणि धर्मशाळांच्या माध्यमातून गोरगरिबांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्यात बापूसाहेबांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या निधनाने गाडगेबाबांच्या विचारांवर निष्ठा ठेवून जगणारे एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली व आप्तपरिवार आहे. अमरावती येथील गाडगेबाबा समाधी मंदिरात बापूसाहेबांचे पार्थिव काही वेळ ठेवण्यात आले होते. अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर येथे सायंकाळी ५ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ◂ (तभा वृत्तसेवा)



बापूसाहेब देशमुख यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनाने संत गाडगेबाबांच्या विचारांची आणि सेवाकार्याची एक निष्ठावंत दीपज्योत हरपली आहे. नागरवाडी येथे त्यांनी उभे केलेले सेवाकार्य, समाजासाठी केलेला त्याग आणि मानवतेप्रती असलेली त्यांची निस्सीम बांधिलकी सदैव प्रेरणादायी राहील.

– **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



सुखासीन आयुष्याचा त्याग करून बापूसाहेबांनी गाडगेबाबांची दशसूत्री आचरणातून जगली. त्यांच्या निधनाने गाडगेबाबांच्या तत्त्वनिष्ठ समाजसेवेच्या परंपरेतील एक मजबूत आधारस्तंभ हरपला आहे.

– **चंद्रशेखर बावनकुळे**, महसूल मंत्री तथा पालकमंत्री अमरावती



ऐश्वर्याचा त्याग करून कर्मयोगी संत गाडगेबाबांची दशसूत्री आयुष्यभर जगणारे बापूसाहेब हे निष्ठावंत समाजकारणाचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्राची कधीही भरून न निघणारी मोठी हानी झाली आहे.

– **डॉ. अनिल बोंडे**, खासदार राज्यसभा

## केंद्रीय मंत्र्याच्या कन्येचा कुचिपुडी नृत्याचा कार्यक्रम

**संसदेचे** पावसाळी अधिवेशन आता शेवटच्या आठवड्यात पोहोचले आहे. आतापर्यंतच्या तीन आठवड्यात सभागृहात गदारोळ आणि गदारोळच झाला, नाही म्हणायला सरकारने या गदारोळात काही महत्वपूर्ण विधेयके पारित करुन घेतली. सभागृहाचे कामकाज वारंवार स्थगित होत होते, त्यामुळे सदस्यांनाही काय करावे, हे समजत नव्हते. अशातच एका कार्यक्रमाने सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांना काहीसा दिलासा मिळाला.

केंद्रीय मंत्री रालोदचे जयंत चौधरी यांची कन्या इलेशाच्या कुचिपुडी नृत्याच्या कार्यक्रम नुकताच दिल्लीत झाला. आता पंधरा वर्षाच्या असलेल्या इलेशाने वयाच्या साडेचार वर्षापासून कुचिपुडी नृत्याचे प्रशिक्षण घेतले. पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित डॉ. राजा रेड्डी आणि डॉ. राधा रेड्डी तसेच कौशल्या रेड्डी यांचे मार्गदर्शन तिला मिळाले. कमानी ऑडिटोरियममध्ये झालेल्या या कार्यक्रमाला जयंत चौधरी यांनी आपल्या सर्वपक्षीय खासदार मित्रांना बोलावले होते, आणि बहुतांश खासदार उपस्थितही राहिले. संसदेतील रोजचा गोंधळ पाहण्यापेक्षा इलेशाच्या कुचिपुडी नृत्याचा कार्यक्रम निश्चितच बहारदार होता. केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल, माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, सुरेंद्रसिंग नागर, कार्तिकेय शर्मा, आरपीएन सिंग, राजीव शुक्ला, राजीव राय, महिमाकुमारी मेवार, संगीताकुमारी सिंगदेव यांच्यासह अनेक खासदार यावेळी उपस्थित होते. सामान्यपणे अधिवेशनाला शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस सुट्टी असते, त्यामुळे सदस्य शुक्रवारीच आपापल्या मतदारसंघात रवाना होता, पण यावेळी या खासदारांनी इलेशाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी मतदारसंघात जाणे रद्द केले.

●●

## केरळ काँग्रेसमधील प्राणिसंग्रहालय

**लोकसभेच्या** पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी आपल्या आक्रमक रुपाचे दर्शन घडवले. आतापर्यंतच्या संसदेच्या सर्व अधिवेशनाच्या तुलनेत राहुल गांधी यांनी यावेळी सरकारला सळो की पळो करुन सोडले. काँग्रेसच्या कार्यकाळात भाजपातील अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, अरुण जेटली आणि सुषमा स्वराजसारखे नेते सरकारला जसे धारेवर धरत तसेच राहुल गांधींनी यावेळी केले. राहुल गांधींची समजून काढण्याचा प्रयत्न सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दोनतीन वेळा केला. एकदा त्यांनी राहुल गांधींची प्रत्यक्ष भेट घेतली आणि दोनदा फोनवर चर्चा केली, पण राहुल गांधी आपल्या भूमिकेपासून माघार घ्यायला तयार नाहीत. त्यामुळेच राहुल गांधी आमचे शत्रू नाही तर विरोधक आहे, असे विधान रिजिजू यांनी केले.

संसदेच्या अधिवेशनाचे कामकाज एक दिवस नेहमीच्या गोंधळामुळे स्थगित करण्यात आले. संसदभवनाच्या बाहेर राहुल गांधी केरळच्या खासदारांसोबत गप्पागोष्टी करत होते.




केरळ काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि कन्नूरचे खासदार के. सुधाकरन यांचा उल्लेख राहुल गांधी यांनी कन्नूरचे सिंह असा केला. कारण सुधाकरन यांना डाव्यांच्या बालेकिल्ल्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रचंड झुंज द्यावी लागते. अलेप्पीचे खासदार आणि काँग्रेसचे संघटनमहासचिव केसी वेणुगोपाल यांचा उल्लेख राहुल गांधी यांनी अलेप्पीचे वाघ असा केला. मावेलिक्काराचे खासदार के. सुरेश यांना तुम्ही काय म्हणून संबोधित कराल, असा प्रश्न पत्रकारांनी राहुल गांधी यांना विचारला असता, त्यांनी मावेलिक्काराचे हत्ती असे त्यांचे वर्णन केले. सुरेश या मतदारसंघातून सलग आठवेळा निवडून आले, हे त्यांना हत्ती म्हणण्यामागचे कारण आहे. एकंदरीत केरळ काँग्रेस हा पक्ष कमी आणि प्राणिसंग्रहालयच जास्त आहे, असे म्हणायला हरकत नाही.

●●

## वायको राहुल गांधींपेक्षाही तरुण

**एमडीएमकेचे** नेते वायको यांच्या लोकसभेतील भाषणाच्या चार खंडाचे प्रकाशन राजधानी दिल्लीत नुकतेच एका कार्यक्रमात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्या उपस्थितीत झाले. वायको तीन दशके लोकसभेचे सदस्य होते. या काळात त्यांनी लोकसभेत केलेल्या भाषणांचे हे खंड आहेत. आपल्या भाषणात सर्वच नेत्यांनी वायको यांचे कौतुक करतांना अजूनही ते कसे सक्रिय आहे, हे सांगतांना त्यांचे तरुण असे वणून केले. वायको यांना तरुण म्हणून सिध्द करण्याची नंतर अहमहमिकाच सुरु झाली. माकपचे जॉन ब्रिटास यांनी ८२ वर्षीय वायको यांचे वर्णन व्यासपीठावरील सर्वात तरुण नेता असे केले. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात ब्रिटास यांच्या मताला दुजोरा देत वायको खरोखरच तरुण असल्याचा निर्वाळा दिला. राहुल गांधी यांच्या भाषणानंतर ब्रिटास यांनी पुन्हा एकदा पोडियमवर येत वायको फक्त तरुण नाही राहुल गांधीपेक्षाही तरुण असल्याचा उल्लेख करताच सभागृहात हास्याचा स्फोट झाला. स्वतः वायको आणि राहुल गांधी यांनाही हसू आवरले नाही.

●●

## हाताची घडी अन् तोंडावर बोट

**संसदेत** अनेक पक्षांच्या खासदारांना समोर पत्रकार विशेषतः वाहिन्यांचे पत्रकार दिसले की बोलण्याचा मोह आवरत नाही. प्रसिध्दीच्या झोतात राहण्यासाठी ते काहीतरी बोलून जातात. अशा बोलण्याने कधी ते स्वतः अडचणीत येतात, तर कधी पक्षाला अडचणीत आणतात, वा कधी विरोधकांच्या होती मोठा मुद्दा देतात. भाजपमध्ये अशा खासदारांची संख्या खूप जास्त आहे, जे अतिउत्साहात काहीतरी वेडेवाकडे बोलून जातात. त्यामुळे वाहिन्यांना दिवसभरासाठी एखादा विषय मिळून जातो. सभागृहातील कामकाज स्थगित झाल्यावर खासदार संसदभवनातून बाहेर निघाण्यासाठी मकर द्वारातून बाहेर पडतात. वाहिन्यांच्या पत्रकारांनी गोरखपूरचे भाजपा खासदार रविकिशन यांना पडकले आणि संसदेतील गदारोळाच्या संदर्भात त्यांची प्रतिक्रिया विचारली. रविकिशन यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नकार देत माझे सध्या मौनव्रत सुरु असल्याचे सांगितले. मला माझ्या एका महाराजांनी मौनव्रत राखायला सांगितले आहे. त्यामुळे मी काहीही बोलणार नाही, श्रावण महिना संपेपर्यंत माझे मौन व्रत राहणार आहे, असे सांगत रविकिशनयांनी आपली सुटका करुन घेतली. भाजपाने ज्या काही मोजक्या खासदारांना न बोलण्याची सूचना केली, त्यात रविकिशनही आहेत, अशी चर्चा आहे. त्यामुळे त्यांनी हाताची घडी तोंडावर बोट अशी भूमिका घेतली आहे, असे म्हणतात.

**दिल्लीवाला**

### आज केजरीवालविरुद्धच्या याचिकेवर सुनावणी

**नवी दिल्ली:** २०२१-२२ च्या अबकारी धोरणाशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिलेल्या जामिनाला आव्हान देणाऱ्या ईडीच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. ईडीने २०२४ मध्ये दाखल केलेली याचिका न्या. मनोज जैन यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यात आली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात केजरीवाल यांना दिलासा दिला आहे. १२ जुलै २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत अटकेची गरज आणि आवश्यकता या मुद्द्याशी संबंधित तीन प्रश्न मोठ्या न्यायासनाकडे सोपवताना मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर केला होता. ■

# जेऊर येथे मारहाणीत जखमी झालेल्या 'युपी'च्या कामगाराचा अखेर मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

जेऊर (ता. अक्कलकोट)येथे मारहाणीत जखमी झालेल्या उत्तर प्रदेश येथील एका कामगाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी सायंकाळी पाच वाजता मृत्यू झाला. संदीप कुमार (वय ३० वर्ष, रा. प्रयागराज, उत्तर प्रदेश. सध्या रा. जेऊर ता. अक्कलकोट) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो जेऊर येथील एका कंन्स्ट्रक्शन कंपनीत काम करीत होता.१ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास जेऊर गावाजवळ किरकोळ भांडणातून कामगारापैकी सागर आणि दयानंद यांनी त्याला काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली होती. त्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला अक्कलकोट येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून तेथीलच एका खाजगी दवाखान्यात आठ दिवस उपचार करून शेवटी मित्र दीप कुमार यांनी शनिवारी दुपारी येथील शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले होते. त्याचा उपचारादरम्यान सायंकाळी सव्वा पाच वाजता मृत्यू झाला. मयत संदीप कुमार हा विवाहित असून तो दोन महिन्यांपूर्वी आपल्या भावासोबत जेऊर येथील कन्स्ट्रक्शन कंपनीत कामासाठी आला होता. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





भारत आणि अमेरिकन नौदलातील सैनिकांनी दक्षिण नौदल कमांडचे तळ असलेल्या कोची येथे संयुक्त सराव केला. पाणसुरुंग शोधून ते नष्ट करण्यात तज्ज्ञ असलेले सैनिक व अधिकारी सरावात सहभागी झाले होते

## अमली पदार्थ तस्कराला अटक

**हैदराबाद, ९ ऑगस्ट**

तेलंगणाच्या अमली पदार्थ विरोधी पथक ईगलने अमली पदार्थांची कथित विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करुन त्याच्याकडून २.५ लाख रुपये किमतीचे ३३० ग्रॅम हॅश ऑइल जप्त केले. विजयवाडा-हैदराबाद महामार्गावर बसमधून उतरल्यानंतर या अमली पदार्थ तस्कराला पकडण्यात आले. आंध्र प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्याचा रहिवासी आणि चालक म्हणून काम करणाऱ्या या आरोपीला यापूर्वी गांजा विक्रीच्या एनडीपीएस प्रकरणांमध्ये अटक करण्यात आली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये त्याची जामिनावर सुटका झाली होती. जामिनावर सुटल्यानंतर, तो सोशल मीडियाच्या माध्यमातून ओडिशातील एका ड्रग पुरवठादाराच्या संपर्कात आला होता. (वृत्तसंस्था)

# सौदीच्या प्रकल्पावर हूथी बंडखोरांचे हल्ले

**। संरक्षण करारानंतर पहिल्यांदाच क्षेपणास्त्राचा मारा**
**। जाझान तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे नुकसान**

**रियाध, ९ ऑगस्ट**

येमेनच्या हुथी बंडखोरांनी सौदी अरबच्या अल जुबैल येथील सरकारी तेल शुद्धीकरण कंपनी सौदी अरामकोच्या बारी वायू प्रकल्पावर क्षेपणास्त्राचा मारा केला. यात प्रकल्पाचे मोठे नुकसान झाल्याने तेथील कामकाज बंद करण्यात आले. हा प्रकल्प सौदीतील सर्वात मोठ्या वायू प्रक्रिया केंद्रांपैकी एक आहे. याशिवाय जाझान तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि औद्योगिक वसाहतीवरही हल्ले चढविण्यात आल्याने येथे शनिवारी रात्री अनेक स्फोट झाल्याचे वृत्त आहे. विशेष असे की, पाकिस्तान, तुर्की आणि सौदीचा दोन दिवसांपूर्वीच संरक्षण करार झाला. 'इस्लामिक नाटो'ची स्थापनेचा दावा करताना एका देशावर हल्ला झाल्यास तिन्ही देशांवर हल्ला झाल्याचे मानले जाईल, असे करारात नमूद आहे. अशातच हूथीने केलेल्या हल्ल्यानंतर सौदीच्या मदतीला पाकिस्तान, तुर्की येणार का, असा प्रश्न आहे. सौदीवरील हल्ल्याला २४ तासांचा आणि संरक्षण कराराला ४८ तासांचा कालावधी झाला असताना लष्करी मदतीसंदर्भात तुर्की आणि पाकिस्तानच्या वतीने प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान हुथीने शनिवारी रात्री अल जुबैल येथील औद्योगिक वसाहतीला लक्ष्य करत क्षेपणास्त्राचा मारा केला. हा परिसर जगातील सर्वात मोठ्या पेट्रोकेमिकल आणि औद्योगिक केंद्रांपैकी एक आहे, जो जागतिक पेट्रोकेमिकल पुरवठ्यापैकी अंदाजे ८ टक्के वाटा उचलतो. जुबैल सौदी अरेबियाच्या जीडीपीमध्ये ७ टक्के पेक्षा जास्त योगदान देते आणि येथे सौदी अरामको, साबिक, एक्सॉनमोबिल, डाऊ केमिकल आणि शेवरॉन फिलिप्स यांसारख्या प्रमुख कंपन्या आहेत.

**नागरिकांमध्ये दहशत**

सौदी अरबच्या ऊर्जा मंत्रालयाने हुथीकडून झालेल्या हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, जाझानमधील सौदी अरामकोच्या एका प्रकल्पावर क्षेपणास्त्राचा मारा करण्यात आला. यामुळे अरामकोसह जाझान तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. यामुळे दोन्ही प्रकल्पातील काम थांबवण्यात आले. या हल्ल्यात निवासी भाग आणि औद्योगिक परिसराचे नुकसान झाले आहे. आम्ही या हल्ल्याचा निषेध करतो आणि संरक्षणासाठी ताकदीने प्रत्युत्तर देण्यासाठी वचनबद्ध आहे. दरम्यान सौदी सरकारने जीवितहानी संदर्भात माहित जारी केली नाही.

**क्षेपणास्त्रांनीच प्रत्युत्तर देणार**

सौदीवरील हल्ल्यानंतर इराकी हरकत हिजबुल्लाह अल-नुजाबा मिलिशियाचे नेते शेख अक्रम अल-काबी यांनी एक चित्रफित जारी करत म्हटले की, क्षेपणास्त्रांना केवळ क्षेपणास्त्रांनीच प्रत्युत्तर दिले जाईल. त्यांची ऊर्जा केंद्र आमच्या लक्ष्यावर आहे, हे त्यांनी विसरू नये. (वृत्तसंस्था)


हल्ल्यानंतर तेल शुद्धीकरण आणि वायुप्रकल्पांना आग लागली

### हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल

पीएमएफशी संलग्न असलेल्या मिलिशिया गटाचे सरचिटणीस अल-काबी यांनी इराक आणि तेथील लोकांवरील हल्ल्यांमध्ये सौदीचा सहभाग असल्याचा आरोप केला. अल-काबी म्हणाले, तिरस्करणीय वहाबी अल-सौद राजवटीसोबत राजनैतिक संबंधांचा पर्याय निरुपयोगी आहे. त्यांनी आरोप केला की, इराक आणि तेथील लोकांना लक्ष्य करणाऱ्या असंख्य कटामागे सौदी अरेबचा हात असून, त्यांना याची किंमत चुकवावी लागेल. ■

# नोकरी गमावल्यास अमेरिका सोडावी लागणार




### ट्रम्प प्रशासन कोणते बदल करण्याच्या तयारीत ?

परदेशी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना नोकरी गमावल्यानंतर नवीन रोजगार शोधण्यासाठी अमेरिकेत राहता यावे, यासाठी २०१७ मध्ये ६० दिवसांचा कालावधी सुरू करण्यात आला होता. नियमात बदल करण्यासाठी एक प्रस्ताव तयार करण्यात आला असून, याला मंजुरी मिळाल्यास नोकरी गेलेले परदेशी नागरिक हद्दपारीसाठी पात्र ठरतील. ही तरतूद ई-१, ई-२, ई-३, एच-१ बी, एच१बी१, एल-१, ओ-१ आणि डीएन श्रेणीतील अनिवासी व्हिसाधारकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना लागू होईल. ■

## रोजगार शोधण्याचा ६० दिवसांचा कालावधी रद्द करण्याचा प्रस्ताव

**वॉशिंग्टन, ९ ऑगस्ट**

अमेरिकेत काम करणारे परदेशी व्यावसायिक आणि नोकरी करणाऱ्यांना धक्का देणारा नवा नियम अमेरिकेत आणला जाणार असून, त्या दिशेने गृह सुरक्षा विभागाने हालचाली सुरू केल्या आहे. यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, त्यात नोकरी गमावल्यास अथवा व्यवसाय बंद पडल्यास परदेशी नागरिकांना चोवीस तासात देश सोडावा लागेल अशी तरतूद आहे.

गृह सुरक्षा विभागाने (डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी) ६० दिवसांचा नोकरी शोधण्याचा कालावधी रद्द करण्यासाठी एक प्रस्ताव पुनरावलोकनासाठी सादर केला आहे. जर याची अंमलबजावणी झाली, तर अनेक व्हिसाधारक आणि त्यांचे कुटुंबीय नोकरी संपल्यानंतर देशात राहण्याची सध्याची संधी गमावतील. गृह सुरक्षा विभागाचा एक प्रस्ताव सध्या फेडरल ऑफिस ऑफ मॅनेजमेंट अँड बजेट (ओएमबी) येथे पुनरावलोकनासाठी सादर करण्यात आला आहे. ही माहिती कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. जर या प्रस्तावाला अंतिम मंजुरी मिळाली, तर अमेरिकेतील वास्तव्याचा निर्धारित कालावधी संपण्यापूर्वी नोकरी गमावणाऱ्या अनिवासी व्हिसाधारकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपलब्ध असलेला ६० दिवसांचा कालावधी रद्द होईल आणि त्यांना चोवीस तासात देश सोडावा लागेल. (वृत्तसंस्था)




### भारतीयांवर कसा होणार परिणाम?

६० दिवसांचा कालावधी रद्द केला गेला, तर ज्या परदेशी नागरिकांची नोकरी गेल्यास, किंवा त्यांनी राजीनामा दिल्यास त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना तत्काळ अमेरिका सोडावी लागेल. अशा व्यक्तींना अमेरिकेत त्यांच्या व्हिसाची स्थिती किंवा नियोक्ता बदलता येणार नाही. सध्या अमेरिकेत भारतीयांची लोकसंख्या अंदाजे ५.२ दशलक्ष आहे. एच-१बी रोजगार व्हिसाच्या सर्वात मोठ्या लाभार्थ्यांमध्ये भारतीय नागरिकांचा समावेश आहे. मात्र नव्या नियमाने अमेरिकेतील भारतीय नागरिकांच्या अडचणी वाढणार आहे. ■

## चित्रपट वार्ता

### 'टीव्हीएफ'चा मराठी सिनेमात धमाका




**मुंबई :** 'कोटा फॅक्टरी', 'पंचायत', 'सपने वर्सेस एवरीवन' आणि 'गुल्लक'सारख्या गाजलेल्या मालिकांनंतर 'द वायरल फीवर' अर्थात 'टीव्हीएफ'ने आता आणखी एक मोठी घोषणा केली आहे. वेगळ्या धाटणीच्या कथांसाठी ओळखल्या जाणाऱ्या या प्रॉडक्शन हाऊसने मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्याची घोषणा केली असून, त्यांच्या पहिल्या मराठी चित्रपटाचे नाव 'बयांगीः पलायची नाही, तालायची' असे आहे. निर्मात्यांनी एका गूढ पोस्टरद्वारे या चित्रपटाची घोषणा केली. या पोस्टरमध्ये एका नारळाशेजारी दिवा ठेवलेला दिसत आहे. हा चित्रपट हॉरर प्रकारातील असून कोकणातील सर्वाधिक भयावह लोककथांपासून प्रेरित आहे. विशेष म्हणजे, यात अलौकिक घटनांसोबत विनोदाचा रंजक मिलाफ पाहायला मिळणार आहे. सुपरनॅचरल लोककथेच्या पार्श्वभूमीवर कथा पुढे सरकणार असली, तरी तिची मांडणी गंभीर न ठेवता मनोरंजन आणि विनोदाने परिपूर्ण करण्यात आली आहे. ■

### 'ऑपरेशन सफेद सागर' एक युद्धकथा



**मुंबई :** कारगिल युद्धाची कहाणी आतापर्यंत अनेक दृष्टिकोनांतून मांडली गेली आहे. मात्र, 'ऑपरेशन सफेद सागर' ही मालिका या युद्धातील तुलनेने कमी चर्चिल्या गेलेल्या एका महत्त्वपूर्ण पैलूवर प्रकाश टाकते. १९९९च्या कारगिल युद्धादरम्यान भारतीय हवाई दलाने पार पाडलेल्या ऐतिहासिक उच्च-उंचीवरील मोहिमेवर आधारित ही नेटफ्लिक्स मालिका आहे. सखोल संशोधन आणि प्रत्यक्ष घटनांच्या आधारावर साकारलेली ही मालिका 'गोल्डन एरोज स्क्वाड्रन'च्या शौर्याला सलाम करतेच; पण युद्धाची भावनिक किंमतही तितक्याच प्रभावीपणे मांडते. त्यामुळे ॲक्शन आणि भावनांचा योग्य समतोल साधण्यात ही मालिका कितपत यशस्वी ठरते, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. १६ हजार ते १८ हजार फूट उंचीवरून पाकिस्तानी सैन्याच्या मजबूत ठिकाणांवर हल्ले करणाऱ्या या मोहिमांमध्ये मिग-२१, मिग-२३ आणि मिग-२७ या लढाऊ विमानांनी अत्यंत धोकादायक मिशन पार पाडले होते. ही मालिका त्याच थरारक मोहिमांचा अनुभव प्रेक्षकांसमोर पुन्हा उभा करते. ■

### सिनेमा-३-अफेयरच्या अफवांचे मृणालकडून खंडन



**मुंबई :** अभिनेत्री मृणाल ठाकूर गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी तिचे नाव भारतीय क्रिकेटपटू यशस्वी जायसवालसोबत जोडले गेले. मृणालचे नाव यापूर्वीही अनेक कलाकारांशी जोडले गेले आहेत. मात्र, यशस्वी जायसवालसोबत तिच्या डेटिंगच्या चर्चा सुरू झाल्यानंतर सोशल मीडियावर अफवांना उधाण आले. मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील एका कॅफेमध्ये मृणाल आणि यशस्वी एकत्र दिसल्याचा दावा करणारा एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या चर्चांना सुरुवात झाली. दोघेही कॅफेमधून बाहेर पडताना दिसल्याचे सांगत सोशल मीडियावर अनेकांनी त्यांच्या नात्याबाबत अंदाज बांधण्यास सुरुवात केली. मात्र, या चर्चांना मृणाल ठाकूरने पूर्णविराम देताना देशात खूप काही घडत आहे. 'जेन-झी'कडे लक्ष द्या, अशा शब्दात अफवा उडविणाऱ्यांना सुनावले. ■

# कोलंबियामध्ये भीषण वणवा

**लाखो लोकांना सुरक्षितस्थळी हलवले; निवासी भागांना धोका वाढला**


कॅनडातील कोलंबिया जंगलात लागलेली भीषण आग

**ओटावा, ९ ऑगस्ट**

कॅनडाच्या ब्रिटिश कोलंबिया प्रांतात भीषण वणवा पेटला आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आग वेगाने पसरत असून, सरकारने जंगलालगतच्या भागातील लाखो लोकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे आणि आणिबाणी जाहीर केली.

कॅनडाच्या पश्चिम प्रांतातील ब्रिटिश कोलंबियामध्ये वेगाने पसरणाऱ्या वणव्यामुळे आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आग निवासी भागांकडे ढकलली जात असून, अनेक वस्त्यांना धोका निर्माण झाला आहे. व्हँकुव्हर येथे झालेल्या पत्रकारपरिषदेत प्रीमियर डेव्हिड एबाय यांनी सांगितले की, परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. आगीची परिस्थिती क्षणोक्षणी बदलत आहे. शनिवारच्या रात्री मोठ्या संख्येने लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. यामुळे आणीबाणी जाहीर करणे आवश्यक झाले, ज्यासाठी सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्याकरिता विशेष अधिकारांची आवश्यकता आहे., लोकांचे प्राण वाचवणे आणि मदतकार्यात साहाय्य करणे हे सरकारचे प्रथम प्राधान्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की, आगीत अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी हवाई मार्गाने बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. (वृत्तसंस्था)

**आणिबाणी जाहीर**

### सरकार सर्वोतोपरी मदत करणार : कार्नी

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की. आग विझवण्याच्या आणि मदतकार्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. गेल्या काही दिवसांपासून वायव्य ओंटारियोमध्ये वणवे पेटले असून, त्यामुळे अनेक भागांमध्ये हवेची गुणवत्ता खालावली आहे. राजधानी ओटावा आणि कॅनडाचे सर्वात मोठे शहर टोरोंटो यांनाही धुराचा फटका बसला. वणव्यांमुळे निर्माण झालेल्या धूर आणि आर्द्रतेमुळे ओटावामध्ये हवा गुणवत्तेचा इशारा जारी करण्यात आला. ■

# कोलकातात विमान अपघात टळला

**आकाशात घालाव्या लागल्या घिरट्या**

**कोलकाता, ९ ऑगस्ट**

क्वालालंपूरहून १५९ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या मलेशिया एअरलाइन्सच्या एमएच-१८४ या विमानाला शनिवारी रात्री नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरताना अडचणींचा सामना करावा लागला. विमानतळ सूत्रांनुसार, कॉकपिटच्या दिशेने येणाऱ्या लेझर बीममुळे वैमानिकाचे लक्ष विचलित झाले. हे विमान शनिवारी रात्री ११:२० वाजता उतरणार होते.

विमान विमानतळाच्या धावपट्टीपासून सुमारे आठ नॉटिकल मैल अंतरावर असताना वैमानिकाने मध्यमग्राम-बारासात दिशेकडून कॉकपिटच्या दिशेने येणारा एक तेजस्वी लेझर बीम बघितला. अचानक आलेल्या तेजस्वी लेझर बीममुळे वैमानिकाची दृष्टी क्षणभर बाधित झाली. त्यामुळे तो क्षणभर दिशाहीन झाला. परिणामी, विमानाचे नियोजित लँडिंग चुकले आणि पुन्हा उतरण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्याला आकाशात घिरट्या घालण्यास भाग पडले. अखेरीस रात्री सुमारे ११:२५ वाजता विमान सुरक्षितपणे उतरले. विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर, एअरलाइनने विमानतळ प्रशासनाला माहिती दिली.

**पोलिसात तक्रार, तपास सुरू**

कोलकाता विमानतळ प्रशासनाने नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलिस ठाण्यातही तक्रार दाखल केली आहे. कोलकाता विमानतळाचे संचालक विक्रम सिंह यांनी सांगितले की, विमानतळ परिसरात लेझर लाईट्सच्या वापरास बंदी आहे. तथापि, अशा घटना अधूनमधून घडतात. त्याचा परिणाम विमान वाहतुकीवर होऊ शकतो. पोलिस अधिकाऱ्यांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली असून ते तपास करत आहेत. यापूर्वीही वैमानिकांनी टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान लेझर लाईट्समुळे त्यांच्या दृष्टीवर परिणाम होत असल्याची तक्रार केली आहे. (वृत्तसंस्था)

## भारतीय महिलेची हत्या; जोडीदाराला अटक

**टोरोंटो, ९ ऑगस्ट**

एका भारतीय महिलेच्या हत्येप्रकरणी सात महिन्यांनंतर टोरोंटोमध्ये तिच्या जोडीदाराला अटक करण्यात आली. बऱ्याच काळापासून फरार राहल्यानंतर तो कॅनडात परतला असता त्याला शुक्रवारी टोरोंटो विमानतळावर अटक करण्यात आली. अब्दुल गफूरी, असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर प्रथम श्रेणी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॅनडामध्ये प्रथम श्रेणी हत्येच्या गुन्ह्यासाठी जन्मठेपेची सक्तीची शिक्षा असून, २५ वर्षांपर्यंत पूर्ण पॅरोलची कोणतीही तरतूद नाही.

हे प्रकरण हिमांशी खुराना यांच्या हत्येशी संबंधित आहे. ती गतवर्षी डिसेंबरमध्ये टोरोंटोमधील एका निवासस्थानात मृतावस्थेत आढळली होती. (वृत्तसंस्था)

# प्रश्न विचारणे अस्सल भारतीय परंपरा

**'अर्जुनाच्या प्रश्नांतूनच 'भगवद्गीते'चा जन्म : राज्यपाल'**

**मुंबई, ९ ऑगस्ट**




कोणतीही गोष्ट जशी आहे तशी न स्वीकारता चौकस बुद्धीने प्रश्न विचारणे, हा पाश्चात्त्य विचार नसून तो आपल्या समृद्ध अन् अस्सल भारतीय संस्कृतीचाच भाग आहे. अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला प्रश्न विचारले नसते, तर जगभरात 'ग्रंथांचा ग्रंथ' म्हणून गौरवली गेलेली 'भगवद्गीता' निर्माणच झाली नसती, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

मुंबईत 'इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाइट नेशन्स' संस्थेच्या वतीने आयोजित 'आयमीन' चॅम्पियनशिप परिषदेच्या सांगता सत्रात राज्यपाल बोलत होते. देशातील १०० शहरांमधील आणि ५ देशांतील २,१०० हून अधिक 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' युवा प्रतिनिधींशी त्यांनी थेट संवाद साधला.



भारतीय परंपरेतील स्त्रीशक्तीच्या योगदानाचा गौरव करताना राज्यपाल म्हणाले की, आपल्या संस्कृतीत अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. या सर्व स्त्रिया आपल्या काळातील बंडखोर होत्या. त्यांनी सरधोपट मार्ग न निवडता शक्य तिथे प्रस्थापितांना सवाल केले. सावित्रीने तर स्वतःच्या बुद्धिमत्ता आणि तर्कशुद्ध संवादाच्या जोरावर प्रत्यक्ष मृत्यूची देवता असलेल्या यमराजालाही सवाल केले होते, हीच भारतीय विचारांची खरी ताकद आहे. (तभा वृत्तसेवा)

### 'नेति नेति' संकल्पनेतून सत्यान्वेषण

उपनिषदांमधील 'नेति नेति' (हे नाही, हेही नाही) या उल्लेखाचा संदर्भ देत राज्यपालांनी सांगितले की, या संकल्पनेमुळेच भारतीय तत्त्वज्ञानात सत्यान्वेषण नवनव्या मार्गाने झाले. ही संकल्पना मानवी मनातील चौकस बुद्धीला चालना देणारी आहे. ■

### नियमांच्या चौकटीतच स्वातंत्र्याचा खरा आनंद

स्वातंत्र्य आणि शिस्त यांचा सुंदर मेळ घालताना राज्यपालांनी शास्त्रीय संगीताचे उदाहरण दिले. एखाद्या रागातील स्वरांची चौकट पाळली, तरच वेगवेगळे गायक त्या चौकटीत राहून नवनवीन पद्धतीने गाण्याचे स्वातंत्र्य उपभोगू शकतात. गाण्याचा आनंद घेण्यासाठी रागाची चौकट जशी कसोशीने पाळावी लागते, तसेच ठराविक नियमांच्या चौकटीत राहूनच स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेता येतो, असा मौलिक मंत्र त्यांनी तरुणाईला दिला. ■

## अग्रलेख

# एफसीआरए आणि पोटशूळ

या वर्षाच्या सुरुवातीला संसदेत सादर झालेल्या परकीय योगदान नियमन दुरुस्ती विधेयकावर विरोधकांनी टीकेचे रान उठविले आहे. या विधेयकाचे अजून कायद्यात रूपांतर झाले नसले तरी त्यावर थेट अमेरिकेत प्रतिक्रिया उमटत आहेत. अमेरिकन काँग्रेसचे खासदार रिले मूर यांनी या विधेयकावर आक्षेप घेत दोन्ही देशांच्या संबंधांवर याचा परिणाम होणार असल्याची धमकी दिली. हा कायदा काही नवीन नाही. भारताच्या अंतर्गत राजकीय बाबी आणि संस्थांमध्ये परकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी आणिबाणी सुरू असताना १९७६ मध्ये हा कायदा सर्वप्रथम लागू करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर जवळपास २८ वर्षांनी जाग आल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांनी हा कायदा लागू केला. या २८ वर्षांच्या काळातच पूर्वोत्तर भारतात ख्रिश्चन मिशनरीज मोठ्या प्रमाणात कार्यरत झाल्या. आज मणिपूर, आसाम सोडले तर सेव्हन सिस्टर्समध्ये मिझोराम, मेघालय, नागालँण्ड, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा या राज्यांमध्ये हिंदू आणि स्थानिक आदिवासी समुदाय बऱ्या पैकी अल्पसंख्यक झाला. सिलिगुडी कॉरिडॉरपासून अतिपूर्वेकडील ही सातही राज्ये भारतापासून वेगळी करण्याचा डाव ख्रिश्चन मिशनरीजनी आखला होता. त्यासाठी परदेशातून मोठ्या प्रमाणात निधी आला. या सातही राज्यांकडे काँग्रेस सरकारने ६० वर्षे दुर्लक्ष केले. ख्रिश्चनांनी आपले पाय पक्के रोवल्यानंतर उरलीसुरली कसर मुस्लिमांनी भरून काढली. बांगलादेश १९७१ मध्ये स्वतंत्र झाला पण, त्याची झळ आसाम, पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा या राज्यांना बसली. लाखोंच्या संख्येने बांगलादेशी मुस्लिम या तिन्ही राज्यांमध्ये आले आणि तेथील जमिनीवर कब्जा करीत कायमचे बस्तान बसविले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ओडिशा, मध्यप्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, झारखंड या राज्यांमधील आदिवासीबहुल भागांना लक्ष्य करीत मोठ्या प्रमाणात धर्मांतर घडवून आणले. आज तर पंजाबात शिखांचे धर्मांतर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी परकीय शक्ती आणि परदेशातून येणारा पैसा ओतला जात आहे. हिंदूंचे पैशाच्या बळावर करण्यात येणारे धर्मांतर रोखण्यासाठी मोदी सरकारने परकीय नियमन योगदान कायद्यात सुधारणा करणारे विधेयक आणले आहे. या विधेयकावरून आता राजकारण सुरू झाले आहे. कारण, देशात सुरू असलेल्या धर्मांतराचे मूळच हा पैसा आहे. या मुळावर घाव घालण्याचा तरतुदी नवीन विधेयकात आहेत. म्हणूनच तर विरोधकांना पोटशूळ उठला आहे.

विधेयकातील प्रस्तावित बदल हे स्वयंसेवी संस्था आणि धर्मादाय संस्थांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणारे असल्याची ओरड विरोधकांनी सुरू केली आहे. पूर्वी विदेशी निधी मिळालेल्या संस्थांचा काही हिशेबच लागत नव्हता. विदेशातून बक्कळ पैसा येत असल्याने देशात अब्जावधी रुपयांच्या मालमत्ता जमविण्यात आल्या. हजारो संस्थांनी परवान्याचे नूतनीकरणही केले नाही. पैशाचा हिशेब नाही. परकीय निधीचा वापर कोणत्या कामासाठी केला याची काटेकोर नोंद नाही. काँग्रेस सरकारच्या काळात, २०१० मध्ये या कायद्यात सुधारणा करून परवाना वैधतेचा कालावधी पाच वर्षे निश्चित करण्यात आले. मोदी सरकारने २०२० मध्ये त्यात बदल करीत नियम कडक केले. बाहेरून येणारा निधी दिल्लीतील स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत एका विशिष्ट खात्याद्वारेच येणे बंधनकारक करण्यात आले. दर पाच वर्षांनी नूतनीकरण बंधनकारक करण्यात येऊनही हजारो संस्थांनी या नियमाचे पालन केले नसल्याचे आढळले. परवाने कालबाह्य किंवा रद्द झाल्यानंतर त्या अब्जावधी रुपयांच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनाबाबतचे कोणतेही स्पष्ट नियम नव्हते. मालमत्तांवर अवैधरीत्या कब्जा करण्यात आल्याचे अथवा स्वतःच्या फायद्यासाठी उपयोग केल्याच्या घटना समोर आल्या. याला आळा घालण्यासाठी सरकारने कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेत नवीन विधेयक गेल्या मार्च महिन्यात संसदेत मांडले. देशभरात कार्यरत अथवा बंद पडलेल्या स्वयंसेवी संस्थांबाबत गेल्या जुलै महिन्यात एक आकडेवारी बाहेर आली. यामध्ये २०२४ पासून ते जुलै २०२६ पर्यंत २२ हजारांहून जास्त स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द झाले, तर १५ हजारांहून अधिक संस्थांचे परवाने कधीचेच कालबाह्य झालेत. सध्या देशात १४४३४ अधिकृत संस्था अशा आहेत, ज्यांना नियमानुसार विदेशातून निधी मिळत आहे. ज्या उद्देशासाठी स्वयंसेवी संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या, त्याला अनेक संस्थांनी हरताळ फासला. विदेशातून आलेला पैसा हडप केला गेला. हा निधी देशविघातक किंवा धर्मप्रसारासाठी वापरण्यात आल्याची शंका घेतली जाते. कारण परिस्थिती तशी दिसते. या सर्व गोष्टी टाळण्याच्या उद्देशाने एफसीआरए कायद्यात सुधारणा करणारे विधेयक आणले गेले आहे. तसे पाहिले तर नियमांचे पालन करून कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला काहीही अडचण होण्याचे कारण नाही. संस्थेचा परवाना नूतनीकरणासाठी वेळेवर अर्ज केला नाही किंवा अर्ज फेटाळल्यास एफसीआरए परवाना कालबाह्य समजण्यात येईल, अशी महत्त्वाची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. सोबतच विहित मुदतीत एखादी स्वयंसेवी संस्था पुन्हा परवाना प्राप्त करू शकली नाही तर संस्थेची सर्व मालमत्ता सरकारच्या मालकीची होईल. ही मालमत्ता विकण्याचा अथवा हस्तांतरित करण्याचा अधिकार सरकारला मिळणार आहे. परदेशातून आलेल्या निधीचा अपहार झाल्यास नव्या विधेयकात थेट संचालक, विश्वस्त आणि पदाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. आणखी काही बदलही सुचविण्यात आले आहेत. पण, या दुरुस्त्यांना ईशान्य राज्यांमधील चर्च, ख्रिश्चन धर्मादाय संस्थांनी विरोध करणे सुरू केले आहे. सोबतच काँग्रेस, द्रमुक, डावे पक्ष आणि शरद पवार गटानेही विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या तरतुदी कोणत्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाहीत, अशी घोषणा मिझोरामचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी केली आहे. वास्तविक पाहता लालदुहोमा कडवे ख्रिश्चन आहेत. ४ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांनी अमेरिकेतील मेरीलॅण्ड येथे भाषण देताना, आम्हाला मिझोराम हे वेगळे ख्रिश्चन राष्ट्र हवे, असे विधान केले होते. यावरून ते नव्या एफसीआरए दुरुस्ती विधेयकाला का विरोध करीत आहेत, हे दिसून येते. विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाले तर आपल्या हाती काहीच उरणार नाही, याची भीती काहींना सतावत आहे.

वास्तविक पाहता हा नियम काही फक्त ख्रिश्चन अथवा मुस्लिम स्वयंसेवी संस्थांनाच लागू होईल, असे नाही. कायदा सर्वांसाठी असेल. ६ ऑगस्टला देशभरातील ख्रिश्चन धर्मगुरू आणि स्वयंसेवी संस्थांच्या १७ सदस्यीय शिष्टमंडळाने संसद भवन परिसरात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. शाह यांनी या शिष्टमंडळाला कोणते आश्वासन दिले हे अजून बाहेर आले नसले तरी सरकार १३ ऑगस्टला संसदेत हे दुरुस्ती विधेयक आणणार असल्याची चर्चा आहे. या काळात सर्व खासदारांना संसदेत उपस्थित राहण्याबाबतचा व्हीपही भारतीय जनता पक्षाने जारी केला आहे. सोबतच रालोआच्या घटक पक्षांनाही व्हीप बजावला आहे. देशाच्या सुरक्षेसाठी आणि संस्कृती रक्षणासाठी हे दुरुस्ती विधेयक पारित होणे आवश्यक आहे. हिंदू कुणाचेही धर्मांतर करीत नाहीत. प्रत्येक धर्माचा आदर करण्याची भावना प्रत्येक हिंदूची आहे. मात्र, याउलट हिंदूंचे धर्मांतर करण्याचे प्रयत्न अन्य धर्मीयांकडून सुरूच आहेत. २०१४ मध्ये जर केंद्रात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले नसते तर आज हिंदूंची स्थिती दयनीय झाली असती. मुस्लिम आणि ख्रिश्चनांच्या धर्मांतराचा वरवंटा आणखी वेगाने फिरला असता. त्यामुळे सरकारने कुणाच्याही दबावाला बळी न पडता एफसीआरए दुरुस्ती विधेयक पारित करणे अगत्याचे झाले आहे. अशा मुद्यावरचे पोटशूळ भारताला नवे नाहीत! ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# जंतर मंतर छू मंतर!

जंतर मंतर आता छू मंतर होणार? सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेवरून हा अंदाज बांधला जात आहे. जंतर मंतरवर कोणत्याही आंदोलनास परवानगी देण्यात येऊ नये अशी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली असून त्यावर सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत, न्या. जोयमाल्या बागची आणि न्या. मोहाना या तीन न्यायमूर्तींचे पीठ सुनावणी करीत आहे.

**जनहित याचिका :** जंतर मंतर भागात राहणाऱ्या काही लोकांनी ही जनहित याचिका दाखल केली असून, या भागात वारंवार होणाऱ्या आंदोलनामुळे, आम्हाला दैनंदिन असुविधांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आंदोलनाची ही जागा बदलून दुसऱ्या ठिकाणी आंदोलनाला परवानगी देण्यात यावी अशी सूचना या याचिकेत करण्यात आली आहे. शिवाय वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणाऱ्या अडचणी, प्रवेश व बाहेर जाण्याचे मार्ग या बाबी विचारात घेता ही मागणी महत्त्वाची आहे अशी टिप्पणी करीत सरन्यायाधीशांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी याबाबत सरकारची भूमिका जाणून घ्यावी असे सांगितले आहे. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका न फेटाळता, ती महत्त्वाची असल्याचे म्हटले आहे.

**२० जुलैचा संसद मोर्चा :** कॉक्रोच जनता पार्टीने २० जुलै रोजी संसदेवर एक मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. त्याला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांना लाठीहल्ला, अश्रुधूर व पॅलेट गनचा वापर करावा लागला आणि नंतर हा सारा वादाचा मुद्दा ठरला आहे. आंदोलक विद्यार्थी थेट संसद भवनाच्या प्रवेशद्वारापर्यंत जाऊन धडकले होते. यात काही समाजकंटकही सामील झाले होते. नंतर संसद भवन परिसराची प्रवेशद्वारे बंद करण्यात आली होती.

**७ नोव्हेंबर १९६६ :** संसद भवनापर्यंत आंदोलन करणाऱ्यांनी धडक देण्याची ही काही पहिली घटना नव्हती. यापूर्वीही अशा काही घटना घडल्या आहेत. यात एक महत्त्वाची घटना होती ७ नोव्हेंबर १९६६ रोजी घडलेली. गो- हत्येवर बंदी घालण्याची मागणी करण्यासाठी काढण्यात आलेला एक विशाल मोर्चा संसद भवनाजवळील पटेल चौकात अडविण्यात आला होता. सर्वपक्षीय गोरक्षा महाअभियान समितीने आयोजिलेल्या या मोर्चात काही लाख साधू-संत व नागरिक सामील झाले होते. नंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागले. जाळपोळ सुरू झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी प्रथम लाठीहल्ला केला. पण, त्याचा उपयोग न झाल्याने अखेर पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यात काही इसम मरण पावले.

**कामराज यांचे निवासस्थान :** पोलिसांच्या या कारवाईनंतर मोर्चातील लोक अधिक संतप्त झाले आणि मग या भागात जाळपोळ सुरू झाली. एवढेच नव्हे तर काँग्रेसचे एक वरिष्ठ नेते श्री कामराज यांच्या निवासातही आंदोलक घुसले. नंतर त्यांना बाहेर काढण्यात आले.

**गुलझारीलाल नंदांचा राजीनामा :** गोहत्या विरोधी आंदोलन व पटेल चौकातील घटनाक्रम याचे पडसाद उमटत तत्कालीन गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना राजीनामा द्यावा लागला. कारण ती घटना लहानसहान नव्हती. त्याचे पडसाद साऱ्या देशात उमटले व जगात या आंदोलनाची नोंद घेण्यात आली.

**शाप की योगायोग? :** गोहत्या विरोधी आंदोलनात सामील असणाऱ्या साधू-संतांवर झालेला लाठीहल्ला व नंतरचा गोळीबार याने संतप्त होत आंदोलनाचे एक नेते स्वामी करपात्री महाराज यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना 'तुमचाही शेवट असाच होईल' असा शाप दिला होता. आणि एक योगयोग म्हणजे ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधींची गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

**नंतर बंदी :** पटेल चौकातील या हिंसाचारानंतर तेथपर्यंत मोर्चा नेण्यावर बंदी घालण्यात आली. दिल्ली पोलिसांच्या शिफारसीवरून तो निर्णय घेण्यात आला होता व मागील ६० वर्षांत पटेल चौकात कोणत्याही आंदोलनाची परवानगी देण्यात आलेली नाही.

**मग बोट क्लब :** संसद भवनाजवळील बोट क्लब हा जनआंदोलनाचे व जनसभांचे एक केंद्र झाला. लंडनमध्ये हाईड पार्कवर जनसभा घेतात, तसा उल्लेख बोट क्लबचा होऊ लागला. १९७७ मध्ये आणिबाणीच्या विरोधात झालेली विशाल सभा बोट क्लबने अनुभवली. त्यापेक्षा मोठी सभा रामजन्मभूमी मंदिर आदोलनासाठी झाली.

**किसान आंदोलनानंतर :** मात्र, १९९३ मध्ये शेतकरी आंदोलनात झालेल्या हिंसाचारानंतर बोट क्लबवर सभा- मोर्चे- निदर्शने यास मनाई करण्यात आली. शेतकरी नेते महेंद्रसिंग टिकैत, शरद जोशी यांना व्यासपीठावरून उड्या मारीत पलायन करावे लागले होते. तत्कालीन नरसिंहराव सरकारने बोट क्लबवर मोर्चा-निदर्शने करण्यावर बंदी घातली.

**२०१७ चा आदेश :** २०१७ मध्ये राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने बोट क्लबसोबतच जंतर मंतरवरही सभा-निदर्शने करण्यावर बंदी घातली. आंदोलनामुळे या भागात होणारे ध्वनिप्रदूषण व पर्यावरणाचे नुकसान या दोन कारणांसाठी ही बंदी घालण्यात आल्याचे प्राधिकरणाने घोषित केले.

**सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप :** राष्ट्रीय हरित प्राधिकरणाच्या या बंदीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने यात दखल घेत बोट क्लब व जंतर मंतरवरील बंदी उठविली आणि जंतर मंतर पुन्हा एकदा आंदोलकांनी गजबजू लागले. या दोन्ही ठिकाणी होणाऱ्या आंदोलनांवर सरसकट बंदी घालता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यात म्हटले होते. विशेष म्हणजे हा निवाडा २०१८ च्या जुलै महिन्यातच देण्यात आला होता. पण, तरीही दिल्ली पोलिसांनी बोट क्लबवर आंदोलनाला परवानगी न देण्याची भूमिका घेतली होती. यामुळे बोट क्लबवरील आंदोलने, सभा-मेळावे इतिहासजमा झाले. सुरक्षा कारणांस्तव या भागात मोर्चा-आंदोलने याची परवानगी देता येणार नाही असे पोलिसांनी स्पष्ट केल्यानंतर जंतर मंतर हेच आंदोलनाचे एकमेव केंद्र झाले होते. काही वर्षांपूर्वी गाजलेले अण्णा आंदोलन जंतर मंतर भागातच झाले होते. त्यानंतरचे मोठे आंदोलन म्हणजे नुकतेच झालेले विद्यार्थ्यांचे आंदोलन.

**आता हद्दपार? :** कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात २० जुलै रोजी घडलेला हिंसाचार पाहिल्यानंतर केंद्र सरकार जंतर मंतरवर आंदोलनास परवानगी देण्याची शक्यता कमी आहे. सर्वोच्च न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केंद्र सरकारची भूमिका मांडण्यास सांगितले आहे. तेव्हा केंद्र सरकारची भूमिका स्पष्ट होईल.

दिल्ली पोलिस आता जंतर मंतरवर मोर्चा वा आंदोलनाची परवानगी देण्याची शक्यता कमी आहे. मग, आंदोलनासाठी नवी जागा कोणती निश्चित केली जाईल? या संदर्भात दोन मैदानांचा उल्लेख केला जातो. एक म्हणजे ऐतिहासिक असे रामलीला मैदान वा कर्नाल रोडवर असलेले बुराडी मैदान. बुराडी मैदान तर दिल्लीच्या सीमेवर असल्याने पोलिसांसाठी ही जागा सर्वांत सोयीची मानली जाते. कारण, शेवटी जागेचा निर्णय तर दिल्ली पोलिसच करणार आहेत.

जंतर मंतरमुळे अडचणीत आलेले दिल्ली पोलिस आता या जागेलाच छू मंतर करण्याचा प्रयत्न करतील असे दिसते. आंदोलनाची जागा संसद भवनापासून दूर व सुरक्षित जागेवर नेल्यास कायदा व सुव्यवस्थेची कोणतीही समस्या निर्माण होणार नाही असा दिल्ली पोलिसांचा कयास आहे. 'न रहेगा बांस, न बजेगी बांसुरी!' जंतर मंतरवर आंदोलन होणारच नाही तर मग समस्याही होणार नाहीत. दिल्ली पोलिस बहुधा असाच विचार करीत असावेत. ■

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# निवडणुकांअभावी रखडला ग्रामीण विकास

दीर्घकाळापासून अनेक जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका न झाल्याने ग्रामीण भागाच्या विकासावर परिणाम झाला आहे. यावर पर्याय म्हणून अनेक ठिकाणी जुन्या सरपंचांनाच प्रभार सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतला. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिल्याने नवीन समस्या निर्माण झाली आहे. ग्रामीण विकासासाठी तरुणाई सरसावली आहे. होतकरू उमेदवारांच्या हाती सत्ता सोपविणे देशहिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. राज्यात जवळपास १५ हजार ६३६ ग्रामपंचायतींना निवडणुकीची प्रतीक्षा असून अनेकदा घोषणा करण्यात आली. परंतु, या ना त्या कारणांनी निवडणुका वारंवार पुढे ढकलण्यात आल्या. ग्रामपंचायत निवडणुकांना मोठे महत्त्व आहे. शासनाने ग्रामपंचायतींना प्रचंड अधिकार दिलेले आहेत. १४ व्या वित्त आयोगाने ग्रामपंचायतींच्या निधीत खोऱ्याने पैसा ओतला. मार्च २०२४ पर्यंत ग्रामपंचायतींसाठी १५ वा वित्त आयोग लागू होता. आता १६ वा वित्त आयोग लागू असून सरकार ग्रामीण भागाच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. परंतु, लोकनियुक्त प्रतिनिधीच ग्रामपंचायतीत नसल्याने शासकीय निधीचा सुयोग्य वापर होऊ शकत नाही. अनेक ठिकाणी जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी निवडणुका जाहीर करून आरक्षण सोडतही काढण्यात आली. परंतु, नंतर कुठल्या ना कुठल्या सबबीवर या निवडणुका रद्द करण्यात आल्या. आता पुन्हा ग्रामपंचायत निवडणुकांची हूल उठली असून दिवाळीनंतर निवडणूक कार्यक्रम लागण्याची शक्यता आहे.



ग्रामीण भागाच्या विकासासाठी हजारावर योजना आधीच कार्यान्वित होत्या. आता पुन्हा राज्य सरकारने ५ नवीन योजनांना मंजुरी देऊन ग्रामीण भागाचा कायपालट करण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटींच्या घरात पोहोचली आहे. परंतु, ३४ जिल्हा परिषदा आणि ३५१ पंचायत समित्यांच्या या महाराष्ट्रात २७ हजार ९५१ ग्रामपंचायतींपैकी १५ हजारांवर ग्रामपंचायतींचा कारभार सध्या प्रशासकांकडे आहे. प्रशासक जनतेला न्याय देऊ शकत नाही. कारण, तो लोकप्रतिनिधी नसून शासकीय सेवक आहे. शिवाय प्रशासकांना नागरिकांच्या मूलभूत समस्यांची जाणीव नसते. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी या निवडणुका होणे अत्यंत आवश्यक आहे. मतदारयादी पडताळणीसाठी विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम घोषित होण्यासाठी डिसेंबर महिना उजाडू शकतो.

काही ठिकाणी रिक्त जागा भरण्यासाठी पोटनिवडणुका घेतल्या जात आहेत. परंतु, सरसकट निवडणुकांची घोषणा होत नसल्याने दीर्घकाळापासून निवडणुकांची तयारी करणाऱ्या तरुणाईला प्रतीक्षा करावी लागत आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३८ अन्वये सरपंचांना विशेषाधिकार प्राप्त आहेत. परंतु, सरपंचपदाची निवडणूक लढविण्यासाठी ठोस निकष नसल्याने अनेकदा पोटभरू उमेदवार सरपंच बनतो आणि मग गावाची कधीही भरून न निघणारी हानी होते. अलिकडे तरुणाईचा पुढाकार आणि नागरिकांमध्ये जागरूकता वाढीस लागल्याने योग्य उमेदवार निवडून येण्याची शक्यता अनेक पटींनी वाढली आहे. बदलत्या भारतात मतदारांनी जागरूक असणे नितांत गरजेचे आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत जात हा घटक नेहमी प्रभावी ठरत आलेला आहे. परंतु, अलिकडे ग्रामीण भागातही विकासाचे राजकारण होऊ लागल्याने जातीचा मुद्दा बऱ्याचअंशी कमकुवत झाला आहे.

ग्रामसभेला कायद्याने राखीव अधिकार दिले आहेत. परंतु, बहुतांश गावांमध्ये ग्रामसभाच होत नाही. निवडणुका न झाल्याने अनेक गावांमध्ये ५ ते ६ वर्षांपासून ग्रामसभा झालेल्या नाहीत. अनेक ठिकाणी गावकरी ग्रामसभेला उपस्थित राहत नसल्याने संबंधितांना भ्रष्टाचार करण्यासाठी मोकळे रान मिळते. अलिकडे ग्रामीण भागातही जागरूकता येत आहे. ही समाधानाची बाब असली तरी आजही अनेक ठिकाणी गावगाड्यातील निवडणुका कुणाच्या तरी प्रभावाखाली लढवल्या जातात. हे चित्र पालटण्यासाठी आणखी काही काळ लागणार आहे. देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी तरुणाईने पुढाकार घेऊन योग्य उमेदवारांची निवड केली तर ग्रामीण भागातील चित्र झपाट्याने बदलू शकते, यात शंका नाही. ■

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# खरी जेन-झी

नुकत्याच जंतर मंतरवर विद्यार्थ्यांच्या नावाखाली जे हिंसक प्रदर्शन झाले, त्यामध्ये अनेक असामाजिक तत्त्वांनी भाग घेतला होता, असे दिल्ली पोलिसांच्या नोंदीवरून समजते. यामध्ये गुन्हेगारी पृष्ठभूमीचे २५०० पेक्षा अधिक लोक सहभागी झाले होते, असे दिल्ली पोलिसांचे म्हणणे आहे.वास्तविक पाहता, विद्यार्थ्यांच्या या आंदोलनामध्ये 'भारत तेरे टुकडे होंगे', अशा पद्धतीच्या घोषणा दिल्या जाणे हे देशाच्या संविधानाला आणि राष्ट्राच्या सुरक्षेला सुद्धा धोकादायकच म्हटले पाहिजे. यामध्ये चिंतेची गोष्ट अशी की, अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी केवळ आपली राजकीय पोळी भाजण्याकरिता आगीमध्ये तेल टाकण्याचे काम केले. योगेंद्र यादव हे नेते म्हणाले की, यापुढे लोकशाहीचे भविष्य संसद ठरविणार नाही, तर ते रस्त्यावरून ठरविले जाईल. अशा पद्धतीच्या चिथावणीखोर घोषणा या बेजबाबदार राजकीय नेतृत्वाचे प्रदर्शनच म्हटले पाहिजे.

जर तुम्ही निवडणुका जिंकू शकत नसाल, तर तुम्ही कधी शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून, तर कधी विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून, देशातील लोकनियुक्त सरकारला खाली खेचण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अल्टरनेटिव्ह पॉलिटिक्स किंवा पर्यायी राजकारणाचाच भाग आहे. जंतर मंतरवर विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे अतिशय अश्लील प्रदर्शन संपूर्ण देशाला बघायला मिळाले. विशेषतः विद्यार्थिनींच्या तोंडी असलेल्या शिव्या ऐकून देशातील महिला शक्तीला तर धक्काच बसला असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्या जगविख्यात आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेत्याला अत्यंत खालच्या दर्जाच्या शिव्या या मुलींना पुढे करून देण्यात आल्या. यांच्याही आई-वडिलांना जर कोणी अशा पद्धतीच्या शिव्या दिल्या, तर यांना ते चालणार आहे का?

ज्या राजकीय पक्षांनी हा सगळा तमाशा घडवून आणला, त्यांचेही नेते आहेतच. आज तुम्ही मोदींना शिव्या दिल्या, उद्या तुमच्या नेत्यांना दिल्या जातील, ते तुम्हाला चालेल का? आज जी पायवाट झालेली आहे, उद्या तो राजमार्ग होऊ शकतो. हे या विरोधी पक्षांनी विसरू नये. या मुला-मुलींना पाहून सर्वच पालक आपले मुले-मुली अशा प्रकारचे निघणार तर नाही ना, या विचाराने धास्तावले गेलेले आहेत. विविध राजकीय पक्ष समाज माध्यमांमधून आणि विविध टीव्ही वाहिन्यांवरून जेन-झी चे गोडवे गाताना दिसत आहेत, त्यांच्यावर पोलिसांनी कसे अत्याचार केले, हे सांगताना आणि त्यांचे व्हिडीओ प्रसारित करताना दिसत आहेत.

पण पोलिसांच्या गाड्या कोणी उलटविल्या? पोलिसांना घेरून कोणी मारले? ५० पेक्षा अधिक पोलिस जखमी कसे काय झाले? याचे उत्तर कोणीही दिलेले नाही. कुठल्याही राजकीय नेत्यांनी जखमी पोलिसांबाबत एकही शब्द काढलेला नाही.

वास्तविकता ही आहे की, देश अराजकतेच्या उंबरठ्यावर उभा असलेला पाहून अनेक राजकीय पक्षांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. टीव्हीवर जो विद्यार्थ्यांचा तमाशा सुरू होता, तो पाहून अनेकांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटत होते. जे बांगलादेशमध्ये घडले, नेपाळमध्ये घडले, फ्रान्समध्ये घडले, ते भारतातही घडले पाहिजे, हीच विरोधी पक्षांची अनेक दिवसांपासूनची इच्छा आहे. देशाला आणि विशेषतः तरुणांना अराजकतेचा, अस्थिरतेचा मार्ग, हिंसेचा मार्ग दाखविणाऱ्या या राजकीय पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना जनतेने नीट ओळखण्याची आणि त्यांना त्यांची जागा दाखविण्याची आवश्यकता आहे.

आमच्या राजकीय स्वार्थांकरिता आम्ही देशाच्या तरुणाईला चुकीची दिशा दाखवण्याचे पाप कदापि करू नये, हे यांच्या लक्षात यायला पाहिजे होते.

भाजप जरी आज सत्तेवर असला, तरी त्याने ६५ वर्ष सत्ताप्राप्तीसाठी प्रतीक्षा केलेली आहे. परंतु आज विरोधी पक्ष बारा वर्षांतच सत्तातुर झालेले आहेत. आणि यासाठी ते कुठल्याही थराला जायला आणि देशविघातक शक्तींशी हातमिळवणी करायला सुद्धा तयार आहेत. जेन-झी म्हणजे केवळ हे तमाशा करणारे नाहीत, तर कमी वयामध्ये आयएएस, आयपीएस करणारे सुद्धा आहेत. अगदी तरुण वयामध्ये देशाच्या सीमेवर हातात बंदूक घेऊन देशाच्या सीमेचे रक्षण करणारा जवान हा सुद्धा जेन-झी आहे. पॅरालिम्पिकमध्ये आपल्या शारीरिक समस्येचा बाऊ न करता देशासाठी पदक जिंकणारा खेळाडू हा सुद्धा जेन-झी आहे.

जेन-झी म्हणजे फक्त रील्स बनवणारी पिढी नाही. याच जेन-झी मध्ये मनू भाकर आहे, जिने ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकलीत; शीतल देवी आहे, जिने दोन्ही हात नसतानाही जगाला तिरंदाजी शिकवली; अवनी लेखरा आहे, जिने अपंगत्वावर मात करून पॅरालिम्पिक सुवर्ण जिंकले. अंध जलतरणपटू ईश्वरी पांडे आहे, जिने श्रीलंका ते भारत हे अंतर पोहून पूर्ण केले.

नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये देशासाठी पदक जिंकणारे खेळाडू जेन-झीच आहे. आपला परिवार चालविण्यासाठी बाजारात भाजी विकणारे, विविध पदार्थ विकणारे हे पण जेन-झी आहेत. ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली, ते क्रांतिकारक सुद्धा त्यांच्या काळातील जेन-झी होते. वयाच्या सोळाव्या वर्षी हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा घेणारे छत्रपती शिवाजी महाराज हे सुद्धा जेन-झी होते. देशाचा इतिहास जेन-झी ने घडविला आहे. परंतु देशभक्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतभक्तीचा मंत्र ज्यांनी धारण केला, तेच लोक जनतेला वंदनीय झाले. तेच खरे राष्ट्रनायक झालेत.

'भारत तेरे टुकडे होंगे' म्हणणाऱ्या लोकांना देश कधीच स्वीकारणार नाही. देशाला अश्लील शिवीगाळ करणाऱ्या तमासखोरांची नाही, तर देशभक्तीचे गाणे गाणाऱ्यांची आवश्यकता आहे. हीच खरी जेन-झी आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## कृत्रिम दुष्काळ ग्रामीण भारतासाठी अधिक घातक

नैसर्गिक आपत्तींमुळे देशातील शेतकऱ्यांना अनेकदा मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. त्यामध्ये दुष्काळ, अवर्षण आणि अतिवृष्टीदेखील समावेश आहे. अशी नैसर्गिक संकटे रोखणे अद्याप मानवाला शक्य झालेले नाही. अनेकदा अशा ओल्या आणि कोरड्या दुष्काळामुळे कृषी जीवनावर मोठा परिणाम दिसून येतो. परंतु, सरकारची चुकीची धोरणे आणि मानवनिर्मित टंचाई तसेच जागतिक युद्धाचे सावट यामुळे निर्माण होणारा कृत्रिम दुष्काळ ग्रामीण भारतासाठी अधिक घातक आणि विनाशकारी ठरत आहे. महाराष्ट्रातील शेकडो गावांतून दुष्काळामुळे घरदार सोडून दरवर्षी ऊसतोड मजुरीसाठी भटकावे लागत होते. परंतु, या परिस्थितीतून वाट काढणाऱ्या काही तरुणांनी अशा कुटुंबांना पारंपरिक मजुरीच्या साखळीतून बाहेर काढले. वेगवेगळे पर्यायी मार्ग शोधण्यात आले. ग्रामीण भागातील जनतेने स्वतःच्या हिमतीवर दुष्काळावर मात करून आर्थिक स्थैर्य मिळवल्याची अनेक उदाहरणे समोर येत आहेत. दूर पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाची झळ भारतातील ग्रामीण भागालाही बसत आहे.

देशामध्ये जेव्हा उदारीकरण आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली तेव्हापासून सरकार आपण कल्याणकारी योजना राबवत असल्याचे सांगत आहे. पण प्रत्यक्षात लोकांचे कल्याण करण्यापेक्षा योजनेच्या लाभार्थींची संख्या वाढवण्याकडे अधिक कल दिसून येतो. योजनांमधून आणि धोरणांमधून समाजातील संपत्तीचा प्रवाह सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याऐवजी कमी केला जातो. कृत्रिमरीत्या टंचाईसदृश स्थिती निर्माण केली जाते. अशा परिस्थितीलाही दुष्काळ असेच म्हटले पाहिजे. हा मानवनिर्मित दुष्काळ असतो. तो संथगतीने येत असतो. परंतु, त्यामुळे होणारे नुकसान मोठे असते. त्याचबरोबर त्याचे परिणामदेखील दीर्घकाळ टिकून राहणारे असतात. ओल्या किंवा कोरड्या दुष्काळाचा सामना करण्याची क्षमता आपल्या शेतकऱ्यांमध्ये असते. परंतु, मानवनिर्मित अशा दुष्काळाचा सामना करण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेची क्षमता नसते. शहरी चष्म्यातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याची खोड बंद झाली पाहिजे. अर्थकारण आणि शेतकऱ्यांचे वास्तव समजून घेण्यासाठी वेगळ्या दृष्टिकोनाची आज गरज आहे. बहुतांश लोक आजही शेतीचे अर्थकारण शहरी दृष्टिकोनातूनच पाहत असतात. शहरी विकासाची सावली ग्रामीण भागावर पडत असल्यामुळे तेथील प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे होत चालले आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

■■■

## वाचक पत्रे

## शाकाहार उत्तम आहार

प्राण्यांच्या शरीरातील अनेक घातक जीवजंतूंचा शरीरावर होणारा परिणाम, हवेतील वातावरणात प्राण्यांचे शरीर आतून कुजते व अनेक आजार होतात. प्राण्यांच्या शरीरावरील न दिसणाऱ्या रोगांमुळे जीवघेण्या साथींचा प्रादुर्भाव वाढतो, मनुष्याच्या मेंदूवर विपरीत परिणाम होतो आणि तोसुद्धा पावसाळ्यात जास्त; म्हणूनच मांसाहार मानवी जीवनाला योग्य नाही. दुर्मिळ व पोषक भाज्या खाणे, पचन संस्थेवरचा ताण कमी करणे, दुर्मिळ खनिजे व उपयुक्त पोषक घटक शरीराला प्राप्त होणे आणि बुद्धी तल्लख

होण्यासाठी शाकाहार हाच उत्तम आहार आहे. उत्तम धार्मिक असणाऱ्या दीप अमावास्येची 'गटारी' ही उपमा बंद करा. दिव्याच्या ज्योतीसारखे तेज प्राप्त होण्यासाठी दीप पूजा असताना कोणीही मद्यपान करून जीवनात अंधार साठविण्याची सवय लावू नका .

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

■■■

## मातीच्या मूर्तीसोबतच पर्यावरण रक्षणही करा

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणपतीवर बंदी आलेली आहे. पीओपी गणपती दिसायला सुरेख असतात. मातीच्या गणपतीपेक्षा मजबूत असतात. परंतु ते पाण्यात विरघळत नाही. त्यामुळे विसर्जन केले तरी अर्धवट असतात. मध्यंतरी तलाव, विहिरी स्वच्छ करण्यात आल्या. त्यात डोके, हात नसलेले गणपती आढळले. म्हणून पीओपी गणपतीवर बंदी आली ते योग्य झाले. आपल्या देवांची कुणी विटंबना केली तर आपल्या भावना दुखावतात. पीओपी गणपती पाण्यात विरघळत नाही. मग आपणच आपल्या देवाची विटंबना करतो ना? त्यामुळे पीओपी गणपतीवर बंदी आणणे योग्य आहे. मागे गणपतीच्या उंचीवर बंधन आले. तेही योग्यच म्हणावे लागेल. अति उंचीमुळे गणपती विद्युत तारांमध्ये अडकतात. दुसरे असे की, मातीच्या गणपतीत झाडांची बीजे टाकल्यास आणि घरी विसर्जन केल्यास ती माती आपल्या घरी झाडे असलेल्या ठिकाणी टाकल्यास त्यातून झाडे उगवतील. त्यामुळे आपोआपच वृक्षलागवड होऊन पर्यावरणाला मदत होईल. नागपूरला फिरत्या विसर्जन टाकीची सोय आहे. तेथील माती आणि पाणी झाडांना दिल्यास झाडे वाढतील. लहान मुलांनाही वृक्षलागवडीचे महत्त्व कळेल. सार्वजनिक ठिकाणी पीओपी गणपतीची स्थापना झाल्यास दंड आकारला जावा आणि आपल्याच देवाची विटंबना टाळावी. ■

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# कुलकर्णी, पुकाळे, कोकरे, कलकामकर, तुपे, देशमुख, कोरे, गुदोडगी अव्वल

### बी.आर. जोशी मॅरेथॉन स्पर्धा





तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

बी आर जोशी मॅरेथॉन स्पर्धेत श्रेयांश कुलकर्णी, आरोही पुकाळे, विराज कोकरे, आर्या तुपे, शिवम कलकामकर, अद्विका देशमुख, अथर्व कोरे, श्रुती गुदोडगी यांनी आपापल्या गटातून अव्वल स्थान पटकाविले.

कै. वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेत ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर महानगर पालिका सभागृह नेते नरेंद्र काळे, ज्येष्ठ पत्रकार महेश रामदासी, शिक्षण प्रसारक नियामक मंडळीचे सदस्य सुरेश बाबु मंकणी, त्यांच्या पत्नी अॅड. निता मंकणी, शिक्षण प्रसारक मंडळीचे सदस्य राघव अष्टेकर यांची प्रमुख उपस्थितीत झाले. सुरुवातीला प्रतिमा स्वामी यांनी विद्यार्थ्यांकडून वॉर्मप एक्सरसाइज करून घेतला. क्रीडा ज्योत प्रज्वली करून याचे उद्घाटन झाले. सकाळी साडेसात वाजता मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात झाली विविध गटातील मुला मुलींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचा उत्साह, जिद्द आणि खेळाडू वृत्ती यामुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले. पारितोषिके पोलीस उपनिरीक्षक विष्णू गायकवाड यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना मेडल्स व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे पंच म्हणून सूर्याजी लिंगडे व दशरथ गुरव यांनी काम पहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक अमित कोटीकर यांनी केले. बाळकृष्ण पाटील यांनी आभार मानले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन) : पहिली व दुसरी :** श्रेयांश शार्दुल कुलकर्णी, वेदांत विजय आदलिंग, वीरांश विश्वजीत सर्वदे. मुली : आरोही सचिन पुकाळे, ईश्वरी सागरसिंग मरुड, शांभवी मारुती सांगळे.

**तिसरी चौथी :** विराज कपिल कोकरे, शौर्य संतोष कलकामकर, प्रियांश प्रशांत सिंदकर. मुली : आर्या विवेकानंद तुपे, अमृता मल्लिकार्जुन मोर्डे, सानवी रमेश बिराजदार.

**पाचवी सहावी :** शिवम संतोष कलकामकर, आदिराज ज्ञानेश्वर पाटील, श्लोक गिरीश लोंढे. मुली : अद्विका प्रवीण देशमुख, हिंदवी विष्णू गायकवाड, शाश्वती कीर्ती, कुमार वेळापुरे.

**सातवी आठवी :** अथर्व सातप्पा कोरे, वीर चंद्रकांत घोडके, स्वराज शशीधर शिंदे. मुली : श्रुती शिवानंद गुदोडगी, आराध्या सिद्धेश्वर तारापूरे, स्वस्तिका लक्ष्मीकांत बेद्रे.

## लोधी भवन उभारण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी : आ. कोठे



तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि.९ ऑगस्ट

लोधी समाजाच्या विविध विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. लोधी भवन उभारणीसाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार असून, वनशितलादेवी मंदिराच्या सुशोभीकरणासाठी तसेच बालाजी मंदिर परिसराच्या विकास व सुधारणा कामांसाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी आवश्यक ते सहकार्य सातत्याने केले जाईल, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी स्पष्ट केले.

परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा यांचा अनोखा संगम ठरलेली लोधी समाजाची शेकडो वर्षांची माँ शितलादेवी आषाढ महायात्रा रविवारी सोलापूरात उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. पहाटेपासून देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत होती. दिवसभर पूजा-अर्चा, नैवेद्य आणि सामूहिक दर्शनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. लष्कर येथील नळबाजार चौकातील माँ शितलादेवी मंदिर तसेच हुच्चेश्वरनगर, कुमठा नाका येथील मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. देवीला नैवेद्य-प्रसाद अर्पण करून भक्तांनी मनोभावे पूजा-अर्चा केली. सोलापूरसह मुंबई, पुणे, संभाजीनगर तसेच कर्नाटकातील विजापूर परिसरातूनही भाविक दर्शनासाठी आले होते.

**एकाच दिवशी सामूहिक आषाढ महायात्रेची परंपरा**

शितला देवीचा वार रविवार असल्याने लोधी समाजात आषाढ महिन्यातील कृष्ण पक्षातील एका शुभ रविवारी सामूहिकरीत्या आषाढ महायात्रा साजरी करण्याची पारंपरिक प्रथा आहे. या दिवशी समाजातील हजारो बांधव एकाच दिवशी देवीची पूजा करून ही परंपरा जपतात. त्यामुळे महायात्रेला धार्मिकतेबरोबरच सम ाजातील एकोपा आणि सांस्कृतिक वारशाचेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.संध्याकाळी पाच वाजता शेकडो वर्षांच्या परंपरेनुसार समाजबांधव, माता-भगिनी आणि लहान मुले नवीन वस्त्रे परिधान करून नैवेद्य-प्रसादासह एकत्र आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि माँ शितलादेवीच्या जयघोषात हजारोंच्या संख्येने भाविक रंगभवन, पत्रकारनगर येथील वनशितलादेवीच्या महापूजेसाठी एकत्रित झाले. सामूहिक महापूजा, दर्शन आणि नैवेद्य-प्रसादाच्या कार्यक्रमाने परिसर भक्तीमय झाला.

**मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा वाढली**

लोधी समाजाचे अध्यक्ष भगतसिंग कल्लावाले आणि सम ाजातील पंच, कुटुंबप्रमुख व मुरब्बीगण यांच्या नेतृत्वाखाली महायात्रेचे आयोजन करण्यात आले. वनशितला देवीच्या दर्शनासाठी आलेल्या मान्यवरांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर अविनाश कोंड्याल, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, माजी आमदार शिवशरण पाटील तसेच लोधी समाजाचे अध्यक्ष भगतसिंग कल्लावाले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत भरत बडुरवाले, रविसिंग कैय्यावाले, धनश्याम शिवसिंगवाले, रणजीत दवेवाले, नागनाथ शिवसिंगवाले, अॅड. सुरजसिंग लोधा, परशुराम सतारेवाले, हनुमान चौधरी, लक्ष्मण बंबेवाले आदींनी केले.

**परंपरेतून जपला सामाजिक एकोपा**

या महायात्रेच्या निमित्ताने समाजातील ज्येष्ठ, युवा, माता-भगिनी आणि बालक एकाच ठिकाणी एकत्र येत असल्याने धार्मिक परंपरेसोबत सामाजिक बांधिलकी आणि परस्पर स्नेह अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. रामसिंग सतारेवाले, किसनसिंग कजाकवाले, मानसिंग कोलाकटी, सोबुराम शिवसिंगवाले, बंसीसिंग कैय्यावाले, भरतसिंग मदनावाले, कन्हैयासिंग खंडेवाले, अशोकसिंग बुकेवाले, अर्जुनसिंग रिसालदार, मोहनसिंग मौलावाले आदी उपस्थित होते.

## माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा हर्षल लंगोटे याची राज्य अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या हर्षल लंगोटे याची राज्य अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली. सोलापूर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'सोलापूर जिल्हा कनिष्ठ अॅथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेतून त्याची निवड झाली. हर्षलने १४ वर्षाखालील गटातील १०० मीटर धावणे प्रकारात निवड झाली. राज्य स्पर्धा २७ ते ३० ऑगस्ट या कालावधीत श्री. विठ्ठल रावजी चॅरिटेबल ट्रस्ट, देवरुख (जिल्हा रत्नागिरी) येथे होणार असून या स्पर्धेत हर्षल सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्यास क्रीडाशिक्षक अजय पारीक व ऋतू भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या रुपाली हजारे यांनी हर्षलचे अभिनंदन केले.



## स्वर्गीय सुभाष बुबणे स्मृती करंडक सोलापूर जिल्हा टेबल टेनिस स्पर्धा २२ व २३ ऑगस्टला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट -

जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या वतीने स्वर्गीय सुभाष भालचंद्र बुबणे यांच्या स्मरणार्थ 'सोलापूर जिल्हा मानांकित टेबल टेनिस स्पर्धा २२ व २३ ऑगस्ट रोजी मुळे पॅव्हेलियन पार्क स्टेडियम येथे होईल.

या स्पर्धेत १२, १४, १७ वर्षाखालील मुले व मुली, महिला गट तसेच ५० वर्षापुढील प्रौढ गटासाठी सामने होणार आहेत. मुलांच्या गटातील खेळाडूंना फक्त एकाच ग्रुपमध्ये खेळता येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन २२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६:३० वाजता होईल, तर रात्री ७:०० वाजता सामन्यांना सुरुवात होईल. पहिल्या दिवशी (२२ ऑगस्ट) संध्याकाळी ७:०० वाजता १२ वर्षे (मुले/मुली), १४ वर्षे (मुली), १७ वर्षे (मुली) आणि महिला गटाचे सामने खेळवले जातील; तसेच रात्री ८:३० वाजता प्रौढ ऐकेरीचे सामने होणार आहेत. त्यानंतर रविवारी (२३ ऑगस्ट) १४ मुले, १७ मुले आणि सर्व अंतिम सामने पार पडतील.



स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी प्रति खेळाडू १५० रुपये नोंदणी शुल्क संघटनेचे सचिव झेड. एम. पुणेकर यांच्याकडे ९४२३५३५८४० या नंबरवर ऑनलाईनने २१ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत पाठवावे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी करावी, असे आवाहन संयोजक हर्षवर्धन बुबणे व जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान यांनी केले आहे.

## इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांची दै. 'तरुण भारत'ला औद्योगिक भेट



तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. ९ ऑगस्ट -

एसएचीएसएमडी केकेआय पॉलटेक्निक अक्कलकोट येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी सोलापूर दैनिक तरुण भारत येथे औद्योगिक भेट देऊन वृत्तपत्र निर्मिती तंत्रज्ञान प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दैनिक 'तरुण भारत' येथे बातमी संकलन, संपादन, पानांची मांडणी, मुद्रण तसेच वितरण प्रक्रियेची माहिती घेतली. उद्योग समूहांच्या विविध विभागांची पाहणी करून विद्यार्थ्यांनी तेथील कार्यपद्धती समजून घेतली. तेथील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.ही औद्योगिक भेट संस्थेचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, सचिव आत्माराम घाटगे यांच्या सहकार्याने व प्राचार्य एन.बी.जेऊरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. ही औद्योगिक भेट यशस्वी करण्यासाठीची व्ही. एस खिलारी तसेच विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

यावेळी ई अँड टेलिकम्युनिकेशनचे विभागप्रमुख पी. बी. देसाई, समन्वयक व्ही.एस. कलबुर्गी आणि पी. के. पाटील हे उपस्थित होते. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील ज्ञानाचा प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळाला आणि आधुनिक मुद्रण, वृत्तपत्र निर्मिती प्रक्रियेची तांत्रिक माहिती झाली.

### छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेजच्या

## आमिर शेख यास राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्ण



तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट -

येथील मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी सायं. कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा विद्यार्थी आमिर शेख याने सुवर्णपदक पटकावले.

पुण्यातील खराडी येथे 'द रॉयल तायक्वांदो अकॅडमी'च्या वतीने आयोजित १०व्या खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत त्याने १९ वर्षाखालील वयोगटात 'क्युरोजी' (फाईट) प्रकारात ही कामगिरी केली आमिरला प्रा. सचिन गायकवाड, प्रा. संतोष गवळी, मारुती घोडके आणि नितीन गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याच्या या राष्ट्रीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव प्रा. महेश माने, मुख्याध्यापक सुजाता जुगदार आणि प्राचार्य एम. डी. पाटील, प्रा. जगन्नाथ पांढरे, प्रा. अश्विन नागणे, प्रा. हरीश गरड, प्रशांत राणे, रोहन हावळे आणि दत्ता सुतार आदी उपस्थित होते.

**कष्टाळू आणि जिद्दी खेळाडू**

दिवसभर मेहनतीचे काम करून आणि सायंकाळी छत्रपती शिवाजी सायं. कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेऊनही, आमिरने खेळाची आवड कधीही कमी होऊ दिली नाही. आपल्या व्यस्त वेळेतून वेळ काढून तो दररोज नियमितपणे सकाळी दोन तास आणि संध्याकाळी एक तास कठोर सराव करत असे. त्याच्या या जिद्दीचे आणि कष्टांचे चीज झाले आहे.

## विद्यार्थी आणि शिक्षकांनी अद्यावत ज्ञान प्राप्त करावे : प्रा. डॉ. मेंते

### वसुंधरा महाविद्यालयात भूगोल विषयाची कार्यशाळा



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

सर्वांनी बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान अवगत करावे लागेल. विशेषता शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अद्यावत राहावे लागेल. नवनवीन तंत्रज्ञान, त्यातील विकसित झालेले सॉफ्टवेअर याचा वापर करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अद्यावत ज्ञान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आर. एस. मेंते यांनी केले.

बी.ए. भाग तीनच्या भूगोल विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळेत बोलत होते. वसुंधरा महाविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि सोलापूर भूगोल शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी डॉ. के. एम. जमादार, डॉ. एस. सी. आडवीतोट, डॉ. दीपक देडे, डॉ. बी.बी. राऊत उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. दिगंबर झोंबाडे यांनी ही कार्यशाळा विद्यार्थी, शिक्षक, संशोधक यांच्यासाठी असून शिक्षकांनी कायमस्वरूपी अपडेट राहून विषयात तज्ञ झाले पाहिजे, ती आपली जबाबदारी आहे अशी ठाम भूमिका मांडली. डॉ. बी.बी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रदीप कोल्हे, आभार प्रा. डॉ. राजाराम पाटील, सूत्रसंचालन डॉ. संगीता भोसले यांनी केले.

या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी अशा १०७ जणांनी सहभाग नोंदवला. पहिल्या सत्रात तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. व्ही. के. पुकाळे, डॉ. चंद्रशेखर ताटे- देशमुख तर सत्राध्यक्ष प्रा. डॉ. आर.जे. मोहरकर, दुसऱ्या सत्रात तज्ञ मार्गदर्शक डॉ. एस. एस. मस्के, डॉ. डी. के. देडे, तर सत्राध्यक्ष डॉ. एम.जी. लवटे, तिसऱ्या सत्रात तज्ञ मार्गदर्शक प्रा. पांडुरंग जाधव, डॉ. कोनाडे भैरप्पा, तर सत्राध्यक्ष डॉ. नागनाथ धायगुडे इत्यादींनी जबाबदारी पार पडली.

## ज्ञानसंपदा प्रशालेत साने गुरुजींचे कथाकथन



सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

ज्ञानसंपदा शिक्षण प्रसारक मंडळ आणि अ.भा. साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांति-दिन साजरा करण्यात आला.

याचे उद्घाटन प्रशालेचे मुख्याध्यापक ओंकार बेडगनूर यांच्या हस्ते करण्यात आले. कथामाला कार्यकर्ते विजय बिज्जरगी यांनी भगतसिंग तर अरुण घुमाळ यांनी भाई कोतवाल यांची कथा सांगितली. कथामालेचे कार्यवाह डॉ. रामचंद्र धर्मसाले यांच्या कृति-युक्त बालगीतामुळे, कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत आली होती. साने गुरुजींच्या "खरा तो एकची धर्म। जगाला प्रेम अर्पावे!!" या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कथामालेच्या अध्यक्षा आरती काळे यांनी क्रांतिकारी कथा सप्ताहाचा हेतू स्पष्ट केला. प्रीती स्वामी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. धर्मसाले यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया पंदरकर यांनी आभार मानले.

Classifieds

**विकणे आहे**

सराफ बाजारातील सुसज्ज फर्निचरसह गाळा योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.
संपर्क : ९९७५६३७९५९
९९७५७२११२०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# लातूरच्या 'आधुनिक बालकीर्तन'ला प्रथम क्रमांक

### दिग्दर्शनात नवलाजी जाधव; अभिनयात शंतनू देढे व पायल जाधव अव्वल



तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

अस्तित्व मेकर्स फाउंडेशनतर्फे आयोजित रंगसाधक प्रमोद खांडेकर करंडक २०२६ राज्यस्तरीय लघुनाटिका हास्य प्रहसिका स्पर्धेत लातूरच्या ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या 'आधुनिक बालकीर्तन' या लघुनाटिकेने प्रथम क्रमांक पटकावला. हुतात्मा स्मृती मंदिर येथे शनिवारी झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील २४ संघांनी सहभाग घेतला.

कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन आणि विनोदाची प्रभावी सांगड घालत बालकलाकारांनी सादरीकरण केले. त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. द्वितीय क्रमांक दि अविरंग क्रिएशन, सोलापूरच्या 'काहीतरी राहिलय'ला, तर तृतीय क्रमांक अलकास थिएटर, सांगलीच्या 'कोती डिबेट'ला मिळाला.

दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक 'आधुनिक बालकीर्तन'चे दिग्दर्शक नवलाजी जाधव, द्वितीय राजू गायकवाड आणि तृतीय शिवप्रसाद चिक्का यांना मिळाले. पुरुष अभिनयात शंतनू देढे, विनोद आवळे व रमेश श्रावण, तर स्त्री अभिनयात पायल जाधव, सई दरेकर व अपर्णा पवार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. अभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, हास्यजत्रा फेम मुकेश जाधव व ज्येष्ठ नाट्यकर्मी सुनील गुरव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सुहासिनी शहा यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. त्यांनी अस्तित्व फाउंडेशनच्या सांस्कृतिक कार्याचे कौतुक केले. अध्यक्ष डॉ. किरण लोंढे यांच्यासह आयोजकांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### लंडन गोल्फमध्ये दीक्षा डागर, अदितीची दमदार कामगिरी



**लंडन :** प्रतिष्ठित लंडन गोल्फ स्पर्धेत भारतीय गोल्फपटू दीक्षा डागर आणि अदिती अशोकने अव्वल २० गोल्फपटूंमध्ये आपले स्थान टिकवून ठेवले आहे. यामध्ये दीक्षा 'लेडीज युरोपियन टूर ऑर्डर ऑफ मेरिट'मधील आपली रँकिंग सुधारण्याचे ध्येय ठेवून खेळत आहे. तिसऱ्या फेरीत ७२ चा स्कोअर नोंदवल्यानंतर दीक्षा डागर लंडन स्पर्धेत संयुक्त १९ व्या स्थानावर आहे. अदिती अशोकनेही आपली दमदार कामगिरी कायम राखत तिसरी फेरी संयुक्त १९ व्या स्थानावर मजल मारली. प्रणवी उर्सला मात्र घसरणीचा सामना करावा लागला; आव्हानात्मक ठरलेल्या तिसऱ्या फेरीनंतर ती संयुक्त ३८ व्या स्थानावर पोहोचली. कॅनडाची अॅना हुआंग १९-अंडर-पार स्कोअरसह स्पर्धेत प्रभावी आघाडीवर आहे. या कामगिरीमुळे दीक्षा डागरच्या 'लेडीज युरोपियन टूर ऑर्डर ऑफ मेरिट' रँकिंगमध्ये सुधारणा करण्याच्या आशा जिवंत राहिल्या आहेत. दीक्षाने पहिल्या दोन फेऱ्यांत ७५-७० असा खेळ केला होता आणि ती संयुक्त २२ व्या स्थानावर होती, परंतु तिसऱ्या फेरीत ७२ चा स्कोअर केल्यावर ती संयुक्त १९ व्या स्थानावर आली.

### ड्युरंड चषक : ट्राऊचा इंडियन नेव्हीवर विजय

**इम्फाळ :** रविवारी येथील खुमान लॅम्पक मुख्य स्टेडियमवर झालेल्या १३५ व्या इंडियन ऑइल ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेतील 'गट डी' मधील आपल्या अखेरच्या सामन्यात अफ्रिदी बुयामायुमने दोन गोल करीत 'ट्राऊ एफसी'ला 'इंडियन नेव्ही एफटी'विरुद्ध २-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवून दिला. बुयामायुमने पूर्वार्धात व उत्तरार्धात प्रत्येकी एक गोल केला. 'ट्राऊ एफसी'चा गोलरक्षक ताजुद्दीन याने उत्कृष्ट कामगिरी करत काही महत्त्वपूर्ण बचाव केले. विजय मिळवूनही 'ट्राऊ एफसी' व इंडियन नेव्ही हे दोन्ही संघ ड्युरंड चषकातून बाहेर पडले. एफसी रेंगदाई संघ 'गट डी'चा विजेता म्हणून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला. सामन्याच्या मोठ्या भागावर इंडियन नेव्हीचे वर्चस्व होते आणि त्यांनी गोल करण्याच्या तब्बल २६ संधी निर्माण करून सतत दबाव टाकला होता; तरीही ट्राऊ एफसीने गोल करण्याच्या बाबतीत अत्यंत अचूक आणि प्रभावी खेळ केला. बुयामायुमचे दोन गोल (१६ व्या आणि ६० व्या मिनिटाला) आणि गोलरक्षक ताजुद्दीनची उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर मणिपूरच्या या संघाने सामना जिंकून तीन गुण मिळवले. बुयामायुमने १६ व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले, त्यानंतर मध्यंतरानंतर लगेचच इंडियन नेव्हीच्या खुल्लाकपम झहीर खानने (४६ व्या मिनिटाला) गोल करून बरोबरी साधली. मात्र, ६० व्या मिनिटाला बुयामायुमने एका शानदार गोलद्वारे ट्राऊला पुन्हा आघाडी मिळवून दिली. ट्राऊ एफसीने तीन सामन्यांतून चार गुण मिळवत 'गट डी'मध्ये दुसरे स्थान पटकावले. इंडियन नेव्हीनेही तीन सामन्यांतून तीन गुणांसह आपली गट फेरीची मोहीम संपवली; परिणामी, दोन्ही संघ उपांत्यपूर्व फेरीपूर्वीच स्पर्धेतून बाहेर पडले.

### इंटर मियामीचा मॉन्टेरीकडून पराभव

**मियामी :** अर्जेंटिनाचा मधल्या फळीतील खेळाडू रॉड्रिगो डी पॉलने ३२व्या मिनिटाला गोल करून मियामीला मध्यंतरापर्यंत १-० अशी आघाडी मिळवून दिली, परंतु ह्यूगो कुपर्स व दिएगो रॉसीने नोंदविलेल्या गोलच्या बळावर मेक्सिकोच्या मॉन्टेरी संघाने जोरदार मुसंडी मारत विजय नोंदविला. लीग चषकाच्या फुटबॉल सामन्यात लिओनेल मेस्सीच्या अनुपस्थितीत इंटर मियामीला २-१ असा पराभव पत्करावा लागला. वडिलांच्या निधनामुळे इंटर मियामीचा कर्णधार लिओनेल मेस्सी या सामन्यात अनुपस्थित होता.

# भारताचा श्रीलंका एकादशवर ६ गड्यांनी विजय

## जयस्वालचे ६१ धावांचे योगदान
## सिराजची षट्कारांची हॅट्ट्रिक


यशस्वी जयस्वाल

**कोलंबो, ९ ऑगस्ट**

रविवारी एनसीसी मैदानावर झालेल्या सराव सामन्याच्या तिसऱ्या आणि अंतिम दिवशी यशस्वी जयस्वालने सर्वाधिक ६१ धावा केल्या, तर वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने सलग तीन षटकार ठोकत आपल्या आक्रमक फलंदाजीची चुणूक दाखवली. या कामगिरीच्या जोरावर भारताने 'श्रीलंका क्रिकेट एकादश'वर रोमांचक विजय मिळविला.

श्रीलंकेच्या ८ बाद ३६३ धावांच्या प्रत्युत्तरात भारताने दुसऱ्या दिवशी ६ बाद ३५७ धावा ठोकल्या. तिसऱ्या दिवशी सकाळी याच धावसंख्येवर आपला पहिला डाव घोषित केला. त्यामुळे श्रीलंकेला ६ धावांची आघाडी मिळाली. तिसऱ्या दिवशी श्रीलंका एकादशने ६ बाद २०० धावांवर आपला दुसरा डाव घोषित केल्यानंतर भारतासमोर २०७ धावांचे लक्ष्य ठेवले. भारताने ४५ षटकांत ४ बाद २१४ धावा ठोकून आपला विजय साकार केला.

वेळेचे भान राखत भारताला शेवटच्या दोन षटकांत २३ धावांची गरज होती. केवळ १५ चेंडूंत ३२ धावांवर नाबाद राहिलेल्या सिराजने ४४ व्या षटकात सोनल दिनुशाच्या गोलंदाजीवर षट्कार ठोकला आणि त्यानंतर ४५ व्या व दिवसाच्या अंतिम षटकांत केशरा नुवानथाच्या गोलंदाजीवर जोरदार फटकेबाजी केली.

सिराजने नुवानथाच्या गोलंदाजीवर मैदानातील वेगवेगळ्या दिशांना सलग तीन षट्कार मारले आणि तीन चेंडू शिल्लक असतानाच भारताला शानदार विजय मिळवून दिला. तसेच, सामन्यासाठी आवश्यक असलेल्या षटकांचा कोटा पूर्ण करण्यासाठी गरजेचे असलेले 'बोनस रन्स'ही भारताने मिळविले.

जखमी निवृत्त होण्यापूर्वी सलामीवीर यशस्वी जयस्वालने ४६ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांसह ६१ धावांची खेळी केली. त्याने शुभमन गिल (४४) याच्यासोबत १०५ धावांची सलामी भागीदारी केली.

तत्पूर्वी, सामन्याचा अंतिम दिवस भारतासाठी उत्साहवर्धक ठरला; कारण गुरुवारी सराव सत्रादरम्यान उजव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाल्यामुळे बाहेर असलेल्या नियमित कर्णधार शुभमन गिलने पुन्हा मैदानात पुनरागमन केले. (वृत्तसंस्था)

# अस्मिता चलिहाला कोरिया मास्टर्स बॅडमिंटन विजेतेपद

**आसान, ९ ऑगस्ट**




रविवारी झालेल्या कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अस्मिता चलिहाने पहिला गेम गमावल्यानंतर जोरदार पुनरागमन करीत चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शीचा पराभव केला आणि ही स्पर्धा जिंकणारी इतिहासातील पहिली भारतीय खेळाडू ठरली. २६ वर्षीय डावखुऱ्या अस्मिताने ५३ मिनिटांत हानवर १४-२१, २१-१४, २१-१४ असा विजय मिळविला. या विजयामुळे तिने आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठे विजेतेपद पटकावले व भारतातील 'सुपर ३००' विजेत्यांच्या विशेष गटात स्थान मिळविले.

गुवाहाटी येथील 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सेलेन्स'मध्ये (एनसीई) प्रशिक्षण घेणारी अस्मिता रविवारी या यादीत सामील झाली. या स्तरावर माजी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेली सायना नेहवाल आणि माजी जागतिक विजेती पी.व्ही. सिंधूने अनेक विजेतेपदे जिंकली आहेत; तसेच, देविका सिहागने फेब्रुवारीमध्ये 'थायलंड मास्टर्स' व तन्वी शर्माने गत आठवड्यात 'चीन तैपेई ओपन'चे विजेतेपद पटकावले होते.

मला खूप छान व अविश्वसनीय वाटत आहे. मी हे यश पचवण्याचा प्रयत्न करत आहे. आता मला आणखी यश मिळविण्याची भूक लागली आहे, असे अस्मिता कोरिया मास्टर्सचे विजेतेपद जिंकल्यानंतर म्हणाली.

जागतिक क्रमवारीत ५० व्या स्थानावर असलेल्या अस्मिताने उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित हिना अकेचीचा पराभव केला होता. अंतिम सामन्याची सुरुवात तिने दमदारपणे केली व ९-५ अशी आघाडी घेतली; मात्र, त्यानंतर सलग चुकांमुळे तिने पाच गुण गमावले आणि पहिल्या गेममधील आपली आघाडीही गमावली.

तरीही, गुवाहाटीच्या या शटलरने पुढील दोन गेम्समध्ये आपली चूक सुधारली. रॅलीजमध्ये टिकून राहण्यासाठी तिने संयम राखला आणि निर्णायक क्षणी 'विजयी फटके' मारत अंतिम सामना आपल्या नावे केला. पहिल्या गेममध्ये 'ड्रिफ्ट'च्या (हवेच्या प्रवाहाच्या) परिस्थितीमुळे खेळणे थोडे कठीण होते, त्यामुळे मला परिस्थिती हाताळता आली नाही. पण दुसऱ्या गेममध्ये, कोर्टाची दुसरी बाजू अधिक सोयीस्कर होती आणि तिथे हवेचा प्रवाह (ड्रिफ्ट) कमी होता, त्यामुळे मला खेळावर नियंत्रण मिळविता आले. आणि तिसऱ्या गेममध्ये, ११ गुणांनंतर मी पुन्हा बाजू बदलली व मला चांगली बाजू मिळाली. त्यामुळे, मी हा विजय मिळवू शकले याचा मला आनंद आहे, असे अस्मिता म्हणाली. (वृत्तसंस्था)

# बसंत कुमार मेघवालची 'चांदी'

### जागतिक २० वर्षांखालील अॅथ्लेटिक्स उंच उडीचे पदक जिंकणारा पहिला भारतीय



**युजीन, ९ ऑगस्ट**

येथे सुरू असलेल्या जागतिक २० वर्षांखालील अॅथ्लेटिक्स स्पर्धेत भारताच्या बसंत कुमार मेघवालने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवित पुरुषांच्या उंच उडी प्रकारात रौप्यपदक पटकावले. तो २० वर्षांखालील जागतिक स्पर्धेत उंच उडीचे पदक जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू होण्याचा मान मिळविला.

राजस्थानमधील श्री गंगानगर जिल्ह्यातील अनुपगढ या सीमावर्ती भागातील रहिवासी असलेल्या या १९ वर्षीय बसंत कुमारने २.२१ मीटरची सर्वोत्तम उडी मारली. ही कामगिरी त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीइतकीच होती.

शुक्रवारी भालाफेक प्रकारात आशिष यादवने जिंकलेल्या रौप्यपदकानंतर, चालू स्पर्धेतील भारताचे हे दुसरे पदक आहे. अल्जेरियाच्या युनेस अयाचीकडून निसटत्या फरकाने पराभूत झाल्यामुळे बसंतचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले, तर ग्रेट ब्रिटनच्या ओटिस पूलने कांस्यपदक जिंकले.

२.२१ मीटरची उंची पार केल्यानंतर, पदके जिंकणाऱ्या तिन्ही स्पर्धकांना २.२४ मीटरचा टप्पा गाठण्यात अपयश आले. त्यामुळे 'काऊंटबॅक' पद्धतीचा अवलंब करावा लागला, ज्यामध्ये आयाचीने बसंतवर सरशी साधली.

#### शाहनवाज खानने लांब उडीत कांस्यपदक जिंकले

शाहनवाज खानने पुरुषांच्या लांब उडी प्रकारात कांस्यपदक पटकावले. आशिष यादव (भालाफेक) व बसंत कुमार मेघवालने (उंच उडी) जिंकलेल्या रौप्यपदकांनंतर या स्पर्धेतील भारताचे हे तिसरे पदक ठरले आहे. या स्पर्धेत लांब उडीचे पदक जिंकणारा शाहनवाज हा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे; यापूर्वी २०२१ मध्ये शैली सिंगने महिलांच्या लांब उडीत रौप्यपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)



## 'फिटनेसला हो, अंमली पदार्थांना नाही म्हणा'

**हनोल :** रविवारी गुजरातच्या हनोल येथून 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल'च्या ८५ व्या आवृत्तीचे नेतृत्व केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी केले. हा कार्यक्रम 'नशा मुक्त भारत' या संकल्पनेवर आणि 'फिटनेसला हो म्हणा, अंमली पदार्थांना नाही म्हणा' या संदेशावर आधारित होता. 'फिट इंडिया मूव्हमेंट' अंतर्गत युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाने अंमली पदार्थांच्या व्यसनाविरुद्धच्या मोहिमेत देशातील तरुणांना अग्रस्थानी ठेवले; यात सहभागींनी अंमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि निरोगी व सक्रिय जीवनशैली स्वीकारण्याची सामूहिक शपथ घेतली.

# पार्क यांच्या मार्गदर्शनाखालील पुढील टप्पा आकारास येतोय्

## सिंधूसोबत ऑलिम्पिक कांस्यपदकापासून ते सलग 'सुपर ३००' विजेतेपदांपर्यंत

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

दोन आठवड्यात दोन वेगवेगळ्या खेळाडूंनी दोन 'सुपर ३००' विजेतेपदे पटकावलीत. भारतीय बॅडमिंटन संघाचे मुख्य प्रशिक्षक पार्क ते-सांग यांच्यासाठी हा केवळ चांगल्या निकालांचा दोन आठवड्यांचा कालावधी नाही, तर भारतीय बॅडमिंटनमध्ये त्यांनी घेतलेल्या मेहनतीची ही एक झलक आहे. ते अशा खेळाडूंना घडवित आहेत, ज्यांच्याकडून त्यांना भारतीय बॅडमिंटनच्या पुढील पिढीतील स्टार्स बनण्याची आशा आहे.

गत रविवारी, १७ वर्षीय तन्वी शर्माने 'तैपेई ओपन' जिंकली. त्यानंतर सात दिवसांनी, २६ वर्षीय अस्मिता चालिहाने गुडघ्याच्या गंभीर दुखापतीतून सावरत शानदार पुनरागमन करीत 'कोरिया मास्टर्स'चे विजेतेपद पटकावले.

हे दोन आठवडे अद्भुत होते. गेल्या आठवड्यात तन्वीची कामगिरीही अप्रतिम होती. ती अवघ्या १७ वर्षांची आहे आणि तिने तिचे पहिले 'बीडब्ल्यूएफ' स्तरावरील विजेतेपद जिंकले. आज मला अधिक आनंद झाला कारण अस्मितासाठी ही पहिलीच अंतिम फेरी होती व तिने विजेतेपद जिंकले. एक प्रशिक्षक म्हणून मी खूप आनंदी आहे, असे पार्क यांनी कोरियातील 'आसान' येथून सांगितले.

पार्क यांनी हैदराबादमध्ये पी.व्ही. सिंधूसोबत चार वर्षे काम केले; या कालावधीची सांगता टोकियो ऑलिम्पिकमधील कांस्यपदकाने झाली. तो सहवास संपल्यानंतर, भारतीय बॅडमिंटन संघटनेने त्यांना युवा खेळाडूंसोबत काम करण्यासाठी संपर्क साधला.





अस्मिता व तन्वीसोबत प्रशिक्षक पार्क ते-सांग

जेव्हा मी सिंधूसोबत काम करायला सुरुवात केली, तेव्हा ती आधीच जागतिक विजेती होती आणि तिच्याभोवती चांगल्या वरिष्ठ खेळाडूंचा गट होता, त्यामुळेच मी ठरविले की, या खेळाडूंना स्वतः, माझ्या हातांनी घडवेन. भारतीय खेळाडूंची एक नवीन पिढी तयार करणे हा त्यामागचा उद्देश होता, असे पार्क यांनी सांगितले.

#### लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता हे ध्येय

तन्वी शर्मा व अस्मिता चालिहा या दोघींसाठीही आमचे मोठे उद्दिष्ट समान आहे. पुढील वर्षी १ मेपासून २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता शर्यत सुरू होईल, त्यामुळे पुढचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. ऑलिम्पिकमधील स्थानासाठी खऱ्या अर्थाने आव्हान उभे करणे हे तन्वी व अस्मिता यांच्यासाठी एक कठीण आव्हान असणार आहे. या दोघींनी माझ्या सूचनांचे पालन केले पाहिजे आणि खूप कठोर सराव केला पाहिजे. मी त्यांच्या तग धरण्याच्या क्षमतेची व मानसिक बळाची काळजी घेईन, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# श्रीलंकेत गौतम गंभीरची कसोटी

**कोलंबो, ९ ऑगस्ट**

श्रीलंकेतील आगामी कसोटी मालिकेत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरसमोर एक निर्णायक क्षण उभा आहे. गंभीरच्या कार्यकाळात भारताने एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये जगातील अव्वल संघ म्हणून आपली ओळख निर्माण केली असली, तरी कसोटी क्रिकेटमध्ये मात्र त्यांना तीच उच्च दर्जाची कामगिरी कायम राखता आलेली नाही.

गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने दोन आयसीसी विजेतेपदे पटकावली आहेत, २०२५ ची आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि या वर्षाच्या सुरुवातीला जिंकलेला टी-२० विश्वचषक.



मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये भारताचे प्रशिक्षक म्हणून त्यांची कामगिरी निराशाजनक राहिली आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये मायदेशात बांगलादेशविरुद्ध २-० असा सहज विजय मिळवून त्यांनी आपल्या कार्यकाळाची सुरुवात केली होती. त्यानंतर अवघ्या एका महिन्यात, न्यूझीलंडविरुद्धच्या मायदेशातील मालिकेत भारताला ३-० असा लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला; फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांवर खेळण्याचा भारताचा जुगार पूर्णपणे फसला.

कसोटी प्रशिक्षक म्हणून गंभीरच्या प्रतिमेला आणखी एक धक्का बसला जेव्हा भारताला ऑस्ट्रेलियात १-३ असा पराभव स्वीकारावा लागला. याच देशात यापूर्वी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने दोनदा विजय मिळविला होता. (वृत्तसंस्था)

# एकातेरिनाकडून सबालेन्का पराभूत


एकातेरिना अलेक्झांड्रोव्हा

### टोरोंटो मास्टर्स टेनिस

**टोरोंटो, ९ ऑगस्ट**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली बेलारूसची आर्यना सबालेन्का डब्ल्यूटीए टोरोंटो मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या चौथ्या फेरीच्या सामन्यात रशियाच्या १६ व्या मानांकित एकातेरिना अलेक्झांड्रोव्हाकडून पराभूत झाली. अलेक्झांड्रोव्हाने चार वेळच्या ग्रँड स्लॅम विजेत्या सबालेन्काला २ तास २९ मिनिटांत ७-६ (७/३), ४-६, ६-४ असे पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

पुढील महिन्यात सलग तिसऱ्या यूएस ओपन विजेतेपदाच्या शोधात असलेल्या सबालेन्काचा, अलेक्झांड्रोव्हासोबतच्या कारकिर्दीतील डब्ल्यूटीए स्पर्धेत विजयाचा रेकॉर्ड ५-५ असा झाला आहे. उपांत्यपूर्व फेरीत अलेक्झांड्रोव्हाचा सामना अमेरिकेची आठवी मानांकित अमांडा अनिसिमोव्हा किंवा युक्रेनची नववी मानांकित एलिना स्वितोलिना यांच्यापैकी एकाशी होईल.

पहिल्या सेटमध्ये सबालेन्काने सर्व्हिस ब्रेक करून २-० अशी आघाडी घेतली, त्यानंतरचे चार गेम्स गमावले, पण नंतर आपली सर्व्हिस राखत फोरहँड ड्रॉप व्हॉली विनरच्या जोरावर ४-४ अशी बरोबरी साधली.

११ व्या गेममध्ये सबालेन्काने आणि १२ व्या गेममध्ये अलेक्झांड्रोव्हाने डबल फॉल्टमुळे सर्व्हिस ब्रेक झाल्याने सामना टाय-ब्रेकमध्ये गेला. जेव्हा सबालेन्काने क्रॉसकोर्ट फोरहँड बाहेर मारला, तेव्हा रशियन खेळाडूने शेवटच्या सहापैकी पाच गुण मिळवून पहिला सेट जिंकला.

दुसऱ्या सेटमध्ये, अलेक्झांड्रोव्हाने फोरहँड बाहेर मारल्याने सर्व्हिस ब्रेक गमावला आणि सबालेन्काने ४-३ अशी आघाडी मिळाली. त्यानंतर अव्वल मानांकित खेळाडूने दोनदा सर्व्हिस राखत निर्णायक सेट खेळण्याचा भाग पाडले.

सबालेन्काने फोरहँड नेटमध्ये मारल्याने तिची सर्व्हिस ब्रेक झाली आणि अलेक्झांड्रोव्हाला ३-१ अशी आघाडी मिळाली, पण सातव्या गेममध्ये रशियन खेळाडूने डबल फॉल्ट करून सर्व्हिस ब्रेक गमावला. दहाव्या गेममध्ये, सबालेन्काने तीन विनाकारण चुका केल्या, ज्यामुळे अलेक्झांड्रोव्हाला सर्व्हिस ब्रेक आणि मॅच पॉईंट्स मिळाले. आर्यना सबालेन्काने आपला सहावा आणि शेवटचा डबल फॉल्ट केला आणि सामना गमावला. (वृत्तसंस्था)

# खेळाडू ठरावीक वेळेत तंदुरुस्त होण्यास 'यंत्रे' नाही

### सीओई व संघ व्यवस्थापनात उत्कृष्ट समन्वय

**बेंगळुरू, ९ ऑगस्ट**

क्रिकेटपटूंच्या दुखापतीतून सावरण्याच्या प्रक्रियेला विलंब झाल्यास त्यासाठी या केंद्राला दोष देऊ नये; कारण क्रिकेटपटू काही 'यंत्रे' नाहीत की जे प्रत्येक वेळी निश्चित केलेल्या वेळेतच पूर्णपणे बरे होतील, असे बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे (सीओई) प्रमुख व्ही. व्ही. एस. लक्ष्मण रविवारी म्हणाले.

सीओई व संघ व्यवस्थापन यांच्यात 'अखंड' समन्वय असल्याचे लक्ष्मण यांनी अधोरेखित केले. प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराह, अष्टपैलू खेळाडू हर्षित राणा, हार्दिक पंड्या, वॉशिंग्टन सुंदर आणि वरच्या फळीतील फलंदाज बी. साई सुदर्शन हे काही असे खेळाडू आहेत जे सध्या सीओई मध्ये आपापल्या दुखापतीतून सावरत आहेत.

"पहा, सीओई हे केवळ पुनर्वसन केंद्र नाही, तर क्रिकेटपटूंना उत्कृष्ट कामगिरी करण्यास मदत करण्यात त्याची मोठी भूमिका आहे. सीओई व दोन्ही संघांचे व्यवस्थापन तसेच दोन्ही संघांचे एसएसएसएम कर्मचारी यांच्यात उत्कृष्ट समन्वय आहे. त्यामुळे त्यांच्यात अखंड संवाद साधला जातो. तंदुरुस्तीचे कडक निकष आणि मानवी शरीराची रचना पाहता, एखाद्या खेळाडूसाठी विशिष्ट वेळेत पूर्ण तंदुरुस्ती प्राप्त करणे कठीण असते, असे लक्ष्मण म्हणाले.


बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सचिव देवजित सैकिया, व्ही. व्ही. व्ही. एस. लक्ष्मण व इतर

मार्गदर्शक तत्त्वे आणि वेळापत्रक हे अपेक्षांवर आधारित असतात, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे, पण हे मानवी शरीर आहे. हे काही यंत्र नाही की जिथे वेळापत्रकाचे नेहमीच तंतोतंत पालन होईल. त्यामुळे खेळाडूंची प्रगती कशी होत आहे हे समजून घेण्याची प्रक्रिया सतत सुरू असते. दुखापतीचे निदान झाल्यापासून ते सीओईमधून बाहेर पडेपर्यंत आणि तंदुरुस्त घोषित होईपर्यंत ही प्रक्रिया चालते, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रक्रियेत, निवडकर्ता 'सेंटर ऑफ एक्सलन्स'कडे खेळाडूच्या तंदुरुस्तीचा अहवाल मागवतो; आम्ही तो अहवाल गोळा करून निवड समितीच्या अध्यक्षांना पाठवितो व त्याची प्रत संघाचे मुख्य प्रशिक्षक व बीसीसीआयलाही दिली जाते. खेळाडूंची निवड ही त्यांच्या तंदुरुस्तीवर अवलंबून असते. त्यामुळे, तंदुरुस्तीची मंजुरी मिळाल्यासच बुमराह व सुदर्शन यांची बीसीसीआय दौऱ्यासाठी निवड होणार होती. दुखापती हा खेळाडूच्या कारकिर्दीचाच एक अविभाज्य भाग आहे व ही चिंतेची बाब आहे असे मला वाटत नाही. एखादा खेळाडू उच्च स्तरावर खेळत असतो, तेव्हा त्याला आपली १०० टक्क्यांहून अधिक क्षमता पणाला लावावी लागते. त्यामुळे मला वाटते की, दुखापती हा कोणत्याही खेळाडूच्या प्रवासाचा एक भाग असतो. खेळाडूंना होणाऱ्या दुखापतींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे, असे ५१ वर्षीय लक्ष्मण म्हणाले.

बीसीसीआयच्या सीओईमधील फिटनेस कर्मचारी- अॅड्रियन, निक तसेच कमलेश हे काम योग्यरित्या करीत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

#### खेळाडू तंदुरुस्त झाला, तरच संघात समाविष्ट केला जाईल : सैकिया

दुखापतग्रस्त खेळाडूंच्या पुनर्वसनाची एक प्रक्रिया आहे. आम्ही एसएसएम व एस ॲण्ड सी प्रक्रियेअंतर्गत काही निकष निश्चित केले आहेत. जोपर्यंत ते निकष पूर्ण होत नाहीत किंवा त्याहून चांगली कामगिरी होत नाही, तोपर्यंत आम्ही खेळाडूंना खेळण्यासाठी मुक्त करत नाही. यामागचा मुख्य उद्देश असा आहे की, संघात खेळाडू परततो, तेव्हा त्याने पहिल्या सामन्यापासूनच आपल्या पूर्ण क्षमतेनुसार कामगिरी करावी, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया म्हणाले. २१ किंवा २८ दिवसांच्या कालावधीत खेळाडू तंदुरुस्त झाला आणि त्याची निवड झाली, तर त्याला संघात समाविष्ट केले जाईल. साधारणपणे, संघ रवाना होण्याच्या किमान तीन ते चार आठवडे आधी आमच्या निवडीच्या बैठका होतात. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘दक्षिण’मधील विद्यार्थ्यांना भाषिक अडचण

## ‘फाईव्ह स्टार‘ शाळांसाठी पं.स.चा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुका हा बहुभाषिक तालुका असून तालुक्यातील अनेक मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मातृभाषा कन्नड आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे अध्ययन करताना अडचणी येत आहेत. इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करताना त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेता, नवोपक्रम अंतर्गत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक




शाळा ह्या ‘फाईव्ह स्टार’ दर्जाचे करण्याकामी दक्षिण सोलापूर पंचायत समितीने पुढाकार घेतला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विदयार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषा विकासासाठी व इंग्रजी अध्यापन वृध्दींगत करण्यासाठी दक्षिण सोलापूर पंचायत समितीने विविध नवोपक्रम सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासाठी सर्व मुख्याद्यापकांना इंग्रजीमध्ये परिपाठ सादर, इंग्रजीमध्ये फलक लेखन, इंग्रजी वर्तमानपत्र वाचन, दैनंदिन इंग्रजी संभाषण व शाळा रँकींग स्पर्धा सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. फाईव्ह स्टार दर्जा प्राप्त करणाऱ्या शाळांना ‘‘फाईव्ह स्टार‘ शाळा म्हणून घोषित करण्यात येईल. अशा शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

### फाईव्ह स्टार शाळा घोषित करणार



सर्व मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी वरील उपक्रम प्रभावीपणे राबवून विदयार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषा विकासासाठी इंग्रजी अध्यापन वृध्दींगत करावे. तसेच फाईव्ह स्टार दर्जा प्राप्त करणाऱ्या शाळांना ‘फाईव्ह स्टार‘ म्हणून घोषित करण्यात येणार आहे. अशा शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करून त्यांचा आदर्श इतर शाळांसमोर ठेवण्यात येणार आहे.

- **मनोज राऊत,** गटविकास अधिकारी, दक्षिण सोलापूर पंचायत समिती.

### विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढणार



बहुभाषिक दक्षिण तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाचे आवड निर्माण करुन दैनंदिन वापर करण्यासाठी दक्षिण पंचायत समितीने नवीन उपक्रम सुरु केला आहे. बीडीओ मनोज राऊत व सर्व पदाधिकार्यांच्या सहकार्याने शैक्षणिक गुणवत्ता वाढणार आहे. यामुळे भविष्यात स्पर्धा परीक्षा देण्यासाठी मदत होईल, असे दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे सभापती संदीप टेळे यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम



विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या ज्ञानात वाढ, आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी तसेच प्रभावी संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी हा अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. दैनंदिन इंग्रजी संभाषण, फलक लेखन, इंग्रजी वाचन व विविध कृतींमधून विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात इंग्रजी शिकता येईल.

- **लक्ष्मण काटेकर, सोलापूर**



दक्षिण तालुक्यात कन्नड भाषेचा वापर अधिक आहे. शाळांमध्ये मराठी आणि हिंदी शिकविताना इंग्रजीचाही वापर केला जातो. दक्षिण पंचायत समितीने इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्येच इंग्रजी भाषेविषयी आवड निर्माण होईल.

- **मल्लप्पा वाघमोडे, पालक, मंद्रूप**

## राज्याच्या मुख्य सचिवांकडून चंद्रभागा घाट, मंदिर परिसराची पाहणी



### श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ ऑगस्ट -**

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पंढरपूर दौऱ्यादरम्यान चंद्रभागा नदी घाट तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी त्यांचे स्वागत केले.

अग्रवाल यांनी प्रथम चंद्रभागा घाट परिसराची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी नदीपात्र स्वच्छता, भाविकांसाठी स्नान सुविधा, प्रकाश व्यवस्था तसेच घाटावरील सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. आषाढी-कार्तिकी वारीतील भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनाबाबत माहिती दिली. तसेच यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये स्वच्छता व वारकऱ्यांना सुविधांना प्राधान्य दिल्याचे सांगितले.

त्यानंतर अग्रवाल यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत ७३ कोटीच्या निधीतून झालेल्या मंदिर विकास, सुशोभिकरण कामांची पाहणीही केली. जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी प्रस्तावित पंढरपूर कॉरिडॉरबाबत माहिती दिली. आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्ग व पंढरपूर शहर व परिसरात गर्दी नियंत्रणासाठी व वाहतूक नियमासाठी पोलीस प्रशासनाकडून वापरलेल्या ए.आय तंत्रज्ञानाबाबतची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली. प्रस्तावित विकासकामे, भाविकांच्या सुविधा आणि परिसराच्या एकात्मिक नियोजनाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य सचिवांनी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी व समन्वयाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

### श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन

अग्रवाल यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन राज्यातील शेतकरी व भाविकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांचा सत्कार केला. यावेळी नगराध्यक्षा प्रणिता भालके, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, प्रांत अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण घम आदी अधिकारी उपस्थित होते.

## नंदेश्वर येथे विवाहितेची आत्महत्या

**मंगळवेढा, दि. ९ ऑगस्ट -**

नंदेश्वर येथे एका २३ वर्षीय विवाहित महिलेने अज्ञात कारणावरुन राहत्या घरात साडीच्या सहाय्याने सिलींग फॅनला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. शरणाप्पा पुजारी (वय ३२, दूध डेअरी लॅब असिस्टंट अहिर संघ ता.इंडी) हे नंदेश्वर येथे भाड्याच्या घरात राहत होते. दि.८ ऑगस्ट रोजी सकाळी ६.४५ वाजता त्यांची पत्नी काशिबाई (वय २३) हिने अज्ञात कारणावरुन राहते घरात साडीच्या सहाय्याने फॅनला गळफास घेवून आत्महत्या केल्याची त्यांनी माहिती दिली. याचा अधिक तपास पोलीस हवालदार शिंदे हे करीत आहेत.

## अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी बसवंतराय बिराजदार यांची निवड

**अक्कलकोट, दि. ९ ऑगस्ट -**

मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन अँड प्रॅक्टिशनर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी बसवंतराय बिराजदार



यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. बिराजदार हे गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील लॅब तंत्रज्ञांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सक्रियपणे कार्यरत आहेत. अक्कलकोट तालुक्याची नूतन कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्षपदी काशिनाथ माळी, सचिवपदी शरण बसप्पा ढेपे आणि खजिनदारपदी नितीन पाटील यांची निवड झाली.कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र बागुल, उपाध्यक्ष डॉ. जगदीश पाटील, सचिव केतन अवसरकर, समन्वयक योगेश देशमुख आणि खजिनदार मधुकर सानप प्रमुख उपस्थित होते. राज्य पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित अध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले.



## भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संघातर्फे एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने गणेश पेठ येथील हिंगुलांबिका सांस्कृतिक भवन येथे ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबीर आयोजित करण्यात आले. सर्वप्रथम हिंगुलांबिका देवी प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, सचिव अरुण आकुडे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबीराचा २५६ नागरिकांनी लाभ घेतला.यावेळी शशिकांत रंगदळ, रविंद्र खमितकर, श्रीकांत अंबुरे, सुभाष पाखरे, सुदाम पिसे, शामराव क्षीरसागर, सूर्यकांत खमितकर, रामराव डोईजोडे, रविंद्र आकुडे, अरुण उत्तरकर, सतिश हिबारे, दत्तात्रय हिबारे यांचे सहकार्य लाभले. अशोक महिंद्रकर, सुनील डोईजोडे, गिरीश माळवदकर, बाळकृष्ण पतंगे, दत्तात्रय बुलबुले, उमा पुकाळे, कृष्णा चिट्याल, शोभा अंबुरे, शोभा आकुडे उपस्थित होते.

## संकटाना सामोरे जाण्यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे आवश्यक : मोनिका कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

स्वसंरक्षण प्रशिक्षण घेतल्याने आपल्यात आत्मविश्वास, शिस्त आणि धैर्य निर्माण होते त्यामुळे आपण कोणत्याही संकटाला सामोरे जाऊ शकतो असे प्रतिपादन माननीय मोनिका कोठे यांनी केले. स्व. तात्यासाहेब विष्णुपंत कोठे यांच्या ८९व्या जयंतीनिमित्त विष्णुपंत कोठे मेमोरियल इंग्लिश स्कूल येथे आयोजित चार दिवसीय शिबिराचा शुभारंभ झाला. शिबिराच्या पहिल्याच दिवशी हिंदु जनजागृती समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, प्रात्यक्षिके तसेच जनजागृतीपर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी त्या बोलत होत्या.



मोनिका कोठे यांनी हिंदु जनजागृती समितीचे आभार व्यक्त करत समितीच्या निःस्वार्थ सेवाकार्याचे आणि समाजहितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच स्वसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. यश मुगड्याल, डॉ. राधिका चिलका, नगरसेवक श्री. सत्यनारायण गुर्रम, श्री. रमेश यन्नम, श्री. निर्मलकुमार काकडे तसेच शाळेच्या प्राचार्या पुष्पा नायर हे उपस्थित होते.

शिबिराचा आरंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाला. त्यानंतर हिंदु जनजागृती समितीचे प्रशिक्षक यश मुगड्याल, लिंगराज हुळ्ळे, श्रुतिका पोगुल, गौतमी सीता, रुचिता आडम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी कराटेची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली.

## मनोज जरांगे-पाटील शिवतीर्थावर नतमस्तक

### मंगळवेढ्यात स्वागत; परिसरात घोषणाबाजी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ९ ऑगस्ट -**

पश्चिम महाराष्ट्रातील मराठा आरक्षणासाठी सातारा गॅझेट लागू करावे आणि मराठा समाजाला न्याय द्या या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या लढ्याला पश्चिम महाराष्ट्रात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मढ्यानंतर सरकोली येथेही त्यांच्या सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सभा संपल्यावर ते मंगळवेढ्यातील शिवतीर्थावर येवून नतमस्तक झाले.

सरकोली येथील सभा आटोपल्यानंतर मंगळवेढ्यातील मराठा बांधवांच्या आग्रहास्तव ऐनवेळी आपल्या ठरलेल्या



मार्गात बदल करून मंगळवेढ्यात येण्याचे मनोज जरांगे पाटील यांनी मान्य केले. मंगळवेढ्यातील शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास नतमस्तक होऊन अभिवादन केले. यावेळी मराठा बांधवांनी त्यांचे एक मराठा लाख मराठा,एकच मिशन मराठा आरक्षण,जय भवानी जय शिवाजी अशा घोषणांनी स्वागत केले. मंगळवेढा नगरीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सुनंदा आवताडे यांनी मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत केले. याप्रसंगी दामाजी शुगरचे संचालक सिद्धेश्वर आवताडे, लतीफ तांबोळी, नगरसेवक प्रशांत गायकवाड, सीमा बुरजे, प्रमोद सावंजी यांच्यासह सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचे सर्व शिवभक्त, अनेक मराठा बांधव उपस्थित होते

या प्रसंगी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनाची तयारी मोठ्या स्वरूपात करण्याचे आवाहन केले. आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मराठा आरक्षणाच्या लढ्याला बळ देण्याचे आवाहन त्यांनी केले.

## लाच प्रकरणी कोल्हापूर सर्किट बेंचने रद्द केला सोलापूर जिल्हा न्यायालयाचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

तक्रारदाराच्या अर्जावर कामासाठी लाच मागितल्याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल न करण्याबाबत आरोपीने दाखल केलेला अर्ज सोलापूर जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता. मात्र तो निकाल उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने रद्द केला आहे.

तक्रारदाराचा वळसंग येथील शेतजमिनीचा काही भाग सोलापूर-अक्कलकोट रस्त्यासाठी संपादित झाला असून सदरचा भाग हा जास्त संपादन झाल्याची शंका आल्याने त्यांनी जमिनीची मोजणी करण्यासाठी उप-अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सोलापूर यांच्या कार्यालयात अर्ज करून मोजणी होऊन तसा अहवाल मिळणेकामी अर्ज केलेला होता. सदर कार्यालयातील अमोल भोसले, उप-अधीक्षक, ज्योतीपाल कुचेकर, शिरस्तेदार व द-याप्पा कुंभार, पर्यवेक्षक भूमापक, भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर यांनी तक्रारदाराकडे रक्कम १ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली, म्हणून तक्रारदाराने त्यांच्याविरुद्ध सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

सोलापूर लाचलुचपत विभागाने केलेल्या पडताळणीत तडजोडीअंती रक्कम रु. ४० हजार लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सर्व आरोपींविरुद्ध सापळा रचला. लाचेची रक्कम रु. ४० हजार स्वीकारताना आरोपी द-याप्पा कुंभारला रंगेहात पकडले होते. त्यानुसार सदर बझार पोलिस ठाण्यात सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर प्रकरणात अमोल भोसले व द-याप्पा कुंभार यांच्यावतीने ॲड. निलेश जोशी यांनी दोषमुक्तीसाठी अर्ज करून न्यायालयास गुन्हाची दखल घेता येणार नाही, असा अर्ज दाखल केला होता. तो जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता. त्याविरुद्ध अमोल भोसले व द-याप्पा कुंभार यांनी ॲड. निलेश जोशी यांच्यावतीने उच्च न्यायालय, कोल्हापूर सर्किट बेंच येथे रिव्हीजन अर्ज दाखल केला. आरोपीच्यावतीने असे मुद्दे मांडले की, तक्रारदाराची शेतजमीन मोजणी होऊन त्याबाबतचा अहवाल भूमी अभिलेख कार्यालयात तक्रारीपूर्वीच दाखल केल्याने त्यांच्याकडे तक्रारदाराचे कोणतेही शासकीय काम प्रलंबित नव्हते. तसेच लाच पडताळणीच्यावेळी आरोपीकडून कोणत्याही प्रकारची स्पष्टपणे लाच मागितली नसल्याचे व तक्रारदार हा सरकारी कर्मचाऱ्यांविरुध्द खोट्या केसेस करत असल्याचे कागदपत्रांच्या आधारे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

लाचलुचपत पोलिसांनी आरोपींविरुद्ध कोणताही सबळ व ठोस पुरावा नसल्याचे व कायद्यातील अनिवार्य तरतुदीची पूर्तता केली नसल्याने आरोपींविरुद्ध गुन्ह्याची दखल घेता येणार नाही, असा युक्तिवाद केला. त्यापृष्ठर्थ सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे दाखले दिलेले होते. ॲड. निलेश जोशी, सोलापूर यांनी केलेला युक्तिवाद मान्य करून न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी सोलापूर जिल्हा न्यायालयाचा आदेश रद्द करून आरोपींविरुद्ध दाखल गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त केले. सदर प्रकरणात अमोल भोसले व द-याप्पा कुंभार यांच्या वतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. शक्ती कोळेकर, ॲड. स्मिता शिंदे यांनी काम पाहिले.

## ब्रह्मपुरी-मुंढेवाडी जोडरस्ता जागोजागी खचला धोकादायक रस्ता तात्काळ दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ९ ऑगस्ट -**

ब्रह्मपूरी-मुंढेवाडी या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने अक्षरशः रस्त्याची चाळण झाली आहे. याकडे जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीन संताप व्यक्त होत आहे. हा रस्ता तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी ब्रह्मपूरी व मुंढेवाडी गावच्या नागरिक व शेतकऱ्यांतून होत आहे.

ब्रह्मपूरी-मुंढेवाडी हा रस्ता दोन गावांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. रस्त्याचे काम जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून केले होते. रस्ता जागोजागी खचल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बागायत क्षेत्र असल्यामुळे ऊस गाळप हंगामात या रस्त्यावरुन ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. गेल्या वर्षी पावसाळ्यात हा रस्ता भिजून अडीच फुटाचे मोठाले खड्डे पडल्याने तो धोकादायक बनला आहे. एवढी गंभीर परिस्थिती असतानाही जि.प. बांधकाम अधिकाऱ्यांचे या रस्त्याकडे अद्यापही लक्ष कसे काय गेले नाही? यावर नागरिकामधून संताप व्यक्त होत आहे. काही महिन्यातच ऊस गाळप हंगाम सुरु होणार असून ऊसाची भरलेली वाहने या रस्त्यावरुन कशी जाणार असाही सवाल शेतकरी विचारत आहेत. वाहने पलटी झाल्यास याची नुकसान भरपाई अधिकारी देणार का? असा सवालही होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या रस्त्याची पाहणी करुन तात्काळ रस्ता दुरुस्त करुन घ्यावा अशी मागणी या परिसरातून जोर धरत आहे.

## जुन्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला; डोक्याला पाच टाके, पाय फ्रॅक्चर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ९ ऑगस्ट -**

बार्शी शहरातील झाडबुके मैदान परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर दांडक्याने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना दि. ८ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत बार्शी शहर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मंदाबाई गायकवाड (वय ५५, रा. झाडबुके मैदान, पाण्याच्या टाकीजवळ, बार्शी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, शनिवार दि. ८ ऑगस्ट रोजी रात्री त्या व त्यांचा मुलगा सोमनाथ घरात असताना, वस्तीत राहणारा सनी फासगे हा त्यांच्या घरासमोर आला. पांडे चौक येथे शिवीगाळ केल्याच्या कारणावरून त्याने सोमनाथशी वाद घालत शिवीगाळ सुरु केली. मंदाबाई यांनी शिवीगाळ का करतोस, असे विचारले असता त्याने त्यांनाही शिवीगाळ करून ढकलून दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

त्यानंतर सनी फासगेने सोमनाथला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दांडक्याने डोक्यावर आणि उजव्या पायाच्या नडगीवर मारले. या हल्ल्यात सोमनाथ गंभीर जखमी होऊन घटनास्थळी बेशुद्ध पडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घटनेनंतर नातेवाईकांच्या मदतीने जखमी सोमनाथला रिक्षातून जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याच्या उजव्या पायाची नडगी फ्रॅक्चर झाल्याचे तसेच डोक्याला झालेल्या जखमेवर पाच टाके घालण्यात आल्याचे सांगितले. तो सध्या बेशुद्ध असून गंभीर जखमी आहे.

दरम्यान, आरोपीने मंदाबाई यांचा मोठा मुलगा नवनाथ, दीर सुरेश गायकवाड आणि पुतणी दिपाली बनसोडे यांनाही शिवीगाळ करून ‘तुमच्याकडे बघतोच’ अशी धमकी दिली. याप्रकरणी मंदाबाई गायकवाड यांनी सनी फासगेविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मराठा समाजाच्या लेकरासाठी माझी झुंज

### मनोज जरांगे-पाटील यांचे वाटंबरे येथील सभेत स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.९ ऑगस्ट-**

मी आपल्या समाजाच्या लेकरांसाठी झुंज देतोय. मराठा समाजाच्या लेकरावर अन्याय झाला की माझी तळपायाची आग मस्तकात जाते म्हणून मी शिव्या देतो, असे स्पष्टीकरण मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिले.

रविवार दि.९ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल, वाटंबरे ता.सांगोला येथे सभा झाली. याप्रसंगी विविध समाज बांधवांकडून जरांगे पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मराठा समाज बांधव हजारोंच्या संख्येने उपस्थित होता. समाजासाठी संघर्ष करणे ही माझी जबाबदारी आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून मला लांब घालवण्यासाठी माझ्याविरुद्ध षडयंत्र



रचले गेले. मराठा समाजाला प्रमोशन मिळत नाही, विद्यार्थ्यांना कॉलेजला ॲडमिशन मिळत नाही, त्यासाठी मी लढतोय. मराठा समाज या राज्यात मोठा आहे. मी मराठा समाजाला पक्के आरक्षण दिले आहे हे त्यांच्या आत्ता लक्षात आले आहे. मराठ्यांची सत्ता असताना ओबीसीचे एकही प्रमाणपत्र रद्द केलेले नाही, मग आमचे रद्द करण्यासाठी प्रयत्न का करता असा सवाल जरांगे पाटील यांनी केला. तसेच मराठा समाजाच्या युवकांनी आळस न करता दि.२९ ऑगस्टच्या अंतरवाली येथील आंदोलनास भेट द्यावी असे आवाहन केले. सभेसाठी सकल मराठा समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

### एकमेकाला सहकार्य करा

एकमेकाला सहकार्य करा, एकमेकातील वैर सोडून द्या, व्यसनापासून दूर राहा, शेतात एकमेकाचे बांध फोडू नका, अशी विनंती मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला यावेळी केली.

दैनिक सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

आपल्या नि:पक्ष, निर्भीड आणि जनहिताच्या पत्रकारितेने समाजप्रबोधनाचे महत्वाचे कार्य केले आहे. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!



शुभेच्छुक

लातूर जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभाग

जिल्हा सरचिटणीस

राम तुळशीराम काकडे

भिंगोली

ता. शिरूरअनंतपाळ

जि. लातूर


42

वर्धापन दिन


# महेश अर्बन को-ऑप बँक लि;

अहमदपूर जि. लातूर

फोन नं. ०२३८१ २६२७२२,२६२२०० Email- mahesh.bankyahoo.com

-: बँकेची ठळक वैशिष्टे :-

कार्यक्षेत्र : लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड, औरंगाबाद, सोलापूर व पुणे जिल्हा

मुख्य कार्यालयासह शाखा : अहमदपूर, जळकोट, लातूर, नांदेड, औरंगाबाद, उदगीर, बार्शी रोड लातूर, नळेगाव, औसा, कळंब, लोहा, सोलापूर, अंबाजोगाई रोड लातूर, औराद (श),, अंबाजोगाई व पुणे.

१) बँक स्थापनेपासून ऑडीट वर्ग अ.
२) ठेवीवर आकर्षक व्याजदर, जेष्ठ नागरीकांना पाऊन टक्का अधिक व्याज
३) तत्पर व विनम्र सेवा
४) अदयावत व सुसज्ञ मुख्य कार्यालय व शाखा
५) विमा संरक्षीत बँक
६) एसएमएस ची सुविधा
७) आरटीजीएस / एनईएफटी सुविधा
८) स्वत:चे स्वतंत्र डेटा सेंटर
९) ए.टी.एम. सुविधा उपलब्ध
१०) मोबाईल बँकींग / फोन पे सुविधा

अध्यक्ष



बाळासाहेब जाधव (माजी मंत्री)



मा.ना.श्री. बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री)

मा. संचालक मंडळ

मा.श्री. बाळासाहेब किशनराव जाधव, अध्यक्ष
मा.श्री. निवृत्तीराव सुदामराव कांबळे, उपाध्यक्ष
मा.श्री. बाबासाहेच मोहनराव पाटील, संचालक
मा.श्री. शिवानंद सांबप्पा हेंगणे, संचालक
मा.श्री. अशिष पंढरीनाथ गुणाले, संचालक
मा.श्री. अब्दुल मुजीब अब्दुल रऊफ पटेल, संचालक
मा.श्री. दिलीप कॉडलराव जाधव, संचालक
मा.श्री. विनायक गुलाचराव भोसले, संचालक
मा.श्री. सतिश बापूराव कल्याणे, संचालक
मा.श्री. अशोक नारायणराव गादेवार, संचालक
मा.श्री. नौनिहालसिंग गुलाबसिंह जहागीरदार, संचालक
मा.श्री. सुदर्शन निवृत्तीराव मुंडे, संचालक
मा.श्री. पुरुषोत्तम रामनिवास पुरोहित, संचालक
मा.सौ. संगीता महेंद्र खंडागळे, संचालीका
मा.श्रीमती सत्यकला शंकरराव जाधव, संचालीका
मा.ॲड.श्री. भारतभूषण भिमरावजी क्षीरसागर, तज्ञ संचालक
मा.श्री. धनंजय दादासाहेब दारफळकर, तज्ञ संचालक
मा.श्री.देवेंद्र भालचंद्र जाधव, व्यवस्थापक मंडळ सदस्य
मा.श्री.ॲड. सादीक गुलाम शेख, व्यवस्थापक मंडळ सदस्य
मा.श्री. अक्षयदीप ताराचंद पूत (सी.ए), व्यवस्थापक मंडळ सदस्य
मा.श्री. सिद्राम शंकरअप्पा रंदाळे, स. व्यवस्थापक
मा.श्री. प्रशांत पवन मांडवकर, प्र. व्यवस्थापक



वर्धापन दिनाच्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा!

सोलापूर तरुण भारत वृत्तसमूहास

वर्धापन दिनाच्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

संदिप धुमाळे

माजी शहराध्यक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार

माजी सदस्य सं. गां. नि. यो. समिती

शिरूर अनंतपाळ जि. लातूर



संधी निकेतन शिक्षण संस्था वडगाव

द्वारा संचलित

जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळा

उदगीर, जि. लातूर.



श्री राजापटेल अब्दुल मलिक

व्यवस्थापकीय अधीक्षक



श्री निवृत्ती महिपती वडगावकर

सचिव


42

वर्धापन दिन


सोलापूर तरुण भारत विभागीय कार्यालय लातूर वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर



अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर,

उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर,

उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे,

सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया,

सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लगे,

सहसचिव प्रशांत पेन्सलवार

कोषाध्यक्ष महादेव नौबद

सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे





मागासवर्गीय संघ रूपचंदनगर रेणापूर द्वारा संचलित

प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा

कै. दगडोजीराव देशमुख रूपचंद कनिष्ठ महाविद्यालय

मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह

श्री साई बालगृह



श्रीमती उषाताई मिठाराम राठोड

सचिव

पी.एन.लव्हेकर

मुख्याध्यापक

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद



प्रदीप मिठाराम राठोड

प्राचार्य/मुख्याध्यापक

रूपचंदनगर, रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर | सोमवार, १० ऑगस्ट २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


# 'एकजुटीच्या रथावर आरुढ होऊनी चल बा पुढती...'


एम.के.ग्रुपच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांनी मास्को येथे दिलेल्या भेटीचे देखावा.


जे.के.बहुउद्देशीय संस्थेने महाराष्ट्र दलित साहित्य संमेलना देखावा सादर केला.


लहुजी ब्रिगेड बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने स्त्रीचा आदर देखावा सादर केला.


एन.पी.ग्रुपच्या वतीने सादर करण्यात आलेला देखावा.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवाची दिमाखदार मिरवणुकीने सांगता

### ५५ मंडळांचा सहभाग, डॉल्बीच्या तालावर थिरकली तरुणाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

जयघोष, ढोल-ताशांचा निनाद, डॉल्बीचा दणदणाट, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित प्रबोधनात्मक देखाव्यांनी शहरातील वातावरण भारावून गेले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवाची रविवारी दिमाखदार मिरवणुकीने सांगता झाली. विविध सामाजिक संदेश देणारे आकर्षक देखावे हे मिरवणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. सुमारे ५५ मंडळांनी सहभाग घेतल्याने मिरवणुकीला भव्य स्वरुप प्राप्त झाले.

गुरुवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सार्वजनिक मंडळांच्या वतीने प्रतिमेची मनोभावे प्रतिष्ठापना करुन महोत्सवाला सुरुवात झाली होती. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रविवार, दि.९ ऑगस्ट २०२६ रोजी मिरवणुकीने महोत्सवाची सांगता करण्यात आली. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करुन मिरवणुकीला प्रारंभ झाला. या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष साक्षांत लोखंडे, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, ॲड. शैलेश पोटफफोडे, युवराज पवार, अजय मोहिते, बंडू गवळी, वैशाली डोलारे, मनोज लोंढे, महेश लोंढे, किशोर जाधव, प्रवीण वाडे, विशाल लोंढे, सतीश बगाडे, गोविंद कांबळे, विश्वास शिंदे, सुहास शिंदे, शांतीलाल साबळे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



जे.के.बहुउद्देशीय संस्थेने महाराष्ट्र दलित साहित्य संमेलना देखावा.


सोलापूर शहरात रविवारी सायंकाळी अण्णाभाऊ साठे पुतळ्यापासून मिरवणुका काढण्यात आल्या.

**✲ महापुरुषांच्या विचारांचा जागर**

यंदाच्या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वस्ताद लहुजी साळवे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा जागर करणारे प्रबोधनात्मक देखावे सादर करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊंचे साहित्य, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गिरणी कामगारांचा संघर्ष, शिक्षणातून परिवर्तन आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देणाऱ्या देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

**✲ डॉल्बीचा आवाज, विद्युत रोषणाई**

डॉल्बीच्या चित्तथरारक आवाजासह रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने मिरवणुकीत विशेष रंग भरला. विविध गीतांवर तरुणाईने ठेका धरत उत्साहाला उधाण आणले. बुधवार पेठ, मातंग वस्ती, वीर फकीरा चौक, जुना बोरामणी नाका, लष्कर, विजापूर नाका, देगाव, पांढरी वस्ती, अशोक चौक, फॉरेस्ट यांसह शहरातील विविध भागांतील मंडळांनी मिरवणुकीत सहभाग घेतला.

**✲ या मार्गावरुन काढण्यात आली मिरवणूक**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकातून सुरु झालेली मिरवणूक रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा, मेकॅनिकी चौक मार्गे येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मिरवणुकीची सांगता झाली.

**✲ या देखाव्यांनी वेधले लक्ष**

आर. के. प्रतिष्ठान : कोहिनूर मिल : लाल बावटा कलापथक यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गिरणी कामगारांच्या हक्काच्या संघर्षाचा देखावा सादर केला. वारणेचा वाघ युथ फाउंडेशन, पांढरे वस्ती यांनी 'जग बदल घालुनी घाव - सांगूनी गेले मज भीमराव' हा देखावा सादर केला. वीर फकीरा तरुण मंडळाने 'संघर्षातून स्वाभिमान - शिक्षणातून परिवर्तन' हा संदेश दिला.

एस. एस. ग्रुपने 'एकजुटीच्या या रथावर आरूढ होऊनी चल बा पुढती...' हा देखावा सादर करून सामाजिक एकजुटीचे महत्त्व स्पष्ट केले. सी. एस. मित्रपरिवारने महापुरुषांचा देखावा सादर केला. मधला मांगवाडा तालीम सावधान तरुण मंडळाने 'मुंबई महाराष्ट्राचीच - संयुक्त महाराष्ट्र चळवळ' हा देखावा सादर केला. जय लहुजी युवा प्रतिष्ठानने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विविध ग्रंथसंपदेचा देखावा साकारला. नवरंग तरुण मंडळ, देगावने आकर्षक देखावा सादर केला, तर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तरुण मंडळाने 'शाळेत नेतानाचा' देखावा सादर केला. इतर मंडळांनीही लक्षवेधक व प्रबोधनात्मक देखावे सादर केले.

## ▶▶ महत्वाचे...

### शेती बांधाच्या वादातून दोघांना तलवार व सळईने मारहाण

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

शेती बांधाच्या वादातून दोघांना तलवार, लोखंडी सळई व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मोडनिंब (ता.माढा) येथे शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता घडली. सिध्देश्वर ज्ञानदेव मोरे (वय-४०), आकाश मोहन मोरे (वय-२६, दोघेही रा.बावी) अशी जखमींची नावे आहेत. वरील दोघेजण शनिवारी दुपारी मोडनिंब येथील पंचरत्न हॉटेल समोर असताना शंकर मोरे व नागनाथ धनाजी बचुटे व इतर सात जणांनी मिळून मारहाण केली. यात ते दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता सोलापुरातील शासकीय रुग्णालयात सुधीर मोरे यांनी दाखल केले.

### तरुणाने गळफास घेऊन केला आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

एका १९ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना अक्कलकोट येथील शिवाजीनगर तांडा येथे शुक्रवार, दि.७ ऑगस्ट २०२६ रोजी घडली. सचिन विकास चव्हाण (वय-१९, रा.शिवाजीनगर तांडा, ता.अक्कलकोट) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने शुक्रवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घरगुती भांडणातून गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आजी भागुबाई यांनी दाखल केले.

### बाथरुममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला मृतदेह

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

बाथरुममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची घटना गांधीनगर परिसरातील जयराम अपार्टमेंटमध्ये उघडकीस आली. अरुण कुमार कोळी (वय-३५, रा.जयराम अपार्टमेंट, मॉडर्न शाळेसमोर, गांधीनगर, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवार, दि.७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घरातील बाथरुममध्ये नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आला. सदर बझार पोलिसांना ही खबर समजताच हवालदार ए.एन. सुरवसे यांनी घटनास्थळी धाव घेत नातेवाईकांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची माहिती सदर बझार पोलिसांना समजली असता हवालदार ए.एस. सुरवसे यांनी घटनास्थळी पोहचून नातेवाईकांच्या साह्याने सदरचा मृतदेह खाली उतरून शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात रात्री अकरा वाजता दाखल केला.

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या विरोधातील पुरावे माझ्याकडे : सुषमा अंधारे

### खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्याबाबतीतही केली भूमिका स्पष्ट

### आगामी काळात राजकीय समीकरणावर होणार परिणाम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

राज्याचे ग्रामविकास तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे सर्व काही 'मीच खाईन' या भूमिकेत वावरतात. त्यामुळे त्यांच्या विरोधात 'भाजपा'तच अस्वस्थता आहे. त्यांच्या विरोधातील टक्केवारीचे पुरावे माझ्याकडे आहेत, असा दावा शिवसेना 'उबाठा'च्या उपनेत्या तथा सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांनी केला.



शिवसेना 'उबाठा'च्या सोलापुरातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासोबत बैठकीच्या निमित्ताने त्या सोलापुरात आल्या होत्या. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्या पुढे म्हणाल्या, शिवसेना उबाठाच्या पक्षवाढीसाठी संघटनात्मक पध्दतीने काम करा, पक्षासाठी ताकद लावा. नवीन कार्यकारिणीत काम करणाऱ्यांना संधी द्या.

मुळात शिवसेना 'उबाठा'चे खासदार संजय राऊत आणि 'भाजपा'चे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची तुलनाच होऊ शकत नाही, असे सांगायलाही त्या विसरल्या नाहीत. दरम्यान, खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी शिवसेना 'उबाठा'च्या वारंवार करीत असलेल्या टीकेबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

'भाजपा'मधील अंतर्गत नाराजीमुळे आगामी काळात राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो, असा सूचक इशाराही त्यांनी दिला. यावेळी जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, शरणराज केंगनाळकर, महानगरप्रमुख महेश धाराशिवकर, माजी महानगरप्रमुख तथा कामगार नेते विष्णू कारमपुरी यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## पंढरपूरच्या 'तुळशीगंध अगरबत्ती'ला राष्ट्रीय सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ ऑगस्ट-**

येथील युवा उद्योजक ऋषिकेश भट्टड यांच्या 'तुळशीगंध अगरबत्ती' या अभिनव उपक्रमाला अटल इनोव्हेशन मिशन (IM), नीती आयोग यांच्या वतीने 'ग्रासरूट इनोव्हेशन रिकग्निशन २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. ३१ जुलै २०२६ रोजी राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या दिमाखदार पुरस्कार सोहळ्यात भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत या नवकल्पनेचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




तुळशीगंध अगरबत्ती हा उपक्रम मंदिरातील पवित्र निर्माल्याचा पर्यावरणपूरक पद्धतीने पुनर्वापर करून कोळसामुक्त, नैसर्गिक अगरबत्ती तयार करतो. या नाविन्यपूर्ण संकल्पनेमुळे मंदिरातील निर्माल्याच्या विल्हेवाटीची समस्या कमी होण्यास मदत होत असून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, स्थानिक महिलांसाठी रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकासाला चालना मिळत आहे. श्रद्धा, पर्यावरण आणि उद्योजकता यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर विशेष दखल घेण्यात आली.

या यशामागे एसव्हीईआरआय (SVERI), पंढरपूर येथील उखउ सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) श्री. आशिष भुतडा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनासह उखउ इन्क्युबेशन सेंटरच्या भक्कम पाठबळामुळे या नवकल्पनेला संशोधनापासून व्यावसायिक यशापर्यंत सक्षम दिशा मिळाली. हा राष्ट्रीय सन्मान तळागाळातील नवोपक्रम, प्रभावी मार्गदर्शन आणि संस्थात्मक सहकार्य यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

## जिल्हा परिषदेत लिफ्टची सुविधा; ज्येष्ठ, दिव्यांगांसह नागरिकांचा त्रास होणार कमी

### 13 ऑगस्टच्या सर्वसाधारण सभेत खर्चाच्या प्रस्तावाला मंजुरीची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद भवनात विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना आता पायऱ्यांची धावपळ कमी होण्याची शक्यता आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच वरच्या मजल्यावरील कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय लवकरच होण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषद इमारतीत तीन ठिकाणी लिफ्ट बसविण्याच्या दृष्टीने जागांची पाहणी करण्यात आली. खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे.



जिल्हा परिषद भवनाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर अनेक महत्त्वाचे प्रशासकीय विभागांसह पदाधिकाऱ्यांचे कक्ष असल्याने दररोज शेकडो नागरिकांना कामानिमित्त वरच्या मजल्यावर जावे लागते. मात्र, इमारतीत लिफ्टची सुविधा नसल्याने ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि महिलांना पायऱ्या चढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येवर उपाय म्हणून प्रशासनाने लिफ्ट बसविण्यासाठी तीन संभाव्य ठिकाणांची चाचपणी केली आहे. यामध्ये इमारतीच्या आतील बाजूस सामान्य प्रशासन विभागाच्या जिन्याशेजारी, पूर्व बाजूस समाजकल्याण सभापतींच्या कक्षासमोरील भागात तसेच पश्चिम बाजूस मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांच्या कार्यालयाशेजारील जागेचा समावेश आहे.

तिन्ही ठिकाणी लिफ्ट बसविण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात येत आहे. हा सविस्तर प्रस्ताव १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे. सभेची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

यापूर्वीही जिल्हा परिषद भवनात लिफ्ट बसविण्याचा विषय चर्चेत आला होता. मात्र, विविध कारणांमुळे हा प्रस्ताव पुढे सरकला नाही. मागील आठवड्यात झालेल्या बैठकीत हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाल्यानंतर लिफ्टसाठी योग्य जागा निश्चित करून खर्चाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आता १३ ऑगस्टच्या सर्वसाधारण सभेतील मंजुरीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**सुलभ प्रशासनच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय**

लिफ्ट सुविधा सुरु झाल्यास जिल्हा परिषद भवनातील विविध कार्यालयांपर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे होणार आहे. विशेषतः दिव्यांग आणि ज्येष्ठांसाठी सुलभ प्रशासन यादृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी सांगितले.

**याठिकाणी लिफ्टचा विचार**

सामान्य प्रशासन विभागाच्या जिन्याशेजारी, पूर्वबाजूस समाजकल्याण सभापती कक्षासमोरील भागात, पश्चिम बाजूस मुख्य वित्त व लेखा अधिकारी कार्यालयाशेजारी.

## चारा टाकताना गायीने मारली ढुसणी; आठ महिन्यांची गर्भवती महिला जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

चारा टाकताना गायीने ढुसणी मारल्याने ८ महिन्याची एक गर्भवती महिला खाली कोसळून गंभीर जखमी झाली. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील हालचिंचोळी येथे शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी घडली. गायत्री गेनसिध्द पुजारी (वय-२२, रा.हालचिंचोळी, ता.अक्कलकोट) असे जखमी झालेल्या गर्भवती महिलेचे नाव आहे. शनिवारी सकाळी त्या आपल्या घरातील गाईला चारा घालत असताना गायीने अचानकपणे त्यांना ढुसणी मारली. यात पोटाला, हाताला, कमरेला मार लागून त्या जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## भेळच्या गाडीजवळ झालेल्या मारहाणीत तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**




गुरुनानक चौक परिसरातील भेळच्या गाडीजवळ लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी घडली. कृष्णा राजू सूर्यवंशी (वय-२०, रा.भारतनगर, कुमठा नाका) असे जखमीचे नाव आहे. शनिवारी सकाळी तो गुरुनानक चौकातील भेळगाडीजवळ थांबला होता. त्यावेळी अनोळखी ८ ते १० जणांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्याला उपचारासाठी भाऊ मानव यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५२८

**तुम्ही संत दयानिधी । तारा,सांभाळा दुर्बुध्दी ।**
**मायबाप कृपावंत । तुम्ही दयाळू संत ।**

पंत आणि संत यात फरक असतो. डोक्याने मोठा असणाऱ्यांना पंत म्हटले जाते आणि डोके व हृदयाने मोठे असणाऱ्यांना संत म्हटले जाते. संतांच्या हृदयाची खोली आजपर्यंत कोणालाही मोजता आली नाही. ज्या समाजाकडून अत्यंतहाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याच समाजाला नीतीमत्तेचे, आत्मज्ञान, कर्तव्याचे धडे देण्यात संत अजिबात कुचराई करीत नाहीत. परीसाला फोडावे म्हणून जरी लोखंडाने घाव घातला तरी परीसाला लोखंडाचा स्पर्श होताच त्याचे सोने होते. त्याप्रमाणे संतांना छेडावे, त्यांची टिंगलटवाळी करावी, त्यांना त्रास द्यावा म्हणून जरी कोणी त्यांच्याजवळ गेला तरी त्याच्यात सुपरिवर्तन होते. कारण समोरच्या व्यक्तिच्या दुर्बुध्दीचे सद्बुध्दीत परीवर्तन करणे हा संतांचा स्वभाव असतो. अशा सुस्वभावी व दयानिधी संतांनी आपणाला सांभाळावे, या संसार सागरातून



तारावे आणि आपल्या दुर्बुध्दीचे सद्बुध्दीत परीवर्तन करावे, अशी विनवनी सेनाजी, संत महात्म्यांना करतांना,

**तुम्ही संत दयानिधी । तारा,सांभाळा दुर्बुध्दी ।**

असे म्हणतात. स्वत: एक महानसंत असणारा महात्मा जर इतर संतांना एवढे महत्व देतो, तर आपण संसारात अडकलेल्या जीवाने संत, महात्म्यांना किती महत्व द्यावे हे आपणच ठरवावे.

लेकरांचे सहस्त्र अपराध पोटात घालणारे मायबाप मुलांसाठी कृपावंत असतात. त्याचबरोबर मायबाप त्यांच्या मुलासाठी सदैव दयाळू वृत्ती जोपासतात. कोणतेही मायबाप आपल्या मुलांचे भलेच इच्छितात. प्रसंगानुरूप एखाद्या मायबापाला मुलांच्या विरुध्द पाऊल उचलावे लागू शकते. असे पाउल उचलण्यामागेही त्या मुलांचे भले करण्याचाच त्यांचा विचार असू शकतो. असो, मायबाप हे मुलांसाठी सदैव कृपेचा आणि दयेचा सागर असतात. संसारामुळे आणि नाशवंत देहाची महती मायेमुळे न कळल्यामुळे मायबापाची कृपा आणि दया ही त्यांच्या मुलांपुरती सिमित असू शकते. पण संतांच्या कृपा आणि दयेला मर्यादा नसते. त्यांच्या समोर किंवा त्यांच्या सहवासात जो कोणी येईल त्याच्यावर कृपा आणि दया करणे हा संतांचा स्थायी स्वभाव असतो. संतांची कृपा आणि दया व्यक्तिला आत्मज्ञानाचा मार्ग दाखवते. याची आपणाला जाण असल्याने आपण स्वत:ला विसरुन अगदी नम्रपणे आणि मन:पूर्वक संत महात्म्यांना शरण जात असल्याचे सेनाजी, मायबाप कृपावंत' तुम्ही दयाळू संत', असे सांगतात. आपली नम्रता आणि पूर्ण शरणांगती संतांच्या कृपा आणि दयेस पात्र होईल असा सेनाजींना आत्मविश्वास वाटतो. आपणालाही संतांना शरण जाता आले पाहीजे. शरणांगती म्हणजे हार नसते. शरणागती ही नवविधा भक्तीतील एक प्रकार आहे. शरण जाणे म्हणजे पूर्णत: नम्र होणे, अहंकारमुक्त होणे होय.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. १० ऑगस्ट २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. द्वादशी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- आद्रा (१२.२६)**
**योग - वज्र (२२.२६)**
**करण - गरज (१८.२७)**
**राहू काल : सोमवार**
**स. ०७.३० ते ०९.००**
**दिनविशेष : १५१९:**
**फर्डिनांड मॅगेलन आपली पाच जहाजे घेऊन पृथ्वी प्रदक्षिणेसाठी निघाले.**
**१७४१: त्रावणकोरचे राजा मार्तंड वर्मा यांनी डच ईस्ट इंडिया कंपनीचा पराभव केला.**
**१८१०: स्मिथसोनियन इन्स्टिट्युशनची स्थापना झाली.**
**१८२१: मिसुरी हे अमेरिकेचे २४ वे राज्य बनले.**

# 'लोकमंगल'च्या सभासदांना १२.२० टक्के लाभांश जाहीर

## ३ हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पूर्ण; वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापुरातील महालक्ष्मी बँक्वेट हॉलमध्ये उत्साहात व सभासदांच्या मोठ्या उपस्थितीत संपन्न झाली. संस्थेने गत आर्थिक वर्षात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीच्या पार्श्वभूमीवर सभासदांना १२.२० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभासदांची मंजुरी मिळताच तात्काळ लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यावर जमा करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. चेअरमन गुरण्णा तेली यांनी प्रास्ताविक केले तर संस्थेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांनी सभासदांसमोर सादर केला.

संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी सभासदांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या अडचणी, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या.




सभासदांनी व्यक्त केलेल्या सूचना व अपेक्षांचा संस्थेच्या आगामी वाटचालीत सकारात्मकपणे विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मयत कर्जदार रत्नदीप पंडित यांच्या वारसदार श्रीमती भाग्यश्री पंडित यांना संस्थेच्या अपघाती विमा योजनेअंतर्गत २ लाख रुपयांचा विमा धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याबरोबरच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैष्णवी आदलिंगे, हनुमंत लोंढे, शिवानंद शिंगडगाव यांचा तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या आरती जाधव व प्रतीक आगरकर यांचा गौरव करण्यात आला. तसेच पतसंस्थेतून कर्ज घेऊन व्यवसाय उभारून यशस्वी झालेल्या सुशील ताकमोगे, धनंजय किरवे, अरुण जाधव, अशपाक मंगळूर, हरिदास तळेकर यांचाही सन्मान करण्यात आला.

गत आर्थिक वर्षात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मोहोळ, अवंतीनगर, भंडारकवठे शाखा नंबर १ व केम या शाखांचा सर्वोत्तम शाखा म्हणून बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सभेस पतसंस्थेचे व्हा. चेअरमन निर्मला कुंभार, कार्यकारी संचालक मनीष देशमुख, तज्ञ संचालक विठ्ठल ढेकळे, संचालक शहाजी साठे, समाधान पाटील, शिवाजी माळी, भीमाशंकर कलशेट्टी, फैय्याज मुलाणी, युवराज गायकवाड, संचालिका लक्ष्मी नडगेरी, सरोजनी टिपे, वैधानिक लेखापरीक्षक जे.डी. भैसे, कायदेशीर सल्लागार अॅड. धनंजय केकडे, कर सल्लागार दीपक दरगड, प्रॉपर्टी व्हॅल्यूएटर साहिल खडके उपस्थित होते. सूत्रसंचालन सतीश लोंढे यांनी केले.

## परिस्थितीशी तडजोड करा

त्यागी बनवण्यासाठी काहीतरी उच्च ध्येय गाठण्याची दृढ इच्छा माणसाच्या मनात असली पाहिजे. त्यागी बनवण्यासाठी दूरदृष्टी आणि व्यापकदृष्टी असली पाहिजे,' असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.




बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चतुर्मासात त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या, 'अंगी त्यागवृत्ती बाणण्यासाठी विवेक बुद्धी असणे आवश्यक आहे. त्याग करण्यासाठी निर्भयता आणि दृढता अंगी असणे आवश्यक आहे, आत्मविश्वास असला पाहिजे. त्याग भावना सुप्रतिष्ठित होण्यासाठी विवेक, धैर्य, निर्भयता आणि पराक्रम या गुणांची आवश्यकता असते. जीवनाचा पाया उत्तम हवा. मनात खऱ्या अर्थाने गुरुप्रती भक्ती आणि दृढ विश्वास हवा. जीवनाचा पाया मजबूत असेल तर सर्व अहंकार गळून पडतील आणि आत्म्याचा प्रवास आत्मानंदाकडे सुरू होईल. परिस्थितीशी तडजोड करण्याची तयारी हवी. आज कोणीच जुळवून घेत नाही. जो तो आपल्या मर्जीप्रमाणे वागत आहे. आज मुली देखील स्वतः च्या पायावर उभ्या आहेत. उत्तम पॅकेज मुलींना देखील आहे. परंतु परिस्थितीशी तडजोड करण्याची क्षमता दिसत नाही. छोट्या छोट्या गोष्टींवरून घरात वाद-विवाद होताना आढळते. अनेक घर, परिवार तुटत असताना आपण पाहतो. या समृद्ध दुनियेतील अनुभव वेगळेच पहावयास मिळतात. स्त्री असो वा पुरुष परिस्थितीशी तडजोड करावयास शिका, जुळवून घ्या.

**-मल्लेश पुरवंत**

# इन्हरव्हील क्लब ऑफ स्टारलेटचा पदग्रहण सोहळा

### नूतन अध्यक्षा संध्याराणी रच्चा व सचिव आम्रपाली कोनापुरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

येथील इन्हरव्हील क्लब ऑफ सोलापूर स्टारलेटचा पदग्रहण सोहळा आयएमए सभागृहात डफरिन चौक येथे पार पाडला. या क्लबच्या नूतन अध्यक्षा संध्याराणी श्रीधर रच्चा, व नूतन सचिव आम्रपाली रेवणसिद्ध कोनापुरे यांचे निवड झाली आहे. या पदग्रहण समारंभ कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उमा दिक्षित जोशी, डिस्ट्रिक्ट ट्रेझरर - स्मिता चाकोते, रोटरी क्लबच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेश पटेल, पद्मजा अय्यंगार,

रेखा माने, अनुराधा चंडक, भारती पटेल, श्वेता पाटील, किशोरी राठी, रोटरी क्लब नॉर्थच्या नूतन अध्यक्षा आसावरी सराफ, इनरव्हील क्लब नूतन अध्यक्षा दीप्ती देसाई, सचिव जेमिनी बक्षी, तसेच इनरव्हील हार्मनी क्लबच्या अध्यक्षा नेहा राठी, सचिव पूजा भुतडा उपस्थित होते.

प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात इनरव्हील प्रार्थनेने झाली.



त्यानंतर मावळत्या अध्यक्षा सोनिया चंकेश्वर यांनी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या आढावा सादर केला.

तद्नंतर नूतन पदाधिकारी उपाध्यक्ष श्रद्धा घोंगडे व पदाधिकारी अर्चना आघव, गंगा लोणी, नंदा भट्टड, तेजल जवंजाळ, यामिनी गांधी, वैशाली लाहोटी यांच्याकडे क्लबच्या पदाची सुत्रे सोपवण्यात आली कार्यक्रम प्रस्तावना काजल सिंदगी यांनी केले. मनीषा डागा व पूनम कटकधोंड यांनी सूत्रसंचालन केले. श्वेता पाटील यांनी आभार मानले.

# ओढ्यावरील ३१ हजारांचे कॉपर वायर चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

पाणी ओढण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी लावलेल्या मोटारीच्या ३१ हजार रुपये किमतीचे कॉपर वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना आठ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. दरम्यान याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रविंचंद्र भानुदास ठोके (वय ४५ वर्षे, रा. सलगरवाडी, डोणगाव रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी व फिर्यादीच्या शेजारील शेतकऱ्यांनी डोणगाव येथील हत्तुर केगाव बायपास रोड जवळील बाळयाचे घाण पाण्याचे ओढयावरुन पाणी ओढण्यासाठी मोटारी लावल्या होत्या. या पाण्याच्या मोटारीचे ३१ हजार २७५ रुपये किमतीचे एकुण २०८५ फुट तांब्याचे तीन पदरी केबल वायर अज्ञात चोरटयाने दि. ७ ते दि. ८ ऑगस्ट दरम्यान लबाडीने चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. पोलिस हवालदार बन्ने हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# अणदूर येथे तरुणाला लोखंडी रॉडने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

रस्त्यावरून बाजूला सरक म्हंटल्याच्या कारणावरून लोखंडी रॉड आणि टॉमिनी केलेल्या मारहाणीत राहुल सुरेश जाधव (वय २९ रा.अणदूर) हा तरुण जखमी झाला. ही घटना शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास अणदुर येथील देशमुखवस्ती जवळ घडली. प्रकाश अर्जुन देवकर आकाश लक्ष्मण पवार आणि त्याच्या साथीदाराने मिळून मारहाण केली. त्याला नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# शहा-कोठारी प्रशालेत पाठांतर व वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

सन्मती ज्ञानप्रसारक मंडळ सोलापूर व प्रज्ञाश्रमण दिगंबर जैन जनकल्याण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाश्रमण सारस्वताचार्य १०८ श्री देवनंदजी महाराजांच्या जन्मजयंती निमित्त पाठांतर व वक्तृत्व स्पर्धेत विविध गटातून श्रुती कारंडे, समृद्धी कोळी, श्वेताली कांबळे, आर्या आणेकर, प्रशाली सावळे, भाग्यश्री स्वामी, सृष्टी सगरे या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.



श्री.न.फू.शहाकोठारीहायस्कूल येथे ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचे उद्धघाटन वालचंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त बाहुबली उपाध्ये होते. मान्यवरांच्या शुभहस्ते धर्मध्वजपूजन व धर्मध्वजारोहण करून सारस्वताचार्य श्री.देवनंदिजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. सुरुवातीस विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादरीकरण केले. स्पर्धेनंतर लगेच पारितोषिक वितरण प्राध्यापिका वैशाली गांधी, प्रसिद्ध व्यापारी वीरकुमार गांधी यांच्या हस्ते झाले. मान्यवरांच्या हस्ते सात गटातून विजेत्या सर्व स्पर्धकांचे रोख बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक रमेश यादवाड, मुख्याध्यापिका अनिता हाडोळे, मुख्याध्यापिका दर्शना उपाध्ये उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. कोटी यांनी पालक,विद्यार्थी संस्थेचे कौतुक केले. गांधी यांनी यशस्वी स्पर्धक विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी; वाहन चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

धडक देऊन एका दुचाकी भर वेगात वाहन चालऊन एका दुचाकी स्वाराला गंभीर जखमी केल्याप्रकरणी एका वाहन चालकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमनाथ माने असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असूनही याबाबत श्रीराम भागवत शिंदे (रा. २१, अग्रवाल निवास, शिवाजी नगर बाळे, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी हे पशुवैद्यकीय हॉस्पीटल येथे कर्तव्य संपवून दि.२८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वा चे सुमारास सात रस्ता येथून दुचाकी (क्रं. एम एच १३ बी डब्ल्यु ८१५३ ) वरुन जात असताना मागुन येणाऱ्या आरोपी चालवत असलेल्या चारचाकी वाहन (क्रं. एम एच १३ ई एक्स ०५८४ )फिर्यादी च्या दुचाकीस धडक दिली.

त्यात फिर्यादी हे गंभीर जखमी होऊन त्यांचा गुडघा फ्रैक्चर झाल्याचे फिर्यादित म्हटले आहे . पोलीस हवालदार मोरे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# कुटुंब व्यवस्था टिकविण्यासाठी संवाद, संस्कार आवश्यक : डॉ. जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

कुटुंब हे केवळ एकत्र राहण्याचे ठिकाण नसून ते संस्कार, प्रेम, आपुलकी आणि भावनिक आधाराचे केंद्र आहे. कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल तर परस्परांमध्ये संवाद, शिस्त आणि एकमेकांच्या भावनांचा आदर असणे आवश्यक आहे. कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी कुटुंबकर्त्याची भूमिका महत्त्वाची असून, बदलत्या काळानुसार कुटुंबातील महिलांच्या स्थानालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्येष्ठांनीही तरुणांच्या जीवनात अनावश्यक हस्तक्षेप न करता त्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असे प्रतिपादन डॉ. ह. ना. जगताप निवृत्त प्राचार्य दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर यांनी केले.



आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाच्या वतीने आयोजित 'पहिले पुष्प' व्याख्यानमालेत 'आपली कुटुंब व्यवस्था व आपण' या विषयावर ते बोलत होते. या व्याख्यानमालेचे उद्घाटन छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. सुरेश पवार यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी उत्तम आरोग्यासाठी व्यायाम, योग्य आहार, सात्त्विक विचार आणि पुरेशी विश्रांती या चारही गोष्टींची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी या सर्वांचा समतोल आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महातपस्वी श्री कुमार स्वामीजींच्या मूर्तीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्री चनबसप्पा अलमेल यांनी भक्तिगीत सादर करून कार्यक्रमाची भक्तिमय वातावरणात सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. स्वाती देशपांडे यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. ह. ना. जगताप यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. सुरेश किसनराव पवार यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष निळकंठप्पा कोनापुरे यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे सचिव बाबासाहेब कुलकर्णी यांनी आभार मानले. संस्थेचे विश्वस्त नागनाथ चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संतोष मंठाळकर, दयानंद माशाळकर, हिराबाई कुंभार उपस्थित होते.

# 'विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे गरजेचे'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

अक्कलकोट येथील स्व. काशीराया काका पाटील अध्यापक विद्यालयात सौ. उज्वलाताई सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त 'वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा निर्मूलन' विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी समाज व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याची गरज व्यक्त केली.

विज्ञान-तंत्रज्ञान प्रगत होत असतानाही समाजात कर्मकांड, रूढी, परंपरा व अंधश्रद्धांना बळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. शटगार यांनी मंत्राने अग्नी पेटवणे, पाण्याचा प्रसाद, भूतगाडणे, चिठ्ठीतील



मजकूर ओळखणे आदी प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखवून अंधश्रद्धांमागील सत्य स्पष्ट केले. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना २५ डझन वह्यांचे वाटप करण्यात आले. आभार कारले यांनी मानले सूत्रसंचालन खुणे यांनी केले.

# हरिभाई देवकरण महाविद्यालयात क्रांती दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

हरिभाई देवकरण महाविद्यालयात शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी यांच्या नेतृत्वाखाली व प्राचार्या स्मिता कांगुणे यांच्या अध्यक्षतेखाली ९ ऑगस्ट क्रांती दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील 'भारत छोडो आंदोलन' आणि ९ ऑगस्ट १९४२ या ऐतिहासिक दिवसाचे महत्त्व विशद केले.

यावेळी प्रा. बिराजदार यांनी मार्च १९४२ मध्ये भारतात आलेल्या



क्रिप्स मिशनची पार्श्वभूमी, त्याचे प्रस्ताव व अपयश, मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर मंजूर झालेला 'भारत छोडो' ठराव तसेच महात्मा गांधी यांनी दिलेली 'करेंगे या मरेंगे' ही ऐतिहासिक घोषणा याविषयी माहिती दिली. भारत छोडो आंदोलनात विद्यार्थी, महिला, शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिकांनी दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकताना त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, धैर्य, देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठेचे स्मरण करून दिले.

कार्यक्रमास उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक ए. सी. राऊत उपस्थित होते. पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तर प्रा. प्रमोद चुंगे यांनी आभार मानले.

# आदर्श माता शेवराबाई भोसले यांच्या निधनाने पारधी समाजात शोककळा

आदर्श माता म्हणून राज्यभर गौरविलेल्या आणि राष्ट्रीय स्तरावर सन्मानित झालेल्या शेवराबाई ज्ञानदेव भोसले यांचे सोमवारी (दि. १३ जुलै २०२६) वयाच्या ९५व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने आदिवासी पारधी समाजासह सामाजिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर हवेली तालुक्यातील नायगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.




शेवराबाई भोसले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या कुटुंबाचे संगोपन करत मुलांमध्ये समाजसेवा, प्रामाणिकपणा आणि शिक्षणाची मूल्ये रुजवली. त्यांच्या संस्कारातून महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले समाजसेवक नामदेव भोसले, साहित्यिक भास्कर भोसले आणि उत्कृष्ट पत्रकार म्हणून ओळखले जाणारे सुनील भोसले यांनी समाजहिताचे कार्य उभारले. विशेषतः नामदेव भोसले यांनी आदिवासी पारधी समाजाला गुन्हेगारीच्या कलंकातून बाहेर काढून शिक्षण, सन्मान आणि मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे प्रांत अधिकारी वैभव नारवडकर यांनी आपले मत व्यक्त केले. श्रद्धांजलीपर भाषणात सांगितले. या वेळी शेवराबाई यांच्या तेराव्या निमित्त नारवडकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले



सुनील भोसले यांनीही प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वंचित समाजाच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडून अनेकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. शेवराबाई यांनी आयुष्यभर समाजातील महिलांना स्वावलंबन, कष्ट आणि संघर्षाची प्रेरणा दिली. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना विविध संस्थांकडून तब्बल २९ पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. सन २०१४ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते, तर २०२१ मध्ये तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता.

प्रांत वैभव नारवडकर व तहसीलदार. ऋषिकेश शेळके त्यांच्या पश्चात तुकाराम भोसले, भास्कर भोसले, महादेव भोसले, नामदेव भोसले, सुनील भोसले,आनिल महादेव तसेच मुली, सुना, आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कारावेळी डॉ. मधुकर आव्हाड, उद्योगपती जयवंत शितोळे-पाटील, सरपंच संभाजी खडके, विकास चौधरी, नामदेव शितोळे, रघुनाथ चौधरी, बाळासाहेब चव्हरे यांच्यासह नायगाव, पाटस, उरळी कांचन व परिसरातील ग्रामस्थ, पारधी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी आदर्श माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## महत्वाचे...



### क्रांतिदिनी सोलापुरातील महापुरुष, स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट -**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध महापुरुष आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला जंगम आणि कामगार व समाजकल्याण समितीच्या सभापती श्रद्धा पवार यांच्या हस्ते विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले. सिव्हिल चौकातील माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, सिव्हिल हॉस्पिटल येथील डॉ. कोटणीस, मार्कंडेय उद्यानातील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, अशोक चौकातील कै. वड्डेपली तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मेकॅनिक चौकातील स्वातंत्र्य सेनानी तुळशीदास जाधव, सुपर मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले आणि साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे चौकातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासही अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास हरिष जंगम, समुदाय संघटक ऋषी लोखंडे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, विशाल माने, गुरुराज कानडे, किरण पवार यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

### श्री. गेनसिध्द प्रशालेत क्रांतिदिन देशभक्तीमय वातावरणात साजरा

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट -**

कुंभारी, (ता. द. सोलापूर) येथील श्री. गेनसिद्ध प्रशालेत क्रांतिदिन साजरा करण्यात आला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आले.प्रारंभी सोलापूरच्या हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक रमेश बसुदे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी क्रांतिदिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भाषणे केली. मुख्याध्यापक रमेश बसुदे पाटील यांनी स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग, धैर्य व देशभक्तीचे स्मरण करून त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत स्वातंत्र्यवीरांना अभिवादन केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुनील स्वामी यांनी केले.




### लायन्स क्लब बार्शी रॉयलतर्फे मोफत बीपी, शुगर तपासणी

**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**

लायन्स इंटरनॅशनल लायन्स क्लब बार्शी रॉयलतर्फे मोफत डायबेटिक चेक अप कॅम्प घेण्यात आला. डायबेटिक केअर सेंटर बार्शी हिरेमठ हॉस्पिटल येथे हे शिबीर झाले. या ठिकाणी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी तपासणी केली जाते. दि.३ ऑगस्ट रोजी डॉ. स्नेहल माढेकर, डॉ. निनाद माढेकर यांनी या शिबिरामध्ये २० पेशंटची तपासणी केली. बीपी व शुगर तपासणीचा कॅम्प हिरेमठ हॉस्पिटल या ठिकाणी महिन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत असतो. यावेळी प्रोजेक्ट चेअरमन डॉ. स्नेहल माढेकर, ला. कावेरी बागुल, ला. वैष्णवी जाधव, ला. उमेश जाधव, ला. दयानंद रेवडकर, ला.स्नेहल माढेकर, डॉ. निनाद माढेकर आदी मान्यवरउपस्थित होते. डॉ. निनाद माढेकर यांनी रुग्णांची शुगर तपासणी करुन बदलत्या आहार जीवनशैली विषयी तसेच मधुमेहाविषयी माहिती दिली.

# ५८ लाख नोंदी म्हणजे मराठ्यांचे पक्के आरक्षण

## मनोज जरांगे पाटील; सरकोलीत विराट सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ ऑगस्ट -**

सुमारे ५८ लाखा पेक्षा जास्त कुणबी नोदींची प्रमाणपत्रे मराठा समाजाने घेतल्यास सुमारे अडीच कोटी पेक्षा जास्त मराठा समाज आरक्षणाचा लाभ उठवु शकणार आहे. ५८ लाख नोंदी म्हणजे मराठ्यांचे पक्के आरक्षण आहे. त्यामुळे ५८ लाख नोदीं घेतल्याशिवाय आता २९ ऑगस्टला माघार घ्यावयाची नाही असा निर्धार मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.





पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे आज मनोज जरांगे पाटील यांची सभा झाली. सभेत ते बोलत होते. जी प्रमाणपत्रे मिळाली आहेत ती जातपडताळणी कार्यालयाकडून रद्द करण्याची मोहिम सध्या सुरु आहे. महसूल मंत्री बावन्नकुळे कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा आदेश देत आहेत. सातारा, कोल्हापूर, पुणे आणि औंध या दोनशे, अडीचशे वर्षापूर्वीच्या नोंदी आहेत. त्याचे सगळे जीआर काढून ते लागू करुन घ्यावयाचे आहे. हैद्राबाद गॅझेटीयरनुसार सगळ्या नोंदी मराठवाड्याला घ्यावयाच्या आहेत. मराठा समाजातील तरुणांवर दाखल केसेस मागे घेण्याचा शब्द शासनाने पाळलेला नाही, असा आरोपही जरांगे यांनी केला.

मराठा तरुणांना उद्योजक बनविण्यासाठी आण्णासाहेब पाटील विकास महामंडळाकडून कर्ज दिले गेले. मात्र आज अनेक मराठा तरुण उद्योजक आर्थिक अडचणीत सापडलेले आहेत. कर्जाचे हप्ते हे उद्योजक भरु शकलेले नाहीत. त्यामुळे अनेकांचे सीबील खराब झालेले आहेत. त्यामुळे सर्व मराठा समाजातील तरुण उद्योजकांच्या नरड्याला फास लागलेले आहेत. सगळ्या मराठा समाजातील पोरांचे व्याज परतावे घेतल्याशिवाय सोडायचे नाही असा देखील इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

ओबीसी समाजाला मिळणाऱ्या सर्व सोयीसुविधा मराठा समाजाला लागू करण्याची मागणी मान्य केली. मात्र त्या संदर्भातील जीआर अजूनही काढले जात नाहीत. जे जीआर काढले आहेत त्याची शासनाकडून व्यवस्थित अंमलबजावणी केली जात नाही. सारथी स्थापन केली गेली मात्र त्यामधील १ हजार ५५४ अभ्यासक्रमच मराठ्यांना लागू केले गेले नाहीत, असा आरोपही जरांगे पाटील यांनी केला.

### विठ्ठल रखुमाईचे दर्शन

मनोज जरांगे पाटील यांनी पंढरपूर दौऱ्यात येथील विठ्ठल रखुमाईचे मंदिरात जावुन दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत पंढरपूरच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके तसेच मराठा समाजातील नेते उपस्थित होते.

## ग्रामीण रस्ते विकास आराखड्यात भोसरेच्या दोन रस्त्यांचा समावेश

### डांबरीकरणाचा मार्ग मोकळा; शिंदे परिवाराचा पाठपुरावा

**पालकमंत्र्यांचा आदेश; सुलन बागल यांच्या मागणीला अखेर न्याय मिळाला**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ९ ऑगस्ट -**

माढा तालुक्यातील भोसरे येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित दोन महत्त्वाच्या रस्त्यांचा राज्य शासनाच्या ग्रामीण रस्ते विकास आराखड्यात समावेश केला आहे. दोन्ही रस्त्यांना अधिकृत ग्रामीण मार्ग क्रमांक प्रदान केले आहेत. त्यामुळे या रस्त्यांच्या डांबरीकरण, रुंदीकरण आणि मजबुतीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



माजी आ. संजय शिंदे आणि भाजप नेते रणजीत शिंदे यांनी अनेक वर्षापासून या मागणीला मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला होता. शासन निर्णयानुसार बागल वस्ती (बार्शी रेल्वे लाईनजवळ) ते जगदाळे नगर, बार्शी रोड राष्ट्रीय महामार्ग ५४८-सी (जुना रा. मा. १४५) जोडणाऱ्या रस्त्यास ग्रामीण मार्ग क्र. ३५७, तर काळे वस्ती (सोलापूर रेल्वे लाईनजवळ) ते तडवळे रस्ता, इतर जिल्हा मार्ग क्र. १४ जोडणाऱ्या रस्त्यास ग्रामीण मार्ग क्र. ३५६ मंजूर केला आहे. हे दोन्ही रस्ते अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत होते.

पावसाळ्यात चिखल, मोठमोठे खड्डे आणि पाणी साचत असल्याने शेतकरी, विद्यार्थी, वाहनचालक तसेच रुग्ण, ऊस वाहतूक यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे या रस्त्यांचा विकास आराखड्यात समावेश व्हावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

मुंबई येथे झालेल्या बैठकीत संजय शिंदे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या चर्चा होऊन प्रलंबित राहिलेली फाईल अखेर पालकमंत्र्यांच्या टेबलावर आली. त्यानंतर काही वेळातच भोसरी गावचा प्रलंबित प्रश्न शासकीय निर्णयांमध्ये बदलला गेला.

### ७० वर्षात कुणाला जमले नाही ते करून दाखवले

संपुर्ण प्रक्रियेत संबंधित प्रशासकीय अधिकारी, आमचे नेते संजय मामा शिंदे, रणजित शिंदे यांचे आणि कार्यालयीन कर्मचारी तसेच भाजयुमो अध्यक्ष सिद्धेश्वर बागल यांनीही मोलाचे सहकार्य केले. पालकमंत्र्यांनी न्याय दिल्याबद्दल आभार.

**- सुलन बागल, सदस्या, भोसरे ग्रामपंचायत.**

## संघटन मजबुतीसाठी शिवसैनिकांनी पुढे यावे : अंधारे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ ऑगस्ट-**

शिवसेनेचे संघटन मजबुत करणे गरजेचे आहे. प्रत्येक शिवसैनिकाला संघटनेत जबाबदारी देण्याची तयारी आहे. शिवसैनिकांनी पुढे यावे असे आवाहन शिवसेना उबाठा पक्षाच्या सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केले.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मंगरुळे फंक्शन हॉल येथे आयोजित संपर्क दौऱ्यात अंधारे बोलत होत्या. व्यासपीठावर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख शरण राज केंगाळकर, संपर्क प्रमुख उमेश सारंग, उपजिल्हाप्रमुख संजय पोळ, युवा सेना जिल्हाधिकारी रमेश चौगुले, युवा सेना अक्कलकोट तालुका उपाधिकारी संतोष टोणपे, युवा सेना उपजिल्हाधिकारी योगेश फुलारी, शहरप्रमुख राम जाधव, रवि डोके, सोपान निघते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवसैनिकाशी थेट उपनेत्या सुषमा अंधारे यांनी संवाद साधून अडचणी जाणुन घेतल्या. या वेळी शिवसैनिकांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मनोज पवार, आयाज जमादार, पिंटू पांढरे आदींसह शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी दामू राठोड, किरण खरात आदींसह बहुसंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.



## वखारिया विधालयात बाल चित्रकला स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ९ ऑगस्ट -**

बार्शी तालुक्यातील वखारिया विद्यालय, उपळे दुमाला येथे शनिवार दि. ८ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळ, मुंबई आयोजित बाल चित्रकला स्पर्धा पार पडली. पंचायत समिती बार्शी यांच्या सहकार्याने आयोजित स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपळे केंद्राचे केंद्रप्रमुख दिलीप म्हमाणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी केंद्रप्रमुख म्हमाणे यांचे स्वागत व सत्कार केला. स्पर्धेत सहभागी शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांचाही गौरव केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी प्रतिनिधींना गुलाबपुष्प देऊन उत्साह वाढवण्यात आला.

स्पर्धेच्या आयोजनाबद्दल पंचायत समिती बार्शीच्यावतीने मुख्याध्यापक दयानंद रेवडकर आणि केंद्र समन्वयक नवनाथ महाले यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात बोलताना मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास वखारिया विद्यालयाचे शिक्षक रमेश लंकेश्वर, दत्तात्रेय राऊत, अतुल राठोड, अनिल वैद्य, प्रशांत काशीद, मकरंद जगदाळे, रेवणसिद्ध दुलंगे, यश पवार, दादासाहेब धनके, विकास बुरगुटे यांच्यासह उपळे दुमाला व परिसरातील ग्रामस्थ, पालक आणि शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २४० विद्यार्थ्यांचा सहभाग कौतुकास्पद

कमी कालावधीत सर्व शाळांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी प्रोत्साहित केले गेले. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे तब्बल २४० विद्यार्थ्यांनी या केंद्रावरुन चित्रकला स्पर्धेत सहभाग नोंदवला, ही अत्यंत चांगली बाब आहे.

**- दिलीप म्हमाणे, केंद्र प्रमुख, उपळे.**

## पंढरपूर सिंहगडमध्ये टेस्ट ऑटोमेशन कौशल्य विकासावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ ऑगस्ट -**

एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात तृतीय वर्ष बी.टेक.च्या विद्यार्थ्यांसाठी 'बिल्डिंग टेस्ट ऑटोमेशन स्किल्स विथ पोस्टमन अँड सेलेनियम' या विषयावर विशेष अतिथी व्याख्यान दि. ८ ऑगस्ट रोजी झाले.



व्याख्यानासाठी ऑल्टिमेट्रिक लिमिटेड, येरवडा, पुणे येथील टेस्ट स्पेशालिस्ट डॉ. गणेश पाटील हे प्रमुख मार्गदर्शक होते. विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. पिंगळे यांनी प्रास्ताविकात सॉफ्टवेअर टेस्टिंग आणि टेस्ट ऑटोमेशन कौशल्यांचे महत्त्व सांगितले. डॉ. गणेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना एपीआय टेस्टिंग टूल - पोस्टमनची अंमलबजावणी नमुना एपीआयच्या सहाय्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. तसेच सेलेनियम वेबड्रायव्हर आर्किटेक्चरची रचना व कार्यपद्धती स्पष्ट करून मेव्हनच्या सहाय्याने सेलेनियम सेटअप करून वेब ब्राउझर सुरू करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच सॉफ्टवेअर टेस्टिंगमध्ये ऑटोमेशनची वाढती गरज, उद्योग क्षेत्रातील संधी आणि पोस्टमन व सेलेनियमसारख्या साधनांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. एस. एस. भिमदे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. के. जे. करांडे, विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. पिंगळे तसेच विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## यंदा शेतकऱ्यांसाठी साखर ठरणार गोड?

**उच्चांकी दर मिळण्याची अपेक्षा; बाजारात साखरेची मोठी दरवाढ**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि.९ ऑगस्ट -**

महाराष्ट्रात यंदा कधी नव्हे ते बाजारपेठेत साखरेला उच्चांकी दर मिळाला आहे. गेल्या महिन्यात ४२ रुपये किलो एवढा दर होता. ऑगस्ट महिन्यात साखरेला बाजारपेठेत ५५ रुपये प्रती किलो एवढा दर मिळत आहे. साखरेच्या वाढत्या दराचा अंदाज घेता यंदा शेतकऱ्यांना प्रतिटन ४ हजार ते साडेचार हजार रुपये दर मिळण्याची अपेक्षा आहे.

बाजारपेठेत रोज मोठ्या प्रमाणावर साखरेची आवश्यकता असते. प्रत्येकाच्या घरात तसेच हॉटेल किंवा इतर पदार्थ बनविण्यासाठी साखर मोठ्या प्रमाणात लागते. साखरेचा दैनिक वापर वरचेवर वाढतच आहे. बाजारात मोठ्या प्रमाणावर साखरेचा खप होतो. गतवर्षीपेक्षा यंदा बाजारात साखरेला जवळपास १०-१५ रुपये एवढा जास्तीचा दर प्रती किलो मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना गतवर्षी ३००० ते ३३०० रुपये टन असणारा दर यंदा साखरेच्या किमतीचा अंदाज घेता ऊसाला यंदा ४००० ते ४५०० रुपये प्रतिटन एवढा चांगला दर शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे.

साखरेच्या दरात झालेला उठाव पाहता तसेच वाढणाऱ्या मशागतीचा दर, औषधांचा खर्च व इतर सर्व खर्चाचा विचार करता ऊसाला ४५०० हजार रुपये प्रतिटन एवढा दर मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सोडून इतर सर्व राज्यात ऊसाला चार हजाराच्यावर दर आहे. फक्त महाराष्ट्रातच शेतकऱ्यांना चांगला दर मिळत नाही. महाराष्ट्रात इतर जिल्ह्यापेक्षा सोलापूर जिल्ह्यातच ऊसाला दर कमी आहे. विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त साखर कारखाने असूनही कारखानदार दर मात्र सर्वात कमी देतात. साखरेतील दराचा उठाव पाहता महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उच्चांकी दर मिळावा अशी शेतकरी वर्गाची मागणी आहे. खरेतर ज्या साखर कारखान्यात उप पदार्थ निर्मिती होते. त्यांना तर चांगला दर देण्यास काहीच अडचण नाही. कारण या कारखान्यात साखर, मोलॅसिस, वीज निर्मिती, इथेनॉल या सर्वच पदार्थांना चांगला दर मिळतो. यामुळे शेतकऱ्यांना ४००० ते ४५०० प्रतिटन दर द्यायला काहीच हरकत नाही.

## डी.एल.एड. परीक्षेचा निकाल जाहीर; ५३.७४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २ जून ते १० जून या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या डी.एल.एड. परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून राज्याचा एकूण निकाल ५३.७४ टक्के लागला आहे. या परीक्षेला राज्यातील एकूण १९ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती, त्यापैकी १० हजार ७१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी या निकालाची अधिकृत माहिती दिली. परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर हा निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे मूळ गुणपत्रक संबंधित अध्यापक विद्यालयामार्फत हस्तपोच करणार आहे. एकूण १९,४१३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात १०,७१६ विद्यार्थी यशस्वी झाले. उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी आणि छायाप्रत मागवण्यासाठी २८ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येईल. मराठी माध्यमासाठी १४ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी १४ हजार ३७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ७ हजार ५०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मराठी माध्यमाचा निकाल ५०.७३ टक्के लागला आहे. उर्दु माध्यमासाठी २ हजार ८४७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ हजार ८०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील १ हजार ७८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उर्दु माध्यमाचा निकाल ६२.५६ टक्के लागला आहे.

हिंदी माध्यमासाठी ३२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३१४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील २१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हिंदी माध्यमाचा निकाल ६७.१८ टक्के लागला आहे. इंग्रजी माध्यमासाठी १ हजार ९३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १ हजार ८८१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १ हजार १७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.निकाल ६०.९९ टक्के लागला आहे. कन्नड माध्यमासाठी ४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ४३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कन्नड माध्यमाचा निकाल ७७.२७ टक्के लागला आहे. परीक्षा परिषदेमार्फत राज्यात प्रथमच दहावी, बारावी परीक्षेप्रमाणे डी.एल.एड. परीक्षा या इन कॅमेरा घेण्यात आल्या.

# मुलीचा विनयभंग; अल्पवयीन मुलावर पोक्सो अंतर्गत गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**

तू मला आवडतेस,असे म्हणून अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्यात आला. बार्शी शहरातील अलीपूर रोड परिसरात हा प्रकार घडला. या प्रकरणी एका अल्पवयीन मुलावर बार्शी शहर पोलीस ठाण्यात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

संबंधित मुलाने मुलीशी बोलताना तिला लग्नाचे आमिष दाखवले. तसेच विरोध केल्यानंतर हाताने मारहाण करुन केस ओढल्याचा आरोप मुलीने आपल्या पालकांना सांगितल्याचे फिर्यादीमध्ये नमूद आहे. पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबानुसार, पीडित अल्पवयीन मुलगी एका विद्यालयात इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेत आहे. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ती नातेवाइकांच्या मुलीसोबत शाळेत गेली होती.

सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास शाळेजवळ संबंधित व्यक्तीने तिला लज्जा वाटेल असे वक्तव्य केले. त्यावर मुलीने याबाबत शिक्षकांना सांगते म्हटल्यावर त्याने तिला मारहाण केली व केस ओढले.त्यानंतर तो तेथून निघून गेल्याचे फिर्यादीमध्ये नमूद केले आहे. घडलेला प्रकार मुलीने दुपारी पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# करकंब येथील धाकटी वेस पुलाची उंची वाढणार

## विद्यार्थी, ग्रामस्थांसह अनेकांचा प्रवास होणार सुखकर

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.९ ऑगस्ट -**

करकंब ता. पंढरपूर येथे करकंब गाव ते जळोली चौक दरम्यान धाकटी वेस या परिसरात ओढा आहे. या ओढ्याच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या बंधाऱ्यांची उंची जास्त असल्याने सदर बंधारे भरल्यानंतर संबंधित पुलावर तीन ते चार फूट उंचीवरून पाणी वाहत होते. परिणामी वाहतुक बंद झाल्याने सर्वांनाच त्रास होत होता. आता सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाची उंची वाढवण्यास मान्यता दिली आहे. दैनिक तरुण भारतने वारंवार केलेल्या पाठपुराव्यास यश आले असून विद्यार्थी, ग्रामस्थांसह अनेकांचा प्रवास सुखकर होणार आहे.

ओढ्याच्या एका बाजूला जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा तर दुसऱ्या बाजूस ओढ्यापासून ३०० मीटर अंतरावर माध्यमिक शाळा आहे. या दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना या पुलावरून पाणी वाहत असताना त्यातून जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत होता. पुलावर पाणी आल्यानंतर विद्यार्थ्यांना पलीकडे जाता येत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते.






शेतकरी, ग्रामस्थ, व्यापारी,लहान मुले, महिला, वृद्ध नागरिकांची मोठी गैरसोय झाली होती. जीवितास धोका होण्याची शक्यताही होती.

जळोली चौक व त्या परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना नेमतवाडी चौकात येऊन नंतर करकंब गावात दोन किलोमीटरचे अंतर पार करून यावे लागत होते. हा पूल झाल्यामुळे संबंधितांचा वेळ व त्रास वाचण्यास मदत होणार आहे.

सदर पुलाची उंची वाढवून त्याची पूर्तता लवकरात लवकर करण्यात यावी, अशा आशयाचे वृत्त दैनिक तरुण भारतने लावले होते. तसेच वारंवार यासाठी पाठपुरावाही केला होता. या वृत्ताची तसेच पाठपुराव्याची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व प्रक्रिया पूर्ण करत सदर पुलाच्या कामाची पूर्तता केली.

करकंब येथील अजितसिंह देशमुख मित्र मंडळाकडूनही तात्कालीन आमदार बबनराव शिंदे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे या पुलाची उंची वाढवण्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

माजी आमदार बबनराव शिंदे यांनी यासाठी निधी उपलब्ध करून दिला. तर विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनीही विधिमंडळात हा प्रश्न मांडल्याने अखेर या पुलाची पूर्तता झाली आहे. परिणामी अबाल वृद्ध नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### दैनिक तरुण भारतने केला होता पाठपुरावा

दैनिक तरुण भारतने दि.१७ एप्रिल २०२५, दि.१ जानेवारी २०२५, दि.९ जून २०२४, दि.१०ऑक्टोबर २०२२ च्या अंकांमध्ये या मार्गावरील सदर पुलाची उंची वाढवण्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. सदर पुलास मान्यता मिळावी व त्याची लवकरात लवकर पूर्तता करून या पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची गैरसोय दूर व्हावी यासाठी आवाज उठविला होता. त्या प्रयत्नांना यश आले आहे.

### महिनाभरात काम पुर्ण करणार

सदर पुलाचे काम निश्चित कालावधीपुर्वीच पूर्ण करण्यात यश आले आहे. पुलाचे काम पूर्ण झाले असले तरी संबंधित पुलाच्या दोन्ही बाजूंकडील रस्त्याचे मुरमीकरण, खडीकरण व डांबरीकरण एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. सदरच्या पुलाचे काम व डांबरीकरण झाल्यानंतर नागरिक, ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी, अबालवृद्ध, महिला यांची होणारी गैरसोय दूर होणार आहे.

**- अजितसिंह देशमुख, कंत्राटदार.**

## महत्त्वाचे...

### जीवनदत्त आरगडे यांच्याकडे किसान काँग्रेसचे उत्तर प्रदेश प्रभारीपद

**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**



अखिल भारतीय किसान काँग्रेसच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देण्यासाठी बार्शी येथील अ‍ॅड. जीवनदत्त आरगडे यांची पूर्व उत्तर प्रदेश प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पूर्व उत्तर प्रदेशातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांना संघटित व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आरगडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारशीनुसार, अखिल भारतीय किसान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखपालसिंग खैरा यांच्या सूचनेवरून संघटन प्रभारी तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिलेश शुक्ला यांनी ही नियुक्ती केली आहे. ६ ऑगस्ट रोजी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे आरगडे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणातील आरोपीस न्यायालयाकडून जामीन

**टेंभुर्णी, दि. ९ ऑगस्ट -**

खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेला आरोपी प्रदीप मारुती कदम (रा. कंदर, ता. करमाळा) यास बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणातील फिर्यादी आणि आरोपी हे एकाच गावातील रहिवासी आहेत. किरकोळ कारणावरून झालेला वाद पुढे विकोपाला गेल्याचा आरोप आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपी प्रदीप कदम याने बंदूक व कोयत्याच्या साहाय्याने जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप केला होता. त्यानुसार करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

आरोपीच्या वतीने अ‍ॅड. गोपाळ परबत-पाटील यांनी बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने आरोपी सुमारे एक महिना फरार होता, त्याने बंदूक आणि कोयत्याने फिर्यादीचा खून करण्याचा प्रयत्न केला तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा युक्तिवाद केला. त्यामुळे जामीन अर्ज फेटाळण्याची मागणी केली. आरोपीचे वकील अ‍ॅड. गोपाळ परबत-पाटील यांनी आरोपी घटनास्थळी उपस्थित होता की नाही, याबाबतच शंका उपस्थित केली. तसेच फिर्यादी आणि आरोपी हे एकाच जातीचे असल्याने आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप प्रथमदर्शनी ग्राह्य धरता येत नाही, असा मुद्दा मांडला. तसेच फिर्यादीला जीवे मारण्याची भीती असल्याचा दावा केला असला तरी, त्याने नातेवाईकांशी चर्चा करून विलंबाने तक्रार दाखल केल्याकडेही न्यायालयाचे लक्ष वेधले. गुन्हा दाखल झाल्यानंतर तब्बल २० दिवसांनी तपास यंत्रणांनी कलम १०९(१) लागू करून गुन्ह्याचे स्वरूप अधिक गंभीर दाखविण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, तपासातील कागदपत्रे आणि प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी आरोपीस जामिनावर मुक्ततेचे आदेश दिले. या प्रकरणात आरोपीच्या वतीने अ‍ॅड. गोपाळ परबत-पाटील, अ‍ॅड. अभिजित साखरे, अ‍ॅड. के. के. मांगले आणि अ‍ॅड. निखिल घाडगे यांनी काम पाहिले, तर सरकार पक्षातर्फे अ‍ॅड. डी. डी. देशमुख यांनी बाजू मांडली.



### गॅस कनेक्शनसाठी उपोषण; ‘तहसील’च्या लेखी आश्वासनानंतर मागे

**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**

गौडगांव येथील आशा सुतार यांनी नवीन गॅस कनेक्शन मिळावे, या मागणीसाठी बार्शी तहसील कार्यालयासमोर एक दिवस उपोषण केले. अखेर तहसील कार्यालयाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर ते मागे घेतले. गॅस कनेक्शन नसतानाही त्यांच्या बँक खात्यात गॅस अनुदान जमा होत असल्याने त्यांना नवीन गॅस कनेक्शन मिळण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे तात्काळ नवीन गॅस कनेक्शन मिळावे, या मागणीसाठी त्यांनी उपोषण केले. दरम्यान, तहसील कार्यालय बार्शी येथील पुरवठा विभागाने संबंधित गॅस एजन्सीला आशा सुतार यांना तात्काळ नवीन गॅस कनेक्शन देण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबतचे लेखी पत्र तहसील दिले. तहसील कार्यालयाचे लेखी पत्र मिळाल्यानंतर आशा सुतार यांनी आपले एक दिवसाचे उपोषण मागे घेतले. यावेळी पुरवठा अधिकारी आठवले, सामाजिक कार्यकर्ते राहुल भड, अशोक माळी, पांडुरंग घोलप, सतीश बुरगुटे आदी उपस्थित होते.

### पिलीव परिसरावर दुष्काळाचे सावट

**पिलीव, दि ९ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात पावसाळा सुरु होऊन तब्बल दोन महीने झाले तरीही म्हणावा तसा पाऊस पडलाच नाही. यामुळे सध्या तरी पिलीव परिसरावर दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. आता अंतिम टप्प्यात किती पाऊस पडणार असा प्रश्न आहे. या भागातील ओढे, नाले वाहिलेच नाहीत. अद्याप तळी, बंधारे, तलाव कोरडेच आहेत, ते कधी भरणार? या भागातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या भागात शेतीच्या पाण्याबरोबरच, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. अनेक शेतकऱ्यांनी थोड्याफार पावसावर बाजरी, मका ,कडवळ अशी पिके पेरली होती. पण पाऊसच न पडल्यामुळे सध्या पाण्यावाचून ही पिके धोक्यात आली आहेत.

# साखर उद्योगातील योगदानाबद्दल शहाजी भड यांचा सन्मान

## माजी मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते गौरव

### साखर उद्योगाला मल्टीप्रॉडक्ट बायोस्त्रोत बनवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ९ ऑगस्ट -**

पुणे येथे आयोजित दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीज् असोसिएशनच्या ७१ व्या वार्षिक अधिवेशनात व साखर प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी गौडगाव (ता. बार्शी) येथील शहाजी भड यांना साखर क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सोहळ्याला राज्याचे माजी अर्थमंत्री जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, दिलीप देशमुख, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, माजी आयएएस अधिकारी डॉ. शेखर गायकवाड, बी. बी. ठोंबरे आणि आर. व्ही. कुंभार या प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शहाजी भड यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



शहाजी भड यांना राज्यस्तरीय व्यासपीठावर आणि दिग्गज मान्यवरांच्या हस्ते मिळालेल्या या सन्मानामुळे गौडगावसह संपूर्ण बार्शी तालुक्यातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### साखर उद्योगाचे भविष्य बदलण्याची गरज

माजी मंत्री जयंत पाटील म्हणाले की, ‘‘साखर उद्योगाकडे केवळ साखर उत्पादन करणारा उद्योग म्हणून न पाहता मल्टीप्रॉडक्ट बायोमास रिसोर्स म्हणून पाहण्याची आज गरज आहे. इथेनॉल, बायो गॅस, बायो-सीएनजी यांसारख्या विविध मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून या उद्योगाची आर्थिक व्यवहार्यता वाढवणे आवश्यक आहे. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि कार्यक्षमता वाढवण्यावर भर द्यावा लागेल.’

# परसबाग स्पर्धेत हंजगी, करजगी, इब्राहिमपूरच्या शाळा अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ ऑगस्ट -**

पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या मार्गदर्शनानुसार शालेय स्तरावर परसबाग स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत श्री बसवराज हायस्कूल करजगी, वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळा हंजगी, श्री महांतेश्वर प्रशाला इब्राहिमपूर यांनी विभागून पहिला क्रमांक पटकावला.

सेंद्रिय पालेभाज्यांचे उत्पादन वाढवणे, तसेच विद्यार्थ्यां मध्ये निसर्गाप्रती आवड निर्माण करण्यासाठी कार्यरत स्वयंपाकी आणि मदतनीस यांच्यामधून स्पर्धा आयोजित केली होती. उत्कृष्ट पाककृती निवड केलेल्या स्पर्धकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. परसबाग स्पर्धेसाठी श्री बसवराज हायस्कूल करजगी, वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळा हंजगी, श्री महांतेश्वर प्रशाला इब्राहिमपूर तसेच पाककृती स्पर्धेसाठी प्रगती महिला बचत गट अक्कलकोट, श्री जयशंकर प्रशाला तडवळ यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष बंदीछोडे, बीआरसीचे तज्ञ मार्गदर्शक शरद कुंभार आणि शालेय पोषण आहार समन्वयक पंडित गुरव आदींची प्रमुख उपस्थिती होती. अक्कलकोट पंचायत समिती सभागृहात अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी तालुक्यातील जास्तीत जास्त शाळेनी या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन अरबाळे यांनी केले.

# कोरफळेत ‘उपसा सिंचन’च्या टप्पा एकचे जलपूजन

## बार्शी तालुक्यातील अडीच हजार एकर जमीन येणार ओलिताखाली

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट -**

बार्शी तालुक्याच्या दुष्काळी भागाला दिलासा देणाऱ्या बार्शी उपसा सिंचन योजना टप्पा-१ या महत्वाकांक्षी प्रकल्पाला मोठे यश मिळाले आहे. उजनी धरणातून कोरफळे शिवारातील पंप हाऊस येथे पाणी यशस्वीरित्या सोडण्यात आले. या योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या मान्यता आणि निधीमुळे तसेच आमदार राजेंद्र राऊत यांचा पाठपुरावा, बैठका आणि जलसंपदा विभागाशी समन्वयामुळे हा टप्पा पूर्णत्वास आला आहे.

टप्पा एकचे जलपूजन झाल्याने कोरफळे ग्रामस्थांतर्फे पाणीदार आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कोरफळे शिवार, पंप हाऊस परिसर येथे भव्य पाणीपूजन समारंभ पार पडला. पाणीदार आमदार म्हणून ओळखले जाणारे आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते पाणीपूजन करण्यात आले. या पाण्यामुळे कोरफळे गावातील तब्बल २५०० एकर शेतजमीन ओलिताखाली येणार आहे. गेली अनेक वर्षे पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या या भागातील शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामात शेती करता येणार असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

पाणी पूजनानंतर बोलताना राऊत म्हणाले,हा फक्त पाण्याचा प्रवाह नाही, तर शेतकऱ्यांच्या आशेचा प्रवाह आहे. बार्शी तालुक्याला पाणीदार करण्याचा आपला संकल्प आहे. पुढील टप्प्यातही अशीच कामे मार्गी लावू. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचे खरे बक्षीस आहे.



### बार्शी तालुक्यासाठी ऐतिहासिक दिवस

आज कोरफळे गावासाठी आणि संपूर्ण बार्शी तालुक्यासाठी ऐतिहासिक दिवस आहे. उजनीचे पाणी पंप हाऊसपर्यंत पोहोचले. यामुळे २५०० एकर शेतीला संजीवनी मिळाली आहे. हे सर्व श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीला जाते. त्यांच्या ठाम निर्णयामुळे हा प्रकल्प मार्गी लागला.

**- आमदार राजेंद्र राऊत**

### आत्महत्या प्रकरणात आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी

**मंगळवेढा, दि. ९ ऑगस्ट -**

ऊसतोडीसाठी घेतलेले पैसे वारंवार मागून त्रास देवून आत्महत्या करण्यास बिरुदेव जावीर (रा. जालिहाळ) याला प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपी नामदेव शेंडगे याला अटक करुन मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता न्यायाधीश पाटील यांनी तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यातील फिर्यादी सिध्देश्वर जावीर यांचा मयत मुलगा बिरुदेव जावीर याला मार्च २०२६ ते २ ऑगस्ट २०२६ च्या सायंकाळी ५.३० पर्यंत वरील आरोपींनी ऊसतोडीसाठी घेतलेल्या अ‍ॅडव्हान्स पैशाची वारंवार मागणी करुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल होता. तपासिक अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर यांनी आरोपीस अटक करुन मंगळवेढा न्यायालयात उभे केल्यावर सोमवार दि.१० रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### घरगुती कारणावरुन तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा, दि. ९ ऑगस्ट -**

भोसे येथे घरगुती कारणावरुन एका ४२ वर्षीय तरुणाने शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याचा प्रकार घडला असून याची पोलीसात नोंद झाली आहे. खबर देणारे भास्कर दुधाळ यांचा भाऊ मयत राजाराम दुधाळ याने दि.८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता घरगुती कारणावरुन शेतातील लिंबाची झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे दिलेल्या खबरीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार पलुसकर हे करीत आहेत.


झेपावलेले सोलापूर
सोलापूर तरुण भारत
४२ वा वर्धापन दिन
सोमवार, १० ऑगस्ट २०२६
१
बार्शी
माळशिरस
पंढरपूर
मोहोळ
उत्तर सोलापूर
दक्षिण सोलापूर
अक्कलकोट
सांगोला
मंगळवेढा



आमचे मार्गदर्शक
सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
दमदार
आमदार
सीए.विनोद भोसले
नगरसेवक
मा.नागेश खरात
मंडलअध्यक्ष
* शुभेच्छुक *
नगरसेवक सीए विनोद धर्मा भोसले व
मंडल अध्यक्ष नागेश खरात मित्रपरिवार सोलापूर


सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांना विनम्र अभिवादन...
चला, निरोगी, सक्षम आणि एकजूट भारत घडविण्याचा संकल्प करूया.
जय हिंद... वंदे मातरम्...
CHALLENGER SPORTS FOUNDATION SOLAPUR
चॅलेंजर स्पोर्टस् फाऊंडेशन, सोलापूर


आमचे आधारस्तंभ
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन चिरायू होवो..!
श्री.संग्रामसिंह जहागिरदार
माजी सभापती कृषी व पशुसंवर्धन
जि.प.सोलापूर
* शुभेच्छुक *
श्री. अविनाश जेऊरकर
* संस्थापक अध्यक्ष, अष्टविनायक गणेश मित्र मंडळ, पिलीव
* माजी चेअरमन श्रीराम पतसंस्था, पिलीव
* माजी अध्यक्ष विरशैव लिंगायत समाज संघटना
* माजी ग्रामपंचायत सदस्य, पिलीव
* संचालक, विजय ग्रामीण पंतसंस्था
सौ.अनिता अविनाश जेऊरकर
माजी ग्रा.पं.सदस्या


महाराष्ट्र शासन
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
मुख्यमंत्री सचिवालय
मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व सार्वजनिक आरोग्य विभाग
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन
माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव
संपूर्ण लसीकरण, योग्य पोषण
प्रत्येक बालकासाठी
आरोग्याचे मजबूत संरक्षण!
माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव
मधुमेह-रक्तदाब - तपासणी करा नियमित,
रोगांवर मिळवा नियंत्रण निश्चित!
DIET PLAN
PROTEIN
FATS
CARBS
मा. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. सुनेत्रा पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. प्रकाश आबीटकर
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. जयकुमार गोरे
पालकमंत्री
मा. मेघना बोर्डीकर
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण
अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा किंवा १०४ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करा.
जिल्हा परिषद सोलापूर
आरोग्य विभाग
सोलापूर जिल्हा परिषद
अध्यक्ष
दीपक वैद्य
उपाध्यक्ष
इंद्रजीत पवार
सभापती, आरोग्य
चेतनसिंह केदार-सावंत
सभापती, कृषी
रामप्पा चिवडशेट्टी
सभापती, समाजकल्याण
सौ. संस्कृती सातपुते
सभापती, म.बा.स
ॲड. अमृता वाघे






# ऑलिंपिक वारशापासून तेजोमय गरुड भरारीपर्यंत...

सोलापूर शहर आणि जिल्ह्याला क्रीडा क्षेत्राची मोठी व समृद्ध परंपरा आहे. या इतिहासातील सर्वात सुवर्णपान म्हणजे ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पहिल्या आंतरराष्ट्रीय धावपटू वंदना शानबाग होत. त्यांनी निर्माण केलेला हा दैदिप्यमान आणि प्रेरणादायी वारसा आजची नवी क्रीडा पिढी अत्यंत अभिमानाने आणि समर्थपणे पुढे नेताना दिसत आहे. २०२५-२६ मध्ये सोलापूरच्या खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा पटलावर दैदिप्यमान यश संपादन करत शहराच्या क्रीडा विश्वात एक नवीन आणि सुवर्ण अध्याय लिहिला आहे.



## भविष्यातील ऑलिंपिक पदकाची सोनेरी स्वप्ने

योग्य प्रशिक्षण, कठोर मेहनत आणि खेळाप्रती निष्ठा यांच्या बळावर सोलापूरचे हे शिलेदार आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर आपली पकड मजबूत करत आहेत. सोलापूरची ही सुवर्णकन्या वंदना शानबाग यांचा वारसा चालवणारे हे तरुण खेळाडू भविष्यात भारतासाठी ऑलिंपिक पदकाचे स्वप्न नक्कीच पूर्ण करतील, यात शंका नाही!



अजितकुमार संगवे
भ्र. ९८८११३३१०३
वृत्तसंपादक, दै. तरुण भारत

वर्ष २०२५- २६ हे सोलापूरच्या क्रीडा विश्वासाठी अत्यंत ऐतिहासिक आणि यशाने मढवलेले ठरले आहे. या काळात सोलापूरच्या खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या उत्कृष्ट कामगिरीचा ठसा उमटवला आहे.



## क्रिकेट विश्वात झळकणारा सोलापूरचा अर्शीन कुलकर्णी

क्रिकेटमध्ये प्रशिक्षक अशोक टिळक, (स्व.) सलीम खान व सेंट जोसेफ स्कूलमध्ये राजेंद्र गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेला अर्शिन कुलकर्णी हा भारतीय क्रिकेटमधील अष्टपैलू खेळाडू म्हणून पुढे येत आहे. २०२४-२५ च्या विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याने महाराष्ट्रासाठी पहिले शतक झळकावले. २०२५ च्या एमपीएलमध्ये ईगल नाशिक टायटन्सकडून खेळताना तो दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आणि अंतिम सामन्यात ७७ धावांची खेळी करत सामनावीर ठरला. तसेच आयपीएल २०२५ मध्ये एलएसजीने त्याला ३० लाख रुपयांना विकत घेतले होते आणि देशांतर्गत क्रिकेटच्या सर्व प्रकारांत त्याने आपल्या पहिल्या प्रथम-श्रेणी शतकासह उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



## डायव्हिंग: आंतरराष्ट्रीय स्तरावर सोलापूरचा डंका

जलतरणातील डायव्हिंग प्रकारामध्ये श्रीकांत शेटे व मनीष भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या डायव्हिंगपटू श्रावणी सूर्यवंशी हिने एशियन स्पर्धेत पाचवे स्थान मिळवीत आंतरराष्ट्रीय पातळीवर सोलापूरचे नाव उंचावले आहे. ऋतुराज बिडकरने वॉटर पोलोमध्ये रेल्वेला राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक मिळवून दिले आहे. श्रीगणेश उडता व मनस्वी माने यांनी रौप्य, संकेत लिगाडे याने कांस्य तर हरीश अन्नलदास यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वेच्या ओम अवस्थी यानेही कांस्य पदक संपादले.








## धनुर्विद्या: अचूक वेध घेत विश्वविक्रमाची दिशा

धनुर्विद्यामध्ये हरिदास रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून दीपक चिकणे हे धनुर्धर घडवत आहेत. तनिष्का ठोकळ हिने ज्युनियर एशिया कप स्पर्धेत कंपाऊंड प्रकारात रौप्य संपादिले. रणजीत चामले यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली टेंभुर्णीच्या गाथा खडके हिची रिकर्व्ह प्रकारात युथ ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली होती. प्रवीण सावंत यांनी घडविलेली करमाळ्याच्या वैष्णवी पाटील कंपाउंड प्रकारात जुनिअर एशिया कप स्पर्धेसाठी तर चंदिगडचे अनुराग यांनी मार्गदर्शन केलेल्या आरणच्या आदित्य पवार याची सब जुनियर गट आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

## लॉन टेनिस आणि खो-खो: राष्ट्रीय पटलावर वर्चस्व

राजीव देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली संध्याराणी बंडगर यांनी वरिष्ठांच्या ५ व्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ४५ वर्षांवरील महिलांच्या एकेरीत विजेतेपद पटकाविले. अतुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वाडीकुरोलीच्या स्नेहा लामकाने हिने राष्ट्रीय कुमार खो खो स्पर्धेत मुलींच्या गटातील सर्वोत्तम जानकी पुरस्कार पटकावला आहे.



## ॲथलेटिक्समधील चमकदार कामगिरी: वेगाची शिखरे सर

परमानंदनगर बाबलाद तांडा (ता. अक्कलकोट) येथील लांब पल्ल्याचा धावपटू अरुण धनसिंग राठोड याने जर्मनी येथील वर्ड युनिव्हर्सिटी गेममधील हाफ मॅरेथॉनमध्ये २७ वे स्थान मिळवले, तसेच ४२ किमी राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत द्वितीय स्थान संपादन केले, आणि त्याच्या या कामगिरीमुळे रेल्वेने त्याला आपल्या सेवेत घेतले आहे.

सूर्याजी व भारती लिंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या आणि वेगाची राणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूजा राठोडने (१२.१० सेकंद) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत २० वर्षांखालील गटात १०० व २०० मीटर शर्यतीत भारतातून चौथे स्थान मिळवले, तसेच ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले. वेगवान धावपटू विनीत दिनकर याने राष्ट्रीय स्तरावर २३ वर्षांखालील गटात १०० मीटर शर्यतीत १०.४८ सेकंद अशी आपली वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवली. तसेच साईश्वर व श्रद्धा गुंटूक या उदयोन्मुख धावपटूंनी वडील केशव गुंटूक यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेऊन आपले कौशल्य सिद्ध केले आहे.

---

रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय माढाची स्थापना जून १९७० मध्ये माढा शहर व परिसरातील शिक्षणप्रेमी नागरिकांच्या उत्स्फूर्त लोकसहभागातून झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उदात्त ध्येयाने या महाविद्यालयाची पायाभरणी करण्यात आली. महाविद्यालयाच्या स्थापनेत व विकासात सहकार महर्षी कै. गणपतराव साठे, जनार्धन आप्पा चव्हाण, वसंतराव साठे, नागनाथ कदम, योगीराज कुर्डे, नामदेवराव जगदाळे, उद्योगपती जयकुमार पाटील, भाई एस. एम. पाटील यांचे नेतृत्व अत्यंत मोलाचे ठरले.



# माढ्याचे कला व वाणिज्य महाविद्यालय कौशल्याधारित शिक्षणाचे केंद्र



डॉ. सतीश घाडगे
भ्र. ९४२१९६०५९८

सन २०२० हे वर्ष महाविद्यालयाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरले. २०१९-२० या सुवर्णमहोत्सवी वर्षात तत्कालीन प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी महाविद्यालयाचे स्थलांतर नव्या परिसरात करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात प्रवेशद्वार, अंतर्गत रस्ते, जुन्या इमारतीचे नूतनीकरण, रंगकाम तसेच सुमारे १६,००० चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. तदनंतर महाविद्यालयामध्ये विविध विकासकामे सुरु आहेत. महाविद्यालय परिसरात आंबा, सीताफळ व इतर फळझाडांसह दीड हजारांहून अधिक वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला आहे.

महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन्ही विभाग कार्यरत असून कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. वाणिज्य शाखेत पदव्युत्तर शिक्षणाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल आणि वाणिज्य असे सात पदवी विभाग कार्यरत आहेत. गतवर्षीपासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कोर्स सुरु केले असून गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. अलीकडे महाविद्यालयाच्या विकासाला नवी दिशा देणारी अत्यंत अभिमानास्पद बाब म्हणजे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USH) अंतर्गत महाविद्यालयास ५ कोटींचे अनुदान मंजूर झाले आहे. या निधीतून अत्याधुनिक बहुउद्देशीय सभागृह, कौशल्य विकास केंद्र, जुन्या इमारतीचे नूतनीकरण, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा तसेच इतर अत्यावश्यक शैक्षणिक सुविधा विकसित होत आहेत.

महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय, आधुनिक क्रीडांगण, मुलींसाठी मोफत वसतिगृह, रयत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, कौशल्य विकास केंद्र, प्लेसमेंट सेल, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (छउउ) तसेच कमवा व शिका योजना प्रभावीपणे कार्यरत आहेत. महाविद्यालयात उपलब्ध भौतिक सुविधांमध्ये पारंपारिक शिक्षणाबरोबर कौशल्य आधारीत शिक्षण देण्यावर भर दिलेला आहे. चालू वर्षी फॅशन डिझायनिंग, संगणकाचे विविध कोर्सेस, लोककला- लोकसाहित्य- लोकसंगीत केंद्र असे महत्त्वपूर्ण कोर्सेस सुरु केले आहेत. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, आत्मनिर्भर आणि उद्योगाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्र कार्यरत केले आहे.

या केंद्रामार्फत संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, संगणक साक्षरता, डिजिटल कौशल्ये, उद्योजकता विकास, मुलाखत कौशल्य, आर्थिक साक्षरता तसेच विविध अल्पकालीन कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. माढा परिसरातील इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील या सर्व उपक्रमाचे लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालाचे प्रभारी प्राचार्य डॉ. घन:शाम हराळे यांनी केले आहे. (शब्दांकन)




सोलापूरचे मूळ नाव सोन्नलगे असे होते. यादव काळात ते सोनालजी किंवा सोनालीपूर तर मोगल काळात संदलापूर म्हणून ओळखले जात असे. सोळा गावे एकत्र येऊन हे शहर बनले म्हणून त्याला सोलापूर (सोळा+पूर) म्हटले गेले, असाही एक समज आहे.

# ऐतिहासिक नाव आणि उत्पत्ती




### धार्मिक वारसा-

१२ व्या शतकात संत श्री सिद्धेश्वर यांनी सोलापुरात वास्तव्य केले. त्यांनी शहराची पाणीटंचाई दूर करण्यासाठी तलाव बांधला आणि अनेक शिविलगांची स्थापना केली. त्यांची शिकवण आणि गड्डा यात्रा हा सोलापूरचा मुख्य सांस्कृतिक व धार्मिक वारसा आहे. सोलापूर जिल्हा महाराष्ट्राचे कुलदैवत पंढरपूर, अक्कलकोट आणि बार्शी यांसारख्या प्रसिद्ध धार्मिक स्थळांसाठीही ओळखला जातो. सोलापूर जिल्हा महाराष्ट्राचे कुलदैवत पंढरपूर, अक्कलकोट आणि बार्शी यांसारख्या प्रसिद्ध धार्मिक स्थळांसाठीही ओळखला जातो.



**सोलापूरचा इतिहास-** प्राचीन, धार्मिक आणि स्वातंत्र्यलढ्यातील अद्वितीय बलिदानाने समृद्ध आहे. प्राचीन काळात सोन्नलगे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहरावर चालुक्य, यादव, बहमनी आणि मराठ्यांसारख्या अनेक राजवटींनी राज्य केले. हे शहर हुतात्म्यांचे शहर आणि कापड गिरण्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात, मे १९३० मध्ये महात्मा गांधींच्या अटकेनंतर सोलापूर पेटून उठले. ९ ते ११ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी ब्रिटिशांच्या तावडीतून तीन दिवस स्वतंत्र सोलापूरचा अनुभव घेतला होता. या आंदोलनाला दडपण्यासाठी ब्रिटिशांनी मार्शल लॉ (लष्करी कायदा) लागू केला होता. या लढ्यात ब्रिटिशांनी मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन आणि किसन सारडा या चार क्रांतिकारकांना १२ जानेवारी १९३१ रोजी फाशी दिली.






**प्रमुख आकर्षणे-** सोलापुरात ऐतिहासिक सोलापूर किल्ला आणि श्री सिद्धेश्वर मंदिर आहे. तसेच, सोलापूरच्या ‘सोलापुरी चादरी’ जगप्रसिद्ध आहेत.





### हरींत उर्जा (Solar Project) -

मॅगीवॅटचा सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून यामुळे लाखो रुपयांची वीज बचत होत आहे. शहरात नवनविन बांधकामात या सौर प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे, हरघर सोलर अंतर्गत सौर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे काम सुरू आहे.ह्यामुळे सामान्य नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येत आहे.

# सोलापूर विकास कामे व त्रुटी




### पाणी पुरवठा योजना-

उजनी धरण ते सोलापूर दरम्यान ११० चडऊ जलवाहिनी बसवण्याचे काम चालू आहे व शहर नविन जलसंचय विकास कामे चालू आहेत.

सोलापूरमध्ये पाण्याची टंचाई जाणवते, पाणी वाचवा पाणी जिरवा या योजनेद्वारे काही ठोस पावले उचलण्याचा गरज आहे. ग्रामीण भागात, तालुक्यात पाणी टंचाईची समस्या नेहमी भेडसावत असते. तरी त्यावर काही उपाययोजना करायला हव्यात.



### स्मार्ट सिटी प्रकल्प विकास-

पुर्ण झालेल्या ४६ पैकी ३७ + स्मार्ट प्रकल्प महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. ह्यात इंटीग्रेटेड कमांड व कंट्रोल सेंटरमार्फत शहराची सुरक्षितता व कचरा व्यवस्थापन व वाहतूक व्यवस्थापन एकाच ठिकाणहून होणे आवश्यक आहे.

सोलापूर शहरात रस्ते रुंदीकरण, रस्ते दुरुस्तीची विकास कामे चालू आहेत. कचरा व्यवस्थापनद्वारे रस्ते स्वच्छता, जागोजागी कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी रोगराई ह्यावर आळा बसला आहे, तरीही सोलापूर ग्रामीण भागात कचरा निर्मूलन करणे व काही अविकसित भागात कचरा व्यवस्थापनाची अत्यंत आवश्यकता आहे.

शहराची सुरक्षितता या अंतर्गत बऱ्याच ठिकाणी अव्याहत चाललेली गुंडगिरी, बेरोजगार तरूण वर्ग, रिक्षा चालकांची अरेरावी, ह्या सगळ्या गोष्टींचा सामन्य जनतेला प्रचंड त्रास होतो आहे. हाच बेरोजगार तरुण वर्ग जागोजागी, रात्रीअपरात्री बिनधास्त रिक्षा व तत्सम रेकॉर्डवर मोठ्या आवाजात गाणी वाजवत असतात व असे सगळे अव्याहतपक्षे चालू आहे. ह्यावर आळा बसेल अशी उपाययोजना करायला हवी.

### स्मार्ट शाळा (E learning school)-

महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पात शहरात स्मार्ट शाळा उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मुलांना E learning मुळे गणित, विज्ञान व भाषा हे विषय शिक्षकांना समजावून सांगणे सोपे जात आहे. शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी या योजनेचा हातभार लागात आहे.

सोलापूरमध्ये खढ क्णइ झीक्षशलीं ह्या अंतर्गत काही ठोस योजना उपलब्ध होणार आहेत, ज्यामुळे तरुणांना रोजगार, आर्थिक, शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

असेच सोलापूर जिल्ह्याचा सर्वोत्कृष्ट विकास होवो, हीच सिध्देश्वर चरणी प्रार्थना...

# ध्येयवेड्या दिलीपशेठ गांधींचे १५० कोटींचे उद्योगविश्व!






## तरुण वयातच पेलली व्यवसायाची धुरा : शून्यातून उभारले दर्शना सॉल्व्हेंट्सचे साम्राज्य

प्रभाकर क्षीरसागर
वैराग

कठोर परिश्रम, अढळ जिद्द आणि व्यवसायाची उपजत आवड असेल, तर कोणत्याही मोठ्या पदवीची अधिकृतता नसतानाही यशाचे उत्तुंग शिखर गाठता येते, याचे जिवंत आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे बार्शी (जि. सोलापूर) तालुक्यातील वैराग गावचे सुपुत्र उद्योजक दिलीपशेठ शांतीलाल गांधी. तरुण वयातच कौटुंबिक जबाबदारी खांद्यावर घेत, शून्यातून विश्व निर्माण करत त्यांनी बार्शी येथे तब्बल १५० कोटींचा भव्य सोयाबीन प्रक्रिया उद्योग (दर्शना सॉल्व्हेंट एस प्रा. लि.) उभारला आहे. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाने आज यशाची पाच वर्षे यशस्वीरीत्या पूर्ण केली असून, सुमारे २,००० पेक्षा अधिक बेरोजगारांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून दिला आहे. बार्शीच्या औद्योगिक क्रांतीतील हा एक मैलचा दगड मानला जातो.

**दिलीपशेठ यांची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि व्यवसायाचे बाळकडू–**

दिलीपशेठ गांधी यांचा जन्म १० ऑक्टोबर १९६० रोजी शांतीलाल नेमचंद गांधी व सुवर्णलता गांधी यांच्या पोटी वैराग येथे झाला. वडील शांतीलाल यांनी वैराग भागात अन्नधान्य खरेदी–विक्री आणि एक छोटा तेल निर्मिती उद्योग सुरू केला होता. लहानपणापासूनच दिलीपशेठ यांना वडिलांच्या आणि बंधूंच्या (स्व. अनिल व स्व. शिरीष) सोबतीने व्यवसायाचे बाळकडू मिळाले.

अतिशय तरुण वयातच त्यांच्यावर कौटुंबिक व्यवसायाची मोठी जबाबदारी आली. ही जबाबदारी त्यांनी आनंदाने आणि खंबीरपणे स्वीकारली. त्यामुळे त्यांना पुढे औपचारिक उच्च शिक्षण घेता आले नाही, तरी व्यवहाराचे आणि उद्योजकतेचे मोठे धडे त्यांनी प्रत्यक्ष कामातून घेतले. स्वतःला पूर्णवेळ कौटुंबिक व्यवसायात झोकून दिल्यानंतर, १९७९ मध्ये व्यवसायाच्या विस्तारासाठी हे कुटुंब बार्शी येथे आले आणि तरुण दिलीपशेठ गांधी यांच्या खांद्यावर संपूर्ण व्यवसायाची धुरा सोपवण्यात आली.

**कष्टाची वर्षे आणि महाप्रकल्पाचा संकल्पः–**

सुरुवातीला त्यांनी वनस्पती तेल निर्मिती व्यवसायात पाऊल ठेवले. बाजारपेठेतून शेंगदाणा, सूर्यफूल, करडी, तीळ आदी कच्चा माल खरेदी करून वैराग व बार्शी येथील कारखान्यातून तेल काढायचे आणि ते मुंबई, पुणे, कोल्हापूर येथील मोठ्या तेल कंपन्यांना पुरवायचे, असा त्यांचा व्यवसाय होता. तब्बल ४० वर्षांहून अधिक काळ गांधी परिवार तेल कंपन्यांना कच्चा माल पुरवत आहे.

वैराग येथील बैलावर आणि इंजिनावर चालणाऱ्या छोट्या तेलघाण्यापासून सुरु झालेला हा प्रवास एका जागतिक दर्जाच्या कारखान्यापर्यंत न्यावा, हे दिलीपशेठ यांचे स्वप्न होते.

काही आर्थिक अडचणींमुळे २० वर्षे हा संकल्प रेंगाळला होता; परंतु बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन ॲड. रणवीर राऊत व व्यापारी बांधवांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी स्वतःचा कारखाना काढण्याचा निश्चय केला.

आमदार राऊत यांनी केंद्रीय सूक्ष्म व अवजड उद्योगमंत्री नारायण राणे यांच्यासोबत दिल्ली येथे विशेष बैठक घडवून आणत या उद्योगासाठी मोलाचे सहकार्य केले. तुळजापूर रोडवरील कदम वस्ती येथील स्वतःच्या १० एकर जागेत हा भव्य प्रकल्प साकार झाला.

**दर्शना सॉल्व्हेंट एस प्रा. लि. प्रकल्पाची वैशिष्ट्ये एका नजरेत....**

**प्रकल्पाचे नाव–** दर्शना सॉल्व्हेंट एस प्रा. लि. (बार्शी सोयाबीन प्रक्रिया उद्योग)

**अत्याधुनिक मशिनरी–** जर्मनी, जपान, बेंगलोर, राजकोट आणि अमृतसर येथून आयात

**उत्पादन क्षमता–** दररोज ५०० मेट्रीक टन सोयाबीन प्रक्रिया (१०० मेट्रीक टन रिफाइंड तेल निर्मिती)

**साठवणूक क्षमता–** ३ लाख कट्टे आणि ४५० टँकर तेल साठवणूक करण्याची अफाट क्षमता

**पाण्याची सोय–** दररोज ३ लाख लिटर पाणी (२ विहिरी व ३ बोअरवेल्स)

**पॅकेजिंग आणि उपपदार्थ–** हे दर्जेदार तेल १५ किलो, १० किलो, ५ किलो, १ किलो व अर्धा किलो अशा विविध आकर्षक पॅकिंगमध्ये बाजारात उपलब्ध आहे. तसेच तेल काढल्यानंतर उरलेल्या सोयाबीनचा वापर पोल्ट्री आणि पशुखाद्यासाठी केला जातो.

आज २०२६ पर्यंत या कारखान्याने विस्तार करत सोया दूध, पनीर, सोया वडी आणि सोया आटा यांसारखे उच्च दर्जाचे उपपदार्थ बाजारपेठेत उपलब्ध करण्याचे भविष्यात नियोजन आहे.

**शेतकरी आणि बेरोजगारांसाठी ठरला संजीवनी!**

या कारखान्यामुळे बार्शी व परिसरातील ग्रामीण अर्थकारणाला मोठी गती मिळाली आहे.

**थेट खरेदी:** शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी थेट कारखाना स्थळावरच केली जाते.

**जादा दर:** बाजारभावापेक्षा प्रति क्विंटलला १०० रुपये जादा दर दिला जातो.

**झटपट पेमेंट:** शेतकऱ्यांचे बिल कारखाना स्थळावरच कोणत्याही विलंबाशिवाय ताबडतोब अदा केले जाते. यामुळे मध्यस्थांची साखळी तुटली असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

**ग्रामीण शिक्षणासाठी टाकलेलं क्रांतीकारी पाऊल–**

स्वतःला लवकर जबाबदारी स्वीकारावी लागल्यामुळे जास्त शिक्षण घेता आले नाही, याची जाणीव दिलीपशेठ यांना होती. म्हणूनच, ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोरगरीब कुटुंबातील लेकरांना आणि खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे व दर्जेदार शिक्षण आपल्याच परिसरात मिळावे, या उदात्त हेतूने त्यांनी सुवर्णशांती बहुउद्देशीय मंडळ संचलित सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैरागची स्थापना केली.

या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. वैराग परिसरातील तब्बल ५७ ते ५८ खेड्यांमधील हजारो विद्यार्थी आज येथे सोयीस्करपणे उच्च शिक्षण घेत आहेत. पूर्वी या भागात बी.ए., एम.कॉम. किंवा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या (धउचजण) शिक्षणाची कोणतीही सोय नव्हती, ती दिलीपशेठ गांधी यांनी उपलब्ध करून दिली. आज या महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेले अनेक ग्रामीण विद्यार्थी विविध प्रशासकीय आणि उच्च पदांवर यशस्वीरीत्या कार्यरत आहेत.

**सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्य–**

दिलीपशेठ गांधी हे केवळ एक यशस्वी उद्योजक आणि शिक्षणप्रेमी नसून एक दूरदृष्टी असलेले समाजसेवकही आहेत. ते सध्या दि बार्शी मर्चंट्स असोसिएशन लिमिटेडचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय, दिगंबर जैन समाज ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. धार्मिक स्वभावाच्या दिलीपशेठ यांनी अनेक व्यापारी बांधवांना व सहकाऱ्यांना शिखरजी, अमृतसर, चारधाम यात्रा, वैष्णोदेवी माताजी, वाघा बॉर्डर आदी धार्मिक व पर्यटनाची सफर घडवून आणली आहे.

**भक्कम कौटुंबिक साथ आणि विस्तार–**

दिलीपशेठ गांधी यांच्या या यशामागे त्यांच्या संपूर्ण परिवाराचा वाटा आहे. त्यांना व्यवसायात त्यांचे पुतणे शीतल शिरीष गांधी, सोलापूरचे सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सिद्धांत शिरीष गांधी आणि पुतणी सौ. सोनल शीतल दोशी (बारामती) यांचे नवनवीन कल्पक मार्गदर्शनाचे सहकार्य लाभते. तसेच पत्नी सौ. सविता गांधी यांची त्यांना मोलाची साथ लाभली. त्यांच्या दोन्ही मुली सुशिक्षित असून दर्शना (पती: प्रज्वल फडे, प्रसिद्ध व्यापारी, पंढरपूर) आणि कल्याणी (पती: डॉ. नवीन पाटील, यवतमाळ) या आपल्या संसारात स्थिरावल्या आहेत.

गांधी परिवाराची वैराग, कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, मोडनिंब, अमरावती, करमाळा, उस्मानाबाद, लातूर व सोलापूर येथेही धान्य खरेदी–विक्रीची आडत दुकाने असून दर्शना दाळ मिलच्या माध्यमातून त्यांची मोठी उलाढाल आहे.

**२०२१ चा ऐतिहासिक शुभारंभ आणि २०२६ मधील यशस्वी वाटचाल –**

१४ डिसेंबर २०२१ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रकल्पाचे भव्य उद्घाटन झाले होते.

आज २०२६ मध्ये, या कारखान्याला यशस्वीरीत्या ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ५ वर्षांत दर्शना सॉल्व्हेंट्सने शुद्धता आणि विश्वासाच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रातील खाद्यतेल बाजारपेठेत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. अवघ्या १० महिन्यांत उभा राहिलेला हा प्रकल्प आज बार्शीच्याच नव्हे, तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाचा मैलचा दगड ठरला आहे

**थोडक्यात सांगायचे तर...**

मोठ्या पदव्यांपेक्षा कर्तृत्व मोठे असते! लहान वयातच जबाबदारीचे भान ठेवून, स्वप्न बघण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट करण्याची तयारी असेल, तर एखादी व्यक्ती १५० कोटींचे उद्योगसाम्राज्य उभे करू शकते आणि सोबतच हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांचे भविष्यही प्रकाशमान करू शकते, हे दिलीपशेठ शांतीलाल गांधी यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! (शब्दांकन)



# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अलौकीक कार्य




## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्या स्वामी कार्यावरील दृष्टिक्षेप...

**स्वामींचे भक्त संपूर्ण भारतभरातून अक्कलकोट येथे दर्शनासाठी येतात. काळानुरूप भक्त मंडळींच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे. १९८८ पासून आज पर्यंत स्वामी समर्थांच्या अन्नछत्र मंडळात अनेक वैशिष्टयपूर्ण बदल घडले आहेत. पण या सर्व भक्तमंडळींना अन्नपूर्णे सदा पूर्णे शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती या श्लोकाची प्रचिती अन्नपूर्णाच्या रूपात देत, स्वामींच्या कृपा प्रसादाचा लाभ मिळवून दिला आणि अन्नदानाच्या या महाचळवळीचा पाया रचला तो श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने. १९८८ पासून अतिशय पुण्याचं पण तेवढंच आव्हानात्मक व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे काम अक्कलकोट संस्थानच्या राजघराण्याचा वारसा लाभलेले संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे.**



शामराव मोरे
अक्कलकोट

वास्तविक, अक्कलकोट संस्थानच्या भोसले घराण्यावर श्री स्वामी समर्थ महाराजांची खास मर्जी होती आणि असीम कृपा होती. श्री स्वामी समर्थांच्या समकालीन त्यावेळेस श्रीमंत मालोजीराजे दुसरे हे गादीवर होते ते निस्सीम स्वामीभक्त होते. स्वामी भक्तीची परंपरा नंतरच्या काळात राजघराण्यात रुजत गेली आणि या राजघराण्याचा वारसा लाभलेले सन्मा. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांचे करवी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून परगांवच्या स्वामी भक्तांसाठी अन्नदान हे सर्वश्रेष्ठ असे स्वामी कार्य श्री स्वामी समर्थांनी सुरु केले. स्वामी सेवेचा ध्यास आणि अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी या उद्देशाने, गुरूपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सन १९८८ मध्ये सन्माननिय श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प. पू. श्री. मोहन पुजारी आणि आपल्या इतर सहकार्यांच्या सहयोगाने, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या धर्मादाय न्यासाची मुहूर्तमेढ रोवली. अन्नछत्राच्या उभारणी वेळी संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रथमतः ३ किलो तांदळाचा प्रसाद स्वामींना महानैवेद्य म्हणून दाखवला, भाविकांना महाप्रसाद दिला आणि अन्नछत्र मंडळाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या धर्मादाय संस्थेचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यानंतर, सार्वजनिक धर्मादाय न्यास अस्तित्वात आले.

कै. अंबुबाई सरदेशमुख या मात–ोश्रींनी उदार अंत:करणाने वटवृक्ष मंदिराच्या उत्तर महाव्दारालगत स्वतःच्या जागेत अन्नछत्र सुरू करण्यास परवानगी दिली. सुरवातीला अगदी लहान स्वरूपात हे कार्य सुरू होते. पण दिवसेंदिवस स्वामी भक्तांची वाढणारी गर्दी लक्षात घेता, या धर्मादाय न्यासाने देवस्थानच्या दक्षिण बाजूस कै. वीरभद्र कोळ्ळे यांच्या मालकीच्या जागेची रीतसर खरेदी करून, त्या जागेवर नियोजनपूर्वक मोठे पत्राशेड उभारून सन १९९४ मध्ये अन्नछत्राचा कार्य विस्तार केला. सध्याचे अन्नछत्र हे प्रशस्त आणि वातानुकूलित आहे. अनेक स्वामी भक्तांनी या पुण्यकार्यात सढळ हस्ते देणग्या दिल्या. देणग्यांचा ओघ ही वाढला आणि आजही तो सुरु आहे. सुरवातीच्या काळात एस.टी.महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सढळ हाताने मदत करून या कार्यास हातभार लावला. तसेच सोलापूरचे कै. बाळासाहेब शिंदे व कै. शिवाजीराव पिसे महाराज यांनी या कार्यासाठी खंबीर साथ दिली. त्याचप्रमाणे ॲड. सुरेशचंद्र भोसले, पुणे आणि सन्मा. ॲड. नितीनजी हबीब यांनी या स्वामी कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत मोलाची साथ दिली आहे.

स्वामी भक्तांचे व शहरवासी यांचे श्रध्देचे स्थान असलेल्या शमी विघ्नेश गणेशाची स्थापना १९९२ साली यात्रीभुवनसमोर शमीच्या विशाल वृक्षाखाली करून सुंदर असे मंदिर त्या ठिकाणी उभारलेले आहे. या गणेशाची नित्योपचार व पूजा होत असून येथे श्री गणेश जयंती व श्री गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सर्व स्वामी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने, अन्नछत्र मंडळाचे कार्य आजतागायत अविरतपणे सुरू आहे.

आजमितीस श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दररोज दोन्ही वेळेस १५ ते २० हजारांवर स्वामीभक्त, महाप्रसादाचा लाभ घेऊन तृप्त होतात. उत्तम नियोजन, भक्तांच्या गर्दीचे सुयोग्य व्यवस्थापन, महाप्रसादासाठी गुणवत्तापूर्ण अन्नधान्याचा व भाजीपाल्याचा वापर करण्याची दक्षता घेतली जाते तसेच सर्व गुणवत्ता मानकांची काळजीपूर्वक अंमलबजावणी ही केली जाते. तसेच वॉटर सॉफ्टनरच्या माध्यमातून भक्तांना क्षार विरहित व आर.ओ.चे पिण्याचे पाणी दिले जाते. दररोज केल्या जाणाऱ्या महाप्रसादात पोळी, मसालेभात, शिरा किंवा गव्हाची खीर, सांजा, आमटी, बटाटा– वांगी – काकडी भाजी, पालेभाज्या, पापड तर रात्री साधाभात,पोळी,भाजी,आमटी असे प्रसादाचे स्वरूप असते. एकादशीच्या दिवशी साबुदाणा खिचडी, दही, भगर, आमटी, खजूर, केळी असे उपवासाचे पदार्थ असतात. दररोज सकाळी ठीक ११.३० वा. मंदिरात अतिथी व मान्यवर देणगीदारांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य दाखवून, अन्नछत्रात महाआरती व संकल्प पार पडतात. यानंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद दिला जातो. यासाठी अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांची प्रमाणपत्र आयएसओ मूल्यांकन प्रमाणपत्र व भारत सरकारचे भोग प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. येथे सुमारे ३०० सेवेकरी असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालतो. परगावच्या स्वामी भक्तांच्या निवासाच्या दृष्टीने यात्री निवास, यात्री भुवन, अतिथी निवास, गणेश मंदिर यात्री थांबा व यात्रीनिवारा या निवासी इमारती बांधल्या असून यामध्ये स्वामी भक्तांना सोयी सुविधा देऊ केल्या आहेत .यात्री निवास ही भव्य इमारत २००३ पासून स्वामी भक्तांच्या सेवेत रुजू झालेली आहे या इमारतीमध्ये मिनी हॉलसह कॉमन ६६ खोल्या असून १४ मोठे हॉल आहेत. पैकी दहा हॉलमध्ये बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये सुमारे २००० भक्त निवासाला थांबू शकतील इतकी क्षमता आहे. यात्री भुवन या इमारतीत नॉन एसी सुट आणि एसी सुट तसेच डीलक्स एसी सुटस आहेत. सदर इमारतीत सुमारे ५०० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे गणेश मंदिर यात्री थांबा या इमारतीत एकूण बारा एसी सुट असून सुमारे ५० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे.

अतिथी निवास ही इमारत सुद्धा एसी असून येथे सुद्धा ५० भक्त विश्रांतीस राहू शकतील इतकी क्षमता आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र पलंग व्यवस्था सुरू असून याची क्षमता ६१ इतकी आहे. या सर्व इमारतीत लिफ्ट यंत्रणा कार्यान्वित असून अग्निशमन यंत्रणा सुद्धा बसविलेली आहे. सद्यस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात प्रशस्त आणि भव्य असे ८ एकरातील वाहनतळ, वाहनतळ शेड तसेच २९० के.वी. क्षमतेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित आहे.

अन्नछत्रामध्ये संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी स्वतः पुढाकार घेऊन सागवानी व उत्तम कलाकुसर केलेला असा स्वामींचा रथ केला असून हा रथ प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी वेळेस ७ दिवस पहाटे वेळेस शहरातून नगर प्रदक्षिणेस निघत असतो. भोसले घराण्याशी असलेले जुना ऋणानुबंध



जपत भारतरत्न, गानसम्राज्ञी, आदरणीय लतादीदी मंगेशकर यांनी त्यांच्या वापरात असलेली दोन वाहने भेट म्हणून देऊ केलेली आहेत. न्यासाने मंडळाच्या परिसरामध्ये ती वाहने जतन करून ठेवलेली आपल्याला पाहायला मिळतात.

महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास दर्शन घडवणारे शिव चरित्र, धातुशिल्प प्रदर्शन भक्तांना पाहण्यासाठी उभारण्यात आले आहे. भारतरत्न गानसमाज्ञी आदरणीय लतादिदी मंगेशकर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी या न्यासास लाभलेले आहे. गडकिल्ले सृष्टी ही त्यांच्याच संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. अतिथी निवासाजवळ स्वामींची महती भक्तांना कळण्यासाठी श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र भित्ती शिल्प साकारण्यात आले आहे. अतिशय निसर्गरम्य वातावरणात सुशोभित आणि हिरवळीने नटलेल्या या आवारात श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्यान सर्वांचेच लक्ष वेधून घेतात.

न्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रतिवर्षी भव्य प्रमाणात आयोजित करण्यात येणारे गुरुपौर्णिमा आणि वर्धापन दिन हा महोत्सव. या १० दिवसिय धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रामधील दिग्गज प्रवचन– कीर्तनकार, गायक कलाकार आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजू करतात. त्याचप्रमाणे १९८८ पासून स्वामी दर्शनास, उत्सवास व कार्यक्रमाच्या निमित्त्य अन्नछत्रास वेळोवेळी सदिच्छा भेट देऊन व मार्गदर्शन करणाऱ्या



दिग्गज मंडळी, मान्यवर व सन्मा.देणगीदार यांनी न्यासाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने, प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवा, कर्नाटक या राज्यातील स्वामी भक्तांना या माध्यमातून स्वामींच्या दर्शनाचा लाभ अन्नछत्र मंडळाच्या वतीने देण्यात येतो. सन १९९८ पासून ही पालखी परिक्रमा अखंडितपणे सुरू आहे.

**अन्नदानाच्या या पवित्र कार्याबरोबरच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र**



**मंडळ न्यासाच्यावतीने अनेक सामाजिक कार्यांना हातभार लावला गेला आहे आणि या माध्यमातून लोकाभिमुख अशा कामांना, कायमच प्राधान्य दिले जाते. त्या समाजोपयोगी कार्याचा हा आढावा:–**

१९९३ च्या किल्लारीच्या महाविनाशकारी भुकंपाच्या वेळेस या न्यासाने सलग महिना दररोज ट्रक भरून अन्नवाटप केलेले आहे.

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत या न्यासाने अक्कलकोट शहर विकास कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वमालकीच्या जमिनीपैकी ४ १/२ एकर जागा मुस्लीम कब्रस्तानास, ३ एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी आणि ११/२ एकर जागा बाह्यवळण रस्त्यास तसेच भक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाकरीता मुस्लिम कब्रस्तानाजवळ स्वमालकीची जागा नगरपरिषदेस दिली आहे .

८ कि.मी. अंतरावर असलेल्या गळोरगी येथील स्वमालकीच्या विहीरीतून ५ कोटी खर्चून अन्नछत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना केली आहे, तसेच वटवृक्ष देवस्थानाससुध्दा पाणी देऊ केले आहे.

२०१४ मध्ये उद्भवलेल्या तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये अन्नछत्र मंडळाच्या वतीने, गळोरगी येथील स्व–मालकीच्या विहिरीतून पाईप लाईनव्दारे पाणी आणून सलग बारा महिने दररोज १२ लाख ५० हजार लिटर पाणी अक्कलकोट नगर परिषदेस देण्यात आले.

हे न्यास भूकंपग्रस, जळीतग्रस्त , पूरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात पुढे करते तसेच गरिब व गरजवंताना शैक्षणिक व वैद्यकीय मदत करते.

ऑगस्ट २०१९ ला कोल्हापुर व सांगली तसेच डिसेंबर २०२१ ला चिपळूण येथील पुरग्रस्तांना तातडीने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य शिधा वाटप करून, आपलं योगदान दिले आहे.

सर्व सण ,उत्सव व इलेक्शन ड्युटीस कार्यरत असणारे सर्व शासकीय कर्मचारी व पोलीस बांधवांच्या भोजनाची व्यवस्था सुद्धा न्यासाकडून केली जाते. पोलिओ लसीकरणाचे वेळेस शहरातील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना भोजन व्यवस्था केली जाते. शासनाचे उपक्रमास हे न्यास सर्वोतोपरी सहकार्य करते.

राज्य परिवहन मंडळाच्या बाहेर गावाहून मुक्कामी येणाऱ्या सुमारे ५० ते ६० बसेसच्या चालक व वाहकांना सुद्धा अद्ययावत असे विश्रांती कक्ष व वाहनतळ न्यासाकडून या परिसरामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे.

आतापर्यंत प्रति महिन्याची पौर्णिमा व मंडळास साजरा केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उत्सवा प्रसंगी २०१४ पासून सुमारे २५,००० पेक्षाही जास्त रात्क्दात्यांकडून रक्त संकलन केले आणि खऱ्या अर्थाने रक्तदानाची चळवळ अक्कलकोट तालुक्यात रुजविली.

(पान नं ५ वर)

## एक दृष्टिक्षेप– नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर...

नियोजित ५ मजली महाप्रसादगृहाची इमारत ही भव्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित् असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, एकूण ५ हजार भाविकांसाठी प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाले असुन ही सुसज्ज इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा अंदाजे खर्च रुपये ७२ कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि या नियोजित भव्य ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सदर नियोजित भव्य अशा ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे भूमिपूजन दि.२१ जुलै २०२४, रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री व सद्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते संपन्न झाले आहे. तसेच दि.१९ जुलै २०२६ रोजी ख्यातनाम गायिका उषाताई मंगेशकर यांचे हस्ते या महाप्रसाद्गृहालगत प्रशासकिय इमारत बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थांची कृपादृष्टी, स्वामी भक्तांचा स्वामींच्या रुपात मिळणारा आशीर्वाद आणि अन्नछत्रात अहोरात्र व अविरत परिश्रम करणारे, निस्वार्थी वृत्तीने सेवा करणारे असंख्य सेवेकरी व कार्यकर्ते त्यांचे परिश्रम व विनम्रता यावरच अन्नछत्राची शून्यातून निर्मिती होऊन इवल्याशा रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे.



# लोकमान्य टिळक अन् सोलापुरकरांमधील जिव्हाळा

**भारतीय राष्ट्रवादाचे एक जनक, स्वातंत्र्य चळवळीचे एक प्रमुख शिल्पकार, धैर्यमेरु लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे सोलापुरातील अनेक व्यक्तींबरोबर जिव्हाळ्याचे व घनिष्ट संबंध होते. टिळक अनेकवेळा सोलापुरात येऊन गेले. सोलापुरातील वकील, डॉक्टर्स, पत्रकार, व्यापारी सामान्य जनता टिळकांच्या जाज्वल्य देशभक्तीमुळे त्यांच्यातील नेतृत्वगुणांमुळे व निस्सिम, त्यागीवृत्तीमुळे भारावून गेलेली होती. हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन, जगन्नाथ मोरेश्वर सामंत वकील, 'स्वराज्य' साप्ताहिकाचे संपादक बळवंत शंकर लिमये, कर्मयोगी साप्ताहिकाचे संपादक रामभाऊ राजवाडे, जगन्नाथ (मास्तर) परदेशी, पहाडी आवाजात वंदेमातरम म्हणणारे श्रीनिवास काडगावकर हे लो. टिळकांचे भक्त होते. बंडप्पा काडादी, शेठ गुलाबचंद हिराचंद, रावसाहेब निंबर्गीकर, बंकटलाल सोनी आदी प्रमुख व्यापारी लोकमान्य टिळकांचे चाहते व अनुयायी होते. पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांना तर टिळक जीवलग मित्रच मानत होते.**





प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर
भ्र. ९४२०३५७२७०

सोलापूर नगरपालिकेने केलेल्या कर वाढीविरुध्द सोलापुरात आंदोलन करण्याचे आण्णाराव वजीरकर, मल्लिकार्जुन पसारे आदी मंडळांनी ठरविले होते. त्यासाठी लो. टिळकांना आमंत्रित केले गेले. या करवाढीच्या निषेधार्थ बाळीवेशीजवळील मल्लिकार्जुन मंदीराजवळ २५ ऑक्टोंबर १८८१ रोजी लो. टिळकांची जंगी सभा झाली. या सभेत लो. टिळकांनी नगरपालिकेच्या अंदाजपत्रकाची छाननी करुन काटकसरीने कारभार केल्यास आणि अनावश्यक खर्च टाळल्यास करवाढीची आवश्यकता नसल्याचे सप्रमाण दाखवून दिले. परिणामी सोलापूर नगरपालिकेस करवाढ रद्द करावी लागली.

सन १८९०-९१ मध्ये संमती बिलाच्या विरुध्द भाषण करण्यास आप्पासाहेब वारदांनी टिळकांना सोलापुरात बोलाविले होते. १८९६ साली टिळकांनी व वारदांनी सोलापूर जिल्हयातील दुष्काळ निवारणाची सहकारी पध्दतीची योजना ब्रिटीश सरकारपुढे मंजुरीसाठी ठेवली होती. पण सरकारने काहीही सहकार्य करण्यास व जबाबदारी घेण्यास नकार दिल्यामुळे ही योजना फलद्रुप झाली नाही.

सन १८९७ साली 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे' या केसरीतील दोन अग्रलेखांबद्दल टिळकांवर ज्यावेळेस पहिला राजद्रोहाचा खटला भरण्यात आला होता. त्यावेळेस आप्पासाहेब वारदांनी सोलापुरातील एक श्रीमंत गृहस्थ मल्लिकार्जुनअप्पा पसारे यांचे पुण्यातील मेहुणे व एक सधन व्यापारी उरवणे शेठ यांचा लो. टिळकांना जामीन मिळवून दिलेला होता. स्वदेशीच्या प्रचारार्थ कापड गिरण्या काढण्याचे आवाहन त्यांनी अनेकांना केले होते. त्यानुसार आप्पासाहेब वारदांनी राजाबहादूर ग्यानगिरजी यांच्या सहकार्याने कापड गिरणी सोलापुरात सुरु केली. सुरुवातीला ती वारद मिल म्हणून आणि पुढे नरसिंग गिरजी मिल म्हणून ओळखली जात होती. बंडप्पा काडादी यांनी १९१० साली विजापुरात जिनिंग फॅक्टरी सुरु केली. अशाप्रकारे टिळक हे सोलापुरातील व सोलापूर बाहेरील कापड उद्योगाचे प्रेरणास्रोत होते. लो. टिळकांच्या पैसा फंडास व त्यांच्या चळवळीस वारदांनी भरभरुन आर्थिक मदत दिली होती. टिळक १९०८ साली तळेगावच्या राष्ट्रीय विद्यालयाकरीता निधी जमवण्यासाठी सोलापुरात आले असताना वारदांनी ४१०० रुपयांची देणगी दिली होती. त्याकाळात सोलापुरकरांनी एकूण १९००० रुपये गोळा करुन टिळकांना दिलेले होते. सोलापुरातल्या श्रध्दानंद समाजाच्या आजोबा गणपतीच्या उत्सवातही लो. टिळक सहभागी झाले होते. टिळक ज्या ज्या वेळी सोलापुरात यायचे त्या त्या वेळेस त्यांचा मुक्काम वारदांच्या घरीच असायचा आणि ज्यावेळी वारद पुण्यास उन्हाळ्यात सिंहगडावर हवापालट करण्यास जात होते त्यावेळी बऱ्याचदा ते लो. टिळकांसोबत रहात होते. १९ जानेवारी १९११ रोजी आप्पासाहेब वारदांचे निधन झाले आणि त्यांच्या निधनाची बातमी जेव्हा लो. टिळकांना मंडालेच्या तुरुंगात असताना समजली तेव्हा त्यादिवशी त्यांनी अन्नग्रहण केले नव्हते. एवढा जिव्हाळा आप्पासाहेब वारद व टिळकांमध्ये होता. टिळकांनी वारदांचे कार्यकर्तृत्व आणि नावलौकिक पाहून त्यांचा एका पत्रात पुण्यश्लोक असा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला होता. सोलापुरातून प्रसिध्द होणाऱ्या स्वराज्य साप्ताहिकाचे संपादक बळवंत शंकर लिमये यांना १९०७ साली सुरतेच्या राष्ट्रीय सभेत जहाल व मवाळ यांच्या गटात झालेल्या हाणामारीच्या प्रसंगी लो. टिळकांचे शरीर संरक्षक होण्याचा मान मिळाला होता. १९०८ साली टिळक सोलापुरात आले असताना त्यांचे खाजगी सचिव म्हणून लिमये यांनी काम केले होते. १९०८ साली लो. टिळकांनी राजद्रोहाच्या खटल्यात ६ वर्षाची शिक्षा न्यायालयाने ठोठावल्याबद्दल जगन्नाथ मोरेश्वर सामंत वकिलांनी त्या निर्णयावर प्रखर टिका केली होती त्याबद्दल सामंतांनी माफी मागावी अशी न्यायालयाची अपेक्षा असताना त्यांनी ती धुडकावून लावली त्याबद्दल त्यांची वकिलीची सनद सहा महिन्यांसाठी तहकूब ठेवण्यात आली होती.

पंढरपुर येथे १६ नोव्हेंबर १९०७ रोजी चंद्रभागेच्या वाळवंटात सुमारे १५ हजार लोकांसमोर स्वदेशी या विषयावर लो. टिळकांचे भाषण झाले होते. या भाषणात त्यांनी आपल्याजवळ शस्त्रे नाहीत पण स्वदेशी व्रताचे अवलंबन हा एकच उपाय आहे. स्वदेशी व्रताबद्दल शपथ घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित जनसमुदायाला केले. २८ फेब्रुवारी १९०८ रोजी लो. टिळकांचे श्री. सिध्देश्वर मंदीराच्यासमोरील मंडपात 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. या भाषणात लोकमान्य म्हणाले की शिक्षण मिळाल्यावर विद्यार्थ्यांमध्ये पोट भरण्याची ताकद आली पाहिजे. हे सर्व शिक्षण मुलांना सुलभरीतीने देता येईल अशी तजवीज केली पाहिजे. मुलांना देशस्थितीचे ज्ञान वयाच्या पंधराव्या वर्षापासून झाले पाहिजे. देश खाली चाललेला वर उचलण्याची ताकद व धैर्य, जोम यावा याकरीता राष्ट्रीय शाळा पाहिजेत. अशा गोष्टींचा समावेश ज्या शिक्षणात होतो ते राष्ट्रीय शिक्षण होय. शिक्षणक्रमातील दोष काढण्यासाठी शिक्षणक्रम सरकारच्या दडपणातून मुक्त करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणसंस्था काढणे जरुरीचे आहे ही लो. टिळकांची अपेक्षा आजसुध्दा सरकारकडून पूर्ण झालेली नाही. याचदिवशी लो. टिळकांचे 'स्वदेशी संस्था' या विषयावर तर २९ फेब्रुवारीस 'लष्करात सद्यस्थिती' या विषयावर सोलापुरात व्याख्यान झाले. टिळकांची बार्शी आणि पंढरपूर येथेही भाषणे झालेली होती. टिळकांची जनआंदोलनाशिवाय व संघटित चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही अशी ठाम धारणा झालेली होती. होमरुल चळवळीस नेमस्तांचा विरोध होता. लोकही होमरुलच्या विरोधात आहेत असा समज नेमस्तांनी करुन घेतला होता. त्यांनी तसा प्रचारही सुरु केला होता म्हणून हा प्रचार खोडून काढण्यासाठी १९२० साली सोलापुरात प्रांतिक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस साहित्य सम्राट न. चिं. केळकर, ल.ब. भोपटकर, गंगाधर देशपांडे अशी दिग्गज मंडळी उपस्थित होती. समारोपास लो. टिळक हजर होते. त्यांची लोकांनी सजविलेल्या रथातून मिरवणूक काढली. नेमस्तांनी ही परिषद उधळण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा हा डाव सफल झाला नाही. या परिषदेतून लढाऊ व आक्रमक राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. यातून भाई एम.डी. विभुते, डॉ. भाऊकाका अंत्रोळीकर, देशभक्त तुळशीदास जाधव, भाई छन्नुसिंग चंदेले असे लढाऊ नेते पुढे आले. या परिषदेच्यावेळी लो. टिळकांचा ढोर तसेच चांभार समाजाने त्यांच्या गल्लीत सत्कार केला. त्या प्रसंगी टिळकांनी मार्गदर्शनपर भाषणही केले. लोकमान्य टिळकांच्या प्रभावामुळे हुतात्मा अब्दुल रसुल कुर्बान हुसेन यांनी १९२७ साली सुरु केलेल्या आपल्या साप्ताहिकाचे नाव 'गजनफर' म्हणजे केसरी किंवा सिंह असे ठेवले होते. यावरुन त्यांच्यावर असलेला लो. टिळकांचा प्रभाव लक्षात येतो. या सर्व घटनांवरुन लो. टिळकांचा सोलापूरकरांवरील प्रभाव व सोलापूरकरांचे त्यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध होते हे स्पष्ट होते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अलौकीक कार्य

(पान नं ४ वरून) तसेच स्वामी भक्तांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधांनी युक्त अँब्युलन्स सेवा आणि फायर ब्रिगेडची व्यवस्था उपलब्ध आहे. दिव्यांग व वृद्ध लोकांना अन्नछत्र परीसरात ने आण करण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी व व्हीलचेअरची सोय केली आहे.

हे धर्मादाय न्यास शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमास नेहमी भरीव सहकार्य करीत असते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, क्रिडाविषयक व सांस्कृतिक उपक्रम सदैव राबवित असते. स्त्रिभृण हत्या, हुंडाबळी, महिला आरोग्य, वृक्षे लावा व जगवा, जल साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान इ. कार्याच्या माध्यमातून हे न्यास सदैव अग्रेसर आहे.

वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन या महत् कार्यात सोलापूर-अक्कलकोट रस्त्याच्या दुतर्फा, वडाची झाडे लावून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात आले. शहरातील चौकाचे सुशोभीकरण केले आहे. फत्तेसिंह मैदानावर बसण्यासाठी सुमारे ५० नग सिमेंट बाकडे बसविले असून वृक्षारोपण व संवर्धन करून नगरपालिकेच्या विकास कार्यात मोठे योगदान देऊ केले आहे. अक्कलकोट शहराच्या विकासामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मोलाची भूमिका बजावलेली आहे. न्यासाच्या १९८८ पासून अविरत सेवेमुळे अक्कलकोट शहरातील व लगतच्या भागातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे.

अन्नछत्राच्या चौकात पोलीस चौकी, तहसील कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय, या ठिकाणी कायमस्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० अन्नधान्य किटचे वाटप केले आहे. याच दरम्यान, अक्कलकोट येथील ग्रामीण भागात तसेच सोलापूर येथील गरजवंताना १२०० अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. कोविडच्या आणि लॉकडाऊनच्या काळात, अक्कलकोट शहरामध्ये दररोज सुमारे १००० गरीब लोकांना तीन महिने जेवण वाटप केले. एकूण ५२ दिवसात ५१,५०० लोकांना अन्नवाटप केले आहे. शहरात व ग्रामीण भागात सॅनिटायझर ची फवारणी वेळोवेळी केली.

यात्रीनिवास या निवासी इमारतीमध्ये शासनाचे कोविड सेंटर सुरू केले. तेथील पॉझिटिव्ह रुग्णांना दररोज चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण देण्याचे कार्य केले आहे. कोव्हिड सेंटरला स्थानिक प्रशासनाच्या मागणीनुसार ५० बेड, ५० गाद्या, ५० उशा व बेडशिटस देत व्यवस्था करण्यात आली तसेच ससून हॉस्पिटल पुणे येथे व्हेंटीलेटर देऊ केले आहे.

यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता, या उक्तीला सार्थ करत, स्त्री शक्ती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून हे न्यास उल्लेखनीय कार्य करीत आहे. हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था हे अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असून, ही संस्था सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, नवरात्री मध्ये तुळजाभवानी मंदिरात हजारो महिलांसमवेत कुंकुमअर्चन,



गणेशोत्सवात हजारो महिलांसमवेत गणेश अथर्वशिर्ष पठण इ. उपक्रम राबवित सखी महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेच्या अध्यक्षा सौ. अलकाताई जनमेजयराजे भोसले ह्या असून संस्थापक सचिवा- सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले ह्या आहेत.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष श्री.जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली दत्तजयंती २०२१ पासून समर्थ महाप्रसाद सेवा सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, अक्कलकोट शहरातील दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या जवळपास २६० गरीब, गरजवंत व निराधार लोकांना दैनंदिन दोन वेळेचे जेवण, डब्यातून घरपोच करण्याचे कार्य, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे हे न्यास गेली दोन वर्षापासून अक्कलकोट तालुक्यातील कुस्तीगीरांना दरमहा बदाम, काजू, आक्रोड, खारीक, साजूक तूप इ. पैलवानी खुराकाचे सुमारे ८६ कुस्तीगीरांना वाटप करीत आहे.

२०२१ मध्ये अन्नछत्रात अध्यक्षांचे कार्यालयालगत वटवृक्षाखाली असलेल्या जुन्या दत्त मंदिराची काळ्या पाषाणात उभारणी केली असून आतील सुंदर व देखणी दत्तमूर्ती जयपूरहून आणून स्थापित केली आहे.

अन्नछत्राच्या पूर्वेस समर्थ वाटिकेजवळ, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणाच्या मंदिराचे बांधकाम केले असुन प्रति तुळजाभवानी मंदिर उभारण्यात आले आहे. २०२४ पासून भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध झाले आहे.

ऑक्टोंबर २०२३ पासून सोलापूरच्या बी.सी. गर्ल्स हॉस्टेल मधील अनाथ १५० मुलींच्या भोजनासाठी दरमहा अन्नधान्य व खाद्यतेल पुरवठा केला जातो. जानेवारी २०२४ पासून तालुक्यातील ८६ कुस्तीगीरांना दरमहा तूप, खारीक, बदाम, अक्रोड इत्यादींचे खुराक वाटप सुरू केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत अन्नछत्र मंडळाने अक्कलकोट येथील मराठा मंदिर, मुंबई १३७ वर्षे जुने असलेल्या श्री शहाजी हायस्कूल मधील सर्व वर्ग खोल्यांचे व छताचे नुतनीकरण केले आहे. त्याचप्रमाणे जत येथील रामराव विद्यामंदिर येथे न्यासाचे वतीने ५ संगणक संच देण्यात आले आहेत. तसेच रत्नागिरी येथील मराठा मंदिर विद्यावर्धिनी यांचे अ.के.देसाई हायस्कूल व ग्लोबल इंग्लिश मिडियम स्कूलला शैक्षणिक साहित्यासाठी देणगी दिली आहे. विविध सामाजिक संस्थांना त्यांच्या लोकोपयोगी कार्यासाठी या न्यासाने आर्थिक मदत केली आहे. तसेच परगांवच्या स्वामी भक्तांच्या सोयीसाठी इलेक्ट्रिक चारचाकी वाहनांसाठी अन्नछत्राच्या वाहनतळ जागेवर टाटा पॉवर ई झेड चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध आहे.

या धर्मादाय न्यासाचे वतीने अन्नछत्र मंडळालगत असलेल्या गट नं. ५८१ या मोठ्या वाहनांसाठी असलेल्या वाहनतळ जागेवर अक्कलकोट येथील क्रिकेट शिकु इच्छिणाऱ्या मुला-मुलींसाठी अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमीचे काम पूर्ण झाले असून न्यासाचा ३९ वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा औचित्य साधून दि.२९ जुलै २०२६ बुधवार रोजी उद्घाटन होणार आहे.

तालुक्यातील कुस्तीगीरांना कुस्तीचे चांगले प्रशिक्षण मिळावे या साठी गट नं. ५८१ या जागेवर अमोलराजे जनमेजयराजे भोसले आंतराष्ट्रीय दर्जाचे मॅट/गादी व मातीवरील कुस्ती प्रशिक्षण केंद्र (ट्रेनींग ॲकॅडमी) उभारणी अल्पावधीतच सुरु होत आहे.

मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाला असून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी ओढा निर्माण होण्यासाठी तसेच मराठी भाषा संवर्धनासाठी या न्यासाचे वतीने भविष्यात चांगले योगदान असणार आहे. भविष्यात मराठी भाषा संवर्धनासाठी हे धर्मादाय न्यास भरीव असे कार्य करणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात हे न्यास देशी खेळास प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारणार आहे. तसेच अन्नछत्र मंडळ परिसरात भाविकांसाठी ध्यानधारणागृह व योग मंदिर त्याचप्रमाणे सांस्कृतिक भवन-मंगल कार्यालय उभारणार आहे.

न्यासाने जगभरातील स्वामी भक्तांच्या सोयीसाठी मंडळात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती www.swamiannachatra.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. न्यासास देणगी देणाऱ्या देणगीदारास आयकरात ८० ची कलमान्वये सवलत आहे. तसेच परदेशात स्थित स्वामीभक्तांना अन्नछत्राच्या स्वामी कार्यासाठी न्यासाच्या वेबसाईटवर जाऊन FCR ह्या अकाऊंटला देणगी देता येते.

स्वामी भक्तांचे सोयीसाठी आणि ऑनलाइन देणगी देणे सहज सुलभ व्हावे यासाठी न्यासाने क्यू आर कोड प्रणाली सुद्धा विकसित केलेली आहे. सद्या श्री अमोलराजे जनमेजयराजे भोसले हे या धर्मादाय न्यासाचे कार्यकारी अध्यक्षपदी असून ते सक्षमपणे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे हित आणि स्वामीभक्तांना स्वामीरुपात केंद्रस्थानी मानून कार्य करीत आहेत. त्यांनी अन्नछत्राच्या विकासास चालना दिली आहे, तसेच नियोजित महाप्रसादगृह इमारत बांधकामास गती प्राप्त करून दिली आहे.

श्री स्वामी समर्थांची आध्यात्मिक महती, त्यांचं कार्य, हे इतकं ओजस्वी आहे की, त्यांचे अनुयायी, भक्तगण यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे आणि भविष्यातही ही संख्या वाढतच राहणार. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन, सध्याच्या जुन्या महाप्रसाद गृहालगतच्या वाहनतळशेड, याठिकाणी भव्य नियोजित महाप्रसाद गृह साकारण्यात येणार असून नवीन तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला, अभ्यासपूर्ण आराखडा अन्नछत्र मंडळाच्यावतीने सादर करण्यात आला आहे.







# सोलापूरचे पर्यटन... आव्हानापासून समृद्धीकडे!







सोलापूर जिल्हा हा फक्त मंदिरांसाठी प्रसिद्ध नसून इतर ऐतिहासिक व भौगोलिक गोष्टींसाठी ही प्रसिद्ध आहे आणि त्यांचा वारसा या शहराला आणि जिल्ह्याला लाभला आहे. तसं पाहिलं तर अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर, पंढरपूर तसेच सिद्धेश्वर यांचे मंदिर भाविकांना नक्कीच आकर्षित करत असतात. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्हा हा रेल्वे, रस्ते, विमानसेवा आणि खासगी आणि सरकारी बसेस अशा विविध पद्धतीने जगाशी जोडला गेला आहे. याचा नक्कीच फायदा स्थानिक स्तरावर होत आहे.

सोलापूर शहरात आणि सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक नाविन्यपूर्ण राहण्याच्या सोयी म्हणजे हॉटेल-रेस्टॉरंट, लॉजिंग तसेच भक्ती निवास हे निर्माण होऊन भक्तगणांना आणि पर्यटनांना सोयी देत असतात. त्याचप्रमाणे सोलापूरचे खाद्य संस्कृती ही अतिशय उत्तम आहे. इथली शिंगा चटणीपासून कडक भाकरी आणि मांसाहारी पदार्थ इतके सुंदर रित्या बनवले जातात की, जिभेला चव विसरता येत नाही. काहीजण खास खाद्य संस्कृतीसाठी सोलापुरात येतात. याचा फायदा हॉटेल आणि रेस्टॉरंटला होत आहे. चविष्ट पदार्थाचा आनंद घेताना राहण्याची ही उत्तम सोयी निर्माण झाल्या आहेत. अगदी पंचतारांकित हॉटेलपासून साधे राहणीमान असलेले लॉजेस आपल्याला सहज पाहायला मिळतात. या सर्वांना पर्यटकांच्या सोयीसाठी वापरले जात आहे. यामुळे रोजगार निर्मिती होत आहे. काही कौशल्यपूर्ण कामगार वर्ग सर्व पर्यटकांना सोयी देत असतो, त्याचा नक्कीच फायदा कामगारांचे कुटुंब चालवण्यासाठी होत आहे, हा एक सकारात्मक भाग आहे.



ऋत्विज चव्हाण
भ्र.-८३८०८०००८३

आध्यात्मिक पर्यटना बरोबरच मेडिकल टुरिझम मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. आपल्या शहरातील आणि जिल्ह्यातील कौशल्यपूर्ण डॉक्टर यामुळे आजूबाजूचे लोक आणि रुग्ण शहराकडे आकर्षित होत आहेत. याचाही मेडिकल टुरिझम म्हणून फायदा शहराला आणि जिल्ह्याला होत आहे. त्याचप्रमाणे ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या शहरांमध्ये काही ऐतिहासिक अभ्यासात येऊन भेट देतात. अशातच ऐतिहासिक वस्तू आणि वास्तू तसेच भौगोलिक वैशिष्ट्यामुळे जिल्ह्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.



**सोलापूर जिल्हा हा सर्वांसाठी अध्यात्मिक पर्यटनाचे केंद्रबिंदू म्हणून प्रसिद्ध आहे. अशा समृद्ध सोलापूर जिल्ह्यातील आणि आजूबाजूतील मंदिरे यामुळे सोलापूर जिल्ह्याला आणि शहराला एक वेगळे नाव रूप आले आहे. अशातच काही बाबींवर आपण लक्ष दिले तर सोलापूर सारखा जिल्हा महाराष्ट्र राज्य नव्हे, देशातच नव्हे, तर जगभरामध्ये पोहोचू शकतो. खरं पाहिलं तर आध्यात्मिक पर्यटनाला साजेसे असे वातावरण या जिल्हामध्ये आणि आजूबाजूच्या परिसरात आहे. याचा पूर्ण फायदा स्थानिकांना तसेच देवदर्शनाला आलेल्या भाविकांना झाला पाहिजे हेच प्रयत्न असतात. तसं पाहिलं तर जगातून देवदर्शन आणि ऐतिहासिक आणि सोलापूरमध्ये येत असतात.**





जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी फक्त पर्यटन म्हणून नाही तर अभ्यासाच्या दृष्टीने सुद्धा काही जण भेट देतात. अशातच जर शासनाने सुरक्षित आणि सोयीस्कर वातावरण निर्माण केले तर नक्कीच अजून जास्त लोक इकडे आकर्षित होतील, यात काही शंका नाही.

आज सोशल मीडियाचा वापर करून सोलापूरचे नाव सात समुद्र पार नेले पाहिजे. यासाठी युवा पिढीने पुढे येऊन अभ्यासू दृष्टीने सोलापूरचे सकारात्मक गोष्टी जगासमोर ठेवल्या पाहिजे. त्यामुळे सोशल मीडियाची ताकद लक्षात घेऊन अनेक दृष्टीने फायदा करून देणाऱ्या पर्यटन क्षेत्र याला भरभराट आणायचे काम युवा पिढीने केले पाहिजे. त्याचबरोबर अनुभवी लोकांनी योग्य मार्गदर्शन करत पर्यटनासाठी पोषक वातावरण निर्माण केले गेले पाहिजे. अशामुळे नक्कीच आर्थिकदृष्ट्या या शहराला बळकटी येईल आणि जिल्ह्याचे ही नाव होईल. एकंदरीतच सोलापूरचा विकास सर्वांनी मिळून केला पाहिजे आणि पर्यटन क्षेत्र हे कमी खर्चामध्ये जास्त फायदा देणार क्षेत्र ठरत आहे. त्यासाठी सर्वांनीच आपापल्या परीने योग्य असे मार्ग काढून प्रयत्न करत राहिले पाहिजे एवढेच इथे नमूद करू इच्छितो.



---

# भेसळ प्रतिबंधक लस निर्माण होऊ शकेल का?



गेल्या काही दिवसांपासून दूरदर्शनवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून दूध व दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर पडणाऱ्या छाप्यांच्या बातम्या सातत्याने पाहायला मिळत आहेत. या कारवाईमुळे आपल्या रोजच्या दुधात किती आणि कोणकोणत्या प्रकारची भेसळ केली जाते, याचे भयावह चित्र जनतेसमोर आले आहे. हे सर्व पाहिल्यानंतर एकच प्रश्न मनात उभा राहतो. आपण आजवर जिवंत आहोत, हेच नवल नाही का? परंतु प्रश्न केवळ दुधापुरता मर्यादित नाही. आज आपल्या ताटातील जवळजवळ प्रत्येक अन्नपदार्थातून विविध प्रकारची रसायने आणि विषारी घटक आपल्या शरीरात प्रवेश करत आहेत. नुकताच या विषयावर गायकवाड यांनी तयार केलेल्या चित्रपटाची माहिती ऐकली. चित्रपटाची कथा मन हेलावून टाकणारी आहे. ज्याला आपण प्रेमाने अन्नदाता म्हणतो, तोच नकळत आपल्या शरीरात संथ विषप्रयोग करीत आहे, ही जाणीव अस्वस्थ करून जाते. रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिरेक झाल्याने पंजाबात कर्करोगाच्या रुग्णांशी संबंधित कॅन्सर ट्रेन हा शब्दप्रयोग प्रसिद्ध झाला. अशीच परिस्थिती उद्या महाराष्ट्रात किंवा देशातील इतर राज्यांत निर्माण होणार नाही, याची खात्री कोण देणार? या संदर्भात आणखी एक प्रश्न सतावतो. आज धडाकेबाज कारवाई होत आहे; पण हे सर्व आतापर्यंत संबंधित अधिकाऱ्यांच्या नजरेस कसे आले नाही? एखादा गुन्हेगार पकडला गेला की त्याच्या पूर्वीच्या गुन्ह्यांचाही तपास केला जातो. त्याचप्रमाणे, या प्रकाराकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाचीही चौकशी होऊन जबाबदारी निश्चित व्हायला नको का? कारण प्रत्येक वेळी तुकाराम मुंढे यांच्यासारखा धाडसी अधिकारी मिळेल, याची शाश्वती नाही. या विषयावर मी एका कृषितज्ज्ञाशी चर्चा केली. त्यांनी वास्तववादी भूमिका मांडली. ते म्हणाले, रासायनिक खते आणि कीटकनाशके पूर्णपणे बंद केली, तर उत्पादनात मोठी घट होईल. त्यामुळे शेती आर्थिकदृष्ट्या परवडणार नाही. श्रीलंकेने अशा प्रकारचा प्रयोग केला आणि त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागले. त्यामुळे सध्या तरी याला पर्याय नाही. मात्र त्यांचा अतिरेक कमी करण्यासाठी वैज्ञानिक नियोजन, जनजागृती आणि काटेकोर नियंत्रण आवश्यक आहे. शेतीपुरतेच नव्हे, तर व्यापारातही भेसळीची शर्यत सुरू आहे.



डॉ. ह. ना. जगताप
भ्र.-९८२२६१५४६४

कृत्रिम रसायनांनी फळे पिकविणे, त्यांना आकर्षक रंग आणणे, चव बदलण्यासाठी रसायने इंजेक्ट करणे, अधिक दूध मिळावे म्हणून जनावरांना इंजेक्शने देणे, दुधाची घनता वाढविण्यासाठी युरिया किंवा इतर रसायने मिसळणे, अगदी कृत्रिम दूध तयार करणेहे सर्व प्रकार सर्रास सुरू आहेत. यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम कायदे आवश्यक आहेत. यामुळे अस्वस्थ होऊन मी माझ्या एका मित्राशी चर्चा केली. कोणत्याही प्रश्नावर त्याच्याकडे तात्काळ उत्तर असते. त्याने दोन उपाय सुचवले.

**पहिला उपाय-** आपल्याकडे इतके शास्त्रज्ञ आहेत. ते अवकाशात पोहोचतात, नवीन तंत्रज्ञान विकसित करतात. मग भेसळ प्रतिबंधक लस का तयार करू शकत नाहीत? शासनाने त्यासाठी विशेष संशोधनाला प्रोत्साहन द्यावे. माझ्या चेहऱ्यावरचे असमाधान पाहून त्याने दुसरा उपाय सांगितला. जर लस तयार होत नसेल, तर आपणच भेसळयुक्त अन्न पचविण्याची सवय लावून घ्यायची! त्याच्या या उत्तरावर हसायचे की रडायचे, हेच मला समजेना. इतक्यात त्याने आणखी एक विचार मांडला. तो म्हणाला, अन्नातील भेसळीवर उपाय शोधणे तुलनेने सोपे आहे; पण समाजातील वैचारिक भेसळीवर कोण उपाय करणार? पूर्वी कम्युनिस्ट, समाजवादी, हिंदुत्ववादी, आंबेडकरवादी, भांडवलवादी अशा विविध विचारसरणींचे लोक आपल्या भूमिकांशी प्रामाणिक असत. मतभेद होते, पण विचारांशी निष्ठा होती. आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. सकाळची भूमिका आणि संध्याकाळची भूमिका यातच फरक पडतो. परिणामी, कोणाशी कोणत्या विषयावर चर्चा करावी, हे समजेनासे झाले आहे.

कोणता राजकीय नेता आज ज्या विचारसरणीचा पुरस्कार करतो, तो उद्या त्याच विचारसरणीशी प्रामाणिक राहील की नाही, याचीही खात्री देता येत नाही. त्यामुळे मतदान करतानाही मतदार संभ्रमात पडतो. अन्नातील भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे, प्रयोगशाळा आणि अधिकारी आहेत. पण समाजातील आणि राजकारणातील या भेसळीसाठीही एखादी प्रतिबंधक लस निर्माण होऊ शकेल का? हा प्रश्न अनुत्तरित आहे. आणि मीही अजून संभ्रमातच आहे.

(माजी प्राचार्य, दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर)

# सोलापूर जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळे







**प्राचीन काळापासून सोलापूरला पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे सोलापूरचे भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती स्थान. प्राचीन काळात अनेक घराण्याचे सोलापूर प्रदेशावर वर्चस्व होते. कलचुरी घराण्याने तर मंगळवेढा येथे आपली राजधानी स्थापन केली होती. सिद्धरामेश्वरांची गड्डा यात्रा व पंढरपूरची वारकरी दिंडी यांना शेकडो वर्षाचा इतिहास आहे. या देवतांना मानणारा वर्ग परप्रांतात सुद्धा असून या काळात धार्मिक कारणास्तव पर्यटन होत होते. ही परंपरा आजही कायम आहे.**

मध्ययुगीन कालखंडात सोलापुरातील भुईकोट किल्ल्यावर वर्चस्व प्राप्त करण्यासाठी आदिलशाही व निजामशाही यांच्यात अनेक वर्षे संघर्ष व लढाया झाल्या. औरंगजेब दक्षिण मोहिमेसाठी आल्यानंतर अनेक वर्षे सोलापूर व परिसरात त्याचा मुक्काम होता. आधुनिक काळात सोलापूर जिल्ह्याला अनेक महामार्गांनी जोडले आहे. सोलापुरातील पर्यटनस्थळामुळे पर्यटन व्यवसायाला चालना प्राप्त झाली आहे. शासनाने जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांना निधीची तरतूद केलेली आहे. मागील काही वर्षात सोलापूर जिल्ह्यात रस्त्याचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. त्याचबरोबर जलद गतीच्या रेल्वेमुळे पर्यटकांचा प्रवास जलद व सुखद झालेला आहे. यामुळे अनेक पर्यटक परराज्यातून सोलापूरास भेटी देऊ लागले आहेत.





**धार्मिक पर्यटनस्थळेः-**

सोलापूर जिल्ह्यात अनेक धार्मिक पर्यटनस्थळे आहेत. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्र व इतर राज्यातून लाखो पर्यटक व वारकरी येतात. जानेवारी महिन्यात सिद्धरामेश्वरांची गड्डा यात्रा भरते. आजूबाजूच्या राज्यातील अनेक भाविक व पर्यटक सोलापूरला भेट देतात. सोलापुर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ यांचे मंदिर असून त्यांचे भक्तगण संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेले आहेत. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर मंदिर, वडवळ येथील नागनाथ मंदिर, हत्तरसंग कुडल येथील मंदिर समूह, माचणूर येथील सिद्धेश्वर मंदिर, कोरवली येथील महादेव मंदिर, नारायण चिंचोली येथील सूर्यनारायण मंदिर, बार्शी येथील भगवंत मंदिर, संत मंगळवेढा येथील दामाजीपंत व संत चोखामेळा मंदिर, करमाळा येथील कमलाभवानी मंदिर, बाळे येथील खंडोबा मंदिर, मार्डी येथील यमाई मंदिर व सोलापूर शहरातील हिंगुलांबिका देवी मंदिर, मल्लिकार्जुन देवस्थान, मार्कंडेय मंदिर, वीरतपस्वी मंदिर, वेंकटेश्वर देवस्थान, श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर, शाह जहुरवली दर्गा ही धार्मिक पर्यटनस्थळे आहेत.



**ऐतिहासिक पर्यटनस्थळेः-**

सोलापूरचा भुईकोट किल्ला, ब्रह्मपुरी येथील औरंगजेबाची छावणी व गढी वजा किल्ला, राव जगदेवराव जाधव यांची समाधी, अकलूज येथील भुईकोट किल्ला व शिवसृष्टी, अक्कलकोट येथील जुना राजवाडा, नवीन राजवाडा, शस्त्रागार, वाखरी जवळील बाजीराव विहीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिविहार प्रेरणाभूमी, वळसंग येथील आंबेडकर बावडी, गंगा निवास, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक, सोलापूर महानगरपालिकेची इमारत- इंद्रभुवन ही ऐतिहासिक पर्यटनस्थळे आहेत.




**नैसर्गिक व शैक्षणिक पर्यटनस्थळेः-**

सिद्धेश्वर वनविहार- सोलापूर, कुगाव एक निसर्गरम्य बेट-करमाळा, धर्मवीर संभाजी (कंबर) तलाव, हिप्परगा तलाव सोलापूर, माळढोक अभयारण्य- नान्नज, उजनी धरण परिसरातील पर्यटनस्थळे इत्यादी नैसर्गिक पर्यटनस्थळे सोलापूर जिल्ह्यात आहेत. त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, हिराचंद नेमचंद वाचनालय, डाळिंब संशोधन केंद्र व विज्ञान केंद्र ही शैक्षणिक पर्यटनस्थळे सोलापूर शहरात आहेत.





(मुख्याध्यापक- लेखक हिंगुलाबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आहेत.)



प्रमोद हंचाटे
भ्र.-८१४९१८२१३५

**सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन संदर्भात समस्या व त्यावरील उपाययोजनाः-**

१. करवीर दर्शन-कोल्हापूर, महाबळेश्वर दर्शन-महाबळेश्वर याप्रमाणे सोलापूरातील पर्यटनस्थळे पर्यटकांना दाखवण्यासाठी कोणतेच शिस्तबद्ध नियोजन नाही. सोलापूर दर्शन योजना सुरु करावी.

२. सोलापुरात कोणत्याही पर्यटनस्थळाच्या ठिकाणी गाईड दिसून येत नाहीत. स्थळांची माहिती नसल्याने व जाहिरात व्यवस्थित झालेली नसल्यामुळे अनेक ठिकाणे पर्यटकांपासून वंचित आहेत. पर्यटनस्थळांची जाहिरात करावे. त्यांची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित स्थानिक गाईडची नियुक्ती करावी.

३. सोलापूर ते गोवा, सोलापूर ते मुंबई व्यतिरिक्त इतरत्र विमानसेवेचा अभाव दिसून येतो. गोवा, मुंबई प्रमाणे इतरत्र विमानसेवा सुरू करावे व त्यात सातत्य ठेवावे.

४. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी प्रसाधनगृहे व स्वच्छतागृहांचा मोठ्या प्रमाणावर अभाव दिसून येतो. त्यामुळे महिला पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागतो. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी महिला पर्यटकांसाठी स्वच्छतागृह व प्रसाधनगृहाची सोय करावे. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी स्वच्छता व साफसफाई राखावे.

५. गर्दीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी अधिकृत पार्किंग सुविधा उपलब्ध नाहीत. मंदिरे, बागा, पर्यटनस्थळे, बाजारपेठ, बसस्थानक, रेल्वे स्थानक आदी ठिकाणी अतिक्रमणांचा विळखा दिसून येतो. पर्यटकांचा प्रवास सुखद व सुरक्षित करण्यासाठी वाहतुकीत शिस्त निर्माण करावी. सोलापुरात दोन उड्डाणपूल मंजूर आहेत. परंतु कामाला अजूनही सुरुवात झालेली नाही. उड्डाणपूल झाल्यास वाहतुकीची कोंडी व अपघाताचे प्रमाण कमी होईल.

६. शासनाच्या निधीअभावी अनेक कामे रखडलेली दिसून येतात. अनेक पर्यटन स्थळांना मबफ व मकफ दर्जा देण्यात आलेला आहे. परंतु या पर्यटनस्थळांची माहिती महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध नाही. त्याचबरोबर स्थळांच्या ठिकाणी माहिती दर्शविणाऱ्या फलकांचा अभाव आहे. गाईड प्रशिक्षण केंद्र व पर्यटनस्थळ मार्गदर्शन केंद्राची स्थापना करावी. परिपत्रक, वर्तमानपत्र, मासिक, पर्यटनस्थळी माहितीच्या पुस्तकांचा वापर करून त्यांना प्रसिद्धी देण्यात यावी.

७. उजनी धरण परिसरात अनेक गावांचे जलमार्ग आहेत. परंतु सुरक्षित सेवा- सुविधा नसल्यामुळे अनेकांना प्राणास मुकावे लागले आहे. अनेक नैसर्गिक पर्यटनस्थळांच्या ठिकाणी नौकाविहाराची व्यवस्था आहे. परंतु त्या तितक्या सुस्थितीत नाहीत.

८. निवास सुविधा, भोजनालय, खाजगी वाहतूकदार यांचे वर्तन पर्यटन वाढीस मारक आहे. सोलापुरातील व्यावसायिकांना आदरतिथ्याचे धडे द्यावे.

९. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनस्थळी नदी, तलाव किंवा कुंडात प्लास्टिक, निर्माल्य, सांडपाणी सोडल्यामुळे पाणी दूषित होते. त्यावर पर्यटन विभागाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. येणारे सर्वच पर्यटक भाविक उच्च आर्थिक स्तरातील नसतात. त्यामुळे त्यांना निवासाची अडचण येते. ही समस्या दूर होण्यासाठी सवलतीच्या दरात त्यांना निवासाची सोय उपलब्ध करून द्यावे. धार्मिक पर्यटनस्थळी अल्प दरामध्ये ऑनलाइन पद्धतीने भक्त निवास बुकिंगची सोय करून द्यावे. धार्मिक पर्यटनस्थळाच्या ठिकाणी पर्यटकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळावे.

**सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाकडे दुर्लक्ष झालेले आहे. आर्थिक बाबतीत अधिक प्रगती घडवून आणण्यासाठी पर्यटन विकासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. कारण या जिल्ह्यास धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. तसा वारसा इतर जिल्ह्यांना क्वचितच लाभला आहे, यामुळे पर्यटनाकरिता शिस्तबद्ध नियोजन व त्याची योग्य अंमलबजावणी केली तर त्याचा फायदा पर्यटकांना होईल. यातून जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीस चालना मिळेल. भारतातील अनेक राज्यांनी पर्यटनाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. तशा प्रकारचे धोरण राबविणे अगत्याचे आहे. त्याचा फायदा पर्यटकांबरोबरच येथील जनतेला आणि शासनाला निश्चितपणे होईल. विशेष म्हणजे याकरिता मोठ्या प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक करण्याची गरज नाही. आजच्या स्पर्धेच्या युगात रोजगार मिळवणे कठीण होत आहे. अशा परिस्थितीत पर्यटनाबाबत विधायक दृष्टीकोन आणि त्याच्या वाढीसाठी शासन आणि जनतेने पुढाकार घेतला पाहिजे. यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच पर्यटनाच्या मदतीने सोलापूरचा ऐतिहासिक, धार्मिक आणि संपन्न सांस्कृतिक वारसा अधिक प्रकाशात आणणे शक्य होणार आहे. त्यामुळे भारतातील इतर राज्यांच्या पर्यटकाबरोबर परकीय पर्यटकांना आकर्षित करणे कठीण होणार नाही. त्याचबरोबर पर्यटनाबाबत संबंधित असलेल्या घटकांचा रचनात्मक मार्गाने विकास करणे अगत्याचे आहे. या विकासामुळे जिल्ह्याच्या पर्यटनाबाबत उज्ज्वल भविष्य आहे असे खात्रीपूर्वक म्हणता येईल.**





---

साने गुरुजीचे कार्य व साहित्य याचा प्रचार व प्रसार करण्यारिता १९९४ साली सोलापूर जिल्हा साने गुरुजी कथामालेची स्थापना केली. दीनबंधू दीनानाथ कमळे गुरुजीच्या पढाकाराने कथामालेची स्थापना झाली. १९९६ साली सोलापूरात कथामालेचे अधिवेशन झाले कथामाला सक्षमपणे चालण्यासाठी कथा मालेची धुरा अवधूत म्हमाणे यांच्याकडे सोपवले. कथामालार्ते मंगल वाडमय विक्री, कथाकथन, सामान्यज्ञानस्पर्धा, कथाकथन स्पर्धा, बालहक्क कार्यशाळा, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, गुणवंत शिक्षक पुरस्कार, हस्ताक्षर स्पर्धा, व्याख्याने आयोजित केले.




श्यामची आई हे संस्कारक्षम पुस्तक विद्यार्थी व शाळाना सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिले. आतापर्यंत १ लाख पेक्षा अधिक पुस्तके सवलतीत विकी झाली. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी विविध उपक्रम राबवले, नरेंद्र दाभोळकर व श्याम मानव यांचे अंधश्रध्दे विषयी प्रबोधनात्मक व्याख्याने आयोजित केले. कथामालार्ते प्रत्येक शाळेतील आदर्श विद्यार्थ्यांचा सत्कार केला. कथाकथन शिबीर आयोजित करुन शिक्षकांना कथाकथनाचे महत्व, कथाकथन करण्याची पद्धत व कथेचे प्रकार याची माहिती शिक्षकांना दिली. महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेर दरवर्षी कथामाला अधिवेशन संपन्न होतात. या अधिवेशनास कथामाला पदाधिकारी व सभासद उपस्थित राहतात. अधिवेशनातील उपक्रमात सक्रीय सहभाग घेतात.

२००८ साली सोलापूरात दोन दिवशीय अधिवेशन पार पडले. अधिवेशनास संस्थापक प्रकाशभाई मोहाडीकर, मेधा पाटकर उपस्थित होते. बालदिंडी उद्घाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, सांस्कतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अधिवेशनास उत्तम प्रतिसाद मिळाला.

अशोक खानापुरे
भ्र.-९४०३२९५००४




कथामालेचे अध्यक्ष अवधूत म्हमाणे व कार्यवाह अशोक खानापुरे यांना साने गुरुजी बालसेवा पुरस्कार प्राप्त झाला. विजय बिज्ञरगी व आरती काळे यांना उत्कष्ट कथानिवेदक पुरस्कार मिळाला, सोलापूर जिल्हा शाखा, सांगोला तालुका इंदिरा कन्या प्रशाला मोहोळ व उमाबाई ज्यु कॉलेंज यांना उत्कष्ट शाखा पुरस्कार मिळाला.



कथामालार्ते दरवर्षी १०वी मध्ये शिकणाऱ्या १० विद्यार्थिनीना प्रत्येकी हजार रुपये शैक्षणिक मदत दिली जाते निर्मला मठपती स्मती व प्रकाशभाई मोहाडीकर स्मती बालसहित्य सेवा पुरस्कार दिला जातो, साने गुरुजी गौरव पुरस्कार, आदर्श समाजसेवक पुरस्कार, किशोरी पुरस्कार, आदर्श माता पुरस्कार, समाजसेविका पुरस्कार प्रदान करुन गुणवंताचा सन्मान केला जातो.

२०१९ साली कथामाला मध्यवर्तीशी सलग्न करण्यात आले. २०१६ साली सांगोला येथे अधिवेशन झाले. कामगार दिनानिमित्त खाजगी क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करणारे कर्मचारी व हातगाडी ओढणाऱ्या दोन महिलांचा सत्कार करण्यात आला. थंडीत कुडकुडत झोपणाऱ्याना उबदार पांघरुन देण्याचा उपक्रम राबवला. दिवाळीम ध्ये वंचित लोकांना फराळ देण्यात आले. जिल्ह्यात कथामालेचे ३०० शाखा आहेत. कथामालेचा कारभार पारदर्शी आहे. दरवर्षी वार्षिक अहवाल दिला जातो. कथामाला स्थापन होऊन ३१ वर्षे झाली. कथामालेचे उपक्रम अखंडीत चालू आहे. अवधूत म्हमाणे, बाबूराव मैंदर्गीकर जिवराज टाकळीकर, अशोक खानापुरे, सौ. आरती काळे, प्रा.अशोक म्हमाणे, रंगसिध्द दसाडे, रंगसिध्द कोरे, प्रेमचंद मेने, अरुण धुमाळ, गणेश लेंगरे, सुनील पुजारी, सुनील लिगाडे, दिलीप जाधव, श्रीमंत बनसोडे, डॉ. रामचंद्र धर्मसाले, गुरुनाथ राजमाने, विजय बिज्ञरगी, सौ. उज्ज्ला साळुंके इत्यादी जणानी समर्पित भावनेने योगदान दिले आहेत. म्हणून कथामालेचे कार्य सर्वश्रत व प्रशंसनिय झाले आहे. सर्वजाण निरपेक्ष भावनेने कार्य करतात. महाराष्ट्रात सोलापूर कथामालेचे कार्य अग्रेसर आहे. **(लेखक साने गुरुजी कथामालेचे माजी अध्यक्ष आहेत.)**

**सोलापूर जिल्हा हा अवर्षणग्रस्त म्हणून महाराष्ट्रासह देशभरात ओळखला जातो. महाराष्ट्र राज्यातील सर्वात कमी पाउस पडणाऱ्या जिल्ह्यात पहिला क्रमांक सोलापूर जिल्ह्याचा आहे. मात्र येथील स्थानिक नेतृत्व व कष्टाळू शेतकरी वर्गाने भगीरथ प्रयत्नातून दुष्काळामुळे येणारे दारिद्र्य मात्र आपल्या अस्तित्वाला चिकटू दिले नाही. जिल्ह्यातून बारमाही वाहणारी भीमा नदी व तिच्या उपनद्यांमुळे शेतकऱ्यांना मोठा हात दिला. मात्र त्याहूनही येथील शेतकरी व सामान्य नागरिकांनी सहकारात वर्धते धनम हे ब्रीद हातात घेउन दारिद्र्याला जिल्ह्याबाहेर हाकलून लावण्यात बऱ्याच अंशी यश मिळवले आहे.**



# सहकारातून निरंतर समृद्धीकडे जिल्ह्याची झेप

## विना सहकार, नहीं उद्धार!

नद्यांच्या सिंचनाचा वापर करून उसासारखे नगदी पीक घेवून गामीण भागाचे अर्थकारणच बदलून गेले आहे. उसावर प्रक्रिया करणारे सहकारी साखर कारखाने, कापसापासून सुत काढणाऱ्या सुतगिरण्या, दुध संघ आदी शेतमालावर आधारित उद्योग सहकार तत्वावर काढले. नुसते काढलेच नाही तर ते अतिशय उत्तम रितीने चालवून त्यांच्यातून निघणारे आर्थिक उत्पन्न शेतकऱ्यांच्या घरात जाईल, अशी सोय झाली. परिणामी कमी पावसाचा जिल्हा अशी देशभरातून नकारात्मक केली जाणारी गणना खोटी ठरली. दुष्काळी म्हटल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात आज सर्वात जास्त उस पिकाचे क्षेत्र, सर्वात जास्त साखर कारखाने, सर्वाधिक साखर उत्पादन होते.

ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, दुध संघ, सुतगिरण्यांनी समृद्धी आणली. तसे शहरी भागात सहकारी बँका व पतसंस्थांनी अर्थकारण सुधारले. कमी आर्थिक उलाढाल असलेल्या आपल्या जिल्ह्यातील कोणाला उद्योग, व्यवसाय करण्यासाठी कर्ज देण्यास सरकारी बँका आढे-वेढे घ्यायच्या. मात्र येथील नेतृत्वाने काढलेल्या सहकारी बँका, पतसंस्था आदींनी अशा उद्योग, व्यवसायात झेप घेवू पाहणाऱ्यांना सढळ हाताने कर्जपुरवठा केला.

**साखर कारखान्यांमुळे ६ हजार कोटी शेतकऱ्यांच्या खात्यातः**

जिल्ह्यात सद्यस्थितीत एका जिल्ह्याच्या हिशोबाने बोलायचे म्हटल्यास राज्यात व देशात सर्वाधिक म्हणजे ३६ साखर कारखाने चालू आहेत. विशेष म्हणजे त्यातील जवळपास ८५ टक्के कारखाने हे सहकारी तत्वावरील आहेत. उसाच्या वाड्याचा वापर दुधाळ जनावरांना चारा म्हणून करता येत असल्याने शेतकऱ्यांकडील गायी, दुग्धोत्पादनही फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अतिरिक्त दुधावर प्रक्रिया करणारे सहकारी तत्वावरील दुध डेअरी, दुध संघही जिल्ह्यात भरपूर आहेत. त्यातूनही शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढून रोजगारनिर्मितीही चांगली झाली आहे. काही सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सहकारी सुत गिरण्या काढल्या. त्यातील सांगोल्याची शेतकरी सहकारी सुत गिरणी आशिया खंडातील मोठी सुतगिरणी म्हणून गौरवलेली आहे. याच गिरणीची महिला सुत गिरणीही चांगली ख्याती प्राप्तकर्ती आहे. जिल्ह्यात शेतकऱ्यांचे कापूस उत्पादनावर इतके लक्ष नसल्याने सुतगिरण्यांची संख्या व अर्थकारण साखर कारखान्यांइतके प्रभावी नाही. मात्र ज्या गिरण्या आहेत त्यांनी समृद्धतेचे आदर्श घालून दिले आहेत.



विकास चाटी
भ्र.७३५०७७८२००

**जिल्ह्यात सहकारी पतपुरवठ्याचे जाळे**

सध्या जिल्ह्यात मुख्यालय असलेल्या एकुण २० सहकारी बँका, १२० सेवक सहकारी पतसंस्था, १२६ इतर नागरी पतसंस्था, २ कृषि व ग्रामीण क्षेत्राशी संबंधित बँका आहेत. जिल्हा सहकारी बँकेनेही शेतकरी, कृषि उत्पादन आधारित कारखाने व अन्य उद्योगांना मोठ्या प्रमाणात वित्तीय पुरवठा केला. त्यामुळेही जिल्ह्यात उद्योगधंद्यांची चांगली वाढ झाली आहे. जिल्हयातील ग्रामीण भाग व शहरी भागात रोजगार निर्मितीत ङ्गसहकारफ या चार अक्षरांनी जीवन सुखकर केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या राष्ट्र व राष्ट्रीय जिल्ह्यातील एकमेव मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक ही बँक ठरली आहे. इतकेच नव्हे तर सहकारी गृहनिर्माण सोसायटी, विविध सहकारी सोसायटी, शेतीसंलग्न उद्योगांशी संबंधित पतसंस्था यांचे जणू जाळेच सोलापूर शहर, जिल्हा, ग्रामीण व शहरी भागात विणले आहे. सहकारी सुपर बाजारही मोठी उलाढाल करत आहेत. यावरून सहकार तत्वाचे चलन अन्यही क्षेत्रात झाले आहे. सहकार खात्याकडून प्राप्त माहितीनूसार येत्या वर्षात बऱ्याच सहकारी साखर कारखान्यांनी गाळप क्षमता वाढ, अन्य उपउत्पादन निर्मितीसाठी प्रकल्प करण्यासाठी सहकार खात्याकडे परवानगी मागितल्या आहेत. एका अर्थाने दुष्काळी असा शिक्का बसलेल्या सोलापूर जिल्ह्याला समृद्ध करण्याचे भगीरथ काम सहकार या चार अक्षरांनी केले असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

**आणखीही मोठा वावः** जिल्ह्याची वाढती लोकसंख्या, तिला भेडसावणारा रोजगाराचा प्रश्न पाहता अन्यही बरीच क्षेत्रे आहेत, जेथे सहकार क्षेत्राने लक्ष दिल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व आर्थिक समृद्धी येणार आहे. शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, सहकार तत्वावर गटशेती आदी अन्यही क्षेत्रांवरही सहकार क्षेत्रातील नेतृत्वाने प्रयत्न करण्याची गरज आहे. शेजारील धाराशिव जिल्हयात कापसाचे क्षेत्र चांगले आहे. सोलापूर जिल्ह्यातही उसाची तीन पिके झाल्यावर चौथ्या वर्षी जमिनीचा पोत सुधारण्यासाठी एक वर्ष कापसाचे आधुनिक तंत्रज्ञानावर उत्पादन घेतल्यास सुतगिरण्यांचे प्रमाणही वाढेल. त्यातूनही मोठी रोजगार निर्मिती व आर्थिक समृद्धी येणार आहे. (लेखक तरूण भारतचे उपसंपादक आहेत.)

### सहकारी बँका, पतसंस्थांमध्ये जवळपास २० हजार कोटींच्या ठेवी

**सोलापूर जनता सहकारी बँक, सिद्धेश्वर बँक, लक्ष्मी बँक, पंढरपूर अर्बन बँक, कुर्डुवाडी जनता सहकारी आदी बँकांनी प्रारंभीच्या काळात जिल्ह्यात उद्योगांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. नंतर गेल्या ३० वर्षांपासून निर्माण झालेल्या समर्थ बँक, लोकमंगल बँक, महावीर बँक, विकास बँक, माहेश्वरी बँक, मनोरमा बँक आदी बँकांनीही उद्योजकांना पतपुरवठ्यात मोठा हातभार लावला. परिणामी सध्या विशेषत: सोलापूर शहरात बाहेरून आलेले उद्योजक एका हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच असले तरी स्थानिकांनीच फिनिक्स पक्षाप्रमाणे उद्योगात घेतलेल्या भरारीने शहरातील फार मोठ्या प्रमाणात कामगारांच्या हाताला काम दिले आहे.**

**सोलापूर शहरात हातमाग, यंत्रमाग, शालेय गणवेश निर्मिती, रसायन उद्योग, यांत्रिकी उद्योग, विविध कंपन्यांच्या डिलरशीप आदी छोट्या- मोठ्या उद्योगांनी चांगलाच जम बसवला आहे. यातून हजारो लोकांना रोजगार दिला आहे. जिल्हाभरात स्थापन झालेल्या सहकारी बँका, पतसंस्था आदींमध्ये जिल्हावासियांच्या जवळपास २० हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. या शिवाय अन्य जिल्ह्यात स्थापन झालेल्या सहकारी बँकांमध्येही सोलापूरवासीयांच्या मोठ्या प्रमाणात ठेवी आहेत. जिल्ह्याच्या वाढत्या अर्थकारणात सहकारी सहकारी बँका, पतसंस्थांचा सिंहाचा वाटा आहे.**

### जिल्ह्यात यांनी रूजवली सहकार चळवळ

सोलापूर जिल्हयात सहकार महर्षी शंकरराव मोहिते- पाटील, नामदेवराव जगताप, गणपतराव साठे, ब्रम्हदेवदादा माने, वि.गु. शिवदारे, बाबुराव चाकोते, अप्पासाहेब काडादी, माजी आमदार गणपतराव देशमुख, माजी आमदार सुधाकरपंत परीचारक, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी जिल्हयात सहकार चळवळ रूजविली.

या सहकारातील अभ्यासू लोकप्रतिनींमुळेच जिल्हयात सहकारी साखर कारखाने, सहाकरी बॅंका, पतसंस्था, यासह अनेक सहकारी संस्थांची उभारणी झाली. त्यातून सर्वसामान्य नागरीकांना विविध मार्गांनी फायदा झाला. त्यामुळे सहकार चळवळींचे जिल्हयाच्या विकासात मोठे योगदान राहिले. शंकरराव मोहिते- पाटील यांनी तर माळशिरसच्या माळरानावर हरीत व धवलक्रांती घडवून आणली. तोच वारसा पुढे जपत विजयसिंह मोहिते- पाटील यांनी जोपासला. त्यांच्या नेतृत्वाखालीच जिल्हयात सहकाराने वेग घेतला. मात्र, अलिकडे खाजगीकरण वाढल्याने अनेक राजकिय नेते मंडळी सहकारी तत्वावर संस्था काढण्यापेक्षा खासगी मालकीच्या संस्था, खासगी उद्योग उभारण्यास प्राधान्य देवू लागले आहेत.





# भीमाशंकर जंगल ट्रेक

भीमाशंकर जंगल ट्रेक हे नाव वाचूनच ट्रेकला जायची इच्छा जागृत झाली. पूर्वी कळसुबाई आणि नाणेघाट असे दोन ट्रेक इको फ्रेंडली ग्रुप बरोबर केले होते. शुक्रवारी रात्री दोन बस भरून ७० एक माणसं आम्ही या ट्रेकला गेलो. आणि आज सकाळी सोलापूरला काही लोक पुण्याला काही इतर ठिकाणी गेले. कोणतं हिरवे संचित आम्ही सगळे लोक घेऊन आलो ते केवळ शब्दात मांडणे अशक्य आहे.

**ना धो महानोर म्हणतात**
**या नभाने या भुईला दान द्यावे**
**आणि या मातीतून चैतन्य गावे.**

या ओळींचा अक्षरशः अर्थ आम्हा सगळ्यांना या ट्रेकमध्ये कळाला. पाऊस पडतो म्हणजेच नभ भुईला दान देते मातीतून चैतन्य गाते म्हणजे काय.. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालींचे. या ओळींचा अर्थही आम्हाला भीमाशंकर परिसरातील हिरवे हिरवे गालीचे पाहून समजत होता आणि आमच्या डोळ्यांचे पारणे फिटत होते. क्षणात सुरू होणारा पाऊस आणि क्षणात थांबणारा पाऊस मन वेडावून टाकत होता. आमची सगळी हिरवी निसर्ग प्रेमी टीम एकमेकांना हात देत, निसर्गाचा आनंद घेत, रिमझिम पावसामध्ये सह्याद्री मध्ये मनमुराद फिरत होती. वाटेतअसंख्य धबधबे, ओढे होते. ओढ्यांमधून वाहणाऱ्या पाण्याचे एक वेगळेच संगीत मनाला सुखावून जात होते. या सगळ्यातून चैतन्याच्या लहरी निर्माण होत होत्या. या सगळ्या लहरी आम्हा सगळ्यांना चैतन्यमय करत होत्या. दुसऱ्या दिवशी भोरगिरी किल्ल्याचा ट्रेक आणि देवकुंड धबधब्यात केलेली धमाल चिरंतन स्मरणात राहील. असंख्य फोटो, बेसुमार आठवणी घेऊन सगळे आपापल्या गावी परतले.

**जेव्हा नव्हते चराचर,**
**तेव्हा होते पंढरपूर**
**जेव्हा नव्हती गोदा गंगा,**
**तेव्हा होती चंद्रभागा**

असे म्हणतात,

चंद्रभागा म्हणजे भीमा नदी. भीमा नदीचे उगम स्थान या ट्रेकमध्ये पाहायला मिळाले. अतिशय महत्त्वाचे असलेले ज्योतिर्लिंग म्हणजे भीमाशंकर. आणि या पवित्र अध्यात्मिक परिसरात निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केली आहे. घरांच्या छतावर गवत उगवलेले आहे. जवळपास अनेक घरांची छते हिरवी दिसतात. अनेक भिंती आहेत.

अनेक दगडांवर शेवाळे झाल्यामुळे, इथल्या मातीतला दगड दगड हिरवा आहे. इंद्रायणी तांदळाचा भात आपण सगळ्या आवडीने खातो. इंद्रायणी तांदळाच्या भाताची शेती कशी असते कशी करतात हे बघायला मिळाले. केळीची झाडे ही काही दिसली. पण तिथल्या शेतकऱ्यांनी ती रान केळी असल्याचे सांगितले. कोटलिंगेश्वर मंदिराचे शिरगाव येथे दर्शन घेतले. हे मंदिर भोरगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. ही सगळी निसर्गाची जादू, निसर्गाचे चमत्कार इको फ्रेंडली ग्रुपने आयोजित केलेल्या या ट्रेकमुळे पाहता आले.

सोलापूरपासून फार लांब नाही, सगळ्या सोलापूरकरांनी किंबहुना सगळ्यांनीच भीमाशंकराचे दर्शन जरूर घ्यावे. पण परिसरातील निसर्गाचे भव्य रूप नक्कीच पहावे. प्रत्यक्ष या स्थळाला भेट दिल्यानंतरच मातीतून गाणाऱ्या चैतन्याची अनुभूती तुम्हाला मिळेल. तसेच अनेक निसर्गप्रेमी मित्रांची मैत्री तुम्हाला कायम चैतन्य देत राहील.



श्रीधर खेडगीकर
भ्र.९४२३५३६०८४






# रायझिंग सोलापूर ज्ञानाच्या क्षितिजावर...

# शैक्षणिक क्षेत्रातील संधी व आव्हाने








डॉ. विजयकुमार उबाळे

भ्र. ९४२३५३५४४५


भीमा आणि सीना या व इतर नद्या जिल्ह्यातून वाहतात. उजनी धरण हे सिंचन व पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ऊस, ज्वारी, डाळिंब यांसारखी पिके येथे मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. आज फलोत्पादन, कृषिप्रक्रिया उद्योग, शिक्षण, आरोग्यसेवा आणि कापड उद्योग या क्षेत्रांत जिल्ह्याच्या विकासाची क्षमता आहे. या सर्व बाबी सोलापूरच्या विविध अंगी विकासासाठी पूरक आहेत.

ब्रिटिश काळात सोलापुरात शिक्षणाचा पाया रचला गेला. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक शाळा व वाचनालये स्थापन झाली. १९८४ सालापासून शिवाजी विद्यापीठाचे सोलापुरात पदव्युत्तर अध्ययन केंद्र कार्यरत होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे व उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रयत्नातून एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठ १ ऑगस्ट २००४ रोजी स्वतंत्र अस्तित्वात आले. डॉ. इरेश स्वामी हे विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाला १०० हून अधिक पारंपारिक, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माण अशा प्रकारची वरिष्ठ महाविद्यालये संलग्नित आहेत.

सोलापुरात खाजगी विद्यापीठ एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ असून येथे अभियांत्रिकी, व्यवस्थापन व डिझाईनचे शिक्षण दिले जाते. पारंपरिक अभियांत्रिकी शाखांबरोबरच एआय व मशिन लर्निंगसारखे नवीन अभ्यासक्रमही सुरू झाले आहेत. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनचे रूपांतर शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था, सोलापूर या संस्थेत करण्यात आले. यातून सोलापूरची तांत्रिक शिक्षणातील वाटचाल आधुनिक दिशेने होत असल्याचे दिसते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरात आयटी पार्क उभारण्याची घोषणा केली, होटगी येथील २० हेक्टर जागा हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प सोलापूर जिल्ह्याला महाराष्ट्राचे नवे आयटी डेस्टिनेशन बनवण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल असे वाटते.

गिरणगावाच्या ऱ्हासातून उदयास आलेला यंत्रमाग–हातमाग – सोलापुरी चादर उद्योग आजही टिकून आहे. त्याला शिक्षण, वैद्यकीय, आयटी, लॉजिस्टिक व सेवा क्षेत्रांची जोड मिळाली तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ती सोलापूरचे एक आधुनिक शहर म्हणून ओळख निर्माण करेल अशी अपेक्षा आहे. हे साध्य करण्यासाठी उच्च शिक्षणाच्या आधुनिक सुविधा, नामांकित शिक्षण संस्था व विद्यापीठे तसेच आंतरराष्ट्रीय विद्यापीठे स्थापन होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासनाने मुंबई व नवी मुंबई येथे एज्युसिटी आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे स्वतंत्र कॅम्पस उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला असून, हा भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान ठरेल. ज्यामध्ये एकाच कॅम्पसमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठे जसे की स्कॉटलंड, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, अमेरिका व इटली सहभागी होणार आहेत. यासाठी हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक केली जात आहे. याच धर्तीवर सोलापुरात उपक्रम राबवणे योग्य ठरेल.

सोलापूरला मेडिसिटी बरोबरच एज्युसिटी अशी दुहेरी ओळख निर्माण होणे गरजेचे आहे. सध्याच्या परिस्थितीत सोलापूर मध्ये वैद्यकीय उपचार घेण्यासाठी आंध्रप्रदेश, कर्नाटक, उर्वरित महाराष्ट्र असे अनेक ठिकाणाहून रूग्ण उपचारासाठी येत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे गुणवत्तापूर्ण उपचार तसेच उपचारासाठी येणारा मर्यादित खर्च. याबाबी लक्षात घेऊन आज सोलापूर शहरात असणारी वैद्यकीय महाविद्यालये, पॅरामेडिकल महाविद्यालये यात आणखीन वाढ होणे गरजेचे आहे. फक्त शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होऊन चालणार नाही तर या क्षेत्रामध्ये आवश्यक तांत्रिक कौशल्य असणारे गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडवणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महाविद्यालयांत पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षक व डिजिटल संसाधनांची उपलब्धता शहरी भागाच्या तुलनेत कमी असल्याने समान संधीचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होत नाही. तथापि सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, अकलूज, सांगोला यासारख्या ग्रामीण ठिकाणी सुद्धा शैक्षणिक संस्था उच्च शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–** २०२० अंतर्गत देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५० टक्के पर्यंत नेण्याच्या उद्दिष्टातून जागतिक दर्जाचे शिक्षण सोलापूरमध्ये उपलब्ध करून देण्याच्या दिशेने उचललेले तर ते महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

सोलापुरातील संस्थांना गुणवत्ता, संशोधन, सुविधा व आंतरराष्ट्रीय संलग्नतेच्या बाबतीत मागे राहण्याचा धोका आहे. प्रतिभावान विद्यार्थी मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होण्याची कल वाढत आहे. शासकीय वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या इतर मोठ्या शहरांच्या तुलनेत मर्यादित असल्याने विशेष अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना अजूनही स्थलांतर करावे लागते.

सोलापूर हे प्राचीन काळापासून व्यापारी, सांस्कृतिक केंद्र व चळवळींचे शहर म्हणून ओळखले जाते. सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी लि. ने सोलापुरातील पहिली कापडगिरणी सुरू करून वस्त्रोद्योगाचा पाया रचला. पूर्वी शहरात सहा कापड गिरण्या उभारल्या गेल्या, त्यामुळेच सोलापूरला गिरणगाव ही ओळख मिळाली. त्यावेळेस हजारो कामगार या कापड गिरण्यांमध्ये काम करत होते. कालांतराने जुनी यंत्रसामग्री, तंत्रज्ञान अद्ययावत न करणे आणि व्यवस्थापनाचा दृष्टिकोन यामुळे कापडगिरण्या एकामागोमाग एक बंद पडल्या. त्यावेळेस घरगुती यंत्रमागावर सोलापुरी चादरीच्या उत्पादनाचा उदय झाला. ज्यात तेलुगू भाषिक समाजाचे मोठे योगदान आहे. अशा प्रकारे केंद्रीकृत गिरणी- उद्योगाचे रूपांतर पॉवरलूम व हातमाग उद्योगात झाले, ज्यातून जगप्रसिद्ध सोलापुरी चादरी व टॉवेल निर्माण होऊ लागले.

पारंपरिक वस्त्रोद्योगाला आधुनिक कौशल्यांची जोड देणारे विशेष अभ्यासक्रम जसे टेक्सटाइल इंजिनिअरिंग, डिझाइन राबवणे योग्य ठरेल.

सोलापुरी चादर– टॉवेल उद्योगाला जोडून तंत्रज्ञानातील विशेष आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सुरू करून स्थानिक उद्योग व जागतिक शिक्षण यांची सांगड घालणे योग्य होईल. त्यामुळे स्थानिक उद्योगाला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करता येईल.

धार्मिक ठिकाणे श्रीक्षेत्र पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूरसारख्या तीर्थक्षेत्रांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यटन ओघाचा फायदा घेत आध्यात्म, भारतीय संस्कृती व वारसा अभ्यासासाठी खास आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम जसे भारतविद्या (भारतीय इतिहास, संस्कृती, भाषा आणि साहित्याचा अभ्यास करणारी विद्याशाखा), ऐतिहासिक वारसा संशोधन (सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक वास्तू आणि परंपरांचे जतन यांचा अभ्यास) सुरू करता येतील, जे परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे युनिक सेलिंग पॉइंट ठरू शकतात.

सोलापूरचे बहुभाषिक व बहुसांस्कृतिक वैविध्य ही केवळ सामाजिक बाब नसून ती एक शैक्षणिक भांडवल आहे. भाषांतरशास्त्र, सीमावर्ती अभ्यास, सामाजिक सलोखा, संशोधन आणि बहुभाषिक व्यावसायिक कौशल्य यांसारख्या क्षेत्रांत विशेष अभ्यासक्रम सुरू केल्यास सोलापूर विद्यापीठाला एक वेगळी ओळख मिळू शकते. या दृष्टीने सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकसित करण्यासाठी पूरक कोर्सेस राबवत आहे. ती जमेची बाजू आहे. जी इतर एकभाषिक शहरांना सहज शक्य नाही.

ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जाणारा सोलापूर जिल्हा आज द्राक्षे, डाळिंब, केळी सारख्या फळबागा, साखर कारखानदारी या बळावर एक बहुआयामी कृषी– अर्थव्यवस्था म्हणून उभा आहे. उच्च शिक्षणामध्ये सिंचन व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञानाधारित शेती आणि ब्रँडिंग यांची सांगड घातल्यास शेती व बागायती क्षेत्र भविष्यातील औद्योगिक व आर्थिक विकासास पूरक ठरेल. याच बरोबर इथेनॉल निर्मितीसारख्या उपपदार्थ उद्योग, गृहउद्योग यांना चालना देणारे अभ्यासक्रम उपलब्ध करून दिल्यास आर्थिकस्तर वाढविण्यास कारणीभूत ठरतील.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांना नॅक, नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) यासारख्या राष्ट्रीय मानांकनांत उच्च स्थान मिळवण्यासाठी संशोधन, प्रकाशने व पायाभूत सुविधांत गुंतवणूक वाढवावी लागेल.

परदेशी विद्यापीठांसोबत सामंजस्य करार, विद्यार्थी–शिक्षक देवाणघेवाण कार्यक्रम व संयुक्त पदवी अभ्यासक्रम सुरू करून आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करावे लागतील. गुणवत्ता व मानांकनावर भर द्यावा लागेल. आंतरराष्ट्रीय कॅम्पस येण्यापूर्वी हे साध्य करावे लागेल.

उद्योग–रोजगार साखळी मजबूत करणे, आयटी पार्क व नव्याने येणाऱ्या कंपन्यांमुळे पदवीधरांना स्थानिकच रोजगार मिळाल्यास ब्रेन ड्रेन थांबून प्रतिभावान विद्यार्थी सोलापुरातच राहतील, हाच स्थानिक गुणवत्तेचा पाया पुढे आंतरराष्ट्रीय संस्थांना आकर्षित करेल. तथापि सोलापूरला आंतरराष्ट्रीय शैक्षणिक हब बनण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधांचा विस्तार, सुरू झालेली विमानसेवा आंतरराष्ट्रीय व बहुविध शहरांशी जोडणीपर्यंत विस्तारावी लागेल.

परदेशी विद्यार्थ्यांना सुलभ प्रवेश, आंतर्राष्ट्रीय दर्जाच्या वसतिगृहाच्या, जेवणाच्या सोयी– सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. आयटी क्षेत्रातील कार्यरत होणारे तरुण, शिक्षणासाठी बाहेरगावाहून येणारे विद्यार्थी, पालक यांच्यासाठी वीकेंडला पर्यटनाची सोय अथवा डेस्टिनेशन्स निर्माण करावी लागतील. याच धर्तीवर दमाणी परिवाराने जामश्री रियालिटी लिमिटेडच्या माध्यमातून एक वेगळ्या प्रकारचं हब तयार केलेले आहे. ते लहान मुलापासून, तरुण, मध्यमवयीन, जेष्ठ, पुरुष व महिलांना आपल्या हबमध्ये खेचून घेण्यात यशस्वी झाले आहेत. काम, खाद्य, खेळ, मनोरंजन, स्ट्रीट फूड, किराणा, कपडे व इतर सर्व गरजेचे सामान खरेदी करण्याची सुविधा, हे दूरदृष्टीतू साकारलेले स्वप्न आहे.

आयटी पार्कच्या धर्तीवर एज्युसिटी किंवा शैक्षणिक टाऊनशिप विकसित करणे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कॅम्पस व संशोधन सुविधा एकत्र असतील, याकरिता धोरणात्मक व प्रशासकीय पातळीवर प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या मुंबई रायझिंग उपक्रमाप्रमाणे–

रायझिंग सोलापूर साठी प्रस्ताव तयार करून राज्य व केंद्र सरकारकडे विशेष आर्थिक तरतूद व जमीनीसाठी पाठपुरावा करावा लागेल. उद्योजक, गुंतवणूकदार व परदेशी संस्थांना कार्यक्षम प्रशासनाचा विश्वास हवा असतो.

सोलापूरला आंतरराष्ट्रीय शैक्षणिक हब बनवण्यासाठी टप्प्याटप्प्याने पायाभूत सुविधा, धोरणात्मक पाठबळ, स्थानिक बलस्थानांवर आधारित विशेष अभ्यासक्रम आणि गुणवत्तापूर्ण मानांकन याद्वारे पाया मजबूत करणे आवश्यक आहे, जेणेकरून मुंबई–पुण्यानंतर सोलापूर हे राज्यातील पुढचे विश्वासार्ह शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास येईल.

येणाऱ्या काळात सोलापूरची शैक्षणिक, वैद्यकीय व औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करायची असेल तर सर्व स्तरावरून विशेषता: उद्योजक, गुंतवणूकदार, राजकारणी, प्रशासकीय व समाजातल्या विविध घटकांकडून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उत्सवाचे शहर अशी ओळख असणाऱ्या सोलापूरला रायझिंग सोलापूर कडे मार्गक्रमण करणे गरजेचे आहे.

**(लेखक दयानंद शिक्षण संस्था, सोलापूरचे माजी प्राचार्य व प्रशासक आहेत.)**



# श्री सदगुरु प्रभू अण्णा महाराज, श्रीक्षेत्र संगेवाडी







संस्कार महाराज खंडागळे

भ्र. ९८९००८४०२३


जगाच्या पाठीवर भारत भूमी ही देवभूमी व संत भूमी म्हणून ओळखली जाते. जगामध्ये सर्वात जास्त संत आशिया खंडात आहेत. आशिया खंडामध्ये सर्वात जास्त संत भारत देशात आहेत. व भारत देशामध्ये सर्वात जास्त संत महाराष्ट्रात आहेत म्हणून महाराष्ट्राची भूमी ही संतभूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज असे अनेक संत महाराष्ट्रामध्ये अवत्तीर्ण झाले. तसेच सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील सांगोला– पंढरपूर रस्त्यावर श्री क्षेत्र संगेवाडी येथे महान संत श्री सदगुरु प्रभू अण्णा महाराज यांची संजीवनी समाधी मंदिर आहे.

श्री प्रभू अण्णा महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर एक मोठी ऊर्जा मिळते. पूर्वीचे लोक तर नेहमी म्हणायचे की महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर अनेक लोकांचे असाध्य आजार दूर झालेली उदाहरणे आहेत. जुन्या काळामध्ये महामारीचे आजार साथीचे रोग यायचे त्यावेळेला महाराजांच्या सानिध्यात जी लोक आली त्यापैकी एक ही माणूस कोणत्याही रोगाने दगावला गेला नाही.

प्रापंचिक अडचणी असो किंवा इतर कुठल्याही अडचणी समस्या असो प्रत्येक गुरुवारी व अमावस्येला प्रभू अण्णा महाराजांच्या आरतीला उपस्थित राहून प्रसाद घेतल्यानंतर दर्शन घेतल्यानंतर बऱ्याच पैकी अडचणी निवारण होत असतात असे ग्राम स्थांचे मत आहे.

श्री प्रभू अण्णा महाराजांचा जन्म मंगळवेढा या ठिकाणी वैश्य कुळामध्ये झाला. महाराज लहान असतानाच शंकराची भक्त आणि अखंड शिव ध्यान करण्यात मग्न राहायचे. महाराज फिरत फिरत संगेवाडी या गावात आले. हे संगेवाडी गावकऱ्यांचा फार मोठे भाग्य म्हणावं लागेल. कारण संत ज्या ठिकाणी ज्या गावांमध्ये थांबत असतात त्या गावचा उद्धार पिढ्यानपिढ्या होत असतो. संगेवाडी गावातील व पंचक्रोशीतील बरेच लोक महाराजांच्या सानिध्यामध्ये येऊन आपल्या संसारातली दुःख दूर करू लागली. प्रभू अण्णा महाराज उपदेश करायचे तुम्ही परमार्थ करा, देवाची भक्ती करा, संसारावर मोह ठेवू नका. परोपकारी बना, कुणाची चोरी करू नका, निंदा करू नका, मि करतो असं नेहमी म्हणू नका हे सर्व देवाचे आहे. आपण ह्या जगामध्ये क्षणासाठी आलेलो आहोत. कित्येक लोक महाराजांच्या सांगण्यावरून परमार्थिक मार्गाला लागले. ६५ वर्ष निघून गेली आणि महाराजांच्या लक्षात आलं की आता आपण आपलं कार्य थांबवलं पाहिजे. मलाही माझा अवतार संपवायचा आहे असा संदेश संगेवाडी ते लोकांना देऊ लागले. लोक रडू लागले. गुरुवारचा दिवस दुपारची वेळ भाद्रपद मास शके १८३७ प्रभू अण्णा महाराज वैकुंठाला गेले. अफाट जन समुदाय त्या ठिकाणी जमा झाला.

त्यानंतर भक्ताने समाधीची स्थापना केली. आज ही प्रभू अण्णा महाराज अदृश्य असूनही दृष्टांत देत राहतात. जो भक्त श्रद्धा विश्वासाने या ठिकाणी सेवा करतो त्यांच्या जीवनामध्ये प्रभू अण्णा महाराज त्यांचा उद्धार करत असतात हे हजारो लोकांचे अनुभव आहेत. (समाज प्रबोधनकार)



# सोलापूरचा विकास: काही खास, काही ऱ्हास

सोलापूर शहर गेल्या पंचवीस- तीस वर्षांत आमूलाग्र बदल झालेला आपणास दिसून येतो. पूर्वी रस्त्याची अवस्था खूपच बिकट होती. परंतु आज पाहिले तर शहरातील अनेक ठिकाणचे रस्ते चांगले झाले आहेत. सोलापूरला स्मार्ट सिटीचा दर्जा मिळाल्याने मुख्य रस्ते हे सुबक आणि गुळगुळीत झालेले आहेत. अंतर्गत रस्तेही तसे चांगले झाले आहेत. त्यामुळे कोणत्याही गल्लीतून कोणत्याही गल्लीत प्रवेश केला तरी वाहनधारकांना त्रास होत नाही. वाहनांची संख्याही त्या मानाने खूप वाढली आहे. त्यामुळे हे रस्ते खूप कमी पडत आहेत. त्यामुळे रस्त्यांवर गर्दी आणि वर्दळ दिसते. चौकाचौकांत सिग्नलची व्यवस्था असल्याने वाहनांनाही आता शिस्त लागल्याचे पहावयास मिळते.

शहराच्या हद्दवाढीत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. पुणे रोड, विजापूर रोड, बार्शी रोड, तुळजापूर रोड, हैद्राबाद रोड, मंगळवेढा रोड येथील छोटी छोटी खेडी आता शहरात आलेली आहेत. खेडी व तेथील शेती ही शहराने गिळंकृत केलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी मोठमोठ्या इमारती बांधल्या गेलेल्या आहेत. सोलापूर शहरांच्या मध्यवर्ती भागात आणि हद्दवाढ भागात अनेक मोठमोठ्या इमारतींनी जन्म घेतलेला आहे. या बहुमजली इमारतींमुळे सोलापूरची आता मोठ्या शहरात गणना होऊ लागली आहे. बहुमजली अत्याधुनिक घरांमुळे शहराच्या सौंदर्यात आणखी भर पडलेली आहे.

शहरात अनेक थ्री स्टार, फोर स्टार, फाईव्ह स्टार हॉटेल्स निर्माण झाली आहेत. त्यामुळे अतिमहत्त्वाच्या राजकीय, साहित्यिक, चित्रपट, नाट्य क्षेत्रातील व्यक्तींसाठी राहाण्याची उत्तम व्यवस्था झालेली आहे. खव्वयांच्या मागणीप्रमाणे अनेक हॉटेल्सनी आपली रचना बदललेली आहे. वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस आणि इतर आनंदाच्या क्षणासाठी आता हॉटेलमध्ये जेवण करण्याचा ट्रेंड निर्माण झालेला आहे. त्यानुसार आपापले खास वैशिष्ट्ये असलेली अनेक हॉटेल्स गर्दी खेचत आहेत. महामार्गावरील अनेक हॉटेल्समुळे शहरवासीयांची आणि प्रवाशांची चांगलीच सोय झालेली आहे. किराणा दुकान ही संकल्पना नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्याची जागा डी मार्ट, सुपर बझार अशा भव्य दुकानांनी घेतलेली आहे. एकाच छताखाली हवी ती वस्तू तात्काळ मिळत असल्याने लोकांची किराणा दुकानातून किराणा माल खरेदी करण्याच्या मानसिकतेत बदल होत आहे. कापडाच्या दुकानेही आता मॉलच्या स्वरूपात अवतरत आहेत. अत्याधुनिक सुविधांनी युक्त अशा दुकानांकडे एकाच वेळी अनेक कपड्यांचे प्रकार पहावयास मिळत असल्यामुळे लोक तिकडे आकर्षीत होत आहेत.

पूर्वी एखाद्याच्या घरासमोर कार लावलेली दिसत असायची. आता मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोकांच्या प्रत्येक घरासमोर कार दिसते. याशिवाय दुचाकी वाहाने वेगळी. त्यामुळे हा वर्ग आता सुखसंपन्नतेत मोडला जात आहे. गरिबात गरीब घरीसुद्धा आता सायकलऐवजी मोटार सायकल दिसून येते. मोबाईलच्या आगमनामुळे माणसाच्या जीवनशैलीत अमुलाग्र बदल झालेला आहे. ती आता माणसाची अत्यावश्यक गरज झाली आहे. साहजिकच आता मोबाईल विक्री आणि दुरुस्तीच्या दुकानात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. चौपाडात आता एक मोबाईल गल्लीच स्थापन झालेली आपणास पहावयास मिळते. पूर्वी चौकात एखादा भेळ व कचोरीचा गाडा असायचा. पण आता जागोजागी भेळ, कचोरी, पाणीपुरीची दुकाने उभी असतात. त्यात आता चाईनीज, पावभाजी अशा दुकानांचाही समावेश झालेला आहे. लोकांचा बाहेरचा खाण्याचा कल पाहाता आता भेळ, पावभाजी, पाणीपुरी यांची कायमस्वरूपी दुकानेही उपलब्ध होत आहेत. अनेक हॉटेलांमध्ये इडली, वडा, पुरीभाजी, शिरा, उपीट, ऑम्लेट, द्राशी असे गरमागरम खाद्यपदार्थ मिळण्याची हॉटेले तयार झाल्यामुळे खवय्यांची तिकडे झुंबड उडत असल्याचे आपणास पहावयास मिळते. सोलापूरच्या नव्या पेठेचे पूर्णपणे बदल झालेला आहे. मोठमोठी अनेक मजली दुकाने तेथे निर्माण झालेली आहेत. तेथे सुईपासून ते साडीपर्यंत अनेक वस्तू आपल्याला विकत घेता येतात. अनेक वातानुकूलित सोन्या- चांदीची अद्ययावत दुकानांची निर्मिती झाली आहे. त्यामुळे सोने- चांदी खरेदी करण्यास सुलभता प्राप्त झालेली आहे.



राजेंद्र भोसले
भ्र.-९८८१७८६४६६

सोलापूर हे शहर अक्कलकोट, पंढरपूर, तुळजापूर या देवस्थानाच्या अग्रभागी असल्याने पर्यटकांची गर्दी वाढत आहे. त्याचा फायदा सोलापुरातील लॉज व्यवसायिक, ट्रॅव्हल्स यांना होत आहे. अक्कलकोट येथील स्वामी समर्थ, पंढरपूर येथील श्री. विठ्ठल व तुळजापूर येथील भवानी मातेचे दर्शन घेता घेता सोलापूरच्या सिद्धरामेश्वराचे दर्शन घेण्याची भक्ताची इच्छा होतेच.

आत्ताचे धावपळीचे जग आणि ताणतणावाच्या जगात माणूस शांतता शोधण्यासाठी देवाच्या दारी आवर्जून येत आहे. त्यामुळे प्रत्येक देवस्थानाची गर्दी वाढत चालली आहे. सोलापूर हे चादरीसाठी जगप्रसिद्ध आहे. सोलापुरात दाखल झालेला पर्यटक सोलापुरी चादर खरेदी केल्याशिवाय जात नाही. त्यामुळे पूर्व विभागातील चादरीच्या दुकानात चादर, टॉवेल, बेडशीट घेण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडते. एकंदर पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचे सोलापूर आणि आत्ताचे सोलापूर यांची तुलना केली तरी सोलापूरचा विकास खूपच झाल्याचे दिसते.

रस्ते, इमारती, हॉटेल्स यांनी सोलापूर गजबजून गेल्याचे दिसते. रात्रीच्या दिव्यांच्या झगमगाटात सोलापूरचे सौंदर्य उजळून दिसत असल्याच आपणास पहावयास मिळते. पूर्वी कांही ठरावीक हॉस्पिटलमध्ये उपचार चालायचे. आता अनेक नवी अद्ययावत हॉस्पिटले निर्माण झालेली आहेत. अत्याधुनिक यंत्रणा उभी करण्यात आलेली आहे. मानवी शरीराच्या कोणत्याही अवयवासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची वानवा राहिलेली नाही. अनेक सहकारी आणि खासगी हॉस्पिटलमध्ये तेथे आधुनिक उपचार होत आहेत. त्यासाठी लागणार्या आवश्यक मशीन्सही आता आल्या आहेत. कांही अपवाद वगळता कोणत्याही शस्त्रक्रियेसाठी पुणे, मुंबई येथे जावे लागत नाही. अवघडात अवघड शस्त्रक्रिया आता सोलापुरात होत आहेत. मेडिकलची दुकानेही चोवीस तास चालू असतात. ॲम्ब्युलन्स सेवाही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

सोलापूर स्टेशनवरून अनेक एक्सप्रेस गाड्या सुटतात. रेल्वे स्टेशनही सुधारीत झालेले आहे. तेथील स्वच्छता आणि वक्तशीरपणा यामुळे हे स्टेशन आता सोलापूरचे आशास्थान झाले आहे. या रेल्वे स्थानकावरून हुतात्मा एक्सप्रेस, वंदे भारत एक्सप्रेस अशा खास सुटत असल्याने सोलापूरकरांना पुणे- मुंबईला जाणे सोईचे झाले आहे. विमानसेवाही नुकतीच सुरू झाली आहे. ज्या शहराचे दळणवळण सोईचे असते त्या शहराचा विकासही वेगाने होत असतो. सोलापूरच्या विकासात रेल्वेनेही मोठा हातभार लावलेला आहे. सोलापुरात पोलीस आयुक्त कार्यालय असल्याने लोकांना सुरक्षेचा अनुभव येत आहे. वारंवार पोलीस गाड्या गस्त घालतात. प्रत्येक चौकात ट्रॅफिक पोलीस वाहनांना शिस्त लावताना दिसतात. त्यामुळे शहरवासीयांना सुरक्षिततेचा अनुभव येताना दिसतो.




सोलापुरात अनेक सांस्कृतिक सभागृह आहेत. हुतात्मा स्मृती मंदिर, डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, लोकमान्य टिळक सभागृह, शिवस्मारक सभागृह अशा सभागृहातून अनेक साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अनेक शाखा उदयास आलेल्या आहेत. साने गुरुजी कथामाला, सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच, तेलुगू मराठी साहित्यिक मंच, नाट्य परिषद अशा अनेक संस्था आपल्या परीने विविध उपक्रम आयोजित करत असते. ग्रंथ पुरस्कार, व्याख्याने, कविसंमेलने, कथाकथन, नाटक यांच्या माध्यमातून समाजप्रबोधन सातत्याने चालू असते. खरेतर बाह्यांगाने सोलापूरचा विकास खूप झालेला आहे. अजूनही होत आहे. परंतु हा विकास म्हणजे परिपूर्ण विकास आहे का? की ही विकासाची सूज आहे? एखादे बाळ आतून धष्टपुष्ट दिसते पण त्याचे आरोग्य आतून चांगले आहे, असे म्हणता येणार नाही. कांही नकारात्मक बाबींनाही सोलापूर तोंड देत आहे, हे नाकारून चालणार नाही. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत शहर अजूनही असंतुष्ट आहे.

सोलापूरची लोकसंख्या वेगाने वाढत असल्याने पाण्याची गरजही वाढत आहे. अनेक हॉटेल्स, लॉजेस, बिल्डर्स हे पाणी मोठ्या प्रमाणावर वापरत आहेत. सामान्य माणसाची मात्र त्रेधातिरपीट उडत आहे. चार-पाच दिवसांतून एखादा दिवस पाणी येते. ते पाणी एका कुटुंबासाठी पुरत नाही. त्यामुळे त्या पाण्याचा साठा करावा लागतो. गृहिणींना जागरण करावे लागते. पुण्या- मुंबईसारख्या शहरात चोवीस तास पाणी असते. पण सोलापुरात नियमितपणे का पाणी येत नाही? हा प्रश्न सोलापूरकरांसाठी अनुत्तरित आहे. सोलापूरचा हा पाणीप्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आता गरज निर्माण झाली आहे.

सोलापुरातील मिल्स बंद होऊन अनेक वर्षे झाली. सोलापूरचे खरे वैभव गेले. सोलापूरचे कांही चादर कारखाने आंध्रात स्थलांतरित झाले. त्यामुळे सोलापूरचे आर्थिक स्रोत मात्र हरवलेले आपणास दिसत आहे. सोलापुरातील अनेक युवक पुणे, बेंगलोर, मुंबई येथे काम करण्यासाठी जातात. त्यामुळे सोलापूर भावी पिढीस रोजगार आणि नोकर्या देण्यास शहर कमी पडत आहे. मुलं परगावी नोकरीस गेल्यामुळे सोलापुरात आता फक्त वृद्ध मंडळी वास्तव्यास उरलेली आहेत. कांही खासगी बँका, संस्था तरुणांना काम देतात पण ते वेतन तुटपुंजे असते. त्यात त्याच्या प्राथमिक गरजाही भागत नाहीत. त्यामुळे तरुण पिढी दिशाहीन होत आहे.

शहरात जसा विकास झाला तशी ठरावीक मंडळी श्रीमंत झालेली दिसून येतात. त्यांच्यात चंगळवादी संस्कृती बाळसे धरत आहे. सोलापुरात जशी इतर दुकाने वाढली तशीच परमिट रूम, बिअर शॉपी, वाईन शॉप अशा दुकानांची संख्याही वाढलेली आहे. कोणत्याही दुकानात माल खरेदी करण्यासाठी रांग लागत नाही, पण दारू खरेदी करण्यासाठी मात्र रांगा लागत आहेत. डान्स बारची संख्याही कमी नाही. तरुण पिढी ही व्यसनाकडे ओढली जात असून त्यांच्या आयुष्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे रस्ते कमी पडत आहेत. त्यामुळे रस्त्यावर रहदारी कमालीची वाढली आहे. स्त्रिया, लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांना रस्त्याने चालणेही जिकरीचे होऊ पाहात आहे. त्यामुळे छोटेमोठे अपघात नेहमी घडत आहेत. वाहने उभी करण्यासाठी जागा कमी पडत असल्यामुळे दुकानासमोर उभ्या केलेल्या वाहनांच्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

सोलापूरची प्रगती केवळ बाह्यांगाने होऊन चालणार नाही. अंतरंगानेही होणे गरजेचे आहे. केवळ इमारती झाल्या, रस्ते झाले, हॉटेल्स झाली, मॉल्स निर्माण झाले पण खरेदी करण्यासाठी लोकांजवळ पैसा येण्याची स्रोते मात्र अगदीच तोकडी आहेत. तरुणांच्या हाताला काम नाही. त्यामुळे त्यांच्या नैराश्य आणि व्यवसनाधिनता येत आहे. महानगरपालिकेकडून पाण्यासारख्या मूलभूत गरजेवर समाधानकारक तोडगा निघत नाही. त्यामुळे सोलापूरचा खरोखरच विकास झाला का? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहात नाही. केवळ स्मार्ट सिटी असा उल्लेख केला म्हणजे माणसाचे जीवन स्मार्ट होणार आहे का? असे अनेक प्रश्न अनुत्तरितच राहातात.



# गिरणगावाच्या विकासाचा मूक शिल्पकार: अस्सल कष्टकरी

## इथे सोलापुरी कष्टाची दिवाळी फुलते!

**दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि समृद्धीचा सण. पण ज्यांच्या घराचा जमाखर्च हा नेहमीच तारेवरची कसरत असतो, अशा कुटुंबप्रमुखांसाठी हा सण एक मोठी परीक्षाच घेऊन येतो. मुलांचे नवे कपडे, कारभारणीने दिलेली किराणा सामानाची लांबलचक यादी आणि मर्यादित उत्पन्न, अशा परिस्थितीत सोलापूरच्या एका कष्टकरी हाताने यावर एक स्वाभिमानी तोड काढली- ती म्हणजे पूरक उद्योगाची!**

डॉ. श्रीकांत कामतकर
सोलापूर

गोष्ट केवळ एका व्यक्तीची नाही, तर सोलापूरच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाचा खरा पाया रचणाऱ्या लाखो कामगारांच्या सोलापुरी कष्टाची आणि जिद्दीची आहे. एकेकाळी सोलापूरच्या कामगारांवर सरसकट आळशीपणाचा किंवा कामचूकारपणाचा शिक्का मारण्याचा एक चुकीचा प्रघात पडला होता. परंतु, हा शिक्का प्रामाणिक, कष्टकरी आणि राबणाऱ्या हातांवर अन्याय करणारा आहे, हे मी कामगारांचा डॉक्टर म्हणून आलेल्या अनुभवावरून खात्रीपूर्वक सांगू शकतो.

अनेक वर्षांपूर्वी तापाने फणफणलेल्या अवस्थेतही, खूप समजावून सांगूनसुद्धा रजा न घेता, रुग्णालयात डमिट न होता केवळ औषधे खिशात टाकून कामावर जाणारे विजयकुमार चव्हाण माझ्या आजही चांगले लक्षात आहेत.

### शून्यातून उभारलेला स्वाभिमानी प्रवास

आज वय वर्षे ७४ असलेल्या विजयकुमार यांचा जीवनप्रवास म्हणजे सोलापूरच्या संघर्षाचा जिवंत इतिहास आहे. बालपण अतिशिया खडतर गेले. गरिबीमुळे केवळ सातवीपर्यंतच शिक्षण होऊ शकले. वयाच्या १४-१५ व्या वर्षी पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांनी एका लॉजमध्ये हरकाम्या म्हणून काम करायला सुरुवात केली. तिथे मिळणाऱ्या पैशांमधून त्यांनी स्वतःसाठी पहिली शतरंजी आणि चादर घेतली, तीही हप्त्या- हप्त्याने! वयाच्या १८ व्या वर्षी ते सोलापूरच्या एनजी मिलमध्ये कामगार म्हणून रुजू झाले. तेव्हा त्यांचा पहिला पगार होता महिना ४५ रुपये! पुढे २००२ मध्ये जेव्हा ते सेवानिवृत्त झाले, तेव्हा त्यांचा पगार ३,६०० रुपये इतका. या प्रवासात त्यांनी कधीही कामावर खाडा केला नाही. मिल सुटल्यावर घरी आल्यावर त्यांनी जोडव्यवसाय केला. या तुटपुंज्या उत्पन्नात आणि अपार कष्टातून त्यांनी आपल्या दोन मुलांचे आणि एका मुलीचे उत्तम शिक्षण केले, स्वतःच्या कष्टाने हक्काचे घरही उभे केले. दारू, जुगार यांसारख्या सर्व व्यसनांपासून मैलोनमैल दूर राहून, त्यांनी फक्त एकच व्यसन जो? ते म्हणजे कष्टाचे!

### सोलापूरच्या विकासाशी जोडलेली नाळ

विजयकुमार यांच्यासारख्या लाखो कामगारांनी रात्रंदिवस गिरण्यांमध्ये घाम गाळला, म्हणूनच सोलापूरला एकेकाळी भारताचे मँचेस्टर म्हणून ओळखले गेले. जेव्हा मोठ्या कापड गिरण्या बंद पडल्या, तेव्हा सोलापूरची अर्थव्यवस्था कोलमडेल अशी भीती व्यक्त केली जात होती. परंतु, येथील कष्टकऱ्यांनी हार मानली नाही. विजयकुमार यांनी सेवानिवृत्तीनंतरही शांत न बसता दसरा-दिवाळीत पूजा साहित्य, भाजी व फुले विक्रीचा पूरक व्यवसाय सुरू केला.



### पिढ्यांचा बदल आणि सामाजिक वीण-

मी जेव्हा विजयकुमार यांना त्यांच्या जुन्या आठवणी विचारत होतो, तेव्हा या या पहाडासारख्या कणखर माणसाच्या डोळ्यांतून नकळत अश्रू वाहत होते. आज त्यांची दोन्ही मुले आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत आणि त्यांना आराम करण्याचा सल्ला देतात. पण सोलापूरचा हा अस्सल कष्टकरी माणूस आराम करेल तो कसा? शरीराने थकले तरी मनाची उमेद अजूनही तरुणांना लाजवणारी आहे. या पहिल्या पिढीच्या कष्टातूनच सोलापूरची पुढची पिढी शिकली, मोठी झाली. आज गिरणी कामगारांची मुले विविध क्षेत्रात शहराचे नाव उज्ज्वल करत आहेत.

### जिथे राबती हात तेथे हरी!

शहराचा विकास म्हणजे केवळ सिमेंट- काँक्रीटचे रस्ते नव्हे, तर त्या शहरात राहणाऱ्या माणसांची स्वाभिमानी वृत्ती होय. सोलापूरचा खरा ब्रँड हा येथील कष्ट आणि प्रामाणिकपणा हाच आहे. जेष्ठ नागरिक असूनही तरुणांना स्फूर्ती देणाऱ्या विजयकुमार यांच्यासारख्या तमाम सोलापुरी कष्टकऱ्यांना माझा मानाचा मुजरा! सोलापूरचा नावलौकिक वाढवणारा हा कष्टकरी इतिहास कधीच विसरू शकणार नाही.

# कुटुंब नियोजनातून सुदृढ कुटुंब आणि निरोगी समाजाची निर्मिती

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, गर्भधारणेमध्ये किमान तीन वर्षांचे अंतर ठेवल्यास माता आणि बालकाचे आरोग्य अधिक चांगले राहते. योग्य वयात विवाह, नियोजित गर्भधारणा, सुरक्षित मातृत्व, संतुलित कुटुंब आणि स्त्री-पुरुष समानता या सर्व गोष्टी कुटुंब नियोजनाशी निगडित आहेत. त्यामुळे कुटुंब नियोजन हा प्रत्येक कुटुंबाच्या आरोग्याचा आणि विकासाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.



**भारतातील कुटुंब नियोजन चळवळीचा इतिहास**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशासमोर वेगाने वाढणारी लोकसंख्या हे मोठे आव्हान होते. प्रत्येक कुटुंबामागे सरासरी सहा अपत्ये, अपुऱ्या आरोग्य सुविधा आणि कमी आयुर्मान यामुळे विशेषतः महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी १९४९ साली समाजसेविका धनवंती रामाराव आणि अवाबाई बोमनजी वाडिया यांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (FP India) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली.

या संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५२) कुटुंब नियोजनाचा समावेश करण्यात आला. त्यामुळे राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला, ही देशासाठी अभिमानाची बाब आहे.




डॉ. गौरी के. कहाते

भ्र. ७८७५३१७६७३


**FP India चे कार्य**

आज FP India ही देशातील लैंगिक व प्रजनन आरोग्य हक्क (Sexual and Reproductive Health and Rights - SRHR) क्षेत्रातील अग्रगण्य स्वयंसेवी संस्था आहे. संस्था केवळ कुटुंब नियोजनापुरती मर्यादित नसून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असलेल्या आरोग्य सेवांसाठी कार्यरत आहे.

**संस्थेमार्फत खालील सेवा दिल्या जातात**

- आधुनिक गर्भनिरोधक साधने व समुपदेशन
- सुरक्षित गर्भपात सेवा
- सुरक्षित मातृत्व सेवा
- किशोरवयीन आरोग्य व जीवनकौशल्य शिक्षण
- लैंगिक संसर्गजन्य आजारांचे निदान व उपचार
- एचआयव्ही प्रतिबंध व समुपदेशन
- गर्भाशयमुख व स्तन कर्करोग तपासणी
- वंध्यत्व निवारण व उपचार
- लिंगाधारित हिंसाचारग्रस्त महिलांना मदत
- महिलांचे आरोग्य, पोषण व सक्षमीकरण

आज FP India देशातील १७ राज्ये आणि दिल्ली केंद्रशासित प्रदेशात कार्यरत असून दरवर्षी ३ कोटींपेक्षा अधिक लोकांपर्यंत विविध आरोग्य सेवा व जनजागृती उपक्रम पोहोचवत आहे. देशभरात संस्थेची ७० क्लिनिक्स, ८० मोबाईल क्लिनिक्स, १४८ डॉक्टर आणि ५४४ प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी सुमारे १.९९ कोटी आरोग्य सेवा दिल्या जातात.

**सुदृढ कुटुंब हीच सुदृढ समाजाची पायाभरणी आहे. या विचाराचा पाया म्हणजे कुटुंब नियोजन. कुटुंब नियोजन म्हणजे केवळ लोकसंख्या नियंत्रण नव्हे, तर प्रत्येक दांपत्याला आपल्या इच्छेनुसार आणि योग्य वेळेत अपत्यप्राप्तीचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, मातामृत्यू व बालमृत्यू कमी करणे, महिलांचे आरोग्य जपणे आणि कुटुंबाचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण साधणे हा त्यामागील व्यापक उद्देश आहे. त्यामुळे आजच्या आधुनिक युगात कुटुंब नियोजन ही आरोग्यदायी, समृद्ध आणि शाश्वत समाजव्यवस्थेची गरज बनली आहे.**

संस्थेच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत भारत सरकारने सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त स्मरणार्थ टपाल तिकीट प्रकाशित केले. तसेच २०२४ मध्ये हिरक महोत्सवानिमित्त मुंबई जीपीओने विशेष आवरण (Special Cover) आणि माय स्टॅम्प प्रकाशित करून संस्थेचा गौरव केला.

**सोलापूर शाखेचे कार्य**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा ही जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत विश्वासार्ह आरोग्य संस्था म्हणून कार्यरत आहे. भवानी पेठ येथील मुख्य कार्यालय तसेच बुधवार बाजार, जोड बसवण्णा चौक येथील पद्मावती क्लिनिकम धून नागरिकांना अत्यल्प दरात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

**येथे खालील सुविधा उपलब्ध आहेत –**



- स्त्री व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया
- सर्व प्रकारची कुटुंब नियोजन साधने
- १२ आठवड्यांपर्यंत सुरक्षित गर्भपात सेवा
- गर्भाशयमुख व स्तन कर्करोग तपासणी
- एच.पी.व्ही. लसीकरण
- वंध्यत्व तपासणी व उपचार
- एचआयव्ही व हेपेटायटिस तपासणी
- हिमोग्लोबिन, रक्तगट, शुगर, सीबीसी तपासणी
- विवाहपूर्व व वैवाहिक समुपदेशन
- किशोरवयीन मुलामुलींसाठी आरोग्य मार्गदर्शन
- मानसिक आरोग्य व कौटुंबिक समुपदेशन
- अल्प दरातील या सेवांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांनाही दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध होत आहेत.

**संपर्क**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा परमेश्वर कोळी समाज मंदिर, भवानी पेठ, दयानंद कॉलेज रोड, सोलापूर – ४१३००२

दूरध्वनी : (०२१७) २९९ ११२७

पद्मावती क्लिनिक, जन्नत कॉम्प्लेक्स समोर, रंगा चौक, बुधवार बाजारजवळ, जोड बसवण्णा चौक, सोलापूर – ४१३००२

दूरध्वनी : (०२१७) २९९ ०२२

## समाजाच्या वंचित घटकांसाठी विशेष उपक्रम

सोलापूर शाखा समाजातील सर्वाधिक वंचित व दुर्लक्षित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. ट्रक चालक, क्लिनर, ट्रान्सजेंडर समुदाय, एमएसएम, महिला लैंगिक कामगार, जोगवा मागणाऱ्या महिला, हातमाग कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, स्थलांतरित मजूर, ऊसतोड कामगार, दिव्यांग, अनुसूचित जाती-जमाती आणि इतर सामाजिकदृष्ट्या मागास घटकांसाठी संस्था विशेष कार्यक्रम राबविते.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यवसाय प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, जीवनकौशल्य प्रशिक्षण आणि स्वावलंबन कार्यक्रमही यशस्वीपणे राबविले जात आहेत.

## महत्त्वाचे प्रकल्प

सोलापूर शाखेमार्फत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रकल्प राबविले जात आहेत. त्यामध्ये SPRING Humanitarian Project, Flood Emergency Response Project, ललिता सर्वंकष प्रशिक्षण प्रकल्प, महिलांसाठी मोफत बेसिक कॉम्प्युटर कोर्स, अद्या एच.पी.व्ही. लसीकरण प्रकल्प, सर्वंकष लैंगिकता शिक्षण प्रकल्प, तसेच इेर्पीली च्या सहकार्याने ऊसतोड महिला कामगारांच्या प्रजनन आरोग्य व अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांना प्रतिबंध करणारा GROW (Gender Rights Opportunity Work Empowerment) प्रकल्प यांचा समावेश आहे.

ऑगस्ट २०२६ पासून International Planned Parenthood Federation (IPPF) आणि Levi Strauss Foundation यांच्या सहकार्याने गारमेंट उद्योगातील महिला कामगारांच्या प्रजनन आरोग्यासाठी नवीन प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

## आजची गरज – जबाबदार पालकत्व

आजच्या काळात कुटुंब नियोजन म्हणजे केवळ दोन मुलांवर थांबणे एवढीच संकल्पना राहिलेली नाही. निरोगी माता, निरोगी बालक, महिलांचे शिक्षण, आर्थिक स्थैर्य, लिंग समानता आणि कुटुंबाचे सर्वांगीण कल्याण यासाठी जबाबदार पालकत्व स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार मूल होण्याचा किंवा न होण्याचा अधिकार आहे. त्या निर्णयासाठी आवश्यक वैज्ञानिक माहिती, समुपदेशन आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. लहान कुटुंब- सुखी कुटुंब हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. कुटुंब नियोजन स्वीकारणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांसाठी निरोगी, सुशिक्षित आणि सक्षम भारत घडविण्याकडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.




(लेखीका फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (FP India), सोलापूर शाखेचे अध्यक्षा आहेत.)


---

# चक्रव्यूह

सवितासुद्धा राजेशवर खूप ताण-तणावात असायची. राजेश शाळा, कॉलेजमध्ये एवढा लोकप्रिय असताना आईसोबत एवढा तुटक - तुटक का राहतो, हे तिला कळायचं नाही. एक मात्र निश्चित होतं की, राजेशला वयाच्या आठ नऊ वर्षापासून तिनं जीवापाड जपलं होतं. राजेशसाठी ती वाट्टेल ती करायला तयार असायची. त्याला निवासी शाळेत घालतानासुद्धा तिची फार मोठी हतबलता होती. कारण राजेशचे वडील एक डॉक्टर होते. विनायकराव. त्यांना वाटायचं तिने तिचे आयुष्य परिपूर्णपणे जगावं. विनायकराव आणि सविताचा संसार हा तसा दोघांचा. राजाराणीचा संसार असायला पाहिजे होता. पण सविता राजेशमुळे वारंवार दुःखी, कष्टी असायची. सविताला राजेशसाठी खूप काही करायचं होतं. त्याचं भविष्य घडवायचं होतं. त्यासाठीच तिने विनायकरावांशी काही समझोता केला होता.

राजेशला बघता बघता पदवी मिळाली. राजेशचा मित्र शिवा दोघांनाही कॉलेजमधून 'मार्केटिंग एक्झिकेटिव्ह' म्हणून नोकरीही मिळाली होती. शिवाला वाटलं, राजेश शाळा, कॉलेज संपल्यावर एवढी वर्षे होतो तो सहवास संपणार. पण राजेशने स्वतःचे आईवडील पुण्यात असूनसुद्धा वेगळी खोली घेऊन राहण्याचा मनसुबा शिवाकडे बोलून दाखविला. शिवा हैराण झाला होता. असं काय आहे की, ज्यामुळं राजेश स्वतःच्या घरी जायला तयार नाही. शिवा जेव्हा जेव्हा विचारायचा तेव्हा राजेश एवढंच म्हणायचा, 'वेळ आली की मी सांगेन.' पण शिवा आता मात्र अस्वस्थ होता. मनाशी त्याने खूणगाठ बांधली, हे आपण शोधलंच पाहिजे. मित्र- मैत्रिणी शाळा, कॉलेजमधील लोकप्रिय असलेला राजेश कोणत्या गोष्टीमुळे एकांतात रमतो. पुण्यामध्ये दोघे भाडे तत्त्वावर फ्लॅट घेऊन आपली नोकरी सुरू करतात. बॅचलर लाईफ म्हणजे मजाच. त्यामुळे फ्लॅटवर सगळ्या गोष्टींची धमाल. भरगच्च कार्यक्रम. वाढदिवस, पार्ट्या सारं काही मनसोक्त वातावरण असायचं. अशा मनसोक्त चाललेल्या दैनंदिन जीवनातच शिवा सतत विचारात असायचा की, राजेश- ला घराची ओढ का नाही. शेवटी शिवा निर्णय घेतो की, आपण राजेशच्या आईलाच भेटू. पण तो राजेश- ला हे काही सांगत नाही. एके दिवशी दोघे सकाळी फ्लॅटवर बसून चहा पीत असताना राजेशच्या आईचा फोन येतो, 'बाबांना बरं नाही. तू येऊन जातोस का. मलापण तुला भेटायचं, बोलायचं आहे.' राजेश फोन ऐकतो आणि निर्विकारपणे फोन बंद करतो. शिवा शांतपणे पाहात असतो. असं काय गूढ आहे की, राजेशला आपल्या घराची ओढच नाही. आई- वडील याबद्दल तो कधीच बोलत नाही. दोघांमध्ये अलिखित करार असतो, की राजेशला शिवाने याबाबतीत कुठल्याही मित्राने विचारायचे नाही.




श्रीकांत मोरे

भ्र. ७०२०६०००२४


एके दिवशी शिवा राजेशला म्हणतो, 'राजेश अरं तुझं शिक्षण आई - वडिलांनी केलं. शाळा, कॉलेज आई -वडिलांनी केलं. निवासी शाळेत शिक्षण दिलं म्हणून नाराज आहेस का?, घरापासून लांब आहे म्हणून नाराज आहेस का? राजेश तुटकपणे हं एवढंच उत्तर देतो.

आज सकाळी सकाळी शिवा राजेशला सांगतो, मला आईवडिलांकडे जायचंय. माझी बहीण, भाऊ माझी वाट बघताहेत. तसा शिवा दर आठ - पंधरा दिवसाला घरी जायचा. शिवाचे आईवडीलसुद्धा कसा आहे, राजेशचं सगळं ठीक आहे नं. एक आई बोलत होती. अनेक प्रश्न त्या प्रश्नातून तिची होणारी घालमेल आणि पाणावलेले डोळे पाहून शिवाला नेमका बोध होत नव्हता. हे सारं काय आहे.

**शाळा, कॉलेजपासून मित्रांचा लळा. राजेश शालेय शिक्षण संपवून तो केव्हा तरुणवयाम ध्ये आला हे त्याला कळलंच नाही. ज्या शाळेत तो शिकत होता ती निवासी शाळा होती. वर्षातून तीन - चार वेळा राजेशची आई सविता त्याला भेटायची. राजेशला जसं समजायला लागलं होतं तसं तो आईपासून दूर राहायचा. आईबरोबर भावभावनिक फारसे संबंध त्याचे नसायचे. राजेशचा अतिशय जीवलग मित्र शिवा त्याला विचारायचा, ङ्गराजेश तू खूप वेळा उदास असतोस. आई आली तरी तुला आनंद होत नाही.फ आईचे अन् तुझे नाते एक व्यवहार वाटतो. राजेश म्हणायचा, वेळ आली की सांगेन.**



राजेशकडे आले तर त्यालाही मुलाप्रमाणे वागणूक द्यायचे. तसं राजेशचं शिवाच्या कुटुंबातील सगळ्यांशी जमायचं. राजेशला शिवाच्या कुटुंबाचा पण लळा लागला होता.

शिवा घराकडं जायला निघाल्यानंतर राजेश म्हणतो, 'दोन दिवस सुटी आहे. मीपण येऊ का.' शिवा म्हणतो, 'मला मामाकडे जायचं आहे. मी एकटा जाऊन येतो.' राजेशला आश्चर्य वाटते की मला शिवा नाही का म्हणतोय. पण यावेळेस शिवाच्या मनात वेगळे विचार चालू असतात. शिवा पहिल्यांदाच राजेशशी खोटं बोलत होता. मग शिवा बाहेर पडतो. तो थेट आधी सगळी माहिती काढल्याप्रमाणे राजेशच्या घरी जातो. घरामध्ये गेल्यानंतर एक अत्यंत सात्विक, सोज्वळ आणि खानदानी असं व्यक्तिमत्त्व, पाहताक्षणी आईपण भासावं असं व्यक्तिमत्त्व होतं. शिवाला पाहताच सविताने, 'ये बाळ घरात ये म्हणून हॉलमध्ये बोलावते.' हॉल तसा प्रशस्त. आलेल्या गेलेल्यांसाठी खास सजवलेला. बाजूला एका पुस्तकाच्या कपाटाच्या समोर सुंदरसा टेबल. त्यावर सविता आणि विनायकरावांचा फोटो. थोडा वेळ शांततेत गेल्यानंतर सविता भराभर बोलायला लागते. माझा राजेश

सविता आणि शिवा दोघे दोन तीन तास हॉलमध्ये बसून एकमेकांशी बोलत राहिले. या दरम्यान तिच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू शिवाला खूप काही सांगून जात होते. सविता जवळपास राजेश नऊ वर्षांचा असल्यापासून ते तो २४ वर्षांचा होईपर्यंत पंधरा वर्षांचा जीवनपट असंख्य घटनांचा, सुख- दुःखाचा, भावभावनांचा कल्लोळ सारं काही शिवापुढं मांडत होती. शिवाला हे सारं पाहून लक्षात येत होतं की, आपला मित्र असा का वागतो. तो सविताच्या पाया पडतो. आई म्हणून त्याला आशीर्वाद देते, 'शतायुषी भव...!'

आज शिवाला रात्रभर झोप येत नव्हती. तो विचारमग्न होता. चूक सविताची की राजेशची. राजेश शेजारी शांतपणे झोपलेला होता. एक निरागस बालक झोपतो तसा. पण त्याच्या मनामध्ये जो प्रचंड खोलीचा डोह आहे त्यापासून आईचं प्रेम नेमकं कसं बाहेर काढायचं?, शिवाला सुचत नव्हतं. सविताआई अन् त्याची झालेली भेट ही त्याच्यापुरती मर्यादित असली तरी त्याचं संपूर्ण मन या भीतीने व्यापून टाकलं होतं. सविताचे शेवटचे दोन शब्द त्याच्या मनात गुणगुणत होते, मला राजेश पाहिजे. तो माझ्या काळजाचा तुकडा आहे. आज बरेच दिवस गेल्यानंतर शिवा सकाळीच राजेशला म्हणाला, की राजेश चल आपण गणपतीला जाऊन येऊ. चतुर्थी आहे.

गणपतीला नारळ फोडू. राजेश तसा देवाला मानणाऱ्यांपैकी होता आणि माणुसकीही मानणारा होता. त्याच्या मनात असलेली घालमेल त्याच्या कुटुंबापुरती मर्यादित होती. राजेश स्वतःच्या मनामध्ये तो नऊ वर्षांचा असतानाचा प्रसंग आठवून व्यथित असायचा. नऊ वर्षांचं वय तसं म्हटलं तर थोडं थोडं कळणारं आणि म्हटलं तर नाही कळणारं. जीवनप्रवास, समाज हे एक अजब रसायन आहे. प्रत्येक व्यक्तीचं स्वतःचं एक विश्व असतं. राजेशचं असंच एक विश्व तयार झालं होतं. ज्यात तो अभिमन्यूप्रमाणे स्वतःच्या चक्रव्यूहात अडकलेला होता. या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यानं कधी शोधण्याचा प्रयत्न केला नव्हता. पण त्याच्या जीवनात एक अपूर्णता होती. राजेशला नेहमी गाण आवडायचं, 'आई म्हणोनी कोणी आईस हाक मारी' पण आई असताना त्याला हे गाणं का आवडायचं, हे त्यालाही कळत नव्हतं. आज राजेश आणि शिवा गणपतीला गेले. राजेशच्या डोक्यात मोटारसायकल चालवताना वेगळाच काही तरी विचार चालू होता. पुढच्या क्षणी एक मोठा आवाज होऊन राजेशच्या डोळ्यांपुढं अंधार आला होता. गाडी गतिरोधकाला अडकून पडली पडली होती. राजेशला दोन दिवसांनी शुद्ध आली. शेजारच्या बेडवर राजेशची आई सविता आणि सविताच्या हातामधून रक्त काढून राजेशला देण्यासाठी तयारी चालू होती. राजेश कुठल्याच बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हता. पण एवढं कळत होतं की शिवा, शिवा म्हणून तो हाक मारत होता. राजेशचा रक्तगट आणि आईचा रक्तगट सारखा असल्यामुळे राजेशचं पुनर्जीवन झालं होतं. दोन तीन दिवस विश्रांतीनंतर राजेश बोलण्याच्या मनःस्थितीत येतो.

शिवाला किरकोळ जखमा असल्यामुळं राजेशचा हातात हात घेऊन तो बसलेला असतो. राजेश शिवाला विचारतो, 'काय झालं, कसं घडलं.' शिवा त्याला तीन चार दिवसांचा घटनाक्रम समजावून सांगतो. आपण विनायकराव साठेंच्या हॉस्पिटलमध्ये आहोत. केवळ आईचा रक्तगट मॅच झाल्यामुळेच तुला पुन्हा हे जीवनदान मिळालेलं आहे. गेले आठ दिवस आई तुझ्याशेजारीच बसून आहे. मग शिवा त्याला म्हणतो, 'राजेश आता चक्रव्यूह भेदून टाक. तू आईची भूमिका समजून घ्यायला पाहिजेस.' शिवा खोलीच्या बाहेर जातो. सविता राजेशशेजारी येते. ती आपलं मन मोकळं करते.

राजेश, अरे तू नऊ वर्षांचा असताना तुझ्या वडिलांचा अप- घात झाला. तुला माहीत आहे अन् आपल्या डोळ्यासमोर ते गेले. माझं शिक्षण कमी, मी तुझं बालपण, तरुणपण या समाजामध्ये तुला कसा वाढवला होता. म्हणून विनायकराव साठेंशी मी लग्न केलं. बाळ तुला हे अनाकलनीय आहे. मी केवळ तुझ्या हिताचा विचार करून त्यावेळेला हे धाडसाचं पाऊल उचललं. मी तुझी आहे. वाट्टेल ते त्याग करण्याची माझी तयारी होती. पण बाळा पैशाचे सोंग नाही आणता येत. मी तुझ्यासाठी विनायकराव साठेंशी तडजोड केली. मी विनायकराव साठेंवर अन्याय केला. मी त्यांना लग्नापूर्वी अट घातली होती, राजेशनंतर मला पुन्हा भाऊ, बहीण नको आणि विनायकराव साठेंनी माझी अट मान्य केल्यानंतर हे दुसरं लग्न केलं. मला माहिती आहे तू नाराज झालास. तुझ्या मनात माझ्याबद्दल मला समजून घेण्याइतपत वय नव्हतं. आता तुला हा जीवनपट शिवाकडून समजला असेल. तू माझ्या रक्ताचा मुलगा आहेस. राजेश आईच्या गळ्यात पडून मनसोक्त रडून घेतो. चक्रव्यूह भेदून बाहेर पडतो.

जर भारताला खऱ्या अर्थाने घडवायचे असेल, तर त्याची सुरुवात गावापासून आणि गावातील शाळेपासून झाली पाहिजे. महात्मा गांधींचा हा विचार आजही तितकाच समर्पक वाटतो. कारण भारताची आत्मा आजही गावातच वसलेली आहे. मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे आजही मोठे आव्हान आहे. सोलापूर जिल्ह्यातील बोरामणी येथे हे आव्हान स्वीकारून शिक्षणाचा एक वेगळा प्रयोग गेल्या दीड दशकापासून सुरू आहे. हा प्रयोग म्हणजे कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान आणि त्याअंतर्गत उभी राहिलेली ग्लोबल व्हिलेज ही शैक्षणिक चळवळ. ही केवळ शाळा किंवा महाविद्यालय नाही; तर ग्रामीण भारताचे भविष्य घडविण्याचा एक विचार आहे.

# कै. चनशेट्टी गुरुजींच्या विचारातून उभारली ग्रामीण शिक्षणाची क्रांती






प्रा. अनिकेत चनशेट्टी
भ्र. ९५५२६४६९००





**आदर्श शिक्षकाचे अपूर्ण स्वप्न...**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी हे नाव आजही हजारो विद्यार्थ्यांच्या स्मरणात आदराने घेतले जाते. महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या गुरुजींनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शिक्षणाला समाज परिवर्तनाचे साधन मानले. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा, शिस्त, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी रुजविणे हेच त्यांचे ध्येय होते. त्यांच्या वर्गात पुस्तकातील धडा शिकविला जायचा; पण त्याहीपेक्षा जीवनाचा धडा शिकविला जायचा. ते म्हणायचे– विद्यार्थी फक्त परीक्षा पास होण्यासाठी शिकू नये; तर आयुष्य घडविण्यासाठी शिकला पाहिजे. दुर्दैवाने त्यांचे अकाली निधन झाले. पण विचार कधी मरत नाहीत. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करणे. या भावनेतून त्यांच्या स्मृतिदिनी म्हणजे २ जानेवारी १९९६ रोजी कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठानची स्थापना झाली.

**एका स्वप्नाची सुरुवात...**

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी यांना ग्रामीण भागात अनेक वर्षे अध्यापन करताना एक प्रश्न सतत अस्वस्थ करत होता. गावातील मुलांमध्ये बुद्धिमत्ता कमी नाही; मग डॉक्टर, अभियंते, संशोधक आणि प्रशासकीय अधिकारी शहरातूनच जास्त का घडतात?

**उत्तर स्पष्ट होते...** संधीची कमतरता. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळा, इंग्रजी माध्यम, संगणक, विज्ञान शिक्षण आणि प्रेरणादायी वातावरण यांचा अभाव ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या आड येत होता. म्हणून ठरले. गावातील मुलांना शहरात पाठविण्यापेक्षा शहरातील शिक्षण गावात आणू. याच विचारातून २०११ मध्ये ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलची स्थापना झाली.

**गांधीजींची नई तालीम– आधुनिक रूपात:–**

महात्मा गांधी यांनी मांडलेली नई तालीम ही केवळ शिक्षण पद्धती नव्हती; ती जीवन जगण्याची पद्धत होती.

* शिक्षण हे श्रमाशी जोडलेले असावे.
* शिक्षण हे समाजाशी जोडलेले असावे.
* शिक्षण हे स्वावलंबनाकडे नेणारे असावे.

ग्लोबल व्हिलेजने हाच विचार आधुनिक युगाशी जोडला. येथे विद्यार्थ्यांचा... एक हात मातीत... आणि दुसरा संगणकाच्या कीबोर्डवर... असतो.

ही केवळ घोषणा नाही. ही संपूर्ण शिक्षण व्यवस्था आहे.

विद्यार्थी शालेय बागेत काम करतो. शेती समजून घेतो. झाडे लावतो. मातीचे परीक्षण करतो. आणि त्याच दिवशी संगणक प्रयोगशाळेत जाऊन कोडिंगही शिकतो. हीच खरी नई तालीम.

**नई तालीम आणि NEP–२०२० :–**

आज देशात लागू झालेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) वाचताना गांधीजींच्या नई तालीमची आठवण येते. NEP म्हणते: अनुभवाधारित शिक्षण. कौशल्याधारित शिक्षण. बहुविषयक शिक्षण. मातृभाषेचा वापर. कृतीद्वारे शिक्षण. संशोधन वृत्ती. उद्योजकता. गांधीजींनी शंभर वर्षांपूर्वी हाच विचार मांडला होता. ग्लोबल व्हिलेजमध्ये हा विचार प्रत्यक्षात उतरलेला दिसतो.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अख आणि Robotics-**

काही वर्षांपूर्वी artificial Intelligence हा शब्दही ग्रामीण विद्यार्थ्यांना माहिती नव्हता. आज बोरामणीतील विद्यार्थी रोबोट तयार करतात.

Coding करतात. Sensors वापरतात. arduin वर काम करतात. अखचे प्राथमिक प्रयोग करतात. हे शक्य झाले अटल टिंकरिंग लॅबमुळे.

**विद्यार्थ्यांनी तयार केलेले अनेक प्रकल्प आज ग्रामीण समस्यांवर उपाय शोधत आहेत:–**

पाण्याची बचत. स्मार्ट सिंचन. स्वयंचलित उपकरणे. ऊर्जाबचत. ही सर्व स्वप्ने आता प्रयोगशाळेत आकार घेत आहेत.

**विज्ञान शिक्षणाची गरज:–**

२०१४ पूर्वी या परिसरात बारावी विज्ञान शाखाच नव्हती. विद्यार्थ्यांना शहरात जावे लागायचे. अनेकांचे शिक्षण बारावीनंतर थांबायचे. संस्थेने विज्ञान शाखा सुरू केली. त्यात Crop Science हा अभ्यासक्रमही समाविष्ट केला. कारण... या भागातील विद्यार्थी डॉक्टर झाले तर आनंदच आहे; पण आधुनिक शेतकरी झाले तरी तितकाच अभिमान आहे.

**एक अनुभव...**

**प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी एका कार्यक्रमात म्हणाले होते–**

एका शेतकऱ्याने माझा हात धरून सांगितले, मसर, माझा मुलगा शहरात शिकायला जाऊ शकत नव्हता. आज तो तुमच्या संस्थेत शिकून इंजिनियर झाला. त्या दिवशी मला वाटले– आपले आयुष्य सार्थकी लागले. अशी हजारो कुटुंबे आज या संस्थेशी भावनिकरीत्या जोडली गेली आहेत.

**मुलींच्या शिक्षणाचा नवा अध्याय–**

पूर्वी बारावीनंतर अनेक मुलींचे शिक्षण थांबत असे. कारण... शहर दूर होते, प्रवास महाग होता, आणि पालकांची भीती होती. २०२१ मध्ये ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू झाले. आज अनेक मुली पदवी घेत आहेत, स्पर्धा परीक्षा देत आहेत, रोजगार मिळवत आहेत आणि आत्मविश्वासाने जगत आहेत.

**BCA: डिजिटल भारतासाठी ग्रामीण युवक:–**

ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २०२४ पासून इउ सुरू करण्यात आला. कारण भविष्य संगणकाचे आहे.

AI, Cloud Computing, Cyber Security, Programming, Data Science ही क्षेत्रे आता ग्रामीण विद्यार्थ्यांसाठीही खुली झाली आहेत.

**संस्थेची यशोगाथा:–**

**आज या संस्थेचे अनेक विद्यार्थी–**

MBBS / BMS / B.Pth. शिकत आहेत. Engineering करत आहेत. Pharmacy मध्ये आहेत. griculture मध्ये संशोधन करत आहेत. AI क्षेत्रात कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. ही यादी दिवसेंदिवस वाढत आहे. हीच संस्थेची खरी कमाई आहे.

**शिक्षण म्हणजे समाजनिर्मिती:–**

प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी यांचा एक विचार विशेष लक्षात राहतो–

महाविद्यालयातून पदवीधर बाहेर पडणे महत्त्वाचे नाही; तर जबाबदार नागरिक बाहेर पडणे अधिक महत्त्वाचे आहे. म्हणूनच येथे छड्ड, पर्यावरण, सामाजिक सेवा, रक्तदान, ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, संविधान मूल्ये, विज्ञाननिष्ठा आणि मानवी मूल्ये यांवर विशेष भर दिला जातो.

**भविष्याचा रोडमॅप:–**

**संस्थेचे पुढील ध्येय स्पष्ट आहे: –**

संशोधन केंद्र, कृषी नवोपक्रम प्रयोगशाळा, स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर, कौशल्य विकास केंद्र, AI आणि Robotics सेंटर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहकार्य ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण ही स्वप्ने दूरची नाहीत. ती प्रत्यक्षात आणण्याची जिद्द या संस्थेकडे आहे.

आज शिक्षण क्षेत्रात मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. पण प्रत्येक इमारतीत विचार असतोच असे नाही. बोरामणीतील ग्लोबल व्हिलेज ही केवळ इमारत नाही:

तो एक विचार आहे. तो एक संस्कार आहे. तो गांधीजींच्या नई तालीमचा आधुनिक अविष्कार आहे. तो राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा प्रत्यक्ष प्रयोग आहे. तो एका आदर्श शिक्षकाला वाहिलेली जिवंत आदरांजली आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे– तो ग्रामीण भारताला दिलेला विश्वास आहे की, जग जिंकण्यासाठी शहरात जाण्याची गरज नाही; शिक्षणाची गुणवत्ता गावात आली, तर गावच जग घडवू शकते. कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजींनी पेटविलेला ज्ञानदीप आज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रकाश पसरवत आहे. त्या प्रकाशातून उद्याचा सुशिक्षित, सुसंस्कृत, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला आणि राष्ट्रनिर्मितीसाठी कटिबद्ध भारत घडत आहे. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.




# महातपस्वी श्री कुमारस्वामी जीवन व कार्य





महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उत्कृष्ट गुणवत्तेने पूर्ण केले. त्यानंतर धारवाड येथील कर्नाटक महाविद्यालयात तसेच कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतले. राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांत त्यांनी प्रथम श्रेणीत पदवी संपादन केली. विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्तेचा परिचय दिला.

औपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांनी पूर्व आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, शरीरशास्त्र, पदार्थविज्ञान, योगशास्त्र, मानसशास्त्र आणि विविध धर्मांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी मंत्रयोग, लययोग, हठयोग, कुंडलिनीयोग, राजयोग, लंबिकायोग आणि शिवयोग या सर्व योगसिद्धींचे सखोल साधन करून प्रावीण्य मिळवले होते. विद्यार्थीदशेत पहाटे उठून योगाभ्यास, ध्यान आणि शिवचिंतन हा त्यांचा नित्यक्रम होता. वयाच्या २२ ते तेवीसाव्या वर्षी त्यांनी मलप्रभा नदीकाठी नविलुतीर्थ येथे कठोर तपश्चर्या केली. या साधनेनंतर त्यांनी संपूर्ण जीवन मानवकल्याणासाठी अर्पण करण्याचा संकल्प केला. सन १९३३ पासून त्यांनी वीरशैव तत्त्वज्ञानाचा प्रचार सुरू केला. धारवाड येथील नवकल्याण मठाच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे व्यापक कार्य केले. त्यांनी योग, शिवयोग आणि प्रार्थनायोग यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रचार केला.


राजेंद्र मायनाळ
भ्र. ९९२२९१२४३४


सन १९५७ मध्ये ध्यानावस्थेत त्यांना हे प्रभो प्रसीद ॐफ हा सप्ताक्षरी महामंत्र स्फुरला. पुढे हा मंत्र आंतरराष्ट्रीय प्रार्थना योगाचा मूलमंत्र ठरला आणि जगभरातील हजारो साधकांनी त्याचा स्वीकार केला. २२ ऑगस्ट १९६५ रोजी त्यांनी धारवाड येथे तपोवन या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली. हे केंद्र आजही योग, ध्यान, प्रार्थना, आध्यात्मिक साधना आणि मानवसेवेचे प्रेरणास्थान आहे.

श्री कुमारस्वामीजी यांनी भारतभर प्रवास करून असंख्य प्रवचने दिली. त्याचबरोबर त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, बेल्जियम, हॉलंड आणि इटली या युरोपीय देशांचे दौरे करून भारतीय अध्यात्म, शिवयोग आणि प्रार्थनायोगाचा प्रसार केला. सन १९५३ मध्ये ऋषिकेश येथे झालेल्या जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

१९७२ मध्ये पॅरिस येथे झालेल्या सर्वधर्म परिषदेलाही त्यांनी अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन केले. ही त्यांच्या जागतिक कीर्तीची साक्ष आहे. सन १९५४ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. ८ नोव्हेंबर १९७२ रोजी त्यांनी व्हॅटिकनमध्ये पोप पॉल यांची भेट घेऊन शिवलिंग भेट दिले. विविध धर्मांमध्ये संवाद आणि समन्वय प्रस्थापित करण्याचा हा ऐतिहासिक प्रसंग मानला जातो. १९९० मध्ये तपोवनच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमासाठी बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना अध्यक्ष म्हणून आमंत्रित करण्यात आले. यावरून त्यांच्या सर्वधर्मसमभावाच्या विचारांची प्रचीती येते. श्री कुमारस्वामीजी हे उत्कृष्ट लेखकही होते. त्यांनी कन्नड, हिंदी आणि इंग्रजी भाषेत अनेक ग्रंथ लिहिले असून त्यांनी सुमारे ३० हून अधिक ग्रंथांची निर्मिती केली आहे. यामध्ये इंग्रजी १८ ग्रंथ, कन्नड ११ ग्रंथ आणि हिंदी १ ग्रंथ यांचा समावेश आहे. वीरशैव तत्त्वज्ञान, शिवयोग, प्रार्थनायोग, अध्यात्म, शिक्षण, मानवता आणि विश्वबंधुत्व या विषयांवर त्यांनी मोलाचे साहित्य निर्माण केले.

त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. सारे विश्व हे परमेश्वराचे मंदिर आहे. निष्काम सेवा हीच ईश्वरपूजा आहे आणि सर्वांच्या कल्याणातच स्वतःचे कल्याण आहे. जात, धर्म, पंथ, भाषा किंवा वर्णभेद यापलीकडे जाऊन मानवतेचा संदेश देणे हे त्यांच्या जीवनकार्याचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या कार्याची प्रशंसा देश–विदेशातील अनेक थोर व्यक्तींनी केली आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, बसव समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ बी. डी. जत्ती व काँग्रेसचे धुरंधर नेते एस. निजलिंगप्पा, राष्ट्रपती डॉ. शंकर दयाल शर्मा, सूत्तुर मठाधीश जगद्गुरु श्री शिवरात्री देशिकेंद्र महास्वामी, ऋषिकेश येथील योगी श्री शिवानंद महाराज, बेंगलोरचे श्री श्री रविशंकर, चरमूर्ती वैराग्य शिरोमणी डॉ. श्री सिद्धेश्वर महास्वामी, ज्ञानयोग आश्रम विजयपूर, श्री के. के. शहा (माजी केंद्रीय मंत्री व राज्यपाल, तामिळनाडू) तसेच अनेक विदेशी तत्त्ववेत्ते, विचारवंत, वैज्ञानिक आणि राजकारणी यांनी त्यांच्या कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे. त्याचप्रमाणे विदेशी तत्वेत्ते, वैज्ञानिक, देशातील विचारवंत प्रोसर एम. के. स्पेनस (पाकिस्तान) डॉ. डब्ल्यू पेकॉक (कोलंबो) जॉर्ज ?. सी. एन. (चीन), श्री ब्रँको इहोतोविच (युगोस्लाव्हीया) श्री जे. एम. हॉन्डीस (हॉलंड), क्लॉड चौकॉक्स, मॅडम मार्गारेट, मिस चौकार्ड अखमेल, डॉ बिल कॉक्स (कॅलिफोर्निया), श्री जे. एम. होम्स, परमहंस योगानंद जी (लॉस एंजल्स), स्वामी नाद ब्रम्हानंद न्यूयॉर्क मुक्तकंठाने ग्रंथाची प्रशंसा केली. त्यांच्या प्रेरणेने पुढे सोलापूर येथे श्री कुमारस्वामीजी योगविहार तसेच परदेशात क्रोशियाची राजधानी झाग्रेब येथे शिवयोग विद्यापीठाची स्थापना झाली आणि त्यांच्या कार्याचा जागतिक विस्तार झाला. हा योगविहार श्री कुमारस्वामीजी आंतरराष्ट्रीय प्रार्थना संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असून, स्वामीजींच्या आशीर्वादाने त्यांचे परमशिष्य श्री राजशेखर मडकी यांच्या पुढाकाराने १४ डिसेंबर १९६४ रोजी या संस्थेची स्थापना झाली.

**महातपस्वी श्री कुमारस्वामीजी हे विसाव्या शतकातील एक थोर योगी, तत्त्वज्ञ, आध्यात्मिक विचारवंत आणि मानवतेचे उपासक होते. त्यांचे संपूर्ण जीवन हे आत्मसाधना, प्रार्थना, शिवयोग आणि मानवसेवा यांना समर्पित होते. श्री कुमारस्वामीजी यांचा जन्म २ ऑगस्ट १९०९ रोजी कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील हुणसीकट्टी या गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. लहानपणीच मातृछत्र हरपले आणि काही वर्षांत पित्याचेही निधन झाले. त्यांच्या आजी राधाम्मा आणि नीलम्मा यांनी त्यांचे संगोपन प्रेमाने केले. बालपणापासूनच त्यांना ध्यान, योग आणि ईश्वरचिंतनाची विलक्षण आवड होती. त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वामुळे लोक त्यांना बालयोगी म्हणून ओळखू लागले.**



या संस्थेची धुरा समाजातील विविध स्तरातील लोकांनी नेतृत्व केले आहे. यामध्ये माजी आमदार श्री केशवलाल शहा, माजी आमदार अप्पानी बसवंती, श्री रामचंद्र निम्बर्गीकर, श्री द. मा. लेले., श्री राजशेखर मडकी, सध्या या संस्थेचे मी राजेंद्र मायनाळ हे सन २००२ पासून अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत. योगविहार सोलापूर येथे दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी श्री कुमारस्वामीजी यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. याशिवाय वर्षभर महाशिवरात्री निमित्त शिवयोग साधना, गुरुपौर्णिमा, आरोग्य शिबिरे आणि विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातात. २२ ऑक्टोबर १९९५ रोजी त्यांनी देह ठेवला; परंतु त्यांचे विचार, ग्रंथ, तपोवन, योगविहार आणि प्रार्थनायोग आजही लाखो साधकांना प्रेरणा देत आहेत. महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन हे ज्ञान, तपश्चर्या, योग, मानवता, विश्वबंधुत्व आणि निष्काम सेवेचे अद्वितीय उदाहरण आहे. त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ राहील. (आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ. सोलापूर )

